वाङ्मयांतील

खुसखुशीत मेवा

अथवा

'फिरस्त्या'चे निवडक लेख



प्रकाशकः
श्री. वा. गाडगीळ.

दक्षिण हैद्राबाद येथील महाराष्ट्र वाङ्मय मंडळाचें ३ रें पुस्तक.

खुसखुशीत मेवा

अथवा

'फिरस्त्या'चे निवडक लेख.

प्रकाशकः—

" महाराष्ट्र वाङ्मय मंडळ. "

हैद्राबाद दक्षिण.

मे. १९३४.

किंमत १ रुपया.

हें पुस्तक पुणें पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ येथें आर्यभूषण छापखान्यांत रा. रा. **अनंत विनायक पटवर्धन** यांनीं छापिलें व रा. रा. **श्रीकृष्ण वामन गाडगीळ** चिटणीस 'महाराष्ट्र वाङ्मय मंडळ' यांनीं हैद्राबाद दक्षिण येथें प्रसिद्ध केलें.

प्रकाशकाचें प्राक्कथन

निजाम इलाख्यांतील मराठवाडीचा प्रांत म्हणजे वस्तुतः मराठी भाषेचें माहेरघर. बरेचसे प्राचीन महाराष्ट्र कवी व संत या 'मराठवाडींत'च अवतीर्ण झाले. जनार्दनस्वामीचें दौलताबाद, एकनाथाचें पैठण, मुक्तेश्वराचें औरंगाबाद, दासोपंताची आंबे जागाई, किंबहुना, केशवस्वामीचें भागानगर इ. इ. अनेक स्थळें निझाम इलाक्यांतच आहेत. परंतु सध्यां मात्र परिस्थिति अत्यंत प्रतिकूल झालेली आहे! मराठी भाषेला सध्यां आपलें माहेरच पारखें झालें आहे! परधर्मीय सत्ताधारी आपल्या भाषेचें पूर्ण अभिमानी व येथील लोक मातृभाषेविषयीं पूर्ण उदासीन! अशा स्थितींत येथील मराठी भाषेची दैना काय विचारावी!!

परंतु, आश्चर्याची गोष्ट म्हणजे अशा सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितींत—उत्तेजनाचा पूर्ण अभाव असतांनासुद्धां—इकडील प्रांतीं नांव घेण्यासारखे कांहीं कवि व गद्यलेखक आहेत ही अभिमानाची गोष्ट वाटते. अशा या थोड्या गद्य लेखकांत 'फिरस्त्यां' ची गणना होते. विशेषतः मार्मिक विनोद व वेधक उपरोध यांत त्यांचा हातखंडा आहे. याची साक्ष प्रस्तुत लेखसंग्रहावरून पटेलच. त्यांच्या एकंदर सर्व विनोदी लेखांचाच संग्रह या पुस्तकांत करण्याचा प्रथमतः विचार होता. परंतु तसें केल्यास पुस्तक संकल्पित मर्यादेच्या बाहेर जाणार व ते कांहीं विशिष्ट मंडळींनाच आवडणार म्हणून थोडे थोडे सर्व प्रकार असावेत अशी बऱ्याच जणांची सूचना आल्यावरून पहिले पांच लेख धार्मिक, सामाजिक अशा गंभीर स्वरूपाचे आणि शेवटचे तीन लेख प्रवासवर्णनपर व मधले सर्व विनोदी व उपरोधिक अशी निवड करावी लागली. त्याप्रमाणें वरचे खालचे पापुद्रे जरी कांहींशा गंभीर स्वरूपाचे असले, तरी आंतलें पुरण खुसखुशीत मसाल्याचें आहे. म्हणून आम्ही त्यांस "**वाङ्मयांतील खुसखुशीत मेवा**" असें नांव दिलें आहे. 'प्रादेशिक वाङ्मय' ह्या दृष्टीनेंहि ह्या लेखसंग्रहाचें बरेंच महत्त्व आहे. समाजशास्त्र दृष्ट्या प्रादेशिक लेखांचें फार महत्त्व असतें. निजाम इलाख्यांतील प्रजेची विशेषतः हिंदू प्रजेची मनःस्थिात प्रतिबिंबित करणारे फिरस्त्याचे पुष्कळच लेख आहेत. परंतु त्यांतील दोन, तीनच आम्हांस त्यांत घालतां आले!

निजामविजय हें एकच मराठी भाषेंतील साप्ताहिक पत्र आज तेरा वर्षें हैद्राबादेस चालू आहे. आणि फिरस्त्यांचे बहुतेक लेख या पत्रांतूनच वेळोवेळीं

प्रसिद्ध झाले आहेत. कांहीं थोडे लेख **अरुणोदय माला, राजहंस, मंदार पुष्पमाला** व **विहंगमाला** मासिकांतहि आले आहेत; परंतु हीं मासिकेंहि इकडलींच. ब्रिटिश इलाख्यांतील नियतकालिकांत फिरस्त्याचें लिखाण प्रसिद्ध झालेलें नाहींच म्हटलें तरी चालेल. **नव्याकाळांत** 'फरिष्ता' या टोपण नांवानें स्फुटें लिहिणाऱ्या लेखकांशीं फिरस्त्यांचा कांहीं एक संबंध नाहीं.

निजामविजयांत 'फिरस्त्यां'चे लेख इ. स १९२१ पासून येऊं लागले. ते हा कालपावेतों मधून मधून केव्हां तरी येतातच. ह्या तेरा वर्षांत गंभीर व विनोदी लहान मोठे असे त्यांचे शंभर सव्वाशें तरी लेख आतांपावेतों प्रसिद्ध झाले असतील. त्यांपैकीं जेवढे सांपडले त्यांतून अगदीं निवडक, व सर्वांच्या रुचिभेदाचा विचार करून आम्ही ह्या २३ लेखांचेंच प्रकाशन या पुस्तकरूपानें करीत आहोंत.

हे लेख वर्तमानपत्रांतील म्हणून प्रासंगिक महत्त्वाचे असले तरी त्यांतहि सार्वकालीन, संग्राह्य तत्त्वांचें आपल्या विनोदी पद्धतीनें 'फिरस्त्यांनीं' सुंदर ग्रथन केलेलें दिसेल! सारांश थोर मनाच्या खोल खळबळीचें गोड आविष्करण प्रस्तुत लेखांत वाचकांना निःसंशय आढळून येईल.

प्रथमतः आभार मानावयाचे म्हणजे मराठी भाषेंतील सुप्रसिद्ध विनोदी लेखक **श्री. प्र. के. अत्रे** B. A. B. T. T. D. ह्यांचे अनेक व्यवसायव्यापृतत्वामुळें वेळ नसतांही त्यांनीं वेळांत वेळ काढून यांतील कांहीं लेख वाचले, आणि विस्तृत, व अत्यंत मार्मिक प्रस्तावना लिहून दिली त्याबद्दल 'मंडळ' त्यांचें अतिशय आभारी आहे.

हे लेख संग्रहित करून पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याबद्दल बऱ्याच सन्मित्रांची बऱ्याच दिवसांची इच्छा होती. परंतु फिरस्त्यांनीं पुस्तक छापण्यास जर परवानगी दिली नसती, तर त्यांची ती इच्छा पूर्ण झाली नसती म्हणून खुद्द **फिरस्त्यांचे** आणि बऱ्याच महत्त्वाचे निजामविजयाचे मागील अंक देऊन उपयुक्त सूचना केल्याबद्दल श्रीयुत **रा. फाटक संपादक निजामविजय** यांचें जितके आभार मानावे तितके थोडेच होतील.

शेवटीं 'आर्यभूषण' मुद्रणालयाच्या व्यवस्थापकांनीं थोड्या अवधींत केलेल्या उत्तम कामाबद्दल त्यांचे आभार मानणें माझें कर्तव्य आहे. मंडळाकडून अशीच वाङ्मयसेवा घडो. इत्यलम्.

सर्वांचा कृपाकांक्षी,
श्रीकृष्ण वामन गाडगीळ
चिटणीस, महाराष्ट्र–वाङ्मय–मंडळ.

फिरस्त्याची ओळख

कांहीं कांहीं माणसांच्या ओळखी फार लवकर होतात; ' फिरस्त्या ' च्या बाबतींत माझें असेंच झालें. ते तर बोलून चालून ' फिरस्ते ' च ! उन्हाळ्याच्या सुट्टींत आले आपले भटकत भटकत पुण्यांत ! आणि बरोबर पडशींत आपल्या खुसखुशीत लेखांचा मेवाही घालून आले. मे महिना म्हणजे पुण्यांत त्या वेळीं वाङ्मयाचा उरूसच भरतो म्हणाना ! चहूंकडे गुन्हाळेंच गुन्हाळें सुरूं होतात कुठें व्याख्यानाचीं-कुठें उंसाच्या रसाचीं ! पुष्कळ वेळां दोन्हीही पांचटच असतात. अशा एका गुन्हाळावर आमची दोघांची गांठ पडली. चार दोन गोष्टी झाल्या नाहींत तोंच ' फिरस्त्या ' नें आपल्या मिठ्ठास वाणीनें व रुबाबानें मनाला पकड घातली; पडशींतून ' मेवा ' बाहेर काढला चटकन् ! आणि सांगितलें कीं टाका आपल्या ओळखीच्या लोकांमध्यें वांटून ! आतां ' नाहीं ' कसें म्हणायचें ? असल्या गोड कामाला नाहीं कोण म्हणणार ? म्हणून 'होय' म्हटलें ! त्या रुकाराच्या पोटीं या लिखाणाचा जन्म झाला ! 'फिरस्त्या' च्या कल्पना सृष्टींत 'लेखक' व 'कवि' तयार करण्याचा जो प्रचंड कारखाना अस्तित्वांत आला आहे (पान ६९) त्यात एखाद्या साहित्यसम्राटाला गांठून त्याच्याकडून प्रस्तावना कशी लुंगवावी याचा दोन वर्षांचा स्पेशल कोर्स ठेवलेला आहे. या कलेवर खुद्द 'फिरस्त्यां'चें एवढें मोठें प्रभुत्व आहे कीं त्यानें माझ्यासारख्या साहित्य-किंकराकडून चुटकीसरशीं प्रस्तावना उपटली ! अशा रीतीनें मला ' बनविण्यां ' त त्यांच्या कलेचा फारसा गौरव होत नसला आणि त्यामुळें माझा बावळटपणा अधिक उघडकीला येत असला तरी त्यामध्यें या ' मेव्या ' चा आस्वाद मला सर्वांच्या आधीं घ्यावयाला मिळाला या कल्पनेनें तरी मला अतिशय समाधान वाटत आहे.

' फिरस्त्या 'च्या चेहेऱ्यावरून जशी त्यांच्या विनोदसमीक्षक वृत्तीबद्दल एखाद्याचा गैरसमज होईल, तशी त्यांच्या या पुस्तकाच्या बाह्यांगावरून व सुरुवातीलाच घातलेल्या तात्त्विक व गंभीर लेखावरून त्यामधील खुसखुशित माधुर्याची प्रथमतः च कल्पना होणार नाहीं. ' फिरस्ते ' हे मराठी साहित्यांतून फेरफटके मारणारे कांहीं नवखे मुशाफर नव्हत, हें या पुस्तकांतील चारदोन पानें उलटतांच कोणाच्याही लक्ष्यांत येईल. गेलीं तेरा चौदा वर्षे त्यांचा साहित्यिक प्रवास हैद्राबाद संस्थानाच्या हद्दीच्या आंत चाललेला आहे. इकडच्या भागांतील कांहीं

मराठी वाङ्मयाला हैद्राबादी हद्दींत पाऊल टाकण्याला जशी बंदी आहे तद्वत् आमच्या उपेक्षेमुळें तिकडच्या जातिवंत वाङ्मयाला या बाजूस वळण्याच्या बाबतींत जणूं काय पायबंदी बसली आहे ही खरोखर दुःखाची गोष्ट आहे. नाहींतर 'फिरस्त्या 'ची ओळख पुण्यामुंबईकडच्या महाराष्ट्राला या पूर्वींच झाली असती व त्यांचा मेवा मिटक्या मारून खाणारे अनेक रसिक यापूर्वींच निर्माण झाले असते.

या पुस्तकांत संग्रहीत झालेल्या २३ लेखांत 'फिरस्त्या' चे सर्व वाङ्मयात्मक गुण प्रकट झालेले आहेत. जुन्या वाङ्मयाशीं व त्यांतील विचारपरंपरेशीं त्याची किती जानपछान आहे याचे पुरावे जागोजाग पहावयास मिळतात. मूर्तिपूजेची व सुखाची तात्त्विक मीमांसा ते जितक्या अधिकारवाणीनें व सौकर्यानें करूं शकतात तितक्याच मार्मिक रसिकतेनें व सुलभतेनें गिरसप्पाच्या धबधब्याचें किंवा महाबळेश्वराच्या सृष्टिसौंदर्याचें काव्यमय वर्णन ते करूं शकतात. थोडक्या व वेचक शब्दांत सूक्ष्म अर्थ व्यक्त करण्याची शक्ति त्यांच्या भाषापद्धतींत आहे यावरून त्यांनीं साहित्याच्या आखाड्यांत चांगलीच मेहेनत करून ताकद कमावली आहे असें दिसून येतें.

तथापि या पुस्तकाचें वैशिष्ट्य त्यांतील तात्विक लेखांत नाहीं किंवा पान ३६ वर दिलेल्या हिंदुधर्म संस्काराच्या जंत्रींत नाहीं. या पुस्तकाच्या गाभ्यांतील गोडी ज्याला चाखावयाची आहे त्याला 'जदीद गणपति व कदीम गणपति' (पान ४६) या लेखापासून सुरुवात करावी लागेल व 'जलसे बिदाई' (पान १३८) या लेखानें समाप्ति करावी लागेल. म्हणजे, 'फिरस्त्या' च्या लेखणींत विशुद्ध विनोद निर्माण करण्याचें केवढें सामर्थ्य आहे हें दिसून येईल. आजकाल मराठींत विनोदी लेख लिहिण्याची एक ठराविक चाकोरी पडलेली आहे. नवीन विनोदी लेखकांच्या लिखाणाची गाडी या चाकोरींतून बाहेर पडणें जवळ जवळ अशक्य असतें. पण 'फिरस्त्या' चें हें कांहींसे गंभीर स्वरूपाचे विनोदगर्भ निबंध वाचून आज मराठी वाङ्मयांत एक विनोदनिर्मितीचा नवीन प्रकार उपलब्ध झाला आहे असें मला वाटतें. आजकाल मराठींत 'प्रांतिक' साहित्याचा सत्कार होत आहे हें योग्यच आहे. 'फिरस्त्या' च्या विनोदांत हैद्राबादी वातावरणाचे, तेथील ऐसपेस नबाबी आयुष्यक्रमाचे व मुसलमानी भाषा व रहाणीचे इतके मजेदार पडसाद उमटले आहेत कीं ह्यामुळें त्यांच्या या विनोदांत

एकप्रकारचें प्रांतिक वैशिष्ट्य उत्पन्न झालें आहे. तथापि त्यामुळें इतर प्रांतीय वाचकाला त्या विनोदांतील गोडीचा आस्वाद घेण्यास यत्किंचितही अडचण होत नाहीं असा मी निर्वाळा देऊं शकतों.

विसंगति, विरोध, अतिशयोक्ति, उपरोध इत्यादि विनोद निर्माण करण्याचीं सर्व साधनें 'फिरस्त्या'नें वापरलीं असून शब्दनिष्ठ, कल्पनानिष्ठ, प्रसंगनिष्ठ, स्वभावनिष्ठ, इ० विनोदाचे सर्व प्रकार त्याच्या लेखांत आढळून येतात. प्रचलित समाजांतील दोषावर व विशेषतः हैद्राबाद संस्थानांतील मुसलमानी अंमलामुळें उत्पन्न झालेल्या हिंदूंच्या चमत्कारिक परिस्थितीवर 'फिरस्त्या'नें अशा कौशल्यानें फटकारे लगावले आहेत कीं, अंगाला तर लागतें आणि रक्त तर कांहीं निघत नाहीं. ते हंसविण्यसाठीं गुदगुल्या करतात आणि गुदगुल्या करतां करतां बारीक चिमटे घेतात! कित्येक वेळीं आपल्याला गुदगुल्या होत आहेत का चिमटे बसत आहे हेंच मुळीं कळत नाहीं. फार हंसतांना कित्येक वेळां माणसाचा चेहेरा रडका होतो व डोळ्यांतून पाणी गळू लागतें ही शारीरिक परिस्थिति 'फिरस्त्या'च्या या विनोदपद्धतीला एका दृष्टीनें उपकारकच म्हटली पाहिजे.

गजाननाच्या पाठीमागें 'जदीद' व 'कदीम' हीं म्लेंच्छ विशेषणें लागल्यामुळें त्याला या अन्यायाची दाद लावण्यासाठीं स्वर्गांत विष्णुपर्यंत ज्या चकरा घालाव्या लागतात, जागोजाग व्हिजिटिंग कार्डें, शिफारस पत्रे, व मोदकाची लालूच 'समर्था घरीच्या श्वानाना' जी द्यावी लागते त्याचें अत्यंत मार्मिक वर्णन 'फिरस्त्या'नें केलें आहे. सरकारी अधिकाऱ्यांच्या अनेक चक्रें असलेल्या यंत्रांतून एखादें क्षुल्लक कार्य साधतांना माणसाला जी प्रचंड यातायात करावी लागते त्यावर हें रूपक फार समर्पक आहे असें वाटतें. उपरोक्त वर्णनांत "श्री विष्णु आपल्या शेषशाईच्या आरामखुर्चीवर बसून 'जगद्वृत्त' वर्तमानपत्र वाचीत बसले होते" अशा तेजस्वी विनोदछटांची पखरण अधून मधून पेरलेली आहे.

'आमच्या गांवांतील मोटारसर्व्हिस' हा निबंध फिरस्त्याच्या विनोदाचा एक नमुनेदार मासला आहे. वर्णनात्मक विनोदाचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. "पुढें केसाचा झुबका डोकावत आहे व मागें रूमी टोपीचा गोंडा लोळत आहे, अंगांतील शर्ट छातीवर फाटलेला आहे व त्यावर काळा कोट अडकविलेला आहे

अशी एक साधारण काळीकुळकुळीत व्यक्ती सिगारेटचा धूर सोडीत डुलत डुलत मोटारीकडे येत असतांना दिसली. हे कंडक्टरसाहेब येतांच त्यांनीं 'सब लोक उत्तर जाव! सामान तोलनेका है' असा हुकूम फर्माविला! हें कंडक्टर साहेबाचें शब्दचित्र किंवा 'हिंदु समाज जातिभेदानें जसा विस्कळीत झाला आहे त्याप्रमाणें मोटारीच्या फळ्या खिळखिळ्या झाल्या होत्या, मोटारीच्या चाकांना व लोखंडी भागांना स्नेहयुक्त वागविलें जात नसल्यामुळें त्यांची अंत्यजाप्रमाणें किरकिर सुरू झाली होती इ० हें वर्णनही बहारीचें आहे. मोटारीच्या खेंचाखेंचींत **अमीन साहेब** आपला जनाना घेऊन व बरोबर एक मुर्गीचा टोकरा, सुरई इ० सामान घेऊन शिरतात व त्यामुळें आंतील माणसांना मडगार्डवर व बाहेर फळ्यांवर बसावें लागतें. त्या दृश्याचें वर्णन 'फिरस्त्या' नें फारच बहारीचें केलें आहे, "माणसांनीं वेष्टिलेला हा लहानसा पर्वत रस्त्यानें धांवत चालला होता. एखाद्या मेलेल्या मोठ्या किड्याला चोहोंबाजूनें अनेक मुंग्या तोंडांत धरून जशा ओढीत नेतात त्याचप्रमाणें आमच्या मोटारीला चोहोंबाजूनें माणसें पळवून नेत आहेत असेंच कोणास वाटलें असतें' फिरस्त्याचें हें अवलोकन फारच मार्मिक आहे. नेहेमींच्या पद्धतीप्रमाणें शेवटीं वाटेंत मोटार नादुरुस्त होते. त्या वेळीं ड्रायव्हरनें आपल्या अश्लील शब्दसंग्रहाचें जें प्रदर्शन केलें तें वर्णनही मजेदार आहे. "आम्ही खिन्न अंतःकरणानें आपल्या हातून मागें कोणतें पाप झालें याचें चिंतन करीत बसलों" हें असहाय उतारूंच्या अंतःस्थितीचें वर्णन जितकें विनोदी आहे तितकेंच हृदयस्पर्शी आहे.

'दातांचा उपयोग' ह्या निबंधांतील विनोद कोटी-प्रधान आहे. केस पांढरे होऊं लागले म्हणजे दांत काळे करतात' हें एक त्यांतील मासलेवाईक वाक्य आहे. "खऱ्या दांतांपेक्षां 'दाखविण्याच्या दांतांचा' व्यवहारांत अतिशय उपयोग होतो" या कल्पनेंत या निबंधाचा उत्कर्ष झाला आहे.

'लेखक व कवि तयार करण्याचा प्रचंड कारखाना' हा लेख अभिनव असून त्याचा पूर्वी इतर लेखकांनीं वाङ्मयांत निर्माण करून लिहिलेल्या विनोदी कारखान्याशीं कसलाही संबंध नाहीं. होतकरू कवींचे व लेखकांचे 'जिनिंग प्रेस'नें गठ्ठे बांधून त्यांचेवर 'प्रतिभे'च्या 'व्हायोलेट किरणा'चे संस्कार करावयाचे त्यांच्या लिखाणांत 'ओघ' यावा म्हणून त्यांना कृत्रिम पाण्याच्या प्रवाहांत सोडून द्यावयाचें, रसोत्पत्तीसाठी त्यानां निरनिराळे खाद्यपदार्थ द्यावयाचे व ग्रंथ-

प्रकाशनासाठीं कर्ज काढण्याची (व तें बुडवण्याची) त्यानां कला शिकवावयाची वगैरे कारखान्याचें वर्णन जितकें विनोदी तितकेंच टीकात्मक आहे. 'हिंदु मुसलनांच्या एकीची वाटाघाट' हा एक उपहासात्मक (Satire) निबंध आहे. हिंदु-मुसलमानांचें वरकरणी ऐक्य घडवून आणण्याचे प्रयत्न कसे हास्यास्पद रीतीनें होत असतात याचें हें एक मार्मिक संवादात्मक चित्र आहे.

'येथून तेथून चुकलेली खानेसुमारी' हा एक तेजस्वी विनोदाचा नमुना आहे. मनुष्याची खानेसुमारी करतांना ठराविक रकान्यांतून जी आपण मामुली माहिती भरून घेतों ती वस्तुत: किती चुकीची आहे हें यांत मोठ्या सूक्ष्मतेनें दाखविलेलें आहे. माणसासारखीं माणसें दिसत असतांना, पण त्यांच्या हातून पशूंना लाजविणारीं कामें होत असतांना त्यांची मनुष्य या नांवाखालीं फिरून गणना करणें, ज्यांना मनुष्य धर्म देखील माहित नाहीं अशाच्या नांवापुढें हिंदुमुसलमानादि धर्मांचीं नांवें घालणें, कुळांच्या रक्तावर पोसलेल्या सावकारांना अहिंसावादी जैन आहे असें म्हणणें, एक वर्षाच्या मुलाचा धंदा कसाई व सहा महिन्यांच्या मुलीची भाषा कानडी आहे असें नोंदणें या खानेसुमारींतल्या अत्यंत ढोबळ चुका आहेत असें या लेखांत दर्शविलेलें आहे. विनोद व टीका यांचें उत्कृष्ट समभाग संमिश्रण या निबंधांत आढळून येतें.

'दांपत्यकलह' हें एक विनोदी रूपक आहे. या रूपकाची बैठक जरी जुन्या तऱ्हेची असली तरी खुलावटींत मात्र ताजेपणा भरलेला दिसतो. सदाचारपंताच्या **नीति** नामक कन्येचें **धर्माशीं** लग्न लागलें. पण या **धर्म**नामक जांवईबुवानें पुढें इतका अनर्थ माजविला कीं त्यामुळें **नीति-धर्म** यांचा संसार म्हणजे एक निव्वळ फार्स झाला. "**रूढी** नांवाची तात्पुरत्या घरकामासाठीं म्हणून एक दासी ठेविली होती. परंतु **धर्म** इतका निर्लज्ज झाला कीं ह्या दासीशींच त्यानें सलगी आरंभिली. आणि कामातुराणां न भयं न लज्जा या वचनाप्रमाणें शास्त्राद्रूढिर्बलीयसी असें म्हणून या रूढीस त्यानें उपवस्त्र म्हणून खुशाल घरांत घालगलें. एकदां लग्नाची बायको म्हणविल्यानंतर **नीति** बिचारी करती काय. मनांतल्या मनांत कुढून ती अगदीं झुरणीस लागली. **रूढी**च्या नादीं लागून **धर्म** तर पुढें पुढें भलभलतेंच करूं लागला. तो फाल्गुन शुद्ध पौर्णिमेच्या दिवशीं मोठ्यानें शंखध्वनि करूं लागला इ० ......" नीतिप्रधान व उपदेशात्मक स्वरूपाचें एऱ्हवीं अत्यंत कंटाळवाणें वाटणारें लिखाण अशा विनोदाच्या बैठकीवर किती मजेदार वाटतें त्याचें हा लेख हें एक चांगलें उदाहरण आहे.

'अर्थशास्त्रांतील एक काटकसर' या लेखांत काटकसर या गद्य व रुक्ष विषयाला विनोदी कलाटणी देण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. '**चित्रमयजगतांत लंघन** या विचित्र विषयाचें **अजीर्ण** होईपर्यंत प्रतिपादन केलेलें आढळतें' अशा तऱ्हेचीं 'फिरस्त्या' चे विनोदनैपुण्यवैशिष्ट्यानें दर्शविणारीं वाक्यें या लेखांत आहेत. अधिकाऱ्यांना प्रवासाच्या भत्त्याप्रमाणें 'ड्रेस अलावन्स' किंवा 'चिरूट अलावन्स' मिळावा ही लेखकाची सूचना मनोरंजक आहे. कारण 'साध्या तोंडांतून निघालेल्या शब्दापेक्षां तोंडाच्या एके बाजूस दातांनीं दाबून धरलेल्या चिरूटामुळें होणाऱ्या बोबड्या बोबड्या उच्चारानेंच हाताखालील कारकून लोक जास्त वचकतात !"

'जलसे बिदाई' हा 'फिरस्त्या'च्या विनोदी लेखाचा मेरुमणि आहे. हैद्राबाद संस्थानांत अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या म्हणजे त्यांना निरोप देण्याचे जे समारंभ साजरे होतात त्याला 'जलसे बिदाई' असें म्हणतात. अधिकाऱ्यांच्या भयानें वरकरणी सन्मानाचा जो देखावा गरीब रयतेला किंवा दुय्यम नोकरांना मनाविरुद्ध करावा लागतो त्याचा पोकळपणा फारच बहारीनें व्यक्त केलेला आहे. प्रसंगनिष्ठ विनोदाचीं उदाहरणें यामध्यें विशेष आहेत. एका समारंभाला एकच हार आणण्यांत आला. पण ऐन वेळीं अनेक अधिकारी आले. तेव्हां अनेक तुकडे करून ते गळपट्ट्याप्रमाणे प्रत्येकाच्या गळ्यांत दाबून दडपून घालण्यांत आले. एकदां दुय्यम तालुकदार साहेबांना मानपत्र द्यावयाचें होतें, पण ऐनवेळीं मानपत्राचा खर्डा लिहून देण्यास कोणी न मिळाल्यानें समारंभाच्या चालकांनीं कांहीं दिवसांपूर्वीं इंजीनिअरिंग खात्यांतील सब्. डिव्हिजनल ऑफिसरला दिलेलें मानपत्र नांव बदलून दडपून दिलें. आणि त्यामुळें सडका, तलाव व इमारती बांधण्याचें श्रेय अचानकपणें दुय्यम तालुकदार साहेबांच्या पदरांत पडलें ! हें प्रसंगनिष्ट विनोदाचें उत्कृष्ट उदाहरण आहे. अशा प्रसंगीं भाषण करणारे वक्ते दुःखप्रदर्शन करण्याच्या ओघांत कसे वाहवत जातात याचे एक हास्यास्पद उदाहरण लेखकानें दिलें आहे. अमुक अमुक साहेबाची आज बदली झाली आहे व त्यामुळें सगळ्या दुनियेंत दुःख पसरलें आहे हें अतिशयोक्त काव्यात्मक वर्णन करतां करतां एक मौलवी साहेब बोलून गेले कीं "झाडो के पत्तो पत्तो मे अफसोस की हवा बहर ही है !" एकदां तर एका मौलवीनें बदली कोणत्या अधिकाऱ्याची झाली आहे हें माहीत नसतां दुसऱ्याची बदली झाली

आहे असें कल्पून दणदणीत भाषण केलें. शेवटीं त्याला जेव्हां खरा प्रकार कळला तेव्हां त्यांनीं आतांच केलेलें भाषण दुसऱ्या अधिकाऱ्याना पण लागू आहे अशी पगडी (किंवा रूमी टोपी) फिरवली ! सदर निबंध 'फिरस्त्यां'च्या प्रांतिक विनोदाचें एक घवघवीत उदाहरण आहे.

अशा तऱ्हेनें मराठी वाङ्मयांत आज जाहीर रीतीनें 'फिरस्त्या'चें विनोदी लिखाण नमूद होत आहे, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. केवळ विनोद निर्माण करण्यासाठीं किंवा वाचकांना हंसविण्यासाठीं 'फिरस्त्या'नें आपला विनोद निर्माण केला नाहीं. त्याचा विनोद हेतुप्रधान व तत्त्वदर्शी आहे. तथापि कला व तत्त्व यांचे मिश्रण बनवितांना कलेचें मनोरंजकत्व व आकर्षणीयत्व नाश न पावेल इतक्याच बेतांनीं त्यानें तत्त्वाचे थेंब आंत टाकले आहेत. हेंच त्यांच्या विनोदाचे वैशिष्ट्य आहे. यांच्या विनोदानें वाचक हसतां हसतांच एकदम गंभीर बनेल व ही गोष्ट हंसण्यावारी घालविण्यासारखी नाहीं. याच्या आंत कांहीं तरी मख्खी आहे अशी जाणीव त्याच्या मनांत जागी होईल.

मला असें कळलें कीं या संग्रहाव्यतिरिक्त फिरस्त्या' जवळ विनोदी लेखांचा आणखीहि भरणा आहे. असें असेल तर ज्या 'वाङ्मय मंडळानें' प्रस्तुतचा 'मेवा' रसिकांपुढें मांडला त्यानेंच त्या 'मेव्या'चा रतीब कांहीं काळ तरी रसिकांना पुरविण्याचें श्रेय घ्यावें !

महाराष्ट्रांत विनोदवृत्ति असलेल्या लोकांची जशी वाण आहे तशी महाराष्ट्र-साहित्यांत निर्मळ विनोदाची अत्यंत आवश्यकता आहे. ही उणीव 'फिरस्त्या'नें आपल्या वैशिष्ट्यपूर्ण विशुद्ध विनोदानें आज थोड्या अंशानें तरी भरून काढली याबद्दल त्याचें अभिनंदन करणें युक्त आहे. यापुढें 'फिरस्त्या' नें हैद्राबाद संस्थानच्या हद्दींतच चकरा मारीत बसण्याचें सोडून अधूनमधून आमच्या प्रांता-कडेही फेरफटके मारीत जावें. व आपला 'मेवा' विकण्याच्या एजन्सीज् त्यांनीं इकडच्या नियतकालिकांना द्याव्यात. या योजनेमुळें त्यांच्या गुणांची वृद्धि झाली नाहीं तरी निदान त्यांची प्रसिद्धी तरी होईल. आणि हा कांहीं थोडा फायदा नाहीं ! मागें एका व्याख्यानांत मीं सांगितलें होतें कीं अलिकडे प्रत्येक लेखकानें आपल्या पदरीं एकादा नगारेवाला बाळगणें आवश्यक झालेलें आहे. त्याशिवाय लोक डोळे उघडून तुमच्या लिखाणाकडे बघणें शक्य नाहीं. 'फिरस्त्या'

सारख्या लेखकांना देखील नगाऱ्याची आवश्यकता असावी हें दुर्दैव आहे. म्हणून प्रस्तुतच्या प्रस्तावनेदाखल लिहिलेल्या लेखाचा, त्याच्यांतील पोकळपणामुळें जर नगाऱ्यासारखा उपयोग झाला व त्यामुळें 'फिरस्त्या 'च्या मेव्याकडे महाराष्ट्रीयांचें अधिक लक्ष्य वेधलें तर माझ्या या घाईघाईनें उरकलेल्या कामगिरीबद्दल मला कांहीं तरी समाधान वाटेल.

३१ मे १९३४ प्रल्हाद केशव अत्रे

अनुक्रमणिका.

मूर्तिपूजेची मीमांसा.

जगामध्यें दोन प्रकारचे लोक असतात. श्रद्धावान् आणि अश्रद्ध; अथवा संशयी स्वभावाचे. श्रद्धावानांच्या दृष्टीनें आजच्या विषयाचा विचार करावयाचा नाहीं. जे अश्रद्ध आहेत, ज्यांचा स्वभाव संशयी आहे; ज्यांना अवैदिक बौद्धिक शिक्षण मिळून तर्कदृष्टिच ज्यांची वाढलेली आहे, अशांची समजूत पटणें सर्वस्वी अशक्यच असलें तरी त्यांचा तर्कही कोठें लंगडा पडतो हें त्यांस दाखवावयाचें आहे, केवळ तर्काच्याच दृष्टीनें या विषयाचा विचार केला तरी मूर्तिपूजेची उपयुक्तता विचारी मनुष्यास पटली पाहिजे, असें वाटतें. या विषयाचे तीन विभाग होतात. तर्कशास्त्राच्या अग्निरथांत बसून या विषयाच्या विचाराच्या प्रवासाला आरंभ केला, म्हणजे मुक्कामास पोहचेपर्यंत आपणांस तीन स्टेशनें लागतात.

१. सर्वव्यापी व सर्वशक्तिमान् अशा परमेश्वराची प्रतिमा करतां येते काय?

२. पूजेनें व स्तुतीनें ईश्वर प्रसन्न होतो काय?

३. प्रसन्न झाल्यावर त्यास दया दाखविण्यास मार्ग आहे काय?

हिंदुधर्मामध्यें व इतर धर्मांत सूक्ष्मतर पुष्कळच भेद आहेत. परंतु सर्वांस दिसणारा अत्यंत स्थूल भेद म्हणजे हिंदुधर्मांतील **मूर्तिपूजा** होय. ईश्वरोपासना हें सर्व धर्मांचें प्रधान अंग आहे. परंतु मूर्तिद्वारा ही ईश्वरोपासना हा हिंदुधर्माचा विशेष आहे. हिंदुधर्मावर जे अनेक शतकांपासून हल्ले झालेले आहेत; व सध्यांहि होत आहेत, ते ह्या विग्रहोपासनेवरच होत आहेत. ईश्वराचें अथवा 'पराब्रह्माचें' अव्यक्त, निराकार, निर्गुण, सर्वशक्तिमान्, सर्वव्यापी अशा तऱ्हेचें वर्णन करून त्या अव्यक्ताला व्यक्त करावयाचें. निराकाराला चार हात, दोन पाय, गजमस्तक असा आकार द्यावयाचा; निर्गुणाला, 'तूं दयाळु आहेस. न्यायी आहेस. भक्तकामकल्पद्रुम आहेस' इत्यादि गुण लावावयाचे. त्या अनंताला एकाद्या कोनाड्यांत किंवा संबळींत कोंडून ठेवावयाचें, त्याला सर्वशक्तिमान् म्हणून आपल्या हातानें पाटावरून ताम्हनांत व ताम्हनांतून पाटावर उचलून ठेवावयाचें. या

असंबद्धपणाला काय म्हणावें ? हा वदतोव्याघात धर्मांत झाला तरी संभवतो कसा ? आमच्या पूजेंतही

पूर्णस्यावाहनं कुत्र सर्वाधारस्य चासनं ॥
स्वच्छस्य पाद्यमर्घ्यंच शुद्धस्याचमनं कुतः ॥ १ ॥
निर्मलस्य कुतः स्नानं वासोविश्वोदरस्य च ॥
निरालम्बस्योपनीतं रम्यस्याभरणं कुतः ॥ २ ॥
निर्लेपस्य कुतो गंधः पुष्पं निर्वासनस्य च ॥
सुगंधस्य कुतो धूपः स्वप्रकाशस्य दीपनं ॥ ३ ॥
नित्यतृप्तस्य नैवेद्यं ताम्बूलं च कुतः शुचेः ॥
फलदस्य फलं किंवा लक्ष्मीनाथस्य दक्षिणाम् ॥ ४ ॥
स्वयं प्रकाशमानस्य कुतो नीराजनं भवेत् ॥
वेदवाचामवेद्यस्य कुतः स्तोत्रं विधीयते ॥ ५ ॥
प्रदक्षिणमनन्तस्याद्वितीयस्य कुतो नतिः ॥
अन्तर्बहिश्च पूर्णस्य कथमुद्वासनं भवेत् ॥ ६ ॥

इत्यादि मंत्र सर्व पूजा करून आम्ही म्हणत असतों; म्हणजे आम्ही ईश्वरस्वरूप जाणूनच मूर्तीची पूजा करितों. याचा अर्थ काय ? मुसलमान ख्रिश्चन इत्यादि परधर्मीय व ब्रह्मसमाजिष्ट, आर्यसमाजिष्ट इत्यादि हिंदु म्हणविणारे मूर्तिपूजा-विरोधकाचे दोन मुख्य आक्षेप मूर्तिपूजकावर आहेत ते असेः-

१ मूर्तिपूजेनें ईश्वराच्या सत्य स्वरूपाचें अज्ञान स्वीकारणें.

२ मूर्ति करून त्या परमेश्वराची विटंबना करणें,

परंतु आमच्या पूजेचे सर्व मंत्र व इतर स्तोत्रें पाहिलीं म्हणजे हे दोन्ही आक्षेप वृथा आहेत असेंच कबूल करावें लागेल. मातीची किंवा दगडाची मूर्ति केली, तरी ती माती किंवा तो दगड, फार काय ती मूर्ति एवढाच काय तो ईश्वर अशी आमची केव्हांही भावना नसते. आम्ही मूर्तीवर शरीरी ईश्वराची प्राण-प्रतिष्ठा करितों. अर्थात् त्या शरीरास ईश्वराचें प्रतीक मानितों; आणि सृष्ट पदार्थास सर्वज्ञ ईश्वराचें प्रतीक समजतों. अशी प्रतिमा, असें प्रतीक मानण्याची अवश्यकता काय ? तर अनंत, सर्वव्यापी, निराकार, अव्यक्त अशा परमेश्वराचें आकलन आम्हा देहेंद्रियधारी सामान्य पामर जनांना व्हावें. तें नुसत्या शब्दानें

होणें शक्य नाहीं म्हणून हेंच त्याचें उत्तर. ईश्वरसृष्टींत, ईश्वराप्रमाणें नसल्या तरी कांहीं अपेक्षेनें अनंत, सर्वव्यापी, निराकार, अव्यक्त अशा वस्तू आहेत काय ? आणि आम्ही त्यांचें अकलन कसें करितों ? ह्याचा विचार करूं.

'**हवा**' ही एक सर्वव्यापी व निराकार अशी वस्तू आहे. परंतु ह्या हवेचा फायदा आम्हांस व्यवहारांत करून घ्यावयाचा म्हणजे पंखा, भाता, पवनचक्की इत्यादि साधनद्वारांच करून घ्यावा लागतो. '**पंखा**' किंवा '**भाता**' म्हणजे '**हवा**' नाहीं. परंतु ह्या प्रतीकाच्या साधनाशिवाय आम्हांस निराकार सर्वव्यापी अशा हवेचा फायदा घेतां येत नाहीं. दुसरें उदाहरण '**शब्दा**'चें घेऊं. शब्दास वस्तुतः आकारही नाहीं व तो सर्वव्यापी आहे; परंतु त्याचा फायदा व्यवहारांत करावयाचा म्हणजे भाषेची आवश्यकता उत्पन्न होते. आणि शब्दास विशिष्ट आकार दिल्याशिवाय भाषा सिद्ध होणें अशक्य. तिसरें उदाहरण विजेचें. '**वीज**' ही सर्वव्यापी आहे व तिलाही वस्तुतः कांहींच आकार नाहीं. परंतु 'ब्याटरी' च्या प्रतीकाशिवाय तिचे चमत्कार दिसणें शक्यच नाहींत. 'ब्याटरी' व ब्याटरींतील द्रव्यें म्हणजे '**वीज**' नव्हे. परंतु वीज उत्पन्न होण्यास व तिचा व्यवहारांत उपयोग होण्यास ह्या द्रव्यांची व ब्याटरीच्या प्रतीकाची आवश्यकता आहे त्याचप्रमाणें '**मन**' हाही एक सर्वव्यापी व निराकार पदार्थ आहे. देहेंद्रियें हें त्याचें प्रतीक होय. या देहेंद्रियाच्या प्रतीकाशिवाय मनाचे चमत्कार जगांत दिसूं शकत नाहींत. "ह्या दृश्य जगाच्या बुडाशीं 'बुद्धी' अथवा चैतन्य आहे. परंतु तें चैतन्य 'जड' वस्तूच्या आधाराशिवाय कधींच इंद्रियगोचर होणार नाहीं." अशी आधुनिक शास्त्रज्ञांची ठाम समजूत आहे. ह्या त्यांच्या समजुतीच्या दृष्टीनें ईश्वराचें प्रतीक कल्पिणें असंबद्ध होत नाहीं. परमेश्वराचें स्वरूप म्हणजे निराकार, अव्यक्त, अनंत, सर्वव्यापी, निर्गुण असें आहे. हा सिद्धांत सर्वमान्य आहे. परंतु हें **प्रमेय** झालें. ही 'थिअरी' झाली. व्यवहारांत सामान्य लोकांच्या दृष्टीनें ह्या प्रमेयाचें स्वरूप कसें केलें पाहिजे ? ईश्वराच्या अस्तित्वाचा फायदा व्यावहारिक दृष्टीनें कसा करून घ्यावयाचा ? धर्मापुढें हा प्रश्न आला म्हणजे प्रतीकाची आवश्यता उत्पन्न होते. जे मूर्तिपूजेचे विरोधी असे मुसलमान, खिश्चन अथवा ब्रह्मसमाजिष्ट, आर्यसमाजिष्ट इत्यादि लोक आहेत, ते ईश्वरोपासना कशी करितात ? विशिष्ट दिवशीं, विशिष्ट वेळेला, विशिष्ट ठिकाणीं जाऊन, विशिष्ट ठिकाणीं

बसून व विशिष्ट दिशेकडे तोंड करून कांहीं प्रार्थनेचे मंत्र म्हणतात. म्हणजे काय ? सर्वव्यापकत्वाला वैशिष्ट्य दिलें असें होत नाहीं कां ? **देवदास** म्हणतोः—

अहारे अहा ! तूं मुसलमान् वेडा ।
मशीदींत जावूनि कां हांक फोडा ॥
हका मारितां ऐकतो काय अल्ला ? ।
मुल्लाना उगा वर्डवर्डोंचि मेला ॥
नमस्कार कां रे ? दिशा पश्चिमेसी ।
तिन्हीही दिशा ओस झाल्या तुम्हांसी ॥

सर्वव्यापकत्वाला वैशिष्ट्य देणें व सर्वदेशित्वाला एकदेशीयत्व देणें म्हणजेच निराकाराला आकार देणें होय! व ह्या अर्थानें **मूर्तिपूजा नाहीं असा धर्मच पृथ्वीवर शक्य नाहीं** असें म्हणावें लागतें. परंतु ईश्वरोपासनेच्या केवळ व्यावहारिक दृष्टीनेंच मूर्तिपूजा हिंदुधर्मात प्रचलित झाली असें नाहीं. मूर्तिपूजेची प्रवृत्ति जरी निसर्गतः झाली असली तरी सध्याची तिची वाढ व अनेक शारीरिक व बौद्धिक हल्ल्यांमधूनही आजचा तिचा असलेला प्रसार पाहिला म्हणजे मूर्तिपूजेचा दुसऱ्याही एका दृष्टीनें विचार करण्यासारखा आहे. **श्रीमच्छंकराचार्यां**च्या अद्वैत सिद्धांतानें "**जीवब्रह्मैक्य**" हेंच परम ध्येय सिद्ध झालें; परंतु हें 'जीवब्रह्मैक्य' साध्य होण्यास साधनें कोणचीं असावींत यांचा विचार '**मनाची एकाग्रता हेंच परम साधन होय.**' असें ठरतें. आमच्या तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांत 'मना' संबंधीं फार खोल विचार करण्यांत आलेला आहे. आमच्या धर्माची सर्व इमारत मानसशास्त्रावर उभारलेली आहे असेंच कबूल करावें लागेल. तो विषय निराळा आहे. मनाच्या शक्तीचे चमत्कार आमच्या पुराणादि ग्रंथांत पुष्कळच वर्णिलेले आहेत व सध्यांही 'हिप्नॉटिझम्' 'मेस्मेरिझम' 'सायकोथिरपी' इत्यादि विषयांचा अभ्यास करणारांस या मनाच्या अघटित शक्तीचें अस्तित्व कबूलच करावें लागेल. '**मनानें प्रतिसृष्टि निर्माण करितां येते.**' असाच आमच्या तत्त्वज्ञानाचा व धर्माचाही सिद्धांत आहे. या मानसिक शिक्षणास व मनाचें सामर्थ्य वाढविण्यास **चित्तवृत्तिनिरोध** अत्यंत आवश्यक आहे. तरच एकाग्रता वाढून मनाची शक्ति वाढते असेंही सहज प्रत्ययास येऊं शकेल. यापुढें चित्तवृत्तिनिरोधास युक्ताहार, विहार व यम, नियमासन, प्राणायामादि चित्तशुद्धीचे व देहशुद्धीचे प्रकार ओघानेंच आवश्यक ठरतात. चित्तवृत्तिनिरोधना-

साठीं कांहीं तरी प्रतीक पुढें ठेवून वावरणाऱ्या आंतरबाह्य मनाच्या वृत्तीस एकाग्र करण्याचा अभ्यास करण्यास प्रतीक असणें अत्यंत आवश्यक आहे हेंही कबूल करावें लागेल. हेंच प्रतीक त्या परमेश्वराच्या भावनेनें पुढें ठेवून त्याच्या भक्तींत तल्लीन व एकाग्र होण्यांत मनास जें शिक्षण मिळतें व जो आनंद होतो तो वर्णन करून सांगणें शक्य नाहीं, त्याचें वर्णन होणारही नाहीं. अर्थात् ह्या योगाच्या मार्गांत '**मूर्तिपूजा**' '**प्रतीकोपासना**' अगदीं प्रथमची व आवश्यक पायरी होय.

२ परंतु ईश्वराचें अस्तित्व मानलें व मनाच्या शिक्षणासाठीं मानसिक सामर्थ्य वाढविण्यास व भक्तीचा आनंद अनुभविण्यासाठीं प्रतीकोपासनाही अवश्यक अशी मानली तरी तर्कदृष्ट्या काम्य उपासनेसंबंधीं दोन शंका उत्पन्न होणार. त्या अशा कीं, (१) ईश्वर आपल्या प्रार्थनेनें व स्तुतीनें प्रसन्न कां व्हावा ? व जरी प्रसन्न झाला, त्याच्या मनांत जरी दया उत्पन्न झाली तरी आम्हां सामान्य माणसांना तो कशी मदत करतो ? मदत करण्याला वाव कोठें आहे ? त्यांचें म्हणणें "तर्कशास्त्रदृष्ट्या ईश्वराचें भजन व पूजन अनुपपन्न आहे." ईश्वर आहे, व तो जगाचा कर्ता आहे असें मानलें, तरी त्याच्या भक्तीनें व पूजेनें आमच्या मनकामना कशा पूर्ण होणार ! कारण जसें हें त्यानें ब्रह्माण्ड निर्माण केलेलें आहे तसेंच त्या ब्रह्माण्डाचे कायदेही त्यानेंच निर्माण केलेले आहेत. सृष्टिनियमामध्यें वरचेवर फेरबदल करण्याची त्याची शक्ति गृहीत धरली तरी तो आपल्या भक्तासाठीं हरघडीला जर सृष्टिनियम बदलूं लागला तर जगांत अनवस्था माजणार ! तेव्हां त्यानें केलेले सृष्टिनियम तोही मोडूं शकत नाहीं असें धरून चाललें पाहिजे. त्यानें सूर्य उत्पन्न केला, सूर्यमाला उत्पन्न केली, गुरुत्वाकर्षणाचा निमय केला, पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, हीं पंचमहाभूतें उत्पन्न केलीं, ह्या पंचपमहाभूतांचे गुणधर्म उत्पन्न केले, अग्नीमध्यें दाहक शक्ति उत्पन्न केली, पाण्यामध्यें प्रवाहित्व उत्पन्न केलें. हे पंचमहाभूतांचे गुणधर्म नाहींसे करण्याची त्याच्यांतही शक्ति नाहीं; त्याचप्रमाणें प्राण्यांचीं सुखदुःखें त्यांच्या कर्माप्रमाणेंच त्यांना मिळतात. प्रत्येक मनुष्य आपल्या पूर्वकर्मानेंच जन्मास येतो; व पूर्वकर्मानुसारच त्यास सुखदुःख मिळतें. ईश्वराची पूजा केल्यानें, प्रार्थना केल्यानें, ह्या पूर्व कर्माच्या फलामध्यें ती बदल करूं शकतो काय ? स्तुतीनें व पूजेनें ईश्वर प्रसन्न होतो व पूर्वदुष्कृतींचीं फलें तो भोगण्यास लावीत नाहीं

असें मानलें, तर एखाद्या मिजासखोर बादशाहाप्रमाणेंच तोंडपुजेपणा, व खुषमस्करेपणा, अथवा मनापासून केलेली ही स्तुति ईश्वरास आवडते असें ठरेल, व त्याच्या न्यायीपणाला बाध येईल. ह्या अन्यायानें अव्यवस्था माजून जगांतही अनवस्था प्रसंग ओढवेल. ईश्वरानें स्वतः केलेले कर्मफलाचे नियम स्वतः उत्पन्न केलेला 'कार्य कारण संबंध,' निर्मिलेला 'अन्वयव्यतिरेक' तो जर मोडूं लागला तर ईश्वराच्या राज्यांतही झोटिंगपाच्छाई माजेल. माझ्या मागील कर्माप्रमाणें मला सध्यां दारिद्र्य प्राप्त व्हावयाचें आहे हें जर ठरलेलें असेल तर माझ्या सध्यांच्या ईश्वराराधनेनें त्यांत कधींही फेरबदल होणार नाहीं. कारण मागील कर्मांचें फळ मला दारिद्र्याच्या रूपानें भोगलेंच पाहिजे. त्याखेरीज सुटका नाहीं. ईश्वराराधनेनें फार झालें तर पुढें अथवा पुढच्या जन्मीं दारिद्र्य प्राप्त होणार नाहीं. तर्कशास्त्रदृष्ट्या असेंही म्हणतां येईल कीं, पुढच्या जन्मींही जर दारिद्र्य यावयाचें नसलें तर तें ईश्वराच्या उपासनेनें नसून स्वकर्तव्य चिनचुक केल्यानें येणार नाहीं. एखादा निःपक्षपाती अधिकारी नेमून दिलेलें काम चोखपणें केल्यानेंच खूष होतो, काम न करतां रोज सकाळ, संध्याकाळ त्या अधिकाऱ्याच्या घरीं जाऊन त्याचीं स्तुतिस्तोत्रें गायल्यानें तो कधींही खुष होणार नाहीं. त्याचप्रमाणें अध्ययन, अध्यापन इत्यादि शास्त्रोक्त वर्णाश्रमविहित जीं कर्में परमेश्वरानें लावलेलीं आहेत तीं सोडून 'विठ्ठल विठ्ठल' अशा नुसत्या भजनानें ईश्वर-निःपक्षपाती असेल तर—कां खुष व्हावा? कां प्रसन्न व्हावा? ह्या जगांतील व्यवहारांत सुद्धा हेंच दिसतें. 'पेरलें तें उगवतें। हें तो प्रत्ययास येतें।' जसा प्रयत्न करावा तसें फळ मिळतें. जितकी मेहनत करावी तितकें यश मिळतें असेंही अनुभवास येतेंच. सारांश; पुनर्जन्म माना अथवा मानूं नका यश कर्तव्यानें येतें. केवळ ईश्वरपूजेनें अथवा स्तुतीनें येत नाहीं, असें बाह्यतः दिसतें खरें. प्रयत्नवाद सगळा खरा आहे परंतु तो दैवाच्या पायावर उभारला जातो हेंच वाईट आहे. इमारतीचा पाया कोणास दिसत नाहीं म्हणून इमारतीच्या पायाची आवश्यकता नाहीं असें कसें म्हणतां येईल? पायाच तर मुख्य आहे. एकानें श्रीमंताच्या व दुसऱ्यानें गरीबाच्या पोटीं कां जन्मास यावें? त्यांस दोन पक्षांकडून दोन उत्तरें येतात: एक पक्ष प्रायः नास्तिकवादी म्हणतो याला कारण यदृच्छा [Chance.] ह्याला कारण कांहीं नाहीं हेंच त्याचें उत्तर; परंतु ह्या उत्तरानें मनाचें समाधान होत नाहीं. कारण जगांत जर सर्व व्यवस्था

दिसते, कार्यकारण संबंध सर्वत्र दिसतो. बीज, वृक्ष, फूल, फळ व पुनः बीज. हें चक्र जर सर्वत्र दिसतें, आणि जेवढें दृश्य तेवढ्यांत जर पूर्ण व्यवस्था आहे, कार्यकारण संबंध आहे, तर अदृश्यामध्येंही कांहीं व्यवस्था असेल असें मानलेंच पाहिजे. जेवढें दिसतें तेवढेंच सत्य असेंही मानतां येत नाहीं. एकंदर विचार करितां **व्यक्ता**ची उत्पत्ति **अव्यक्तां**तूनच होते. वडाच्या बीमध्यें सर्व वडाचें झाड आहे हें विसरतां कामा नये. मूर्तिकार मूर्ति घडवितो किंवा चित्रकार चित्र काढतो म्हणजे मूर्तिकाराच्या किंवा चित्रकाराच्या मेंदूमध्यें अव्यक्त अवस्थेंत असलेली मूर्ति अथवा चित्र तो व्यक्त करतो असेंच म्हटलें पाहिजे. कोणत्याही व्यक्त वस्तूचें जनन अव्यक्त असलेल्या घटनेप्रमाणें होत असतें. अव्यक्त आपणास दिसलें नाहीं म्हणजे तें नसतें असें म्हणतां येत नाहीं. पूर्वीचा धागा, पूर्वीचा प्रवाह हा मानलाच पाहिजे. जर या व्यक्तमध्य प्रपंचांत आपणांस व्यवस्था दिसते तर अव्यक्त स्थितींतही ती व्यवस्था असलीच पाहिजे. काकतालीयन्याय अथवा यदृच्छा असा कांहीं प्रकार मननांत येत नाहीं. रोज सूर्य उगवतो म्हणून तो उद्यांही उगवलाच पाहिजे, हें प्रमाण तर्कदृष्ट्या जरी अगदीं बरोबर नसलें, तरी ह्या अनुमानप्रमाणावर श्रद्धा ठेवल्याशिवाय जगाच्या व्यवहाराची संगति कदापि लागावयाची नाहीं. अर्थात् प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध होत नसलें तरी **सूर्योदया**च्या अनुमानाइतकेंच सत्य असलेलें **पुनर्जन्म, पूर्वकर्म** इत्यादि अनुमानल्याशिवाय 'एकानें श्रीमंताच्या व दुसऱ्यानें गरीबाच्या पोटीं कां जन्मास यावें' ह्याचें समाधानकारक उत्तर मिळूं शकत नाहीं. **यदृच्छा** अथवा **काकतालीय** न्याय हें **नास्तिकवाद्याचें** उत्तर **अज्ञेया**प्रमाणच तळमळ उत्पन्न करणारें आहे, समाधान करणारें नाहीं. पुनर्जन्म मानल्यावरही पुनः एक शंका उत्पन्न होते. पूर्व कर्मानें एक श्रीमंताच्या पोटीं व दुसरा गरीबाच्या पोटीं जन्मास येतो हें आस्तिकवाद्याचें उत्तर खरें आहे. परंतु शंका ही कीं, जगाच्या आरंभीं तरी हें कर्म कसें उत्पन्न झालें? मुळारंभीं तर सर्व निष्कलंक असलें पाहिजे ना? मग त्या निष्कलंकांत कलंक उत्पन्न झाला कसा? ह्याचा प्रारंभ केव्हांपासून झाला? याचें उत्तर **माये**प्रमाणें हें **कर्माचें रहाटगाडगेंही अनादि अथवा दुर्ज्ञेयारंभ आहे**, असेंच द्यावें लागतें. मनुष्य कोणत्याही कारणानें व कसातरी कर्माच्या फेऱ्यांत सांपडला आहे खरा! सृष्टींचा संहार झाला तरी हें **कर्म** बीजरूपानें

शिल्लक राहून पुन्हां सृष्टीचा आरंभ होऊं लागला म्हणजे त्याच कर्मबीजापासून पुन्हां पूर्ववत् अंकूर फुटूं लागतात. सारांश कर्माच्या कायद्याप्रमाणें हें सर्व जग चाललें आहे. आपण होऊन मनुष्य जगांत कांहींच करूं शकत नाहीं, कारण इच्छा नसतांही सूज्ञ मनुष्याच्या हातून कधीं कधीं पापाचरण होत असलेलें दिसतें. **हॅकले**सारखा जडवादीही,'मनुष्य' म्हणजे परिस्थितीच्या प्रवाहांत सांपडलेल्या ओंडक्याप्रमाणें मानतो, तर मनुष्यानें अमुक करावें व तमुक करावें हा कर्तृत्ववाद व्यर्थच ठरतो ! परंतु तसें नाहीं. मनुष्याच्या कर्तृत्वासही कर्मविपाकांत जागा आहे व दैवाच्या पायावर असला तरी प्रयत्नवादही खरा आहे असेंच विचारान्तीं कबूल करावें लागेल. थोडें विषयांतर करून आपल्या विषयापुरता ह्याचा आतां थोडा विचार करूं.

कर्मापासून कांहीं फळ उत्पन्न होतें व तें भोगण्याशिवाय शरिरास गत्यंतर नसतें. क्रियेपासून प्रतिक्रिया Action and reaction उत्पन्न होतें. हा सृष्टींतील अबाधित नियम आहे. हें फल भोगण्यासाठींच वारंवार देह घ्यावे लागतात. वासना, वासनेमुळें शरीर, शरीराकडून कर्म, व कर्माचें फल भोगण्यास शरीर, पुन्हां वासना, कर्म, पुन्हां शरीर ह्याप्रमाणें जन्ममरणाचा फेरा चालूं आहे. मागील अनेक जन्मांपासून आजच्या क्षणापर्यंत जीवाकडून जीं जीं बरींवाईट कर्म झालीं असतील त्याला संचित हा पारिभाषिक शब्द आहे. ज्या कर्मांचीं फळें जीवानें भोगण्यास प्रारंभ केलेला आहे त्यास **प्रारब्ध** असें म्हणतात; व ज्या कर्मांचीं फळें भोगावयाचीं आहेत त्यास **क्रियमाण** म्हणतात. **रहस्यकारांच्या** मतें जास्त शास्त्रशुद्ध योजना म्हणजे **आरब्ध** व **अनारब्ध**. ज्या कर्माचीं फळें भोगण्यास प्रारंभ झाला त्यास **आरब्ध**; ज्याचीं फळें भोगावयाचीं आहेत त्यास **अनारब्ध** कर्म असे विभाग जास्त आटोपशीर व सयुक्तिक होतील. मागील कर्मांप्रमाणेंच सध्याचा **जन्म** व सुखदुःखें प्राप्त होतात; व **बुद्धिः कर्मानुसारिणी** या वचनाप्रमाणें मागील कर्मांप्रमाणेंच सध्यांही कर्में करण्याची बुद्धि होते. हें जरी खरें आहे तरी तें सर्वस्वी खरें नाहीं. जीव केवळ मागच्या कर्मांचींच फळें भोगतो असें नाहीं; व केवळ मागच्या कर्मांप्रमाणेंच सध्यां बुद्धि वागत असते असेंही नाहीं. मागच्या कर्मांशिवाय प्रत्येक नवीन जन्मांत कांहीं तरी नवीन प्रेरणा बुद्धीस होत असतात व त्या प्रेरणेप्रमाणें कांहीं तरी नवीन कर्में (बरीं वाईट) जीवाकडून होत असतात; व मागच्या कर्म-

फलांत नवीन कर्मफलाची भर पडते. ह्याप्रमाणें मागच्या व सध्यांच्या जन्मांतील कर्मफलाच्या संमिश्रणांत शरिराचें आयुष्यक्रमण होत असावें असेंच मानावें लागतें; असें मानल्याशिवाय जन्ममृत्यूचें चक्र चालणार नाहीं. मागच्या कर्मांचींच फळें जीव भोगतो, नवीन कर्म त्याकडून मुळींच होत नाहीं असें मानलें तर मागील कर्म—संचित केवढेंही असलें तरी त्याचा शेवट लौकरच होईल. परंतु संचितांत वरचेवर भर पडत गेल्यामुळेंच कर्मांचें व फलबंधनाचें जाळें कोळ्याच्या जाळ्याप्रमाणें वाढतच जातें, व जीव त्यांतच गुरफटला जातो, ह्या प्रत्येक जन्मांत नवीन कर्मं करावयास लागणाऱ्या बुद्धीच्या नवीन प्रेरणा कोठून उत्पन्न होतात ! ज्याप्रमाणें समष्टीमध्यें परमात्म्याला कर्तृस्वातंत्र्य नाहीं, त्याचप्रमाणें व्यष्टीमधील देहेंद्रियाच्या कोंडींत सांपडलेल्या जीवात्म्याला-त्या परमात्म्याच्या अंशाला ही–कर्तृस्वातंत्र्य नाहीं हें खरें. कारण जें पूर्णांत नाहीं तें त्याच्या अंशांत नसावयाचेंच. परंतु परमात्मा ज्ञानमय असल्यामुळें जीवात्मा ज्ञानांश आहे; आणि तात्पुरतें प्रेरकत्व जीवात्म्यांत असतें असें मानावें लागतें. हें प्रेरकत्व जीवात्मा देहेंद्रियाच्या कोंडींत सांपडल्यामुळें येतें असें **रहस्यकार** मानितात.

प्रेरकत्व आहे असें मानण्याचें कारण **स्वी**पणाची बुद्धि दृग्गोचर होते. ह्याशिवाय देहेंद्रियाच्या विषयांशीं संयोग होऊन उत्पन्न होणाऱ्या नेहमींच्या प्रेरणांशिवाय प्रकृतीशीं विसदृश अशा कांहीं प्रेरणा अथवा **सद्वृत्ति** मनांत उत्पन्न होत असलेल्या दिसतात. **दया, धैर्य, संयमन, त्याग, वैराग्य, परोपकार** इत्यादि साधारणतः धार्मिक या शब्दानें उद्बोधक होणाऱ्या अंतःकरणाच्या वृत्ति खात्रीनें मानसिक अथवा बौद्धिक शिक्षणानें उत्पन्न होतील अशा नाहींत. दैहिक सुख भोगण्याची प्रवृत्ति वाढविणाऱ्या **खा, पी, चैन कर, सुख भोग** ह्याच प्रायः बुद्धीच्या व मनाच्या वृत्ति होत; कर्मफेऱ्यांत घालणाऱ्या ज्या वृत्ति त्या प्रकृतांच्या होत; व कर्मफेऱ्यांतून सोडविणाऱ्या ज्ञानमय वृत्ति त्या आत्म्याच्या होत असें वर्गीकरण करतां येईल. कर्मानें बंधन होतें व ज्ञानानें तें नाहींसें होतें; अर्थात् ज्ञान म्हणजे अध्यात्मज्ञान; आत्मतत्त्व ज्ञानमय आहे व त्यावर जड प्रकृतीचें, अज्ञानाचें अथवा मायेचें आवरण आहे. जीव हें 'आत्मतत्त्व' आहे, व इंद्रियें हीं प्रकृति-माया आहेत. मन व बुद्धि हेही प्रकृतीच्याच गुणविकासानें झालेले प्रकृतीचेच-म्हणजे जडाचे नोकर आहेत. शरीर व जीव यांमधील

दुवा 'बुद्धि' होय. 'बुद्धि' ही प्रकृतीची-शरीराची-दासी खरी, परंतु जीवाला देहें-द्रियाच्या कोंडींतून सोडविण्यास उपयोगी पडतील तर हीच पडणारी आहे. जीव हा इंद्रियांच्या उपाधींत सांपडलेला असल्यामुळें त्याची सुटकाही ह्या उपाधीच्या द्वारें होते, एरव्हीं होत नाहीं. कर्मांच्या कैदखान्यांतून सुटण्यास बुद्धीला फितुर करून घेण्याशिवाय दुसरा उपाय नाहीं. **रहस्यकार** म्हणतात, ही बुद्धि अंतर्मुख, सात्विक व आत्मनिष्ठ झाली पाहिजे. जीवात्म्याकडून ज्या प्रेरणा उत्पन्न होतात त्या बुद्धीनें चटकन् ग्रहण केल्या पाहिजेत, व त्याप्रमाणें मनास तयार करून संयमनानें शरीरास वागविलें म्हणजे ज्ञान होण्यास सुलभ जातें, व त्या मानानें ज्ञानयुक्त कर्म झालीं तरी तीं बाधक न होतां साधकच होतात. ज्ञान हें साधनही आहे व साध्यही आहे कारण मोक्ष व ज्ञान यांत अंतर नाहीं, सारांश, जीवात्म्याला कर्तृत्व नसलें तरी प्रेरकत्व आहे. हात पाय नसले तरी डोळे आहेत. हें सिद्ध झालें म्हणजे प्रयत्नवाद सिद्ध झाला. जीवकर्तृत्वाधिकरण सिद्ध झालें व हा सिद्धांतही मनाला स्पष्ट पटतो.

उद्धरेदात्मनात्मानमात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥ १ ॥

हा ' जीवकर्तृत्वाधिकरणा ' चा सिद्धांत मनाला पटला, म्हणजे गेलेला भूतकाळ मनुष्याच्या स्वाधीन नसला तरी येणारा भविष्यकाळ बऱ्याच अंशानें मनुष्याच्या स्वाधीन आहे, असें मानावें लागतें. बऱ्याच अंशानें म्हणण्याचें कारण " बुद्धिः कर्मानुसारिणी " ह्या नियमाप्रमाणें मागील कर्मांच्या फलाचे भोग देण्यास लावणाऱ्या कांहीं बुद्धीच्या प्रेरणा असतात. तेवढ्या अंशानें मनुष्य परतंत्र आहे. परंतु मागील कर्मांशीं ज्यांचा संबंध नाहीं अशा बुद्धीच्या नवीन व स्वतंत्र प्रेरणा बऱ्याच असतात. ह्या चांगल्याच व्हाव्यात, वाईट होऊं नयेत असा प्रयत्न केला पाहिजे. असा प्रयत्न करणें मनुष्याच्या स्वाधीन आहे काय ? स्वाधीन असल्यास कसें ? ह्याचें उत्तर " ईश्वरोपासनेच्या द्वारें असा प्रयत्न करणें मनुष्याच्या स्वाधीन आहे " असेंच सनातन वैदिक धर्मानें दिलें आहे. अविनाशी आत्मतत्त्वाची अथवा परब्रह्मरूपी परमेश्वराची ज्ञानपूर्वक उपासना केली म्हणजे तोच परमेश्वर देहेंद्रियांच्या कोंडींत सांपडलेल्या जीवात्म्याशीं आपल्याच अंशाची सुटका करणाऱ्या अशा मोक्षानुकूल प्रेरणा बुद्धीस करतो. " ईश्वर प्रसन्न झाल्यावर त्यास दया दाखविण्यास मार्ग आहे काय ?" ह्या आपल्या शंकेचें उत्तर

येथेंच आहे. मनुष्य आपल्या बुद्धीच्या प्रेरणेप्रमाणेंच कर्म करतो. ह्याविषयीं वाद नाहीं. आणि ह्या प्रेरणा उत्पन्न करणें मनुष्याच्या स्वाधीनचही पण नाहीं. त्या परमेश्वराधीन आहेत. शिक्षण, संगति, परिस्थिति इ० बाह्य कारणें विशिष्ट प्रकारचींच उत्पन्न करणें हें सर्वस्वी मनुष्याच्या स्वाधीनचेंच आहे असें नाहीं. तात्पर्य ईश्वरास शरण गेल्याशिवाय मनुष्याच्या बुद्धीस पूर्णता येणार नाहीं. केवळ कृतज्ञतेच्याच बुद्धीनेंच नव्हेतर आत्मोन्नतीच्या दृष्टीनेंहि ईश्वरोपासना फार आगत्याची आहे. आणि व्यावहारिक अथवा सांसारिक मनुष्यास सगुणोपासना अत्यंत आवश्यक आहे; कारण सद्गुण प्राप्त होण्यास सद्‌गुण उत्पन्न करणाऱ्या भावना प्रबल झाल्या पाहिजेत. भावना प्रबल होण्यास सद्‌गुणांचें ध्यान केलें पाहिजे. ध्यानाचा अभ्यास झाला पाहिजे. श्रीराम, श्रीकृष्ण, हनुमान, गणपति, विष्णु, इ० देवतांचीं चरित्रें पाहिलीं म्हणजे कांहीं विशिष्ट गुणसमुच्चय त्यांच्यांत बसलेला दिसेल, व ते ते सद्‌गुण आपल्या अंगीं बाणण्यास त्या सद्‌गुणांचें चिंतन अहोरात्र केलें पाहिजे; म्हणजे भक्तियुक्त आराधनेनें ते ते सद्‌गुण कांहीं अंशानें आपल्या अंगीं येतील. कारण, "मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः" हा सिद्धांत अबाधित आहे. मन तयार करण्यास अभ्यास झाला पाहिजे, अभ्यासास सगुणोपासनेसारखें सुलभ साधन नाहीं. मूर्तिपूजा ज्ञानपूर्वक केली म्हणजे परमेश्वर बुद्धीस चांगल्याच प्रेरणा देतो. त्या कशा याचें आणखी सविस्तर वर्णन करणें जरूर आहे. परंतु तत्पूर्वी आणखी एका विषयाचें विवरण केलें पाहिजे म्हणजे पुढील विवरण जास्त सोपें जाईल. आपल्या बुद्धीस चांगल्याच प्रेरणा व्हाव्यात, वाईट होऊंच नयेत यासाठींच **धर्मा**ची आवश्यकता आहे. **धर्मा**चें हेंच प्रयोजन. **धर्मा**च्या अनुष्ठानानें बुद्धीस चांगल्याच प्रेरणा कां व्हाव्यात याचा आतां थोडक्यांत विचार करूं. मनुष्याच्या बुद्धीस दोन प्रकारच्या प्रेरणा होतात, हें मागेंच प्रतिपादिलें आहे. एक खाणें, पिणें, चैन करणें, सुखोपभोग घेणें ह्या प्रायः इंद्रियांचा विषयाशीं संयोग करावयास लावणाऱ्या प्रेरणा; व दुसऱ्या महत्त्वाच्या पण क्वचित् उत्पन्न होणाऱ्या म्हणजे **धैर्य, दया, संयमन, त्याग, वैराग्य,** परोपकार इ० पहिल्या प्रेरणा जड प्रकृतीच्या आहेत. पहिल्या प्रायः आरंभीं सुख देणाऱ्या परंतु परिणामीं दुःखदायक होणाऱ्या; आणि कर्मबंधन उत्पन्न करून जन्ममरणाच्या फेऱ्यांत घालणाऱ्या अशा असतात, आणि दुसऱ्या ज्ञानमय

आत्म्याच्या असल्यामुळें आरंभीं जरी दुःखदायक असल्या तरी परिणामीं जास्त शाश्वत सुख देणाऱ्या म्हणूनच मोक्षानुकूल अशा असतात. दुसऱ्या प्रेरणा **आत्म्या**च्या आहेत, **प्रकृती**च्या नाहींत, असें म्हणण्याचें कारण धर्म, धर्मीला कधींहीं सोडीत नाहीं. अग्नीपासून दाहकपणा कधींहि काढून घेतां येणार नाहीं. तद्वत् ह्या परोपकार, संयमन इ० प्रेरणा ज्ञानमय असल्यामुळें जड प्रकृतीच्या असूंच शकणार नाहींत. **प्रकृति** त्रिगुणात्मक असल्यामुळें देहेंद्रियांचा विषयाशीं संयोग करण्यास लावणाऱ्या ज्या प्रेरणा त्या प्रकृतीच्याच असल्या पाहिजेत. **आत्म्यास** कर्तृत्व नसलें तरी बुद्धीच्या सान्निध्यानें त्यास प्रेरकत्व उत्पन्न होतें, स्वतंत्र प्रकृतीस कर्तृत्व नाहीं, व स्वतंत्र आत्म्यास **प्रेरकत्व** नाहीं; 'प्रकृति' व 'आत्मा' अथवा 'प्रकृति' व 'पुरुष,' ह्यांच्या सान्निध्यानें प्रेरकत्व व कर्तृत्व उत्पन्न होतें. आत्मा पंगू असला तरी डोळस आहे व प्रकृति आंधळी असली तरी सत्त्व, रज, तम ह्या त्रिगुणांचे तीस हातपाय आहेत. आणि या आंधळ्या-पांगळ्यांच्या जोडीनेंच समष्टीमध्यें **ब्रह्मांडां**त, व, व्यष्टीमध्यें **जीवात्म्यां**त कर्तृत्व उत्पन्न झालें आहे. परिणामीं दुःख उत्पन्न करणाऱ्या व जन्म-मरणाच्या फेऱ्यांत घालविणाऱ्या अज्ञानमय वासना इंद्रियांचा विषयांशीं संयोग होण्यानें उत्पन्न होतात व वाढतात. पंच ज्ञानेंद्रियें व पंच कर्मेंद्रियें ह्यांचे जे पांच विषय, त्यांच्याशीं संयोग होण्यानें एक प्रकारचें सुख वाटतें परंतु हें तात्पुरतें असल्यामुळें परिणामीं दुःखकारक होतें. क्षणमात्रच कां होईना, परंतु हें सुख फिरफिरून अनुभवावें अशा वासना मनास होतात. आणि ह्या वासना डुकरांच्या संततीप्रमाणें सारख्या वाढत जातात. एकीपासून दुसरी व दुसरीपासून तिसरी अशा अनंत वासना मनास होतात. हाच अभ्यास दृढ झाला म्हणजे '**निसर्ग**' बनतो. Habit is Second Nature ह्या पेक्षां Nature is a result of previous habits हें जास्त खरें आहे. ह्या अभ्यासाचा परिणाम येथेंच बाधतो असें नाहीं तर दुसऱ्या जन्मांतहि ह्याच अभ्यासिलेल्या वासना पुनः पुनः उत्पन्न होतात! मनुष्याच्या खादाडपणाचा अभ्यासच दुसऱ्या जन्मांत उपजल्या बरोबर मातेचें स्तनपान करण्यास शिकवितो. उपजलेल्या मुलांस उपजल्याबरोबर मातेचें स्तन चोखण्यास कोण शिकवितो? परंतु न शिकवितांही तो चोखतो ह्यासच आपण 'उपजत बुद्धि' (Instinct) असें म्हणतो. परंतु 'उपजत बुद्धि' हा मोठा शब्द उपयोगांत आणला म्हणजे प्रश्नाचें उत्तर मिळतेंच असें नाहीं. ही उपजत

बुद्धि अशीच कां असावी? मनुष्याचें मूल उपजतांच लुलें खुळें कां असावें? व जनवारांचें मूल उपजतांच चार पायावर कां उभें रहावें! हा प्रश्न पुन्हां शिल्लक राहतोच. त्याच प्रमाणें भौतिक शास्त्रवेत्ते '**निसर्ग**' '**निसर्ग**' म्हणून जो एक शब्द उपयोगांत अणतात त्याचा अर्थ काय? त्याचा अर्थ त्यांना जो सांगतां येतो त्यापेक्षां आमच्या वेदांतशास्त्रानें अधिक समाधानकारक सांगितलेला आहे. तो हाच कीं, निसर्ग ह्मणजे गतजन्मीं अथवा गतकालीं झालेला अभ्यास तोच निसर्ग बनतो.

"Nature is a result of habits"

हेंच खरें. ही विचारसरणी अवलंबिली ह्मणजे 'गतजन्म' मानावाच लागतो व गतजन्म मानला म्हणजे पुर्नजन्मही मानावाच लागतो.

नासते विद्यते भावो नाभावो विद्यते सतः॥

हा सिद्धांत अनादित आहे. जें पूर्वीं नव्हतें तें आतां उत्पन्न होणार नाहीं व जें आतां आहे तें नाश पावणार नाहीं. "Indestructibility of matter" हा भौतिक शास्त्राचा सिद्धांत अध्यात्मशास्त्रांतहि खराच आहे. कोणच्याही पदार्थाची अथवा विषयाची इच्छा उत्पन्न होण्यास पूर्वानुभव अवश्य आहे. देशावरील ज्या गृहस्थानें 'फणस' कधींहि पाहिला नाहीं व खाल्ला नाहीं त्यास 'फणस' खाण्याची स्वयंभू इच्छा कधींही होणार नाहीं. परंतु ज्यानें तो एकदां चाखला आहे त्यासच तो खाण्याची स्वयंभू वासना होईल. मनुष्यास ज्या **विषयां**च्या स्वयंभू वासना उत्पन्न होतात त्या त्यानें गतजन्मांत अभ्यासिल्यामुळें होत असतात. नुसते 'निसर्ग' अथवा **उपजत बुद्धि** म्हटल्यानें समाधान होत नाहीं. मनुष्यांत कोणी धैर्यवान, कोणी भित्रे, कोणी लोभी, कोणी विषयी, कोणी कृपण इत्यादि प्रकारचे लोक असतात. नानाविध स्वभाव जो दिसतो त्याचें कारण गतकाळांत ज्याचा जसा अभ्यास झाला असेल तसा त्याचा स्वभाव बनतो, हेंच होय. तात्पर्य इंद्रियांचा त्यांच्या विषयांशीं संयोग करणाऱ्या वासना पूर्वाभ्यासानें होतात हा सिद्धांत आहे. हा जसा सिद्धांत आहे तसाच दुसरा असा सिद्धांत आहे कीं, ह्या वासना भोगानें तृप्त न होतां वाढत जातात, उन्हाळ्यांत कितीही गार पाणी प्यालें तरी जशी आणखी गार पाणी पिण्याची इच्छा होते, बर्फानें तर तहान जास्तच वाढते तशाच लहान मोठ्या इतर अनंत वासनांची तृप्ति भोगानें न होतां उलट ह्या वासना जास्तच वाढतात. आणि ह्याच

शेवटीं दुःखाला कारणीभूत होतात. वासनांची उपाधी वाढते, उपाधीनें रागद्वेष वाढतात, रागद्वेषानें अशांतता वाढते व अशांततेनें दुःख वाढतें. “ **मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलम्.** ” ह्याप्रमाणें प्रत्येक वासनांचा परिणाम होतो. आरंभीं सुख क्षणमात्र परिणामीं चिरकालिक दुःख, ह्या वासना भोगानें नाहींशा न होतां वाढतात, व वाढल्यानें त्यांचाच अभ्यास होतो व अभ्यासानें निसर्ग बनतो हा सिद्धांत ज्ञानानें एकदां मनाला पटला म्हणजे वासना नाहींशा कशा करितां येतील हाच विचार मनांत उद्भवतो. त्याचें उत्तर हेंच कीं, इंद्रियांच्या विषयाशीं होणाऱ्या संयोगाला मर्यादा घालीत गेलें पाहिजे तरच त्या वासना नाहींशा होतील अथवा परिणामीं सुखदायक होतील; आणि आमच्या ‘**सनातन धर्मा**चा’ हाच मुख्य उद्देश आहे. हेंच कोणत्याही **धर्मा**चें प्रयोजन असलें पाहिजे. चक्षुरादि इंद्रियांना नियमबद्ध करून वासना मर्यादित करणें म्हणजेच कुवासनांना सुवासना करणें : ह्याकरितांच धर्मांचे **आचार** उपस्थित झाले आहेत. **आमच्या सनातन धर्मांचे यच्चयावत् विधि व संस्कार, उपासना व कर्म, आचार व प्रयोग मनुष्याच्या वासनांना अनिर्गळ न होतां मर्यादित राहण्यांत व त्यास मर्यादित भोग-धर्मयुक्त भोगच-प्राप्त व्हावेत अशा युक्तीनें बसविलेले आहेत.** आचारयुक्त धर्माची म्हणूनच अत्यंत आवश्यकता आहे. वासनांना व त्यांच्या भोगांना **धर्मा**नें मर्यादा घातली म्हणजे त्या वाढत नाहींत आणि ह्या धार्मिक आचारांचा अभ्यास अंगवळणीं पडला म्हणजे मनुष्याची वृत्ति आपोआप त्याकडे होते, आणि दया, परोपकार, वैराग्य इत्यादि दैवी अथवा आत्म्याचे गुण अंगीं बाणूं लागतात.

इंद्रियांचा विषयांशीं संयोग करविणाऱ्या प्रेरणा कमी उत्पन्न झाल्या पाहिजेत व परोपकार, वैराग्य इत्यादि आत्म्याच्या ज्ञानमय प्रेरणा जास्त होण्यास त्यांचा सतत अभ्यास वाढविला पाहिजे. शौच, मुखमार्जन, स्नान, संध्या, पूजा, वैश्वदेव इ० अनेक नित्यनैमित्तिक आचार वस्तुतः **धृतिःक्षमा दमोऽस्तेयं शौचर्मिंद्रियनिग्रहः । धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम् ॥**

हीं धर्माचीं मूलभूत तत्त्वें अंगीं बाणण्यासाठींच उपस्थित झालीं आहेत. धर्मांच्या ह्या प्रत्येक आचाराचें विस्तारपूर्वक विवरण करणें हें विषयाच्या

बाहेरचें आहे. तें अन्य प्रसंगीं करूं. तूर्त फक्त मूर्तिपूजेनेंच कोणत्या ह्या आत्मीय ज्ञानमय प्रेरणा होऊं शकतात तेंच आतां दाखवूं.

जगाच्या बुडाशीं असणारें मूलतत्त्व अनादि, अव्यक्त, अनंत, सर्वव्यापी, सर्वज्ञ व चैतन्यरूपी आहे. हें बुद्धीनें कळलें तरी तें आकलन करण्यास श्रद्धेचाच आश्रय करावा लागतो. बुद्धीला श्रद्धेची जोड असल्याखेरीज काम भागत नाहीं. ज्ञान हा बुद्धीचा धर्म आहे. श्रद्धा हा मनाचा धर्म आहे. बुद्धि व मन ह्यांची सांगड पाहिजे तरच पुरुषार्थ होतो. बुद्धिगम्य ज्ञानाची पूर्तता होण्यास आणि पुढें तें ज्ञान बुद्धींतून आचरणांत येण्यास, व कृतींत फलद्रूप होण्यास ज्ञानास नेहमीं श्रद्धा, दया, वात्सल्य, कर्तव्यप्रेम इत्यादि मनोवृत्तींची अपेक्षा असते.

ज्ञान आहे तेथें श्रद्धा नाहीं; व, श्रद्धा आहे तेथें ज्ञान नाहीं; असा जर प्रकार असला तर सर्वच निरर्थक आहे! **रहस्यकार** म्हणतात " दारूशिवाय नुसत्या गोळीनें बंदुकीचा बार उडत नाहीं." तद्वत् पुरुषार्थ हातून होण्यास ज्ञान व श्रद्धा ह्यांचें संमिश्रण पाहिजे. मनुष्य नुसता ज्ञानी असला आणि त्याच्या अंतःकरणांत श्रद्धेची दारू नसली तर " वांझेनें दाविलें गर्‍हार लक्षण " ह्याप्रमाणें स्थिति व्हावयाची! कोरड्या ज्ञानानें कशी शोचनीय स्थिति होत असते तिचें प्रत्यक्ष प्रत्यंतर पहाणें असेल तर; सध्याच्या सुशिक्षित म्हणविणारांच्या वर्तनाकडे पहावें. सत्य स्वरूपाचें बुद्धीस ज्ञान झालें असलें, तरी त्याची उपासना करण्यास परमेश्वराच्या प्रतीकाची आवश्यकता असतेच. नेत्रादि इंद्रियांना जें गोचर होत नाहीं त्याचें आकलनही सामान्य मनुष्यास होत नाहीं. व प्रेमभक्ति ही उत्पन्न होत नाहीं. म्हणूनच भगवद्गीतेंत ।

क्लेशोधिकतरस्तेषां अव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ताहि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥

" अव्यक्ताचे ठिकाणीं चित्ताची एकाग्रता करूं पहाणारास फार कष्ट होतात; कारण देहेंद्रियधारी मनुष्यास अव्यक्तगति प्राप्त करून घेणें निसर्गतःच कष्टमय आहे असें म्हटलेलें आहे. ह्यासाठीं मूर्तिपूजा हा सोपा व राजमार्ग आहे. निर्गुण ब्रह्मांत विलीन होणें हें अखेरचें साध्य आहे. हें साध्य प्राप्त होण्यास सगुण व साकार मूर्तींची श्रद्धा व भक्तीपूर्वक उपासना करणें हेंच साधन आहे. उपास्य व उपासक हे आरंभीं जरी वेगळे असले तरी ज्ञान व भक्ति ह्यांचें उपासनेच्या द्वारें जसजसें एकीकरण होत जाईल, तसतसा हा भेद सहज गळून जाईल. इतर

दुसऱ्या कोणच्याही साधनाची आवश्यकता न राहतां नित्यभक्तीनेंच ही अद्वैताची भावना उत्पन्न होऊन व वाढत जाऊन “**वासुदेवः सर्वम्**” अशी मनाची अवस्था होऊन व उपास्य उपासक हा भेद शिल्लक न राहतां शेवटीं शुद्ध ब्रह्मांत जीव विलीन होतो. मूर्तिपूजेसारख्या धार्मिक आचाराचें नित्य अनुष्ठान केल्यानें ज्या आत्म्याच्या मोक्षानुकूल वृत्ति उत्पन्न होतात त्याचा विचार करतांना व्यक्तिविषयक व सामाजिक असा दोन्ही दृष्टीनें विचार केला पाहिजे.

ह्या सृष्टीकडे जो विचाराच्या दृष्टीनें पाहील त्याची बुद्धि ह्या सृष्टींतील अघटित घटना पाहून थक्क झालीच पाहिजे. ह्या अघटित घटनांचा जो कर्ता असेल त्याचें अस्तित्व घटून त्याच्या अतर्क्य लीलेचा जों जों विचार करावा तों तों आश्चर्यानें बुद्धि कुंठित होते. अशा ह्या सर्वसमर्थ, सर्वव्यापी व सर्वशक्तिमान् परमेश्वराचें स्मरण मूर्तिपूजेच्या नित्य अनुष्ठानानेंच होऊं शकतें. हा जीवात्मा ज्या परमात्म्याचा अंश आहे त्याचें स्मरण जीवात्म्याच्या उत्क्रांतीस आवश्यक असें आहे. अंशानें आपल्या पूर्णांत विलीन होणें हाच मोक्ष. हें विलीनत्व प्राप्त होण्यास आपण ज्याचे अंश आहोंत, त्या पूर्णाचें स्मरण कायम असणें हें अत्यंत अगत्याचें आहे. हें स्मरण नेत्रादि इंद्रियांस गोचर असें प्रतीक कल्पून त्याची उपासना करण्यानेंच कायम राहील. ज्या जगन्नियंत्यानें आपणांस उत्पन्न केलें व विशेषतः ज्या योनींत बुद्धीची व श्रद्धेची आत्यंतिक वाढ होऊं शकते अशा मनुष्ययोनींत उत्पन्न केलें, हा विचार उदित झाल्याबरोबर, त्या जगन्नियंत्याचें स्मरण ठेवून त्याबद्दल **कृतज्ञ** असणें हें प्रथम कर्तव्य आहे. ही कृतज्ञता कशी प्रगट करतां येईल ?

ईश्वर अचिंत्य व सर्वव्यापी असला तरी जो आपल्याशीं बोलेल, आपल्यावर ममता करील असा असावा ही मनःप्रवृत्ति असते. ह्या मनःप्रवृत्तीनेंच कृतज्ञ बुद्धीनें ईश्वरास शरण जाणें व त्याची भक्ति करणें ह्यांतच समाधान आहे. ईश्वर सर्वव्यापी, सर्वशक्तिमान्, अचिंत्य, निर्गुण इत्यादि बौद्धिक ज्ञानापेक्षां ‘ गतिर्भर्ता प्रभुः साक्षी ’ इ० व ईश्वर माझी गति आहे, माझा पोषणकर्ता, माझा धनी, माझा सखा व कैवारी, लेंकराप्रमाणें तो माझें लडिवाळपणें पालन करितो, माझा साक्षी, माझ्या निवाऱ्याचें व आरामाचें घर, माझा अखेरचा आधार, माझा विसांवा, माझा पाठीराखा इत्यादि मनाच्या श्रद्धेच्याच भावना चित्ताचें जास्त समाधान करतात व अशा भावना उत्पन्न होण्यास प्रतीकोपासनाच अवश्य

आहे. ईश्वर माझा साह्यकर्ता आहे. माझा पाठीराखा आहे. तो माझ्या सर्व हालचाली पहातो. तो माझें संकटनिवारण करीलच करील असें श्रद्धयुक्त अंतःकरण झाल्याशिवाय जीवात्म्यांत **आत्मविश्वासयुक्त सामर्थ्यच** उत्पन्न होऊं शकत नाहीं. सर्वत्र यावनी साम्राज्य माजलें असतांना व स्वराज्यस्थापनेच्याविरूद्ध आपलीं वडीलधारीं माणसें असतांनाही "जय जगदंब" म्हणून आपल्या भवानी मातेचें स्मरण करून **श्रीशिवाजी** महाराजांनीं जी यवनाविरूद्ध तलवार उपसली ती अशा दृढतरनिष्ठेशिवाय उपसली काय ? व **शिवाजीची** ही "भवानी माता" साकार व सगुणच नव्हती काय ? उपनिषदादि वेदांत ग्रंथांचें अध्ययन न करतां केवळ एका भक्तीच्या योगानेंच

गोडपणें जैसा गुळ । तैसा देव झाला सकळ ॥
अतां भजों कोणें परी । देव सबाह्य अंतरीं ॥
उदका वेगळा । नव्हे तरंग निराळा ॥
हेम आलंकार नामी । तुका म्हणे तैसे आम्ही ॥

अशी अद्वैत स्थिति ज्या तुकारामाची झाली होती ती 'विटेवरी उभा कटेवरी हात' अशा ह्या साकार विठोबाच्या भक्तीनेंच झाली नाहीं काय ?

देवाची प्रतिमा पुढें ठेवून रोज नित्य नियमानें चोवीस तासांपैकीं फक्त १५।२० मिनिटेंच मनास मूर्तीच्या ठायीं एकाग्र करण्याची संवय लावली तरी ती पुष्कळ आहे. मनाची एकाग्रता (Concentration of Mind) उत्पन्न करणें ही एक शक्ति आहे. ह्या शक्तीचा उपयोग योगाभ्यसांत तर आहेच, परंतु संसारांतही आहे. मनाच्या वाढीस अशा तऱ्हेची एकाग्रता अत्यंत आवश्यक आहे.

'यतो यतो निश्चरति मनश्चंचलमास्थिरम् ।
ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥

"चंचल व आस्थिर मन जिकडून जिकडून बाहेर फुटूं लागेल तिकडून तिकडून विरोध करून तें आत्म्याच्याच ताब्यांत आणावें" अर्थात् असें ताब्यांत आणण्यास प्रतीक पुढें असलें तर फारच सोपें जातें. नित्य नियमनानें प्रातःकाळच्या प्रशांत व सुप्रसन्न वेळीं स्नान करून व शुचिर्भूत वस्त्रें परिधान करून, सुगंधित गंधपुष्प व धूपदीपांनीं आपल्या देवतेचें श्रद्धायुक्त अंतःकरणानें ध्यान करण्यानें व आपल्या देवतेवर मन एकाग्र करण्यानें चित्ताची जी प्रसन्नता होते त्याचें वर्णन

कितीही केलें तरी त्याचा अनुभव घेणाऱ्यांच्या शतांशही कल्पना इतरांस होणार नाहीं! भक्तियुक्त अंतःकरणानें नित्य नियमित वेळीं आपल्या देवतेची पूजा झालीच पाहिजे, हा नियम अंमलांत आणला म्हणजे शरीरारोग्यास अवश्य असणारा नियमितपणा आपल्या अंगांत येतो. धर्माचरण करणाऱ्यांचा ' नियमितपणा ' हा देहस्वभावच बनतो म्हणून ते प्रायः दीर्घजीवी व आरोग्यसंपन्न असतात.

परंतु ह्या लहानसहान फायद्यापेक्षांहि अत्यंत महत्त्वाचा दैवी फायदा मूर्तिपूजेच्या धर्मानुष्ठानानें जो प्राप्त होतो तो हा कीं, मानसिक सामर्थ्य वाढतें. ' यादृशी भावना कुर्यात् सिद्धिर्भवति तादृशी ' हा मानसशास्त्राचा सिद्धांत आहे. श्रीरामचंद्र, हनुमान, श्रीकृष्ण इ० ज्या ज्या देवतेची आपण उपासना करतों त्यांत त्या त्या देवतेच्या फक्त स्वरूपाचेंच नव्हे तर त्यांच्या चरित्रांत उत्कटत्वानें प्रगट झालेल्या सद्गुणांचेंच आम्ही ध्यान करतों व ते ते सद्गुण आमच्या बुद्धींत ठसावेत व श्रद्धेच्या योगानें आचरणांत उतरावेत हीच आमची उत्कट भावना असते—निदान असली पाहिजे—भावना उत्कट करणें हाच मूर्तिपूजेचा उद्देश आहे. जशी व जितकी दृढ भावना असेल तसें, व तितकें फळ मिळतें. लहानपणीं जसा ध्यास लागतो तसा मनुष्य मोठेपणीं होतो. पूजेची सिद्धी प्रतीकांत नाहीं. प्रतीक कोणतेंही असो. प्रतीकाचे ठायीं आपण जो भाव ठेवतो त्यांत 'सिद्धी' आहे. म्हणूनच

श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः

असें म्हटलेंलें आहे. काम्य उपासनेची उपपत्ती ह्या मानासिक सामर्थ्यांत आहे. मनुष्याकडून कर्म त्याच्या बुद्धीच्या प्रेरणेप्रमाणें होतें. बुद्धीस ज्या प्रेरणा होतात त्या सर्व ' बुद्धिः कर्मानुसारिणी ' ह्या नियमाप्रमाणें केवळ गत जन्मांच्या अथवा गत कालाच्या कर्मांप्रमाणेंच होतात असें नाहीं. **कांहीं प्रेरणा स्वतंत्र होतात** ह्याचें मागें प्रतिपादन झालेंच आहे. ह्या स्वतंत्र प्रेरणा चांगल्या होण्यास चांगल्या भावनांचा अभ्यासच वाढविला पाहिजे, म्हणजे त्या भावना उत्कट केल्या पाहिजेत. आपणांस आपल्या यशःसिद्धीचाच ध्यास लागला पाहिजे. ह्या ध्यासाच्या योगानें ईश्वर यश देणाऱ्या प्रेरणा आपल्या बुद्धींत उत्पन्न करतो, व त्या प्रेरणेप्रमाणें वागलें म्हणजे यशःप्राप्ति होते. **ईश्वर नवसास पावतो तो असा पावतो**. तो बुद्धीच्या द्वारें आपणांस मदत करतो. व श्रद्धेच्या द्वारें आपणांस यशःसिद्धि होते. ' मन ' व ' बुद्धी ' ' श्रद्धा ' व ' ज्ञान ' ह्यांचें ऐक्य झालें पाहिजे. हाच ज्ञानकर्मसमुच्चय आहे.

ऐका पांडुरंग एक मात ।
कांहीं बोलणें एकांत ।
आम्हा तारील संचित
तरी उचित काय तुझें ॥ १ ॥

तुकारामाचा हा एक मजेदार अभंग आहे. ह्यांत प्रयत्नवाद भरलेला आहे. मात्र हा प्रयत्न ईश्वरनिष्ठ पाहिजे. तात्पर्य काम्य उपासना गौण असली तरी ती अनुपपन्न नाहीं. एकाग्र मनानें आपल्या सद्भावना उत्कट करणें त्या मूर्तिपूजेनेंच सुसाध्य आहेत ह्या भावना उत्कट करण्यासच

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥

इत्यादि नवविध भक्तीचे प्रकार उपयोगीं पडतात. श्रीमद्भगवद्गीतेंत हेंच प्रतिपादिलें आहे.

योयो यांयां तनुंभक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।
तस्यतस्याचलांश्रद्धां तामेवविदधाम्यहम् ॥

तात्पर्यः-आस्तिक्य बुद्धि, ईश्वरस्मरण, कृतज्ञता, आत्मविश्वास, मानसिक सामर्थ्य, समाधान, शांति, प्रसन्नता, नियमितपणा, ईश्वरार्पण करण्याची बुद्धि म्हणजे त्याग इ० इ० अनेक मोक्षानुकूल आत्मीय दैवी सद्गुण मूर्तिपूजेच्या योगानें प्राप्त होऊं शकतात व हेच सद्गुण अद्वैत ज्ञानास साह्यभूत होतात.

अरुणोदयमाला-औरंगाबाद.

' सुखा ' संबंधीं कांहीं विचार.

प्राणिमात्र उत्पन्न झाल्यापासून नाहींसा होईपर्यंत ज्याची इच्छा करीत असतो, तें 'सुख' काय आहे ह्याचा थोडासा विचार करूं.

सृष्टींतील सजीव भागाकडे पाहिलें तर एक गोष्ट स्पष्ट दिसते. ती ही कीं, प्रत्येक सजीव वस्तु अस्तित्वांत आल्यापासून कांहीं काल वाढत जाते, आपल्या जातीस उत्पन्न करते व नंतर घटत जाऊन नाश पावते. वनस्पती, पशु, पक्षी व मनुष्यप्राणी सर्व सजीव कोटींस हा नियम लागू आहे. ह्या सजीव वस्तु ज्या वाढत जातात व उत्पादन करतात त्या त्यांच्यांतील चैतन्यशक्तीनेंच; परंतु ह्या क्रियांना बाह्य जड स्थितिही त्यांना अनुकूल असावी लागते; तरच त्या वाढतात अगर उत्पन्न होतात. म्हणजे सजीव चैतन्यास उत्पन्न होण्यास व वाढण्यास निर्जीव जड वस्तूंची गरज असते. तदभावीं तें मृत्यु पावतें. वनस्पतींना उत्पन्न होण्यास व वाढण्यास विवक्षित पाणी, खनिज पदार्थ, उष्णता व हवा आवश्यक असते. त्याचप्रमाणें पशुपक्ष्यांना व मनुष्यप्राण्यांनाही विवक्षित हवापाणी व वनस्पतींची गरज असते. सजीव वस्तूंना वाढण्यास ज्या जड वस्तूंची गरज असते, त्यांचीच ह्यांना प्रबल इच्छा होते. ही इच्छा पशुपक्ष्यांत व मनुष्यांत स्पष्टच दिसते. परंतु वनस्पतींनाही ती असलेली प्रयोगाअंतीं दिसून येते. इच्छा असते म्हणजे मन असतें. मनाशिवाय इच्छेचा असंभव आहे. अर्थात् सर्व सजीव कोटीला—वनस्पतींनासुद्धां मन असतें. ह्या ज्या मनाच्या इच्छा त्या तृप्त झाल्या म्हणजे मनास जी अनुकूल संवेदना प्राप्त होते त्यासच 'सुख' म्हणतां येईल. ह्याचा अर्थ असा कीं सुखाचा भोक्ता मनच आहे. इच्छा मनालाच होतात व त्या तृप्त झाल्या म्हणजे "सुख" मनालाच होतें. एवढेंच नव्हे तर प्राणी मनाच्या शक्तीप्रमाणेंच वाढतो व पुनर्जन्म मानल्यास मनाच्या ध्यासानेंच जन्मास येतो. सजीव सृष्टीच्या वाढीला ज्या जड पदार्थांची आवश्यकता असते, बहुधा त्यांचीच त्यांना प्रबल इच्छा होते. आणि ते पदार्थ मिळविण्यासाठींच प्राणी आपल्या शरीरेंद्रियांचा उपयोग करतो आणि शरीरेंद्रियांच्या उपयोगाप्रमाणेंच त्यांची वाढ होते. शरीरेंद्रियद्वारां प्राणी आवश्यक वस्तु प्राप्त करून घेतात व सुख उपभोगतात. हातापायांनीं मिळवावें, जिव्हेनें चाखावें व जठरानें त्याला आत्मसात करावें म्हणजे सुख होतें व त्यानेंच प्राण्यांचें पोषण होतें. वनस्पतीं-

नाही शरीरेंद्रियें आहेत व मनुष्यांनाही आहेत; परंतु वनस्पतीपासून मनुष्यापर्यंत शरीराची व इंद्रियांची पायरी–पायरीनें वाढ झालेली आहे. ज्ञात प्राण्यामध्यें मनुष्यप्राणी बौद्धिक दृष्ट्या अत्यंत विकास पावलेला आहे. जशी ज्या प्राण्याची वाढ, तसेंच त्याचें मनही विकास पावलेलें असतें; अर्थात् मनाप्रमाणें इच्छा व सुखाभिवृद्धिही होत असते. ही उत्क्रान्ति वनस्पतीपासून 'जीवाणू,' सरपटणारे प्राणी, पक्षी, पशू व मनुष्यें अशा पायऱ्यांनीं झालेली आहे. ज्या प्राण्याच्या जितक्या जास्त इच्छा वाढलेल्या असतात तितकें त्याचें सुखही वाढलेलें असतें.

मनुष्यप्राण्याचें " सुख " सर्वांत जास्त वाढलेलें आहे. प्राण्याची वाढ इच्छातृप्तीनें म्हणजे सुखामुळेंच होतें. हीं इंद्रियसुखें कशानें होतात, तर त्याला इंद्रियांचा विषय त्यास प्राप्त झाला म्हणजे त्या त्या इंद्रियांना सुख होतें. डोळ्यानें सुंदर रूप पाहिलें म्हणजे, कानानें श्रुतिमनोहर गाणें ऐकलें म्हणजे; जिभेनें मधुर रस चाखला म्हणजे, त्या त्या इंद्रियांना सुख होतें. इंद्रियांना इंद्रियांच्या विषयांपासून सुख होण्यास त्या त्या विषयांचा स्पर्श इंद्रियांना झाला पाहिजे; स्पर्शावांचून सुख होत नाहीं. इंद्रियें व इंद्रियांचे विषय इतके जवळ आले पाहिजेत कीं, त्यांना त्यांचा स्पर्श होईल. गुलाबाचें फूल अतिशय दूर ठेवलें, तर घ्राणेंद्रियाला त्याच्या सुवासाचें सुख होणार नाहीं. गुलाब पुष्पापासून निघालेला सुगंधित वायु नाकाच्या मज्जातंतूंना स्पर्श करता झाला तरच सुवासाचें सुख होईल. त्याचप्रमाणें हवेंतील प्रकाशाच्या लाटांचा आघात जर डोळ्यावर झाला, तरच रूपाचें सुख होईल. तात्पर्य रूप, रस, गंध हीं निरनिराळीं स्पर्शाचींच रूपें आहेत. 'त्वग्' इंद्रियाचीच डोळ्यापर्यंत झालेली ही उत्क्रांति आहे. ही सर्व त्वचेचीच वाढ आहे. त्वचेपेक्षां रसनेंद्रिय तीक्ष्ण असतें, रसनेंद्रियापेक्षां घ्राणेंद्रिय, घ्राणेंद्रियापेक्षां श्रवणेंद्रिय व श्रवणेंद्रियापेक्षां नेत्रेंद्रिय, त्याप्रमाणें एकापेक्षां एक तीक्ष्ण व सूक्ष्मग्राही इंद्रियें आहेत. इंद्रियजन्य सुखास इंद्रियांचा व इंद्रियांच्या विषयांचा स्पर्श झाला तरच सुख होतें.एरव्ही होत नाहीं; परंतु हा स्पर्शही विवक्षित प्रमाणांतच झाला पाहिजे. बासुंदीची गोडी मर्यादित असेल तरच त्या गोडीपासून जिव्हेला सुख होईल. परंतु ही गोडी मर्यादेबाहेर गेली तर सुख होत नाहीं उलट दुःख होतें. असेंच सर्व इंद्रियांचें समजावें. साखर गोड, तर ती कितीही खाल्ली तरी सुख झालें पाहिजे. मधुर गायन कितीही ऐकलें तरी सुख झालें पाहिजे, परंतु तसें होत नाहीं. ज्यास्तीचा कंटाळा येतो म्हणजे सुखकर होत नाहीं. शिवाय इंद्रियजन्य सुखास इंद्रियांचे विशिष्ट

विषयच कारणीभूत होतात. उदाहरणार्थ, जिभेला साखरेपासून सुख होतें व कारल्यापासून दुःख होतें. कानाला कोकिळेच्या शब्दापासून सुख होतें, व कावळ्याच्या ओरडण्यानें त्रास होतो. इंद्रियांना विशिष्ट पदार्थापासून सुख व विशिष्ट पदार्थापासून दुःख असें कां व्हावें ? हें अनुकूल व प्रतिकूल वेदना उत्पन्न करण्याचें सामर्थ्य पदार्थांत आहे, अथवा इंद्रियांत आहे ह्याचा विचार करतां, असें मानावें लागतें कीं, वस्तूवस्तूंमध्यें विशिष्ट कमी जास्त आकर्षण असतें. लोहचुंबक लोहाच्या कणांनाच आकर्षण करतो, इतर धातूंच्या कणांना करीत नाहीं. पाण्यामध्यें साखर विरघळली जाते, परंतु गव्हाचें पीठ विरघळत नाहीं. हें आकर्षण निर्जीव वस्तूंमध्यें असतें तसें तें सजीवामध्यें दिसतें आणि सजीव निर्जीवामध्येंही दिसतें. हें जें कित्येक वस्तूंना आत्मसात् करण्याचें सामर्थ्य कित्येक वस्तूंत असतें व कित्येक वस्तूंत नसतें त्यावरून इच्छा–अनिच्छा, आकर्षण–अनाकर्षण; प्रेम-तिरस्कार, अर्थात् सुख-दुःख हे प्रकार ह्या जगांत स्वभावतः आलेले आहेत. सुख म्हणजे नेहमीं दुःखाचा नाशच असतो असें नव्हे. "जगांत सारें दुःखच भरलेलें आहे." 'वासना' अगर 'तृष्णा' ह्यांच्या योगानें जें दुःख होत असतें तें त्या तृष्णेच्या शमनानें नाहींसें होतें म्हणून सुख होतें. वस्तुतः सुखाच्या स्वतंत्र वेदना नाहींत, सुखाला स्वतंत्र अस्तित्व नाहीं." असें कित्येकांचें मत आहे. परंतु तें खरें वाटत नाहीं. कारण इच्छा अगर तृष्ण नसतांहि अकस्मात प्राप्त होणाऱ्या इष्ट वस्तूनें सुखच होतें. देशावरील मनुष्यास ज्यानें पूर्वी कधींही फणस चाखला नाहीं, अशा मनुष्यास फणसाचे गरे खाण्यास दिले तर त्यापासून त्यास "सुख" च होईल. गरे खाण्यापूर्वी त्यास फणसाच्या गऱ्याची तृष्णाच नव्हती, मग त्या तृष्णेचें दुःख कोठून असणार ! अर्थात् दुःखनाश म्हणजेच सुख असें नसून सुखाच्या वेदना स्वतंत्र आहेत. आणि त्या इष्ट अथवा आकर्षक पदार्थ प्राप्त झाल्यानें होतात. जीवाच्या उत्पत्तीस व वाढीस सुखाची आवश्यकता आहे. सुख होण्यास शरीर व इंद्रियें सुस्थितींत असलीं पाहिजेत. इंद्रियांना सुख देणारे विषयच प्राप्त झाले पाहिजेत. त्या विषयांचा इंद्रियांना स्पर्श झाला पाहिजे व त्या सुखाच्या अनुकूल वेदना होण्याइतपतच मर्यादेच्या पाहिजेत, तरच सुख होतें. परंतु ही सर्व स्थिति अनुकूल असूनही कधीं कधीं सुख होत नाहीं. उदाहरणार्थ मनुष्य चिंताग्रस्त असला तर त्यामुळें त्यास ह्या सर्व अनुकूलतेपासूनही सुख होऊं शकणार नाहीं. ह्याचें कारण सुख भोगणारें मन प्रसन्न नसतें. इंद्रियांचीं

सुखें हीं मनाचींच सुखें असतात. इंद्रियजन्य सुखें मनासच होतात. इतर सुखसाधना-प्रमाणें इंद्रियेंही सुखांचीं साधनें आहेत. इंद्रियसुखांवांचून मनास सुखी होतां येतें. मनो-राज्यांत वाटणारें सुख अशा प्रकारचेंच असतें. परंतु मनापेक्षां बुद्धीचें सुख श्रेष्ठ प्रका-रचें असतें आणि तें बुद्धि असणाऱ्या मनुष्यप्राण्यांनाच प्राप्त होऊं शकतें. कालिदा-साच्या काव्यापासून, सुभाषित विनोदापासून होणारें सुख पशुपक्ष्यांना मिळणें शक्य नाहीं. नाटकाच्या उत्कृष्ट संविधानाकापासून उत्पन्न होणारे रस अनुभवण्यास व त्यापासून उत्पन्न होणारे सुख उपभोगण्यास बुद्धिच पाहिजे. नाटकांतील करुण रस पहात असतां, करुण रस इतका उत्तम साधला गेला म्हणून रसिक मनुष्य वाहवाच करतो. व त्या करुण रसापासून त्यास सुखसंवेदनाच होतात; कारण त्यांत बुद्धीचें कौशल्य दिसतें. 'बुद्धीचें सुख' ह्याचा अर्थ बद्धिद्वारां मनास होणारें सुख. सुखाचें भोक्तृत्व मनाकडेच आहे. मनास इंद्रियद्वारां जशीं कांहीं सुखें उपभोगतां येतात, तशींच कांहीं सुखें बुद्धिद्वारांही येतात. इंद्रियद्वारां होणाऱ्या सुखापेक्षां बुद्धिद्वारां होणारें सुख सूक्ष्म, विविध व ज्यास्त शाश्वत असतें. म्हणून तें श्रेष्ठ प्रतीचें असतें. परीक्षेच्या विद्यार्थ्यास परीक्षेच्या वेळेसच असणारें पंचपक्वान्नांचें जेवण टाळतां आलें व परीक्षेची वेळ साधली म्हणजे सुखच वाटतें. येथें बुद्धीच्या सुखासाठीं मनास व इंद्रियांस आपलें सद्यः सुख गुंडाळून ठेवावें लागतें. इंद्रियांचीं सुखें हीं वृद्धिंगत व जास्त शाश्वत करण्याकडे बुद्धीचाच उपयोग होतो. साम-र्थ्यानें सुखसाधनें प्राप्त होतात. शरीरसामर्थ्यापेक्षां बुद्धीचें सामर्थ्य श्रेष्ठ असतें. मनुष्यप्राणी समाज करून रहाणारा आहे. मनुष्याच्या बुद्धीप्रमाणेंच मनुष्य समाजही अत्यंत घोटाळ्याचा परंतु विकास पावलेला आहे; म्हणूनच बुद्धिद्वारां प्राप्त होणारीं सुखदुःखें मनुष्यांनाच जास्त होतात. भूतदया, परोपकार, आदरा-तिथ्य, प्रेम, कर्तव्य, भक्ति, मानापमान, अब्रू, पत, धर्म इ. इ. भावनांचा समावेश मनुष्याच्या बुद्धींत झालेला आहे. आणि ह्या भावनांच्या अनुकूल व प्रतिकूल संवेदना बुद्धीनें उत्पन्न होणाऱ्या आहेत. यांच्या अनुकूल संवदनेनें सुख उत्पन्न होतें. इंद्रियविषयक सुखापेक्षां हें सुख किती तरी श्रेष्ठ प्रकारचें असतें. मान-मान्यतेनें होणारें सुख, गोड खाण्यास मिळण्यापेक्षां किती तरी उच्च प्रकारचें असतें. हीं बुद्धीचीं सुखें प्राप्त करून घेण्यासाठीं कधीं कधीं इंद्रियांच्या सद्यः-सुखाचें बलिदान द्यावें लागतें, म्हणजे इंद्रियसंयमन करावें लागतें. मनुष्याला कितीही सुखसाधनें प्राप्त झालीं असलीं तरी त्यास सहचरावांचून त्या सुखसाध-नापासून फारसें सुख होत नाहीं. सुख भोगण्यास आपले इष्टमित्र असले म्हणजे

हेंच सुख दुणावतें. आपल्या सुखांत वांटेकरी आपले कौटुंबीय सुहृत् असले म्हणजे हें सुख वृद्धिंगत पावतें, नसतां तें सुखही दुःखमय वाटूं लागतें. सुहृदीय प्रेम इतकें जाज्वल्य असतें कीं, स्वतः अनेक कष्ट घेऊन सुहृदांस सुखी ठेवण्याचा मनुष्य प्रयत्न करतो आणि असले कष्टही त्यास सुखप्रदच वाटतात.

मनुष्यास समाजप्रिय बनवून, निव्वळ अप्पलपोटी स्वार्थापासून परार्थाकडे वळविणारी बुद्धि जगन्नियंत्यानें त्यास दिली आणि ह्या बुद्धीचाच विकास होऊन देशाभिमान, धर्माभिमान, विश्वकुटुंबित्व अशा उच्च व उच्चतर भावना मनुष्यांत उत्पन्न झाल्या.

सुखाचा शोध करतां करतांच समाजशास्त्र, नीतिशास्त्र, धर्मशास्त्र इ. शास्त्रें उदयास आलीं. खरें व शाश्वत सुख मिळावें, आणि तेंही एकाच व्यक्तीला नव्हे, सर्व समाजाला नव्हे, तर सर्व जगाला मिळावें हेंच ह्या शास्त्रांचें प्रयोजन. आणि अप्पलपोटी रानटी समाजापेक्षां हीं शास्त्रें ज्यांच्यांत प्रसृत झालीं आहेत असे सुधारलेले समाज निःसंशय सुखी झालेले आहेत. देवळें, धर्मशाळा, अन्नछत्रें, पाणपोया, दवाखाने, गरीबांस मदत करणाऱ्या अनेक संस्था, शाळा, इ. विश्वकुटुंबित्व दर्शविणाऱ्या संस्था परोपकाराच्या भावना वाढत आहेत हेंच सिद्ध करतात. आणि ह्या संस्थांपासून सार्वत्रिक सुखसमृद्धिच झालेली आहे. कित्येकांचें असें मत आहे कीं, परार्थ हा स्वार्थाचाच पर्याय आहे. आपल्या सुखासाठीं जर दुसऱ्यास त्रास दिला तर दुसरे आपणास त्रास देतील म्हणून दुसऱ्यास त्रास देऊं नये. आपण दुसऱ्यास मदत केली तर दुसरे आपणास मदत करतील; आपण दुसऱ्याची सोय पाहिली तर दुसरे आपली सोय पहातील. अशा बुद्धीनेंच ह्या परार्थाच्या कल्पना मनुष्याच्या डोक्यांत आल्या. दुसऱ्याचें दुःख पाहिल्यावर जें आपणास दुःख होतें, त्याचा परिहार करण्यासाठीं म्हणजे आपल्या सुखासाठींच मनुष्याच्या अंतःकरणांत दयेचा उगम झाला. तात्पर्य दया, परोपकार, स्वार्थत्याग हीं सर्व स्वसुखप्राप्तीचींच साधनें आहेत हें म्हणणें कांहीं अंशीं खरें असलें तरी सर्वांशीं खरें म्हणतां येणार नाहीं. स्वसुखनिरपेक्ष अशी दया अगर परोपकार मनुष्याच्या अंतःकरणांत उत्पन्नच होऊं शकत नाहीं काय ? कोणी पाण्यांत बुडूं लागला तर स्वतःच्या जिवाची पर्वा न करतां अथवा आपण जर कधीं काळीं पाण्यांत बुडूं लागलों तर हा बुडणारा मनुष्य आपणास वांचवील ह्याचा विचारही मनांत न येतां एखादा हरीचा लाल बुडणाऱ्यास वांचविण्या-

साठीं एकदम पाण्यांत उडी घालतोच ! एकाद्याच्या घरास आग लागली असतां आपला संबंध नसतांही ती विझविण्यासाठीं स्वतःचा देह अग्नींत घालणारे महाभाग ह्या स्वार्थी जगांत आढळतातच ! धर्माच्या उच्च भावनेसाठीं आपल्या सर्वस्वाचा त्याग करणारे धर्मात्मे कधीं कधीं दिसतात. आणि देशप्रेमाच्या भावनेस वश होऊन आपली अलोट संपत्ति देऊन टाकणारे व तुरुंगवास भोगण्यास सिद्ध होणारे महात्मे आहेतच. असले महात्मे हजारांत, अथवा लाखांत एक, ह्याप्रमाणें तुरळक कां होईनात परंतु असतात, सध्यां आहेत, व मागेंही झालेले आहेत. असल्या महात्म्यांचा हा स्वार्थत्याग स्वार्थमूलक म्हणणें म्हणजे स्वार्थाचा कोशांतील अर्थ नाहींसा करणें होय. कचित असले, तरी असली निरपेक्ष स्वार्थत्यागाची बुद्धि ज्याअर्थीं मनुष्यांत दिसते त्याअर्थीं ती स्वतंत्रच असली पाहिजे. आणि दया, परोपकार इ. स्वार्थनिरपेक्ष स्वतंत्र भावना असूं शकतात हें सिद्ध होतें. आतां असें म्हणतां येईल कीं, आपल्या सर्वस्वाचा त्याग करण्यास हे महात्मे जे जे तयार होतात, त्यांच्या भावना तशाच बलवत्तर असतात, त्या भावना कोणच्या ? तर आत्मौपम्याच्या. दुसऱ्याला कांटा मोडला म्हणजे तो आपल्यालाच मोडल्याइतकें दुःख अशा महात्म्यांना होतें व म्हणूनच दुसऱ्यासाठीं आपल्या सर्वस्वाचा त्याग करण्यास ते सिद्ध होतात. आणि अशा सर्वस्वाच्या त्यागानें त्यांच्या मनास सुख होत असलें पाहिजे. असें मानलें तर हें सुख अत्युच्च प्रकारचें म्हटलें पाहिजे. अर्थात् ह्यास 'आत्मसुख' असें म्हणतां येईल. आत्म्याचें स्वरूप आनंदमय म्हणजे सुखमयच आहे. अज्ञानामुळें हें स्वरूप झांकलेलें आहे असें वेदांताचें मत आहे. सुख आत्म्यांतच आहे, बाहेरच्या वस्तूंत सुख नाहीं.

जीवात्म्यांत असलेलें सुख मनास प्रतीत होण्यास अनुकूल वेदना उत्पन्न करणारीं साधनें आवश्यक आहेत. ह्या बाह्य साधनानें, झांकलेलें सुख भासमान होतें. बाह्य साधनांशिवायही हें आत्मसुख मनास भासमान होण्यास ज्ञानाची आवश्यकता आहे. सुखास कारण ज्ञान व दुःखास कारण अज्ञान हा सिद्धान्त अबाधित आहे. विचारानें पुष्कळशी दुःखनिवृत्ति होऊं शकते हें अनुभवसिद्ध आहे. ह्या दुःखनिवृत्तीस समाधान व शांति हीं नांवें आहेत. विचारानें मनास समाधान प्राप्त होतें व शांतीचें सुख मिळतें.

सुखाचा विचार करतां करतां आपण बाह्य साधनांपासून अंतःसाधनांपर्यंत येऊन पोहोंचलों. अप्पलपोटेपणापासून स्वार्थत्यागापर्यंत मजल मारली. केवळ

शरीरसुखापेक्षां ऐंद्रिय सुख श्रेष्ठ, इंद्रियांपेक्षां मनाचें, मनापेक्षां बुद्धीचें व बुद्धीपेक्षां आत्म्याचें सुख श्रेष्ठ, ही सुखाची सर्वश्रेष्ठ पायरी आहे. विचाराअंतीं हेंही कबूल करावें लागेल कीं, श्रेष्ठ श्रेष्ठ सुख मिळविण्यास कनिष्ठ सुखाचा थोडा त्याग करावा लागतो. इंद्रियसुखें मिळविण्यास शरीरसुखाचा थोडा फार त्याग करावा लागतो. मानसिक सुखासाठीं इंद्रियसुखाचा, बौद्धिक सुखासाठीं मानसिक सुखाचा व आत्मिक सुखासाठीं बौद्धिक सुखाचा ह्या प्रमाणें कधीं कधीं त्याग करावे लागतात. वरिष्ठ प्रकारचें शाश्वत सुख मिळविण्यास कनिष्ठ प्रकारचें सद्यःसुख सोडावें लागतें. इंद्रिय सुखें मिळविण्यास शरीरास कष्ट, मानसिक सुख मिळविण्यास इंद्रियांस कष्ट, बौद्धिक सुख मिळविण्यास मनास कष्ट व आत्मिक सुख मिळविण्यास बुद्धीस कष्ट द्यावे लागतात. ह्याप्रमाणें खऱ्या व शाश्वत सुखाचा विचार करतां करतां कष्टामध्यें व त्यागामध्येंच खरें व शाश्वत सुख आहे असें वाटूं लागतें. वासना अथवा तृष्णा ह्या तृप्त केल्यानें तृप्त होत नाहींत, आणखी वाढतच जातात व त्यामुळें दुःखच होतें. आंबा खाण्याची इच्छा उत्पन्न झाली व तो न मिळाला म्हणजे दुःख होतें, बरें तो मिळाला तरी क्षणिक सुख होऊन पुनः त्याच्या प्राप्तीची ज्यास्त इच्छा म्हणून, दुःख; म्हणजे आदि अंतीं सर्व दुःख, ह्यापेक्षां आंबा खाण्याची वासना उत्पन्नच होऊं देऊं नये, व उत्पन्न झाली तरी ती पुरवूं नये, म्हणजे सर्वदा सुखच आहे; अतएव संसारत्याग हाच सुखप्राप्तीचा खरा मार्ग आहे" असें संन्यासप्रवण निवृत्तिमार्गाचे विचार प्रसृत झाले. ह्या निवृत्तिपंथाचें मूळचें तत्त्वज्ञान हें कीं सुखाच्या स्वतंत्र वेदना नाहींत, जें काय सुख वाटतें तें दुःखनाशानें. दुःख हेंच खरें, व तें नाहींसें होण्यानें प्राप्त होणारी जी स्थिति तिला सुख हें एक भ्रामक नांव दिलें आहे. ही वस्तुतः सुख अशी मनाची कोणती स्वतंत्र वृत्ति नाहीं. ह्या तत्त्वज्ञानावर निवृत्तिमार्गीय संन्यासपंथियांची सर्व इमारत उभारलेली आहे. व हिंदुस्थानांत ह्याच वेदांताचें तत्त्वज्ञान प्रसृत झालेलें आहे आणि त्याचाच अपरोक्ष परिणाम हिंदुस्थानच्या व हिंदुधर्मीयांच्या गुलामगिरीच्या रूपानें आज दृग्गोचर होत आहे. मनुष्य काय अथवा राष्ट्र काय भावनेप्रमाणेंच जन्मास येतें व भावनेप्रमाणेंच वाढतें. सुख म्हणून कांहीं नाहींच हें तत्त्वज्ञान मनांत बसल्यावर कोण शहाणा मनुष्य ह्यासाठीं धडपड करील? परंतु ही समजूत अत्यंत भ्रमात्मक आहे. सुख ही स्वतंत्र वेदना आहे. निव्वळ दुःखनाश म्हणजे सुख नाहीं. आणि हें सुख मिळविण्याचा प्राणीमात्रानें आजन्म

उद्योग करणें हेंच जीवित ध्येय आहे. ही माया नव्हे. निसर्गतः प्राणिमात्राचा सुख मिळविण्याकडेच ओढा असतो व असलाच पाहिजे. हीच त्या जगन्नियंत्याची खरी खरी इच्छा आहे. मनुष्यानें ही त्याची इच्छा जर मनुष्य जन्मास येऊन तृप्त करून घेतली नाहीं, तर त्यानें ईश्वरही संतुष्ट होणार नाहीं. पशूप्रमाणें केवळ शारीरिक व ऐंद्रिय सुखांत लिप्त होऊं नये तर त्यापेक्षां उच्च जें मानसिक, बौद्धिक व आत्मिक सुख तें मिळविण्याचा अहोरात्र प्रयत्न करावा म्हणजेच त्या मनुष्यास खऱ्या मुक्तीचें सुख प्राप्त होईल. असें आत्मिक सुख म्हणजे आत्म्याच्या दृष्टीनें सर्व प्राणिमात्राकडे पाहून त्यांचें सुख वाढविण्याचा अहर्निश प्रयत्न करणें हेंच आहे. आणि ह्याच दृष्टीनें व्यक्तीनें आपल्या एकट्याच्या सुखाचा विचार न करतां सर्व जातीच्या, समाजाच्या व देशाच्या सुखाचा विचार करणें व तें थोडें तरी साध्य करणें हेंच मनुष्याचें खरें खरें कर्तव्य आहे. मनुष्यजन्माचा हाच उद्देश आहे. ह्या दृष्टीनें विचार करतां स्वतः मुक्त होण्यासाठीं रानावनांत जाऊन तपश्चर्या करणाऱ्यापेक्षां समाजाच्या सुखासाठीं व राष्ट्राच्या सुखासाठीं राष्ट्रीय चळवळींत पडून देहदंड सोसणारे महात्मे किती तरी पटीनें श्रेष्ठ ठरतात! पाश्चिमात्य राष्ट्रांत अशा तऱ्हेनें समाजासाठीं व राष्ट्रासाठीं कष्टणारे व सर्व लोकांच्या सुख सोयींची वृद्धि करण्यांत आनंद मानणारे किती तरी थोर गृहस्थ होऊन गेले व सध्याही आहेत, आणि त्याचाच परिणाम तीं राष्ट्रें सुखी आहेत, संपन्न आहेत व स्वतंत्र आहेत. रसायन शास्त्रांत, यंत्र शास्त्रांत, भूगर्भशास्त्रांत, विद्युत्शास्त्रांत, विमानशास्त्रांत इ. इ. अनेक भौतिक शास्त्रांत शोध लावून आपल्या देशाच्याच नव्हे तर एकंदर विश्वाच्या सुख सोयींत भर टाकणारे पाश्चात्य देशीय महात्मे खरोखर धन्य होत. ह्यांच्या शोधानें ह्यांना जें सुख—जें आत्मिक सुख मिळालें असेल त्याची कल्पनाही आपणास करतां येणार नाहीं. आमच्या तत्त्वज्ञानांत जर दोष असेल तर तो हाच, तें आम्हांला फक्त वैय्यक्तिक सुखाचा मार्ग दाखवितें. आमचा धर्म आम्हास फक्त वैय्यक्तिक मोक्ष दाखवितो. आणि ह्याचाच दुष्ट परिणाम म्हणजे आम्ही केवळ वैय्यक्तिक स्वार्थी बनलों आहों! आम्हाला खऱ्या कुटुंबाची कल्पना नाहीं. खऱ्या जात्यभिमानाची कल्पना नाहीं. खऱ्या समाजसुखाची कल्पना नाहीं व खऱ्या देशाभिमानाचीही कल्पना नाहीं. स्वतःसाठीं चार्वाकासारखें अप्पलपोटीं सुख पहावयाचें. आणि जात, समाज व देश ह्यासाठीं वेदांताच्या तत्त्वज्ञानाचा आश्रय

करावयाचा अशी लाजिरवाणी आमची स्थिति आहे, त्या आम्हांला खरें सुख कसें मिळावें ! देश सुखी झाला तर समाज सुखी होईल, समाज सुखी झाला तर आमची जात सुखी होईल, आमची जात सुखी झाली तर आमचें कुटुंब सुखी होईल, व आमचें कुटुंब सुखी झालें तर आम्ही सुखी होऊं. सुखी होण्याची ही यथार्थ कल्पना आम्हांला नाहीं. मला मुक्ति मिळाली म्हणजे पुरे. मला समाजाशीं व देशाशीं काय करावयाचें ! मी आपल्या देवाला भजलों. मीं आपली स्नान-संध्या केली व तीही अगदीं एकीकडे एकांतांत जाऊन केली, म्हणजे माझें धार्मिक कर्तव्य संपलें. मग तिकडे समाज कांहींही करो, समाजाची काळजी करणारा मी कोण ? मला चांगली बुद्धि झाली म्हणजे बस, मी कोणाच्या आध्यामध्यांत जाणार नाहीं. ज्याचा तो भोगील. समाजसेवा ही एक अत्युच्च सेवा आहे ह्याची कल्पनाही नाहीं. अर्थात् त्यापासून होणाऱ्या सुखासही आम्ही पारखे झालों आहोंत, आम्हीं फक्त व्यक्तीपुरताच विचार केला !

राजहंस-हैद्राबाद.

आमचे राष्ट्रीय दुर्गुण

भिडस्तपणा

(शिक्षणानें दृष्टि अंतर्मुख होते. दृष्टि अंतर्मुख झाली म्हणजे आपले दोष दिसूं लागतात, आत्मसुधारणेसाठीं असल्या दोषाची चर्चा करणें आवश्यक होतें म्हणून स्थल-कालानुकूलतेप्रमाणें ह्या दोषांची चर्चा करण्याचें योजिलें आहे. परंतु हे दोष दाखवितांना आदौ कनिष्ठ व मागून श्रेष्ठ असा व्युत्क्रम स्वीकारलेला आहे हें येथें सांगितलें पाहिजे. फि.)

" भिडस्तपणा " हा आमचा राष्ट्रीय दुर्गुण आहे, म्हणजे हिंदुस्थानांतील पंजाब, बंगाल, मध्यप्रांत, गुजराथ, महाराष्ट्र, तेलंगण, कर्नाटक इ. सर्व प्रांतांत बहुधा तो सारख्या प्रमाणांतच आढळतो महाराष्ट्र आपणास स्पष्टवक्ता म्हणवितो परंतु इतर प्रांतांच्या मानानें तो मुखदुर्बलच आहे. जन्मतः अंगीं असलेला हा दुर्गुण एक दोन शतकांच्या दास्यत्वामुळें पूर्णपणें वृद्धिंगत पावलेला आहे. अर्थात् आमच्या संस्थानांत तर हा दुर्गुण इतका वाढलेला आहे कीं, त्याची गणना इकडे सद्गुणांतच होत असते ! लौकिकाच्या दृष्टीनें, दरबारीं व्यवहारामध्यें ह्या दुर्गुणामुळें क्वचित, कित्येक व्यक्तींचा फायदा होत असला तरी भिडस्तपणाची उत्पत्ति दुर्गुणाच्या कुटुंबांतच झाली आहे, हें विसरतां कामा नये. ' भीति ' ही ' भिडे ' ची जननी आहे. व ' स्वार्थ ' हा तिचा पिता आहे. ' भीति ' व ' स्वार्थ ' ह्या दंपत्यापासून ' भिडे ' चा जन्म झालेला आहे.

मनांत नसतांहि भीतीनें अथवा स्वार्थलोलुपतेनें दुसऱ्याच्या मतास अनुमती देणें; ह्यास भीड म्हणतात आणि स्वमताविरुद्ध भीतीनें अथवा मतलबासाठीं व दुसऱ्यास खुष करण्यासाठीं एकादें कृत्य करणें ह्यास ' ढोंग ' म्हणतात ' भीड ' व ' ढोंग ' ह्यांचें बहिणभावंडांचें नातें आहे. भावाची गणना उजळ माथ्यानें दुर्गुणांतच आहे. परंतु बहीण साळसूद आहे. हिचें माहेर जरी दुर्गुणाकडे आहे, तरी हिचा ओढा संभावित मनुष्याकडेच असतो. आणि होता होईतों ही संभावित मनुष्यासच माळ घालते ! म्हणून हिच्या माहेरच्या कुलाकडे दुर्लक्ष्य होतें ! परंतु दुर्लक्ष्य झालें तरी काय ! खाण तशी माती. आईबापाचा वाईटपणा

तिच्यांत येत नाहीं असें नाहीं; उलट आपल्या मोहकपणानें ती आपल्या पतीस इतकी वश करून घेते कीं, संभावित मनुष्य बाईलबुद्ध्या होऊन तिच्या कपट-जालांत सांपडतो, व कालेंकरून आपल्या श्वशुर गृहाचाच रहिवाशी होतो! ह्या दृष्टीनें ती आपल्या भावापेक्षांहि वाईटच म्हटली पाहिजे; प्रथमतः मनांत नसतांहि दुसऱ्याचें मन दुखवूं नये ह्या मुर्वतीखातर संभावित मनुष्य आपली संभाविती सांभाळण्यासाठीं भिडस्त होतो व एकदां भिडस्त झाला म्हणजे हळू हळू त्यास 'ढोंग' करण्याचे प्रसंग येतात! म्हणजे दुर्गुण कुटुंबाचें कुलदैवत जें 'असत्य' त्याचाच तो दास होतो!

"उगीच विरुद्ध बोलून लोकांस कशास दुखवा" "होस हो लावण्यानें आपल्या बापाचें काय जातें" असें म्हणून दुसऱ्यास सुखविण्याची बुद्धि, वाटते तितकी चांगली नव्हे, 'सत्यं ब्रूयात्' 'प्रियं ब्रूयात्' 'न ब्रूयात् सत्यमप्रियम्' आणि "अप्रियस्यच पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः" ह्या दोन्ही गोष्टी खऱ्या आहेत; परंतु त्या तारतम्यानें खऱ्या आहेत. एखादा आंधळा अथवा म्हातारा मनुष्य आला असतां "याहो तुम्ही अंध" अथवा या तुम्ही म्हातारे बुवा असें म्हटल्यास ह्या सत्य भाषणाचा दोघांसही राग येईल, तेव्हां अशा प्रसंगीं अकारण असें हें अप्रिय सत्य बोलूं नये. परंतु एखाद्या, पाऊणशें वयमान झालेल्या म्हाताऱ्यानें स्वतःच्या लग्नाच्या इच्छेनें आपणास कन्येची याचना केली तर अशा प्रसंगीं त्यास स्पष्ट सांगितलें पाहिजे "बाबा, आतां तुमचें वय झालें आहे. तुम्ही वयोवृद्ध आहांत, आतां लग्नाच्या भानगडींत पडूं नका, मी आपली मुलगी तर तुम्हांस देणार नाहींच पण दुसऱ्यासही त्यापासून परावृत्त करीन" हें अप्रिय सत्य ऐकून त्याचें मन दुखावेल परंतु परिणामीं हें स्पष्ट वक्तृत्व दोघांसही हितकारकच होईल. तेव्हां अशा वेळेला सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् ह्या मोहाला बळी न पडतां अथवा 'अप्रियस्यच पथ्यस्य वक्ता श्रोताच दुर्लभः' ह्या वचनानें निराशहि न होता स्पष्ट बोलण्याचीच संवय केली पाहिजे. कित्येकांच्या मतें इतकी स्पष्ट भाषा, न वापरतां गोड व दरबारी भाषा वापरावी. "श्रीमंत, आपली इच्छाच आहे तर आपण लग्न करावें, बाकी माझें जर आपल्याइतकें वय झालें असते तर मी लग्नाच्या कधीं भानगडींत पडलों नसतों. माझी मुलगी आपणास देण्यास हरकत नाहीं परंतु तिचें वय फारच लहान आहे इ. इ." परंतु मनुष्य एकदां गोड भाषणाच्या अथवा दरबारी भाषणाच्या मोहांत सांपडला म्हणजे 'असत्य' भाषण नकळत आपलें चंबूगबाळें

त्याच्या जिव्हेवर ठेवते; व एकदां ह्या पाहुण्यास **जिव्हेवरील ओसरी** मिळाली म्हणजे तो हळूहळू हात पाय पसरून अंतःकरणहि काबीज करतो! व्यवहारांत असत्य भाषण दोषार्ह नाहीं अशी एकदां मनाची समजूत झाली म्हणजे खोट्या भाषणाबरोबर खोटें आचरणहि तो सहज करूं लागतो व ह्याप्रमाणें समाजांत असत्याचा प्रसार होऊन सर्व समाजाचें शील बिघडतें!! बिरबलानें रात्रीं हौदांत दुधाचा लोटा भरून टाकण्याचा हुकूम आपल्या सर्व प्रजेस दिला परंतु सकाळीं हौद दुधाऐवजीं पाण्यानें तुडुंब भरलेला बिरबलाच्या दृष्टीस पडला!। सर्वांच्या दुधांत आपलें एक लोटाभर पाणी सहज झांकून जाईल ही खोटी बुद्धि एका व्यक्तीच्या मनांत उत्पन्न होण्याचा अवकाश कीं, तिचें आंदोलन सर्व प्रजेंत शीघ्रतेनें झालें. खोट्याचा प्रसार वायुवेगानें होतो, यःकश्चित दिसणारें निरुपद्रवी असत्याचें नाणें व्यवहारज्ञ म्हणविणारे वापरूं लागतात परंतु त्याचा प्रसार इतक्या झपाट्यानें होतो कीं, सर्व समाजाची दानत बिघडून जाते. वेळेवर स्पष्ट बोलण्यानें जें काम सहज होतें तें मागाहून साम, दाम, दंड, भेद ह्या कोणच्याहि उपायानें कधीं कधीं होत नाहीं. विशेषतः राष्ट्रांतील कर्त्या मनुष्यांमध्यें हा भिडस्तपणाचा दोष असेल तर त्याचे परिणाम सर्व राष्ट्राला अनेक पिढ्या भोगावे लागतात. हिंदुस्थानच्या इतिहासांतून असे प्रसंग पुष्कळ दाखवितां येतील, धर्मराजाच्या भिडस्त स्वभावामुळेंच त्यांस कौरवांशीं वारंवार द्यूत खेळावे लागले! व राघोबादादाच्या भिडस्त स्वभावामुळेंच नारायणरावांचा खून झाला! कर्त्या पुरुषांचें मनोदौर्बल्य राष्ट्रास घातक होतें. परकीय सत्तेत स्वोन्नतीचा मार्ग स्पष्ट वक्तृत्वानेंच खुला झाला तर होतो. परंतु ह्या परतंत्रतेंत भिडस्तपणाचें प्राबल्य इतकें वाढतें कीं, साध्या गोष्टीही मुखावाटें निघत नाहींत. आरंभीं आरंभीं जे थोडे स्पष्टवक्ते असतात, ते अधिकाराच्या जागीं जातांच मुखस्तंभ होऊन बसतात! प्रजा तर बोलून चालून मुकीच आहे; परंतु अधिकारानें ज्यांना तोंड दिलें आहे; व ज्यांची भाषा ऐकणाऱ्या कानांना ऐकूं जाण्याचा संभव आहे असे लोकहि मूग गिळून मुक्याचेच मूकनायक बनण्यांत प्रतिष्ठा मानतात, ह्यांस काय म्हणावें! ह्या भिडेनें राजकीय प्रांतांत तर आमचें नुकसान अतोनात झालेलें आहे व सध्यांही होत आहे; परंतु सामाजिक बाबतींत ही ह्या दुर्गुणानें आमचें बरेंच नुकसान झालें आहे. व्यक्तिशः ह्याचीं उदाहरणें गत इतिहासांतून अथवा वर्तमान इतिहासांतून किती द्यावींत! नीतिधैर्य Master

Morality आमच्यांत नाहींच म्हटलें तरी चालेल. आमची सारी Slave Morality असते. विचार करणारास हिंदुस्थानांतील बहुधा प्रत्येक कुटुंबांत ह्या दुर्गुणाचे परिणाम दिसून येतील. उदाहरणार्थ

" काय करावें ? ही मुलगी माझ्या बिलकुल पसंत नव्हती परंतु आमच्या काकांनीं रुकार दिला तेव्हां कांहीं बोलतां येईना "

" नाहीं तरी मला यंदा लग्न कर्तव्यच नव्हतें परंतु त्यांनीं फारच गळ घातली तेव्हां करून टाकलें झालें. "

" हे गर्भाधानांतले प्रकार आपल्यास बिलकूल पसंत नाहींत, परंतु काय करावें ! ह्या बायकांपुढें कांहीं चालत नाहीं. "

" अहो, कसलें प्रॉस्पेक्टस अन् कसलें काय ? सगळा लुच्चांचा बाजार परंतु आमचे गोपाळराव त्यांना घेऊन आले तेव्हां घेतला झालें एक शेअर, एक इन-स्टालमेंट आतां दिला पुढचें कोणी पाहिलें ? जिवंत रहातों कां मरतों ? "

" काय हो, हें शंकरराव राजवाड्यानीं हें कसलें खूळ काढलें आहे ? मीमांसा कॉलेज काय ? राष्ट्रीय अग्निहोत्र काय ? माझी तर बिलकूल श्रद्धा नाहीं, परंतु आमचे राव साहेब आले तेव्हां टाकला झालें १०० रु. चा आंकडा. पुढें कोण देत बसलें. "

" छेः हो, मला बिलकूल भूक नव्हती, अहो, आतांच फराळ झाला होता. परंतु तुम्हीं फारच आग्रह केला म्हटलें तुमचें मन कशाला मोडा म्हणून बसलों, परंतु आतां फारच पोट फुगलें बुवा. "

अशा प्रकारें आमच्या मनोदौर्बल्याचा डिंडिम वाजविणारीं वाक्यें नित्यशः कोणाच्या श्रवणीं पडत नाहींत ! !

क्षुल्लक गोष्टींतही आम्हीं भिडेला बळी पडतों, व वाटतील तीं वचनें देतों, व निर्लज्जपणें तीं मोडूनही टाकतों !

ह्या वचनभंगाच्या संवयीमुळें आम्हास शब्दाची किंमत वाटेनाशी झाली आहे. वचनभंगाचें पीक समाजांत बोकाळल्यामुळें कोणाच्याच शब्दावर विश्वास बसेनासा झाला आहे. विश्वासाभावामुळें कोणचेंही संघटनात्मक कार्य समाजा-कडून होईनासें झालें आहे. एवढेंच नव्हे तर सामान्य दानत नाहींशी झाल्यामुळें समाजाचा अधःपात होऊं लागला आहे. भीड भिकेची बहीण त्याप्रमाणें दारि-द्र्याची अवदसा तर आलीच आहे. परंतु 'भिडे भिडे पोट वाढे' नुसतें वाढेच नव्हे, तर फुटे, अशी स्थिति निदान आमच्या संस्थानांत तरी दृग्गोचर होते ! !

'वारा वाहील तशी पाठ देणें;' 'थोरामोठ्यांच्या मनाचा कल पाहून बोलणें;' 'पानी तेरा रंग कैसा ? जिसमे मिलाये वैसा' हीं आमच्या वर्तनाचीं तत्वें होऊं पहात आहेत; व ह्या श्रुति प्रामाण्याबरहुकूम वागणें हेंच व्यवहार कौशल्य असेंही मानण्यांत येऊं लागलें आहे!

आमच्या संस्थानांत नुसता भिडस्तपणाच नाहीं तर 'असत्य भाषण,' 'तोंड-पुजेपणा,' 'हांजी हांजी,' कुढेपणा, इ. भिडेची संततीही मुबलक पसरलेली आहे! उघडच आहे हां स हां ऐकून घेण्याची एकदां कानास संवय लागली म्हणजे विरुद्ध बोलणाराचा संताप येऊं लागतो. "बैल गाभण आहे" असें सरकारनीं म्हटल्याबरोबर लागलीच "होय, सरकार नववा महिना चालू आहे" अशीच श्रुतिमनोहर वाक्येंच ऐकून घेण्याची ज्या कानांना संवय त्या कानांवर "बैल नर आहे; नर जातीला अद्याप गर्भाशय प्राप्त झाला नाहीं" हें सत्यकथन-ही विद्युत्पाताप्रमाणें दुःसहच होणार. अशा स्थितींत न्यायाला व सत्याला नेहमीं बंदिवासांत मनांतल्या मनांतील तळघरांत कोंडून घेऊन ओठांचा दरवाजा घट्ट लावून एवढेंच नव्हे तर त्यावर मिथ्या हास्याचें कुलुप ठोकून बिचाऱ्या न्यायाला व सत्याला विवेकबुद्धीचे दंश सहन करीत कुचंबत पडावें लागतें!! व हा कैदखाना नसून रमणीय बागच आहे असें भासविण्यासाठीं वरून तोंड-पुजेपणाचीं सुरूचीं झाडें लावावीं लागतात!

'भिडे' च्या ह्या साम्राज्यांत सर्वत्र एकसूत्री कारभार असतो; आणि तो-ही 'वशीला' ह्या खिदमतगारामार्फत, अथवा 'शिफारस' ह्या दासीमार्फतच चालावयाचा, त्यामुळें सद्गुणसाम्राज्यांतले गुणविकासाचे घोटाळे (Complexity) त्यांत बिलकुल नाहींत! एक थोपट मार्ग! नौकरींत, वकिलींत, व्यापारांत अथवा कोणत्याही धंद्यांत तुम्हांस यश पाहिजे ना! तर त्या खिदमत-गाराला अथवा दासीला प्रसन्न करा कीं, तुमचें यश खात्रीचें! 'वशीला' व 'शिफारस' ह्या दास-दासीला वश करण्याचेंही कांहीं नियम आहेत. हे नियम ही 'Physics' अथवा पदार्थविज्ञान शास्त्रांला धरूनच आहेत! 'Atomic-weight' म्हणून प्रत्येक पदार्थास जसें आंगचें कांहीं वजन असतें त्याचप्रमाणें प्रत्येक मनुष्यास कांहीं विशिष्ट वजन आहे. हें वजन म्हणजे गुरुत्वाकर्षणाच्या नियमानें प्रत्येक जड पदार्थास जें प्राप्त होतें तें नव्हे तसें असतें तर समाजांत जे कित्येक Baby Elephants लहानगे हत्ती दिसतात. त्यांच्याकडून बरेंच काम

झालें असतें. परंतु हें मनुष्यांचें एकमेकावरील वजन पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणावर अवलंबून नसून अंतरिक्षांतील ताऱ्यांमध्यें फलज्योतिष्यांनीं जें सांकेतिक आकर्षण ठरविलें आहे तशांपैकींच ह्या भिडेच्या साम्राज्यांत एका विशिष्ट मनुष्याचें दुसऱ्या विशिष्ट मनुष्यावर एक विशिष्ट प्रकारचें वजन असतें. ह्या वजनाचा आपलें कार्य करून घेण्याकडे जो उपयोग करील तोच खरा व्यवहारकुशल हें Law of Pressure चें शास्त्र व्यवहारांत पडलें म्हणजे सहज अवगत होतें. उदाहरणार्थ असें समजूं कीं एकाद्या कचेरींत १०० रु. ची जागा रिकामी आहे व ती मिळविणें झाल्यास त्या जागेस आपण पात्र आहोंत किंवा नाहीं ह्या फालतुक विचारांत वेळ न घालतां ती जागा ज्याच्या हातांत आहे. त्यावर कोणाचें 'वजन' पडेल ह्या शास्त्रीय शोधास लागलें पाहिजे! त्या शोधानें जो मनुष्य सांपडेल त्याच्यावर दुसऱ्या कोणाचें वजन पडेल, दुसऱ्यावर तिसऱ्याचें, तिसऱ्यावर चवथ्याचें व चवथ्यावर पांचव्याचें असें करीत करीत आपलें वजन ज्याच्यावर पडेल असा मनुष्य सांपडला म्हणजे त्याच्याकडून 'शिफारसपत्र' पांचव्याला, पांचव्याचें चौथ्याला, चौथ्याचें तिसऱ्याला असें लोण घेत येत मुख्य मनुष्यांकडे जावें म्हणजे बहुधा काम फत्ते!! मात्र आपलें लोण चालू असतां जर दुसऱ्या कोणाचें लोण आलें व ह्या दोन चार 'शिफारशी पत्रां'च्या टकरा होऊं लागल्या म्हणजे स्पेन्सरचा Survival of the fittest हा नियम येथें न लागतां, Survival of the weightiest ह्या Law of Pressure च्या नियमाप्रमाणें वजनदार 'शिफारसी पत्रा'चा विजय होतो! रिकाम्या झालेल्या जागेप्रीत्यर्थ जितके अर्ज येतात त्यांच्या दसपट शिफारसी पत्रें येतात, असें एका जबाबदार अधिकाऱ्यानें एकदां फिरस्त्यास सांगितलेलें आहे. ह्या शिफारसी पत्रांना गांगरून जाऊन रिकाम्या जागा भरण्याचें पत्करण्याऐवजीं स्वतःचीच जागा रिकामी करून देणें चांगलें! असें एका नवख्या अधिकाऱ्यांस वाटलें!!

तात्पर्य भिडस्तपाणांत मनुष्य सांपडला म्हणजे तो स्वतःहि घसरत जातो व दुसऱ्याच्याहि अधःपातास कारणीभूत होतो. अधिकाऱ्यांना आमच्या स्वतःच्या अडचणी सांगण्याचें आम्हांस धैर्य नाहीं मग दुसऱ्याची पंचाईत कोण करतो! शेक्सपिअरनें हॅम्लेट नाटकांत एकच पोलोनिअस दाखविलेला आहे. परंतु तोंडपुजेपणांत पोलोनिअसला मागें टाकणारे कितीतरी पोलोनिअस ह्या भिडेनें उत्पन्न केले आहेत.

नौकरानें धन्याला, कनिष्ठांनीं वरिष्ठ अधिकाऱ्यांना, मुलानें बापास, पत्नीनें पतीस, बालांनीं वृद्धांस खुष ठेवलें पाहिजे व त्यांचा आदर केला पाहिजे, हें खरें; परंतु आपले सत्य व न्याय्य विचारहि गोडभाषेंत अथवा प्रसंगीं कटुभाषेंतहि सांगूं नयेत असें नाहीं. कनिष्ठांनीं ते मुद्दाम स्पष्टभाषेंत सांगावेत, व वरिष्ठांनीं ते ऐकून घ्यावेत. त्यांत दोघांचेंही हितच आहे. स्पष्ट बोलणाराचा कधींही राग मानूं नये. स्पष्ट बोलणारा निष्कपटी असतो. भिडेच्या पोटीं कापट्य उत्पन्न होतें व कपटानें नाश होतो. त्यासाठीं अधिकाऱ्यांनीं स्पष्ट बोलणाराला नेहमीं उत्ते-जनच दिलें पाहिजे.

" England is Peopled by men and mostly fools. " असें स्पष्ट बोलणारा कार्लाईल अथवा त्यापेक्षांहि

ऐसें कैसें रे सोंवळें
शिवता होतसे ओंवळें
आली सिंहस्थ पर्वणी
न्हाव्या भटा झाली धणी
शाक्त गधडा जया देशी
तेथें राशी पापाच्या

ह्याप्रमाणें सर्वांत स्पष्ट बोलणारा साधु तुकाराम. असे साधुच जगाच्या उद्धारास कारणीभूत होतात, व कसें बोलूं काय बोलूं अशा भिडस्त माणसाचा अधःपात होतो हें लक्ष्यांत ठेवा.

निजामविजय-हैद्राबाद.

आमचे संस्कार, पाकयज्ञसंस्था, व हविर्यज्ञसंस्था.

ब्राह्मसंस्कार

१ **गर्भाधान**—भार्येला प्रथमतः रजोदर्शन झाल्यावर सोळा दिवसांच्या आंत पहिले चार दिवस सोडून एखाद्या शुभ दिवशीं हा करावा.

हा क्षेत्र (स्त्री) संस्कार आहे. यामुळें प्रथम एकदां केला म्हणजे त्या स्त्रीचें पुढचे सगळे गर्भ संस्कृत होतातः प्रतिगर्भाला ह्या संस्काराची आवृत्ति नको.

२ **पुंसवन**—गर्भ व्यक्त झाल्यावर हा तिसऱ्या महिन्यांत करावा.

गर्भाला पुरुषत्वप्राप्ति व त्याचा लोप न होणें हा ह्या संस्काराचा उद्देश आहे.

३ **सीमंतोन्नयन**—गर्भापासून चवथ्या, सहाव्या, अथवा आठव्या महिन्यांत हा करावा. हाही क्षेत्रसंस्कार आहे. अर्थात् स्त्री प्रथमतः गर्भिणी असतां एकदांच करावयाचा. सीमंत म्हणजे वेणींतील भाग, त्याचें उन्नयन म्हणजे काढणें हें ह्या संस्कारांत प्रधान कर्म आहे.

४ **जातकर्म**—हा संस्कार जन्मलेल्या शिशूच्या नालच्छेदनापूर्वी अथवा अकरावे दिवशीं करावा. त्यांत शिशूच्या जिभेला सुवर्णयुक्त तूप आणि मध सुवर्णशलाकेनें लावावें हें या संस्कारांतील प्रधान कर्तव्य आहे.

५ **नामकरण**—हें शिशु जन्मल्याबरोबर अकराव्या अथवा बाराव्या दिवशीं करावें.

मुलाचें जन्म नांव जें निघेल तें, प्रत्यहीं संध्या झाल्यावर गुरूचें अभिवादन करितांना उच्चारावयाचें, असें नांव उपनयनापावेतों हें मातापित्यांसच ठाऊक असावें. परंतु ह्याशिवाय व्यावहारिक नांव वेगळें ठेवावें.

६ **अन्नप्राशन**—शिशुला सहावा महिना लागल्यावर, अथवा, एक वर्षाचा झाल्यावर अन्नप्रक्षणारंभ हा संस्कार आहे. निष्क्रमण म्हणजे शिशूला घराबाहेर नेण्याचा मुहूर्त. गौतमादिकांनीं अन्नप्राशनांतच ह्याचा अंतर्भाव केला आहे.

७ **चौल अथवा चूडाकर्म**—हा संस्कार शिशूच्या पहिल्या वर्षी, तिसऱ्या वर्षी अथवा उपनयनाबरोबर यथाकुलधर्म करतात. जावळ काढणें व शेंडी

राखणें. **सदोपवीतिना भाव्यं सदाबद्धशिखेनच, विशिखो व्युपवीतश्च यत्करोति न तत्कृतम्** इति देवलः सर्वदा यज्ञोपवीती व सर्वदा बद्धशिख असावें; यज्ञोपवीतरहित आणि शिखारहित पुरुषानें केलेलें श्रौतस्मार्त कर्म न केल्याप्रमाणेंच-व्यर्थ होतें.

८ उपनयन अथवा मौजीबंधन— ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य कुमाराच्या, गर्भांपासून अथवा जन्मापासून अनुक्रमें आठवें, अकरावें, व बारावें वर्षं उपनयनाचा मुख्य काळ असून १६, २२, आणि २४ वर्षांच्या आंत गौणकाल आहे. हा गौणकालहि अतिक्रांत झाला तर ते कुमार पतित **सावित्रिक** होऊन **व्रात्य** संज्ञा पावतात. आपत् कालींसुद्धां ब्राह्मणानें व्रात्यांशीं ब्राह्मसंबंध म्हणजे वेदविषयक अध्यापन, वेदमंत्रानें यजन इ. करूं नयेत. त्याचप्रमाणें **यौन संबंध** म्हणजे कन्यादानग्रहणादि करूं नयेत.

गर्भाधानापासून चौलापर्यंत ज्याचे सर्व संस्कार यथाकाल झालेले असतील, अशाच कुमाराचें उपनयन करतां येतें. संस्कार झालेले नसतील तर गर्भाधानापासून अन्नप्राशनापर्यंत संस्कारलोपाचें प्रायश्चित्त करून चौल संस्कार प्रत्यक्ष करतात. **उप** (समीप) आणि **नयन** (नेणें) वेदाध्ययनाधिकारप्राप्त्यर्थ सावित्रीचा (गायत्रीचा) उपदेश करावा म्हणून बटूला आचार्यासमीप नेणें हें ह्या संस्कारांतील प्रधान कर्म आहे; म्हणून 'उपनयन' नांवानें हा संस्कार नामांकित झालेला आहे. ह्यांत **मौंजी** मेखलेचें म्हणजे मोळ नामक गवताच्या दोरीच्या करगोट्याचें कमरेस बंधन करावयाचें असतें म्हणून या संस्काराला **मौंजीबंधन** हें नांव मिळालेलें आहे. ब्रह्मचर्यादि व्रताच्या पालनास या संस्कारापासून आरंभ होतो. यामुळें **व्रतबंध** अशीहि संज्ञा ह्या संस्कारास आहे. या संस्कारानें द्विज कुमारास **द्विजत्व** प्राप्त होतें. आणि संस्काराभावानें ते **व्रात्य** होतात ' 'द्विज' म्हणजे दुसऱ्यानें जन्मलेला. **मातुरग्रेऽधिजननं द्वितीयं मौंजिबंधने। तत्रस्यमाता सावित्री पिता त्वाचार्य उच्यते.**

मौंजीबंधनांत यज्ञोपवीतधारण आणि सायंप्रातःसंध्येस प्रारंभ होतो. यांचा त्याग मग संन्यासाश्रम स्वीकारानेंच होतो. एरव्हीं करतां येत नाहीं. **मौंजीबंधन** हाच ब्रह्मचर्याश्रमाचा आरंभ होय. ह्या आश्रमाचें मुख्य कर्तव्य ब्रह्म म्हणजे वेद, व वेदांगें यांचें अध्ययन व ब्रह्मचर्य व्रताचें पालन अध्ययनाकरतां आहे.

९ **महानाम्नी**—ब्रह्मचर्यांत १३ वें वर्ष
१० **महाव्रत** — „ १४ „
११ **उपनिषद्व्रत**— „ १५ „
१२ **गोदानव्रत**— „ १६ „

हीं चार वेदव्रतें (संस्कार) म्हणून स्मृतींतून ज्यांचा उल्लेख आहे तीं हीं व्रतें ऋग्वेदाचीं होत. प्रतिवेदालाहि चार चार व्रतें आहेत. अरण्यकाध्ययनाकरितां हीं वेदव्रतें उक्त आहेत. सांप्रत हे संस्कार कोणी करीत नाहींत. प्रायश्चित्त घेऊन कर्त्तव्यनिर्वाह करतात.

१३ स्नान अथवा समावर्तन—सोडमुंज. प्रथम उत्तम पक्ष म्हणजे चार वेदांचें अध्ययन आणि उपरोक्त चार वेद व्रतें केल्यावर हा संस्कार करावा. तीन, दोन, एक वेदाध्यन उत्तरोत्तर गौण समजावें. एका तरी वेदाचें सांग अध्ययन झाल्यावर गुरुदक्षिणा देऊन समावर्तनाविषयीं आचार्यांची आज्ञा घ्यावी. त्याची अनुज्ञा मिळवून समावर्तन करावें. परंतु ब्रह्मचाऱ्याची इच्छाच असेल तर समावर्तन न करतां आजन्म ब्रह्मचर्य स्वीकारून रहावें अथवा ब्रह्मचर्यांतून **प्रवजन** म्हणजे संन्यास करावा.

'**स्नात**' किंवा समावर्तन ह्या संस्कारानें ब्रह्मचर्याश्रम संपून ब्रह्मचर्यव्रताचें विसर्जन होतें. **स्नात** संस्कार ज्याचा झाला त्याला **स्नातक** ही संज्ञा येते, आणि मग तो विवाहाला योग्य होतो. **स्नातक** ह्या शब्दानें पूर्ण विद्वान् असा बोध पूर्वीं होत असे. शास्त्रांत स्नातकाची योग्यता राजापेक्षांहि अधिक मानलेली आहे. स्वतः पित्यानें, आचार्यानें, आणि स्नातक ज्या कोणाच्या घरीं जाईल त्यानें त्यास उच्चासनावर बसावावें आणि पुष्पमाला अर्पण करून त्याचें पूजन करावें असें शास्त्रांत उक्त आहे. **स्नातक** झाल्यावांचून विवाह संस्कार शास्त्रतःच होत नसल्यामुळें **सोंडमुंजीचा** आतां नुसता **फार्स** करतात! 'स्नात' अथवा **समावर्तन** संस्कार करणाऱ्या ब्रह्मचाऱ्याला **उपकुर्वाण ब्रह्मचारी** अशी संज्ञा असून 'स्नात' संस्कार न करतां आजन्म ब्रह्मचर्य पाळणाऱ्याला **नैष्ठिक ब्रह्मचारी** ही संज्ञा आहे. अध्ययन संपवून स्नातक होतो. तो **व्रतस्नातक** आणि विद्या व व्रतें दोहोंला संपवून जो स्नातक होतो **विद्याव्रतोभय स्नातक** म्हणविला जातो.

१४ विवाह अथवा उद्वाह– सहधर्मचारिणीसंयोग. हा संस्कार पुरुष **स्नातक** होईल तेव्हां झाला पाहिजे. आणि पुरुषच्या उपनयनाकरतां जो काल नियत आहे, तोच स्त्रीच्या विवाहाचा नियत काल समजला पाहिजे. विवाहविधि हें स्त्रीचें उपनयन 'पतिसेवा' हा तिचा गुरु, कुलवास आणि गृहकृत्य ही तिची अग्निपरिचर्या. ऋतुमती होण्यापूर्वीं तिचा विवाह झाला पाहिजे.

विवाहसंस्काराला गौतमांनीं '**सहधर्मचारिणीसंयोग**' अशी संज्ञा दिली आहे. विवाहसंस्कारानें गृहस्थाश्रमाचा आरंभ होतो. विवाहानंतर होणारे सर्व 'पाकयज्ञ' 'हविर्यज्ञ' आणि 'सोमयज्ञ' हे दैव संस्कार आणि दुसरीं गृहस्थाश्रमसंबंधीं धर्मकृत्यें हीं दंपत्यकर्तृक आहेत. म्हणून पतीच्या धर्माचरणांत पत्नी ही सहधर्मचारिणी म्हणविली गेली आहे. सहधर्मचारिणीसंयोगावांचून गार्हस्थच नाहीं. धर्म आणि सशास्त्र प्रजा ह्यांची सिद्धि विवाहसंस्कारानें होते. याप्रमाणें १४ संस्कार. जातूकर्त्याच्या मतें गोदान्त व्यतिरिक्त ४ वेद व्रते मानल्यामुळें ते १५ होतात. ह्याबरोबर 'अंत्येष्टी' ची गणनाकरून १६ संस्कार अशी सर्वत्र प्रसिद्ध आहे.

पंचमहायज्ञ.

१ **देवयज्ञ**– प्रत्यहीं **वैश्वदेव** म्हणून जो केला जातो व त्या अग्नीमध्यें जें हवन होतें त्याचें नांव देवयज्ञ.

२ **भूतयज्ञ**– भूमीवर बलिहरण घालतात त्यास भूतयज्ञ म्हणतात.

२ **पितृयज्ञ**– बलिहरणाबरोबरच **स्वधापितृभ्य** या मंत्रानें भूमीवरच आहुति देतात तो.

४ **मनुष्ययज्ञ**—म्हणजे अतिथीला भोजन देणें. हें संभवेल तर '**सनकादिमनुष्येभ्योहित**' या मंत्रानें भूमीवर बलीप्रमाणें अन्न देऊन मनुष्ययज्ञ संपादन करावा.

या चार यज्ञांचा गृहस्थेतराला अधिकार नाहीं.

५ **ब्रह्मयज्ञ**—संगवकाळीं म्हणजे प्रातः दहा वाजल्यावर भोजनापूर्वी 'ब्रह्म' म्हणजे वेदाध्ययन केलेल्या वेदवेदांगाच्या नित्यपाठाला ब्रह्मयज्ञ म्हणतात. हें पठण प्रत्यहीं होऊं शकेल तितकें करावें. काल म्हटलें असेल त्यापुढें आज याप्रमाणें प्रत्येक ग्रंथाची आवृत्ति शक्य तितके दिवसांत संपवून पुनः प्रत्येक ग्रंथाच्या आवृत्तीस आरंभ करावा, असा वास्तविक प्रकार आहे. परंतु आतां;

वेद आणि वेदांगें जे ग्रंथ ब्रह्मयज्ञांत पठनीय आहेत, त्यांच्या 'आदि' घेऊन ब्रह्मयज्ञाच्या प्रतिनिधींची रचना शिष्टांनीं केलेली आहे. ब्रह्मयज्ञानंतर देव, ऋषि-आचार्य, आणि पितर यांचें तर्पण केलें पाहिजे. सायंप्रातःसंध्या, सायंप्रातरौपासन, आणि पंचमहायज्ञ हें **द्विजां**चें नित्यान्हिक होय,

दैवसंस्कार

पाकयज्ञ संस्था.

१ **अष्टका**—मार्गशीर्ष, पौष, व माघ या तीन महिन्यांच्या सप्तमी, अष्टमी, आणि नवमीस वार्षिक कर्म. निदान माघांत तरी करावयाचें हें कर्म मातेच्या, श्राद्धाचें आहे. सप्तमीला अष्टका आणि नवमीस अन्वष्टका मिळून तीन दिवसांचें हें कृत्य आहे [वार्षिक]

२ **श्राद्ध**—प्रति आमावास्येस करावें, यास पिंडपितृयज्ञ म्हणतात. [मासिक]

३ **पार्वण**—प्रतिपक्षीं प्रतिपदेला हें करावें, यास स्थालीपाक म्हणतात.

४ **श्रावणी**—श्रावणी पूर्णिमेस करणें. [पाक्षिक]

श्रवणाकर्म—असें याचें आश्वलायन सूत्रांत नांव आहे.

५ **आग्रहायणी**–हें मार्गशीष पूर्णिमेस करतात. यास प्रत्यवरोहण म्हणतात

६ **आश्वयुजी**—ही आश्विनी पूर्णिमेस आश्वलायनांची ही ७ सातवी संस्था.

७ **चैत्री**–चैत्री पूर्णिमेस **शूलगांव** नामक आ० सू० कर्म ह्याशिवाय **आग्रयण**, **उत्सर्जन**, **आणि** **उपाकर्म** हे तीन संस्कार **अंगिरोक्त** २५ संस्कार गणनेंत अधिक आले आहेत.

उत्सर्जन आणि **उपाकर्म** हे महाराष्ट्रांत श्रावण महिन्यांत होतात. **उत्सर्जना**चा काळ वस्तुतः माघांत आहे. परंतु त्या काळचा अपाकर्ष करून श्रावणामध्यें **उपाकरण** दिवशीं उपाकरणाच्या पूर्वी हा संस्कार करण्याचा प्रघात आहे वेदाध्यापक आचार्यानें आपल्या छात्रासह हे संस्कार करावयाचे असतात.

अधीत म्हणजे ज्यांचें अध्ययन संपलेलें आहे. **छांदिका** म्हणजे वेदादींची **यातयामता** म्हणजे मलिनत्व निरास पावून त्याचें **आध्यायन** म्हणजे सतेजत्व व्हावें यासाठीं **उत्सर्जन** संस्कार असून **उपाकर्म** संस्कार **अध्येष्य**-माणम् म्हणजे ज्यांचें अध्ययन पुढें कर्तव्य आहे त्यांना मागील वेदांच्या उजळणीसाठीं श्रावणीचा प्रयोग आहे.

हविर्यज्ञसंस्था

१ **अग्न्याधेय**—अग्निहोत्र ग्रहण. अग्निहोत्र परिग्रह केल्यावर यावज्जीव राखलें पाहिजे. पत्नीच्या मरणानें अग्निहोत्र विछिन्न होतें.

२ **अग्निहोत्र**—सायंप्रातः प्रत्यहीं हा अग्निहोत्र होम होय.

३ **दर्शपूर्णमास**—प्रतिपक्षास प्रतिपदेस हें **कर्म** इष्टी ह्या नांवानें प्रसिद्ध आहे.

४ **आग्रयण**—प्रतिवर्षी आश्विनी पूर्णिमा ही श्रौत नवान्नेष्ठी होय.

५ **चातुर्मास्ये**—वार्षिक उक्तकाळीं चातु**र्मास्येष्टि** चार इष्टि प्रसिद्ध आहेत.

६ **निरूढ पशुबंध**—षण्मासिक.

७ **सौत्रामणि**—वार्षिक.

१ अग्निष्टोम २ अत्यग्निष्टोम ३ उक्थ्य ४ षोडशी ५ वाजपेय ६ अतिरात्र ७ आप्तोर्याम.

ह्या सात संस्थांना वार्षिकादि काल नियत नाहीं. यांतील कोणतीहि संस्था करण्यास आपण समर्थ आहों असें अधिकाऱ्यास वाटेल तेव्हां शास्त्रोक्त शुभ दिवस पाहून त्यानें ऋतूस आरंभ करावा. ह्या सगळ्या सोम संस्थांत सोमरसाचें प्राधान्य आहे आणि कित्येक संस्थेंत पशूंचें आलभन आवश्यक असतें. आहिताग्नीलाच या संस्थांचा अधिकार आहे. पहिल्या संस्थेला **सोमयाग ज्योतिष्टोम** अशीहि संज्ञा आहे. सोमयाग केल्यानंतर **आहिताग्नीला दीक्षित** ही संज्ञा प्राप्त होते. **दौर्ब्राह्मण्य** परिहारार्थ सोमयाग प्रायश्चित्तरूप आहे. म्हणजे ज्या ब्राह्मण कुलांत तीन पुरुषपावेतों सारखें **वेदाध्ययन** झालेलें नाहीं. वेद आणि वेदी यांचा लोप झालेला आहे त्यास दुर्ब्राह्मण म्हणतात.

(ही संस्कारसूची अरुणोदयमाला औरंगाबाद या मासिकांत आमच्या पूज्य वडिलांनीं प्रसिद्ध केलेली आहे ती पुढील पिढीच्या माहितीसाठीं आम्ही संक्षिप्त रूपानें येथें देत आहोंत.)

सीमोल्लंघन.

विजयादशमीचा सण वेशी जवळ आलेला आहे. आणखी दोन दिवसांनीं तो आपल्या घरीं येईल. परंपरागत रूढीप्रमाणें तो दिवस आपण आनंदांत घालवूं. त्या दिवशीं गोड गोड पक्वान्नावर यथेच्छ झोड उडवूं. आणि नवीन वस्त्रालंकरणांनीं बिभूषित, व गंजलेल्या जुन्या शस्त्रास्त्रांनीं मंडित होऊन इष्ट-मित्रांसह आपण रहातों त्या गल्लीचें, अथवा फार तर तीस मिळणाऱ्या सडकेचें **सीमोल्लंघन** करूं. नंतर शमीच्या झाडावर हल्ला चढवून तिचा पाला ओरबडून काढूं. शमीस दुखविल्यानंतर तिचें पूजन करून, शमीच्या व आपट्याच्या पानांचें **सोनें** मित्रमंडळीस उदार हस्तानें वांटून **सीमोल्लंघनाहून** परतूं. आपल्या ह्या पराक्रमाची व विजयाची बातमी अगोदरच आपल्या घरीं स्त्रियांना कळलेली असेल ! आाणि आपण घरीं पोहोंचतों तों त्या आपणास ओवाळण्यास सामोऱ्या येतलि ! मग आपण लुटून आणलेलें सोनें, व पाटावरील तांदुळाच्या बाहुल्याचें पोट फोडून त्यांत सांपडलेलें नाणें, आपल्या भगिनींस ओवाळणी म्हणून घालूं ! ह्याप्रमाणें ह्या दसऱ्याच्या सणाची परंपरागत आलेली चाल आहे. ह्या सणा-मधील '**विजय**' '**सीमोल्लंघन**' व, '**सोनें**' हे तीन शब्द फार महत्त्वाचें आहेत. परंतु ह्या शब्दांतील अर्थ नाहींसा झाल्यामुळें हे तिन्ही शब्द सध्यां रसहीन 'चोथ्या' प्रमाणें झालेले आहेत. जें नाणें अतिशय प्रचारांत असतें, त्या वरील अक्षरें लुप्त होऊन तें जसें गुळगुळीत होतें, तसेच जे शब्द अनाठायीं व प्रमाणा-बाहेर प्रचारांत येतात, त्यांचे अर्थ लुप्त होऊन तीं अर्थहीन अक्षरें मात्र बनतात ! शब्दांतील अर्थरूपी प्राण निघून गेल्यावर निरर्थक मूळाक्षरांचें प्रेत कायम रहातें. काप जाऊन कानाचीं भोकें नुसतीं कायम रहावींत त्याप्रमाणेंच ह्या शब्दांची स्थिति झाली आहे. '**दसरा**' हा आमचा वीरत्वदर्शक सण आहे. ह्या सण व ह्या सणाशीं संबद्ध झालेले 'शस्त्र,' 'विजय,' 'सीमोल्लंघन,' व 'सोनें' इ० शब्द असें सांगतात कीं, कोणे एके काळीं आम्ही शस्त्रें वापरीत होतों व कोणे एके काळीं आम्ही सीमोल्लंघन करीत होतों तसेंच कोणे एके काळीं बाहे-रून आपल्या देशांत 'सोनें' आणीत होतों, व कोणे एके काळीं आम्हांस 'विजय' प्राप्त होत होता. आमच्या पूर्व पराक्रमाची, व पूर्व वैभवाची आठवण करून देणारे हे शब्द आहेत ! आणि पूर्वेतिहासाचें स्मरण करून देणारे हे सण

आहेत ! पूर्वेतिहास विसरून जाऊं नये म्हणून कुशलपणानें आमच्या पूर्वजांनीं केलेली ही उपयुक्त योजना आहे. परंतु ही योजना कितीही कुशलपणाची व उपयुक्त असली तरी आम्हांस काय होय ! ज्यांची स्मरणशक्ति यत्किंचित् तरीं कायम असेल, त्यालाच आठवण करून देतां येईल. परंतु ज्यांची पूर्वस्मृति अगदींच नष्ट झाली, आणि ज्यांचीं ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें अगदीं बधीर झालीं, त्याच्या संबंधानें 'आठवण' हा शब्दच निरर्थक आहे. उलट सध्याचे सण आठवण बुजविण्यासच कारण होतात. सध्यांच्या आमच्या सणाच्या चालीनें पूर्व वैभवाची व पूर्वेतिहासाची आठवण होण्याऐवजीं आम्हांस मारवाड्याची व आमच्या कर्जाची मात्र आठवण होते. हे सण सध्यां तुपासाखरेचे मात्र काळ झालेले आहेत ! परंतु समाजांत शिक्षणानें ज्यांची विचारशक्ति जागृत झालेली आहे, त्यांनीं ह्यासंबंधीं विचार केला पाहिजे. खऱ्या शब्दांना खोटा अर्थ केव्हांपासून प्राप्त झाला ? **सीमोल्लंघन** म्हणजे वस्तुतः आपल्या देशाची अथवा, प्रांताची सीमा उल्लंघन करून पुढें जाणें आणि हें सीमोल्लंघन उगीच करावयाचें नाहीं तर 'सोनें' म्हणजे संपत्ति मिळविण्यासाठीं करावयाचें. तरच तें खरें सीमोल्लंघन होय. संपत्ति प्राप्त करून घेण्याकडे जी गति त्या गतीसच सीमोल्लंघन हा शब्द लावला पाहिजे. सीमोल्लंघन करून आपण ज्या दिवशीं आपल्या देशांत बाहेरून सोनें मिळवून आणूं त्याच दिवशीं आपली खरी विजयादशमी, व खरा दसरा होईल ! सध्यां आपण 'सीमोल्लंघन' 'सोनें' 'विजय इ. सर्व शब्दांचें नुसतें नाटक करतों. नव्हे मुलामुलींचा बाहुलाबाहुलीचा खेळ करतों. हा खेळ सोडून त्यास खरें स्वरूप प्राप्त होईल असें करण्याची अद्याप वेळ आली नाहीं काय ? हा खेळ, हा अर्थहीन खेळ आतां किती दिवस खेळणार ? ह्या खेळाचा अद्याप वीट आला नाहीं काय ? का सीमोल्लंघन म्हणजे नुसती आपल्या गल्लीची सीमा ओलांडावयाची ? सोनें म्हणजे झाडाचा पाला ओरबाडावयाचा, व हाच विजय समजून आपल्या बायकांकडून आपणच ओवाळून घ्यावयाचें ? ह्या पोरखेळाला काय म्हणावें ? मी सणाला नांवें ठेवीत नाहीं. माझा कटाक्ष त्यांतील खऱ्या अर्थाकडे पहा हें मुख्यतः सांगण्याचा आहे. सीमोल्लंघनाचा खरा अर्थ प्रगतीकडे जी गति त्या गतीसच सीमोल्लंघन म्हटलें पाहिजे. 'सोनें व विजय' प्राप्त होण्यास शस्त्रास्त्रांसह सीमोल्लंघन हें मुख्य आहे. म्हणून प्रथमतः आपण खरें सीमोल्लंघन करण्यास प्रारंभ केला पाहिजे. आपण कांहीं विशिष्ट सामाजिक, धार्मिक व राज-

कीय मर्यादित सीमेमध्यें आपणांस कोंडून घेतलेलें आहे, ती सीमा ओलांडून पुढें पाऊल टाकण्याचा आपण प्रयत्न करूं. असा प्रयत्न जर करूं तरच तें खरें सीमोल्लंघन होईल. जातिभेदाच्या, जातिद्वेषाच्या व अस्पृश्यतेच्या सीमेमधें आपण आपल्याला मर्यादित करून घेतलें आहे, ती मर्यादा उल्लंघून जातिप्रेमाच्या व एकीच्या प्रांतांत आपण पाऊल टाकूं. बालविवाहाच्या रूढीनें आपण खुरट्या प्रजेची सीमा उत्पन्न केली आहे ती सीमा सुद्धां ओलांडली पाहिजे. आपल्या कर्तृत्वशक्तीला सरकारी नौकरीची जी सीमा आपण घालून दिलेली आहे तिचें उल्लंघन ज्या दिवशीं होईल, त्याच दिवशीं 'खरें सोनें' आपणांस मिळेल. स्वदेशाच्या सीमेमध्येंच कुचंबण्याची जी आपणास संवय झाली आहे, ती सोडून आपल्या देशाची सीमा उल्लंघून आमचे तरुण भराभर परदेशांत जाऊं लागतील तेव्हांच खरें सीमोल्लंघन होईल. परकीय मालाचे एजंट बनणें हीच इतिकर्तव्यतेची सीमा आमच्या व्यापाऱ्यांनीं ठरविलेली आहे; ती सीमा ओलांडून ते जेव्हां स्वदेशांत नवीन माल तयार करून त्याचा प्रसार इतर देशांत करतील तेव्हांच खऱ्या सीमोल्लंघनास प्रारंभ होईल. त्याचप्रमाणें आमच्या विद्यार्थ्यांनीं विद्येला उपजीविकेचें जें कुंपण घातलेलें आहे, तें तोडून विद्येच्या उद्देशाच्या मर्यादा ते जेव्हां विस्तृत करतील तेव्हांच तें सीमोल्लंघन होईल. आमच्यांतील धनिकांनीं आपला स्वार्थ केवळ 'कौटुंबिक-स्वार्थाच्या सीमेमध्येंच कोंडून ठेवलेला आहे ती सीमा उल्लंघून देशाचा स्वार्थ हाच खरा स्वार्थ असें समजून जर ते वागूं लागतील तरच खरें सीमोल्लंघन झालें असें समजतां येईल. त्याचप्रमाणें आमच्यांतील बुद्धिवान माणसांनीं आपल्या बुद्धीस स्वार्थाची जी मर्यादा घालून दिलेली आहे, ती मर्यादा ओलांडून परोपकाराच्या प्रांतांत ते जेव्हां पाऊल टाकतील तेव्हांच तें खरें सीमोल्लंघन होईल. आम्ही आपल्या स्त्रियांना अज्ञानाची सीमा आंखून दिलेली आहे, ती सीमा काढून टाकून जेव्हां त्यांचा प्रवेश ज्ञानाच्या प्रांतांत होईल तेव्हांच सीमोल्लंघन करण्याची प्रौढी आपणास मिरवितां येईल! 'पुनरपि जननं, पुनरपि मरणं' ह्याप्रमाणें आमच्या लोकांनीं आपल्या प्रपंचाची मर्यादा बायकापोरांच्या पोषणापुरतीच आंखलेली आहे; तिचें उल्लंघन करून ते जेव्हां देशांच्या प्रपंचाचाहि विचार करूं लागतील, तेव्हांच त्यांनीं सीमोल्लंघन केलें असें म्हणतां येईल. तात्पर्य आमच्या स्त्रियांची दृष्टि चूल व मूल ह्यांतून निघून जेव्हां देश व लोक ह्यांकडे वळेल, आमच्या विद्यार्थ्यांची दृष्टि हिमालय पर्वत, अरबी समुद्र व पासिफिक महासागर ह्या सर्वांना ओलांडून जेव्हां परदेशाकडे लागेल;

आमच्या कवींची दृष्टि रमणी किंवा फूल ह्यांतून निघून जेव्हां वीररसानें ओथंबलेल्या देशाभिमानाच्या काव्याकडे वळेल, आमच्या मुत्सद्यांच्या दृष्टींचें क्षितिज आपल्या पार्टीच्या विजयांतच मर्यादित झालें आहे तें जेव्हां राष्ट्राच्या विजयाची इच्छा करण्याइतपत विस्तृत होईल, आमचे शिपायी पायदळ व घोडेस्वार होण्यांतच पुरुषार्थ समजतात, त्याऐवजीं सेनानी व सेनानायक होण्याची त्यांच्यांत जेव्हां महत्त्वाकांक्षा उत्पन्न होईल, आमचे नावाडी लहानशा नदींतून लहान होडी वल्हविण्यांतच आनंद मानतात त्याऐवजीं मोठमोठालीं गलबतें चालविण्याची त्यांच्यांत जेव्हां शक्ति येईल, आमचे शिल्पकार मोडलेल्या मशिनरी दुरुस्त करणेंच कौशल्याचें समजतात त्यापेक्षां त्यांची बुद्धि जेव्हां नवीन नवीन मशिनरी उत्पन्न करण्याकडे धावूं लागेल, आमचे धर्मशास्त्री जुन्या धर्मशास्त्राची लटपट सोडून देशकालपरत्वें जेव्हां हिंदुधर्माला सर्व संग्राहक व सजीव करूं लागतील, एकएकटे ईश्वरभजन करण्यापेक्षां इस्लाम अथवा ख्रिस्ती ह्याप्रमाणें आम्ही जेव्हां सर्व मिळून ईश्वरप्रार्थना करण्याचें शिकूं तेव्हांच तें खरें सीमोल्लंघन होईल. ह्या खऱ्या सीमोल्लंघनाकडे हिंदुस्थानवासियांची दृष्टि वळो हीच प्रार्थना आहे.

निजामविजय– हैद्राबाद.

'जदीद' गणपति व 'कदीम' गणपति !

प्रसिद्ध पुराणांतील एक अप्रसिद्ध कथा !

कलियुग लागल्यापासून 'सूत शौनकां'च्या भेटी फारशा कधींच होत नाहींत. परंतु परवां सहज दोघांची भेट झाली, तेव्हां शौनकानें प्रश्न केला, "सूता! अरे, अलिकडे काय वर्तमान आहे? देवांच्या राज्यांत चाललें आहे तरी काय? कांहींच वर्तमान कळत नाहीं!" सूत म्हणाला, "शौनका! देवांच्या राज्यांत सध्यां काय चालावयाचें? अरे, कलियुगामुळें सध्यां देवांच्या कचेऱ्या झाल्या आहेत बंद! सध्यां देवांना कांहीं एक काम नाहीं! माणसें आपल्या कचेऱ्या एक महिनाभर बंद ठेवतात. तेवढ्यांतच त्यांना आपण महत्कार्य केलें असें वाटतें! परंतु देवांनीं सबंध एका युगाची सुटी घेतलेली आहे! अरे, देव ते देवच! हें कलियुग संपेपर्यंत आतां देवांच्या कचेऱ्या कांहीं उघडत नाहींत! मग माणसांत इकडे कितीहि गोंधळ उडालेला असो! त्यांच्याशीं देवांना करावयाचें आहे काय!" शौनक म्हणाला, "अरे, हें तर खरेंच! माणसांची काळजी देव कलियुग संपल्यानंतरच घेणार! परंतु, सूता! देवांतील आपसांत काय वर्तमान आहे तेंही कळत नाहीं!" सूत म्हणाला, "सध्यां त्यांचे आपसांतही कांहीं विशेष व्यवहार नाहींत तरी पण परवां थोडी कांहीं गडबड झाली आहे. ती तुला ऐकावयाची असेल तर सांगतों." शौनक म्हणाला, "अरे, विचारतोस काय? ती तरी सर्व सविस्तर सांग." सूत म्हणाला, शौनका, तुला ती कथा ऐकण्याची इतकी उत्सुकता आहे तर ती मी तुला सांगतोंच. सावधान चित्तानें ऐक" असें म्हणून सूतानें कथा सांगण्यास प्रारंभ केला,

सूत म्हणतात, "शौनका! परवांचा प्रसंग असा आहे कीं, गणांचा स्वामी जो सिद्धिविनायक तो आपल्या महालांतील सिंहासनावर चिंतातुर होत्साता म्लानवदन करून बसला असतां त्रैलोक्यसंचारी नारदाची स्वारी आपल्या सड्या शेंडीसह तेथें प्राप्त झाली. दोघांची दृष्टिभेट होतांच नारदाच्या तीव्र दृष्टीस गजाननाचें म्लानवदन पडलें. नारद म्हणाला, 'गजानना! तूं आज असा म्लान कां दिसतोस? हे सिद्धिविनायका! तुला चिंतातुर होण्याचा असा कोणता प्रसंग आला तें मला मोकळ्या मनानें सांग' यावर तो बुद्धिदाता गजा-

नन म्हणाला, 'अरे, नारदा! तूं फार वेळवर आलास! नारदा! माझ्यावर फार मोठें संकट आहे असें नाहीं. या कलियुगांतही माझी पूजाअर्चा सर्व यथास्थित चालू आहे. परंतु त्यांतील एक साधीच गोष्ट अलिकडे माझ्या मनाला वारंवार खाते. ती गोष्ट इतकी साधी आहे कीं ती ऐकल्याबरोबर तूं कदाचित् हंसशीलही! परंतु कांहीं कां असेना, माझ्या मनाला ती साधीच गोष्ट फार जाणवूं लागली आहे खरी!" नारद म्हणाला, 'गजानना! सांग, अगदीं निःशंकमनानें सांग. मी मुळींच हंसणार नाहीं!' गजानन म्हणाला, 'नारदा! अरे, आम्हीं देव म्हणजे अजरामर ना? आमचें अस्तित्व त्रिकालाबाधित आहे हें खरें ना? दिक्कालाची आम्हांला बाधा होत नाहीं; ही पृथ्वी व असल्या सहस्र पृथ्व्या आमच्या समोर उत्पन्न झाल्या व आमच्या समोर लयाला गेल्या हें सर्व तुला माहीत आहे ना?' नारद म्हणाला, 'होय, ही गोष्ट निःसंय खरी आहे. एक वेळ नव्हे, त्रिवार सत्य आहे, गणनायका! त्याबद्दल तुला एवढा संशय कां उत्पन्न व्हावा?'

गजानन म्हणाला, 'अरे, संशय म्हणजे असा कीं, सध्यां भरतखंडांतील—वर्धा—गुंटकल उत्तर दक्षिण व बेझवाडा—मनमाड पूर्वपश्चिम या जंक्शनांच्या मध्यभागीं असलेल्या भरत खंडांतील लहानशा भागांत माझ्या नांवामागें 'जदीद' व 'कदीम' हीं म्लेंच्छ विशेषणें लोक लावूं लागले आहेत. 'जदीद' व 'कदीम' या यावनी शब्दाचा अर्थ 'नूतन' व 'पुरातन' असा आहे. हीं परिस्परविरोधी विशेषणें हे लोक माझ्या नांवामागें कां लावतात? नारदा! तूं त्रैलोक्यसंचारी आहेस तेव्हां तुला कदाचित् याचें कारण माहिती असेल!' नारद म्हणाला, 'गजानना! मला त्याचें कारण खरोखर कांहीं माहिती नाहीं. परंतु, हे सिद्धिविनायका! या क्षुल्लक कारणास्तव तूं एवढें चिंतातुर कां व्हावेंस?' गजानन म्हणाला, 'मी चिंतातूर झालों नाहीं, परंतु नारदा। मला हीं विशेषणें थोडीं अपमानास्पद वाटतात हें मात्र खरें! मला अनेक नांवें आहेत व अनेक विशेषणें आहेत परंतु तीं सारीं सार्थ आहेत. 'जदीद' व 'कदीम' असलीं परस्परविरोधी व म्लेंच्छ विशेषणें अद्यापपर्यंत कोणींच लावलीं नव्हतीं तीं हे लोक माझ्या नांवामागें खुशाल लावतात! याला काय म्हणावें! मला अगोदर यांनीं हीं म्लेंच्छ विशेषणें लावूं नयेत व लावलेंच तर निदान एक तरी लावावें! त्यांनीं मला एक 'जदीद' तरी म्हणावें नाहीं तर 'कदीम' तरी म्हणावें! या मूर्ख

लोकांना असें समजत नाहीं कीं, मी एकच देव एकाच वेळेस 'जदीद' व 'कदीम' कसा होऊं शकेन ?'

नारद म्हणाला, 'हें या लोकांचें मूर्खत्व तर खरेंच ! परंतु, गजानना ! या निर्बुद्ध लोकांनीं तुला कांहीं जरी म्हटलें तरी तुला त्याचा एवढा विषाद बाळगण्याचें कारण काय ? अरे, तुला 'जदीद' म्हटल्यानें तूं जदीद होत नाहींस व 'कदीम' म्हटल्यानें कदीम होत नाहींस ! शिवाय, हें विघ्नेशा ? हे कलियुग संपेपर्यंत देवांना कांहींच करतां येत नाहीं ! अरे, नुसती गंमत पाहून घालविण्याचे हे दिवस आहेत ! ' गजानन म्हणाला, 'नारदा ! परंतु याहीपेक्षां आणखी एक मूर्खपणा या लोकांचा आहे, तो तूं ऐकिला नाहींस, तो हा कीं, माझें 'जदीदत्व' अथवा कदीमत्व ठरविण्याचा अधिकार यांनीं आपल्यांतीलच 'तहशीलदार' नांवाच्या एका मानव प्राण्याकडे दिलेला आहे ! माझ्यासारख्या पुरातन व सनातन देवाचें 'जदीदत्व' ठरविणार कोण तर या नाशिवंत जगांतील अशाश्वत मनुष्यप्राणी व त्यांतही हंगामी तहशीलदार ! हें केवढें आश्चर्य ! परंतु गजानना ! मृत्युलोकांतील मनुष्यप्राणांच्या या मूर्खलीला तुला समजल्या तरी कशा ? मी त्रैलोक्यसंचारी असून मला त्याची गंधवार्ताही नाहीं.' गजानन म्हणाला, 'अरे, माझ्या भक्तांकडून त्या मला समजल्या. हे लोक एका गांवांत मला जदीद म्हणतात व दुसऱ्या गांवांत हे लोक मला कदीम म्हणतात ! ज्या गांवांत हे लोक मला कदीम ठरवतात तेथें माझी सार्वजनिक रीत्या पूजा होऊं शकते परंतु जेथें तहशीलदारांनीं मला जदीद ठरवलें असेल तेथें मात्र माझी सार्वजनिक पूजा होऊं शकत नाहीं ! असे कांहीं विलक्षण निर्बंध केलेले आहेत ?'

नारद म्हणाला, 'वाःवा, हा तर फारच चमत्कार आहे. हें बुद्धिदात्या परमेश्वरा ! सर्व प्राण्यांपेक्षां मानवप्राण्यांना तूं जास्त बुद्धि दिलेली आहेस असें प्रसिद्ध आहे. असें असून या मानवांमध्येंही इतकें असंबद्ध बुद्धिहीनत्व कां दिसावें ? परंतु, गजानना ! कांहीं कां असेना, कलियुग संपेपर्यंत तूं त्यांना कोणचीच शिक्षा करूं शकत नाहींस. मग या क्षुल्लक गोष्टी उगीच मनास कां लावून घ्याव्यात ? जाऊं दे झालें ! कलियुग संपेपर्यंत तूं तिकडे दुर्लक्षच कर.' गजानन म्हणतो, 'नारदा ! मी पुष्कळ दुर्लक्ष करतों; परंतु हा अपमान सहन होत नाहीं. निदान हें जदीद व कदीम विशेषणांचें शुक्लकाष्ठ माझ्या एकट्याच्याच पाठीमागें कां लागावें हें जाणून घेण्याची माझी इच्छा आहे. नारदा ! हें शुक्लकाष्ठ कोणच्याच

देवाच्या पाठीमागें नाहीं रे ? जदीद विष्णु व कदीम विष्णु, जदीद विठोबा व कदीम विठोबा ! जदीद शंकर व कदीम शंकर, जदीद जगदंबा व कदीम जगदंबा ! असलीं नांवें जर कोठेंच ऐकूं येत नाहींत तर एकट्या माझ्याच नांवाच्या मागें व मीं सांगितलेल्या त्या विशिष्ट प्रांतांतच माझा असा अपमान कां व्हावा! याचें कारण जाणण्याची माझी फार इच्छा आहे.' नारद म्हणतो, 'अरे, हें जाणून तूं करणार काय ? गजानना, ज्याचा परिहार करतां येत नाहीं असल्या अपमानाकडे दुर्लक्ष करणेंच चांगलें ! त्याचें कारण जाणून घेणें म्हणजे आणखी मनाला त्रासच होणार ! तेव्हां हे सिद्धिविनायका ! त्याचा तूं विचारच सोडून दे."

सूत म्हणतात, 'शौनका ! नारदानीं श्रीगजाननास हें कारण जाणून घेण्यांत अर्थ नाहीं असें पुष्कळ सांगितलें. तरी श्रीगजाननानीं आपला हट्ट सोडला नाहीं ! तेव्हां दोघांनीं मिळून पार्वतीदेवीकडे जाण्याचें ठरवलें. मातोश्री पार्वतीस कदाचित् या अपमानास्पद विशेषणांचीं कारणें माहीत असतील तर तिलाच प्रथमतः विचारावें असें ठरवून ते दोघे पार्वतीजवळ आले. पार्वती कांहीं कामांत असल्यामुळें तिची लौकर भेट झाली नाहीं. परंतु थोडे थांबल्यानंतर भेट झाली. तेव्हां दोघांनीं मिळून आपल्या आगमनाचा हेतु तिला कळवला. पार्वतीदेवी म्हणाली, "गजानना ! तुझ्या बाललीला मला साऱ्या आठवतात, परंतु तुला हीं विशेषणें प्राप्त व्हावींत असें त्यांत कांहींच नाहीं. अरे, मनुष्य जें आज करतो त्याचें फल त्याला उद्यां मिळतें. बालपणा तारुण्य कसें होईल हें दाखवतें. तेव्हां तुला जर हीं विशेषणें प्राप्त झालीं आहेत तर तीं तुझ्या तरुणपणींच्या कृत्यांचा परिपाक असावा ! त्या कृत्याचें ज्ञान देवाधिदेव जो महादेव त्याला असेल. तर तुम्ही त्याच्याकडे जा." असें म्हणून पार्वती देवी निघून गेली. मग हे शौनका ! नारद व गजानन दोघांनी मिळन महादेवाकडे जाण्याचा विचार केला व ते महादेवांच्या भुवनाप्रत प्राप्त झाले. तेथें जातांच गजानन आंत एकदम जाऊं लागला तों एका गणानें त्याला अडवलें ! नारद म्हणाला, गजानना । अरे, हें तूं काय करतोस ! अरे, या गणाच्या हातीं तुझ्या नांवाचें 'कार्ड' अगोदर पाठीव आणि मग शंकरानें परवानगी दिली तर आंत जा.' गजानन म्हणाला, 'नारदा ! हें तूं विचित्र काय बोलतोस ! मुलाला आपल्या बापाची भेट घेतां येत नाहीं काय ?' नारद म्हणाला, 'अरे, या पूर्वींच्या गोष्टी ! सध्यांचा प्रघात असा आहे कीं, कोणीही कामासंबंधीं भेट घेण्यास आला म्हणजे अगोदर

कार्डे पाठविलें पाहिजे. मग प्रत्यक्ष पितापुत्र असोत अथवा पतिपत्नी असोत हा कलियुगाचा धर्म सध्यां आम्हां देवांनाहि पाळावा लागतो. अरे, पूर्वीचें तें प्रेम नाहींसें झालें आहे. तुझी प्रत्यक्ष माता तरी तुला गेल्याबरोबर भेटली काय !' श्रीगजानन आश्चर्यचकित झाला व त्यांनीं आपल्या व नारदाच्या नांवाचीं दोन कार्डें श्रीशंकराकडे गणांच्या हस्तें पाठविलीं. श्रीशंकरानीं उलट निरोप पाठविला कीं, परवां दिवसां तीन वाजून तीस मिनिटांनीं (स्टँ. टा.) मी तुम्हांस भेटूं शकेन ! हा निरोप ऐकतांच दोघेहि आश्चर्यमूढ झाले ! आणि ठरल्याप्रमाणें तिसऱ्या दिवशीं ठरलेल्या वेळीं त्यांनीं श्रीशंकराची भेट घेतली; व आपली पृच्छा त्यांच्यापुढें ठेवली. श्रीशंकरानीं आपल्या जटा बराच वेळ खाजवल्या व म्हणाले, 'गजानना ! तुला हीं म्लेंच्छ विशेषणें लागावींत असें कांहीं तुझ्या हातून घडलेलें मला तरी आठवत नाहीं. परंतु, गणेशा ! तूं ब्रह्मदेवाकडे जा. कदाचित् ब्रह्मदेवाच्या दप्तरांत यासंबंधीं कांहीं असेल. अरे, त्याच्या चित्रगुप्तांनीं कांहींतरी भानगड केली असावी ! ' हें शंकराचें भाषण ऐकून गजानन निराश झाले ! आणि ब्रह्मदेवाकडे जाण्याचें त्यांनीं ठरवलें ! त्यावर नारद म्हणाला, ' हे विश्वेश्वरा ! आम्ही ब्रह्मदेवाकडे जाऊं. परंतु कलियुगामुळें सध्यां सर्व देवांच्या कचेऱ्या बंद आहेत. त्यामुळें आम्हांस जी माहिती पाहिजे ती मिळूं शकणार नाहीं. यासाठीं आपण ब्रह्मदेवास एखादें शिफारस पत्र द्या. ' हें नारदांचें भाषण ऐकून शंकर बरेच गोंधळांत पडले ! शेवटीं पुत्रप्रेमच तें ! त्यानीं एक शिफारसपत्र खरडून ब्रह्मदेवाला दिलें, तें पत्र घेऊन नारद व गजानन आनंदानें बाहेर पडले.

गजानन म्हणाला, ' नारदा ! हें काय बंड आहे. ब्रह्मदेव माझे श्वशुर आहेत. त्यांस शिफारसपत्र कशाला ? ' नारद म्हणतो, 'अरे गजानना ! तुला सध्यां कलियुगांतील कांहींच प्रकार माहीत नाहींत याचें मोठें आश्चर्य वाटतें ! ' असो. शौनका ! ह्याप्रमाणें ते आनंदित होत्साते ब्रह्मदेवाप्रत प्राप्त झाले तों ब्रह्मदेवाचे सेवक त्यांस आंत जाऊं देईनात. त्यांनीं आपल्या नांवाचीं दोन कार्डें दिलीं; पण ते सेवक तीं कार्डें आंतच नेईनात ! त्यांनीं त्यांची पुष्कळ विनवणी केली पण व्यर्थ ! शेवटीं नारद म्हणाला, 'गजानना ! तुझ्याजवळचा एक मोदक त्यांना दे ! अरे, **को न याति वशं लोके मुखं पिण्डेन पूरितः**

' मोदक घेतल्यावर हा सेवक आपलें कार्ड ब्रह्मदेवास खात्रीनें पोंचवील. ' त्याप्रमाणें गजाननानें आपल्याजवळचा एक मोदक ब्रह्मदेवाच्या सेवकास दिला

व सेवकांनीं त्याचीं कार्डें ब्रह्मदेवाकडे नेलीं. ब्रह्मदेवानीं लागलीच दोघांना आंत बोलाविलें. आंत जातांच नारदांनीं बरोबर आणलेलें शिफारस पत्र ब्रह्मदेवाच्या हातांत दिलें! ब्रह्मदेवानीं तें वाचलें व गजाननाला सर्व हकीकत विचारली. ती हकीकत ऐकल्यावर ब्रह्मदेव थोडे विचारांत पडले! ते म्हणाले, 'या वेळेस कचेऱ्या बंद आहेत. आणि ही तुमची कारवाई दप्तरांत धुंडाळली पाहिजे. गजानना! तुला हीं विशेषणें कां लागलीं हें कळण्यास चित्रगुप्ताचें दप्तर पहावें लागेल. या वेळेस कांहींच करतां येत नाहीं. पण ज्याअर्थीं तूं शंकराचें शिफारसपत्र आणलें आहेस त्याअर्थीं कांहींतरी केलें पाहिजे हें खरें!' असें म्हणून ब्रह्मदेवानीं एक लहानसें चिटोरें चित्रगुप्तांना लिहून दिलें व नारदास म्हणाले, 'हें चित्रगुप्तास दाखवा.' नंतर नारद व गजानन चित्रगुप्ताकडे गेले व ब्रह्मदेवाचें तें चिटोरें त्यांनीं त्यास दाखविलें. चित्रगुप्त म्हणाला, 'या दिवसांत आम्हांला सुट्टी आहे. आम्ही हें काम कां करावें!' नारदानीं पुष्कळ विनवणी केली तरी तो ऐकेना. शेवटीं नारद गजाननास म्हणाला, 'गजानना! या चित्रगुप्तास तुझ्या जवळचे दोन मोदक देऊन टाक.' त्याप्रमाणें चित्रगुप्तास दोन मोदक मिळाल्यानंतर त्यानें तात्काळ एक फाईल काढून त्यांच्याजवळ दिली! ती फाईल त्यांनीं ब्रह्मदेवाजवळ नेली. ब्रह्मदेवानीं ती पुष्कळ चाळून पाहिली परंतु त्यांतून कांहींच निष्पन्न होईना. शेवटीं ब्रह्मदेव म्हणाले, 'गजानना! हें अतिशय गुप्त आहे, ज्याला Confidential म्हणतात तशांतील हें प्रकरण दिसतें! नुसतें गुप्तच नाहीं तर पोलिटिकलशींही त्याचा कांहीं संबंध येत असावा! यासंबंधीं माहिती आमच्याजवळ नाहीं. पोलिटिकल गुप्त कागद सर्व श्रीविष्णूकडे असतात तेथें तुम्हांला बरीच माहिती मिळण्याचा संभव आहे.' हें ऐकून श्रीगजानन तर फारच निराश झाले. पण नारद म्हणाला, 'ब्रह्मदेवा! आम्हीं श्रीविष्णूकडे जाऊं. परंतु तुम्हीं त्यांना शिफारसपत्र द्या;' त्यावर ब्रह्मदेव म्हणाले, 'नारदा! तुला वेड तर लागलें नाहीं! अरे, श्रीविष्णूनां शिफारसपत्र कोण देणार! जर तुम्हांला तशी शिफारसच पाहिजे असेल तर लक्ष्मीची शिफारस लावा! तेथें लक्ष्मीशिवाय कोणाचेंच कांहीं चालत नाहीं!' हें ब्रह्मदेवाचें वाक्य ऐकून नारद तर स्तब्धच झाले!" अस्तु. सूत म्हणतात, 'शौनका! नारद व गजानन तेथून निराश अंतःकरणानें निघाले. मार्गांमध्यें गजानन नारदास म्हणतो, 'नारदा! माझे तीन मोदक नाहींसे झाले. आणि काम अद्याप कांहींच झालें नाहीं! अरे, लक्ष्मीची

शिफारस श्रीविष्णूकडे न्यावयाची म्हणजे तें शक्य कोटींतील दिसत नाहीं! माझें तिचें तर अतिशय वांकडें! कारण मी सरस्वतीचा पति व सरस्वतीचें आणि तिचें वैर तर जगप्रसिद्धच आहे! तेव्हां हें व्हावें कसें!' नारद म्हणाला, 'असा हताश होऊं नकोस. मीं एक युक्ति योजिली आहे.'

पिता रत्नाकरो यस्य लक्ष्मीर्यस्य सहोदरी।
शंखो रोदिती भिक्षार्थी फलं भाग्यानुसारिणः॥

अरे, लक्ष्मीचा भाऊ जो शंख त्यास आपण वश करून घेऊं या! त्या भिक्षेकऱ्याला वश करण्यास काय लागणार? तूं चार मोदक त्याला दिलेस कीं तो तुला लक्ष्मीची शिफारसचिठ्ठी आणून देईल! शंखाची शिफारस लक्ष्मीला व लक्ष्मीची शिफारस श्रीविष्णूनां असें हें सूत्र जमवलें पाहिजे!' थोडे आढेवेढे घेतल्यावर गजानन नारदाच्या मतांस अनुकूल झाला व दोघेही लक्ष्मीची शिफारस घेऊन विष्णुमंदिराप्रत प्राप्त झाले. विष्णुदूतांजवळ आपआपल्या नांवांचीं कार्डें देतांच तेही त्याकडे दुर्लक्ष करूं लागल्याचें पाहून शेवटीं त्यांसही चार मादक देण्यांत आले! तेव्हां त्यांची दाद विष्णूकडे लागली! श्रीविष्णु आपल्या शेषशाई आरामखुर्चीवर जगद्वृत्त वर्तमानपत्र वाचीत नुकतेच पडले होते. ही मंडळी भलत्याच वेळीं आली म्हणून त्यांस बराच राग आला. परंतु नारदानीं लक्ष्मीची शिफारसचिट्ठी त्याच्या हातांत देतांच शंकरानीं हालाहल विष पचविलें त्याचप्रमाणें श्रीविष्णूनीं आपला राग गिळून टाकला! आणि गजाननास हकीगत विचारूं लागले. गजाननाची ती हकीकत ऐकून श्रीविष्णु आसनावरून स्वतः उठले व आपल्या कचेरींतील फाईली पाहूं लागले! बराच वेळ फाईली चाळल्यावर भगवान् गजाननाकडे वळून म्हणतात, 'गजानना!' 'जदीद' व 'कदीम' हीं यावनी विशेषणें भरतखंडांतील एका विशिष्ट प्रांतांत तुला लावण्यांत येतात हें योग्यच आहे. तुझ्या हातून तसेंच कार्य घडलें आहे. अरे, तूं **रावणाला** फसविलें आहेस व त्याचा अपमान केला आहेस, हें पहा. सी. आय्. डी. च्या Confidential Report मध्यें तुझ्याविषयीं काय लिहिलें आहे तें!' असें म्हणून श्रीविष्णूनीं ती फाईल गजाननाच्या हातांत दिली व ते म्हणाले, 'अरे, आम्ही हें Political Confidential कोणासच दाखवीत नसतों. परंतु तूं लक्ष्मीची शिफारस आणलीस म्हणूनच तुला दाखवितों!' गजाननानें फाईल पाहिली त्यांत पुढील गुप्त मजकूर होता!:—

गजाननाचें स्तवन । देव करिती कर जोडून ॥
म्हणती दिव्य लिंग सोडवून । स्थापी अक्षयीं गणपती ॥ २३ ॥
ऐसा देवीं प्रार्थिला एकदंत । तंव रावणासि मूत्र लागलें बहुत ॥
पुढें पाऊल न घालवत । चरफडीत मूत्रभरें ॥ २४ ॥
भूमीवरी लिंग न ठेवावें । ऐसें पूर्वीं सांगितलें उमाधवें ॥
हातीं घेऊन लघुशंकेसि बैसावें । हेंही कर्म अनुचित ॥ २५ ॥
तंव तो सिद्धिबुद्धीचा दाता । विप्रवेषें गाई राखितां ॥
त्यांसी लंकानाथ म्हणे तत्वता । लिंग हातीं धरीं हें ॥ २६ ॥
विप्र म्हणे लंकापती । माझ्या गाई रानोरान पळती ॥
तुझ्या मूत्रशंकेस वेळ किती । लागेल हें न कळे मज ॥ २७ ॥
रावण म्हणे न लागतां क्षण । येतों मूत्रशंका करून ॥
विप्र म्हणे तीन वेळ बाहीन । न येसी तरी लिंग टाकीन भूवरी ॥ २८ ॥

× × × ×

दुसरी घटका झाली पूर्ण । हांक फोडी गजानन ॥
एवं घटका झाल्या तीन । कदापि रावण न उठेचि ॥ ३३ ॥
जैसें पाखंडियाचें कुमत । न सरेचि वादितां पंडित ॥
तैसें रावणाचें मूत्र न सरे सत्य । पुनः एकदंत हांक फोडी ॥ ३४ ॥
म्हणोनी ठेविलें भूमंडळीं । अक्षय्य स्थापिलें कदाकाळीं ॥
ब्रह्मादिकां उपटे ना ॥ ३५ ॥

श्री शिवलीलामृत– अ. ३

सूत सांगतात, "शौनका ! गजाननानीं हा रिपोर्ट समग्र वाचला व विचार करून म्हणते झाले, 'भगवन् ! यांत माझा काय अपराध आहे ! मी आपल्या आज्ञेप्रमाणें हें देवांचेंच कार्य केलें आहे !' श्रीविष्णु म्हणाले, 'गजानना ! हें कार्य माझ्या आज्ञेनुसार तूं देवांसाठींच केलेंस, हें मी जाणतों व या तुझ्या लहानशा कृत्यानें देवाचें महत्कार्य झालें हेंहि खरें, परंतु तूं **रावणास फसविलेंस व** त्यामुळें त्याचा थोडा **अपमान झाला हेंही खोटें** नाहीं. कर्माचें फळ हें मिळालेंच पाहिजे हा तर माझा कायदा आहे. म्हणून रावणाच्या झालेल्या अपमानाची प्रतिक्रिया म्हणून तुझाही थोडा अपमान या कलियुगांत होत आहे ! हा अपमान यःकश्चित आहे.' नारद

म्हणाला, 'भगवान ! माझी आणखी एक शंका आहे. गजाननानें रावणाचें लिंग **गोकर्ण महाबळेश्वरास** ठेविलें व गजाननाचा अपमान तर या दुसऱ्याच प्रांतांत होत आहे याचें कारण काय ! ' यावर श्रीविष्णु म्हणाले, " नारदा ! ही तुझी शंका बरोबर आहे. परंतु सध्यां या स्वर्गांत इतिहाससंशोधनाचें कार्य सुरू झालेलें आहे. मृत्युलोकांतील प्रसिद्ध इतिहास संशोधक **राजवाडे** येथें स्वर्गांत आल्यापासून त्यांनीं येथेंही आपलें संशोधनकार्य आपल्या स्वभावानुरूप सुरू केलें आहे ! व त्यांच्या संशोधनांत असें सिद्ध झालें कीं, रावणाचें आत्मलिंग गजाननानें ठेविलें ती जागा **गोकर्ण महाबळेश्वर** नसून **औरंगाबादे**जवळ जें **वेरूळ** क्षेत्र आहे ती जागा असावी. येथें गजाननानें आपणांस फसवून लिंग जमिनीवर ठेवलेलें पहातांच रावणास राग तर आलाच पण येवढ्याशा लहान पोरानें आपणास फसवावें काय ? म्हणून स्वतःचीच त्यास लज्जाही वाटली ! म्हणून त्यानें त्या लिंगास **घृणेश्वर** असें नांव दिलें. परंतु पुढें घृणेश्वर, घृणेश्वर म्हणतां म्हणतां **घृष्णेश्वर** असें त्या लिंगास नांव पडलें. तेंही एक ज्योतिर्लिंगापैकींच आहे. आणि हें स्थान ज्या निजाम राज्यांत आहे त्यांत तुझा अशा तऱ्हेनें अपमान होणारच !" हें भगवंताचें भाषण ऐकून श्रीगजानन तर चकितच झाले ! व म्हणाले, भगवन् ! " हीं माझीं विशेषणें आतां नाहींशीं कशी होतील !" श्रीविष्णु म्हणतात, " गजानना ! आम्हां देवांना सध्यां कलियुग असल्यामुळें मृत्युलोकावरील माणसांत प्रत्यक्ष जातां येत नाहीं. पण तूं मनांत आणल्यास तूंच त्याचा उत्तम उपाय करूं शकशील ! अरे, देवांना काय अथवा मानवांना काय, त्यांचें सुख, त्यांचा देव, त्यांचा आनंद इ. त्यांच्याजवळच असतात ! परंतु उगाच त्यासाठीं ते बाहेर धडपड करीत फिरतात. ते स्वतःच दोषी असतात. आणि उगाच दुसऱ्याच्या दोषानें आपण दुःखी झालों असें समजतात. गजनना ! तूं आपल्या भक्तांनां सद्बुद्धि दे. हें तुझ्या स्वाधीन आहे. तुझे भक्त आज जातिभेदानें विभागलेले आहेत. **त्यांना एक होण्याची बुद्धि दे.** तुझे भक्त अस्पृश्य लोकांना तुझ्या दर्शनास व पूजेस येऊं देत नाहींत, असली संकुचित बुद्धि तूं त्यांच्यांतून काढून टाक. आचांडाल सर्व हिंदुमात्राला तुझ्या दर्शनांत व पूजेंत भाग घेण्याची बुद्धि तुझ्या भक्तांना तूं दे म्हणजे सर्व हिंदुमात्रांची प्रचंड एकी वाटेल तें कार्य करूं शकेल." **सूत** म्हणतात, **शौनका** ! " याप्रमाणें गजाननानीं व सर्व देवांनीं मानवांच्या उद्धारासाठींच ह्या ज्या मानवांच्याच लीला दाखविल्या आहेत त्या जे

लोक भक्तियुक्त अंतःकरणानें वाचतील व श्रवण करतील व या वर्षी एकवीस मोदकांच्या ऐवजीं जे लोक एकवीसशें मोदक श्री **गजाननास** अर्पण करतील त्यांचा इहपर निश्चयानें उद्धार होईल असें समज."

इति श्री कल्पनासागरपुराणे तर्कवितर्क खंडे विचारविवेकसर्गे जदीद्–कदीम गणपतिर्नाम द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ *

निजामविजय– हैद्राबाद.

* 'जदीद' ह्याचा अर्थ नवा, व 'कदीम' ह्याचा अर्थ जुना हे उर्दू शब्द आहेत; निजाम राज्यांत सार्वजनिक गणेशोत्सवांना मोठ्या खटपटीनें परवानगी मिळते. तीहि फक्त जे गणेशोत्सव जुने म्हणजे वीस पंचवीस वर्षांपूर्वीपासून चालू आहेत, त्यांनाच परवानगी देण्यांत येते. आणि हा जुनेपणा ठरविण्याचें कामहि तहसिलदारा (मामलेदार) वर सोंपविलें जातें. हा हुकूम निघाला, त्या वेळेस जदीद गणपति व कदीम गणपति असले व्यभिचारी शब्द सुशिक्षित मोठमोठी मंडळीहि आपल्या भाषणांत उच्चारीत त्याला उद्देशून हा विनोदात्मक लेख लिहिला आहे.

आमच्या गांवांतील 'मोटार सर्व्हिस'!

अथवा नीतिपाठ देणारी एक संस्था!!

आमच्या गांवीं मोटार सर्व्हिस सुरू झाली. ही आनंदाची बातमी समजल्यानंतर लौकरच तो आनंद अनुभवण्याचा प्रसंग मला आला. बरोबर आमचे एक डॉक्टर स्नेहीहि होते. स्टेशनच्याबाहेर आल्याबरोबर मोटार आमच्या दृष्टीस पडेल असें आम्हांस वाटलें होतें. परंतु स्टेशनाबाहेर दोन फर्लांग आलों तरी मोटार कोठें दृष्टीस पडेना! म्हणून आम्हीं निराशेच्या गटांगळ्या खाऊं लागलों! इतक्यांत मोटारच्या शिंगाचा मंजुळ स्वर-कारण त्यावेळेस तो स्वर आम्हांस फारच आल्हादकारक वाटला–आमच्या कर्णरंध्रावर पडला! आणि निराशेनंतरच्या आशेचें स्वारस्य आमच्या लक्षांत आलें. आमचे डोळे एकदम त्या हॉर्नच्या आवाजाकडे वळले, तो रंग उडालेल्या लाकडांच्या फळ्यांचा सापळा चाकावर उभा असलेला दूर एका झाडाखालीं दिसला! ती जरत्कारू मोटार आमच्या दृष्टीस पडली! अर्थात् कानास झालेल्या आनंदाचे वांटेकरी डोळ्यांस होतां आलें नाहीं. उलट ही अनुभववृद्ध मोटार आम्हांस घरीं सुरक्षित कशी पोहोंचवील ही शंका मनांत उत्पन्न झाली. परंतु ह्या मोटारीशिवाय तेथें दुसरें कोणचेंहि वाहन नसल्यामुळें "सर्ववाहानान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज" हा भगवंतांनीं केलेला उपदेश मोटारही करूं लागली, आणि "संशयात्मा विनश्यति" ह्या भगवंताच्या वाक्यानें आम्ही आपल्या मनास तयार करून मोटारीसच शरण गेलों! ही मोटार स्टेशनापासून इतके दूर रुसल्यासारखी कां? ह्याची चौकशी करतां असें समजलें कीं ही **करोडगिरीच्या (कस्टम)** मुन्शी साहेबांची योजना आहे. करोडगिरीचा नाका चुकवून प्यासेंजर मोटारमध्यें एकदम बसतात हे त्यांस सहन झालें नाहीं! उघडच आहे '**गिरी**' चढून जाण्याखेरीज मोटारचें कैवल्यसुख कसें अनुभवतां येतें? आमच्या ट्रंका व बोचकीं करोडगिरीच्या नाक्यावर उचकलीं गेलीं! डॉक्टरसाहेब सूटपाटलोनमध्यें असल्यामुळें त्यांची ट्रंक फारशी उचकली गेली नाहीं, परंतु माझ्या ट्रंकेची बरीच चांचणी झाली, इतकी कीं ट्रंक बंद करतांना आंतील सामान ट्रंकेच्या झांकणाविरुद्ध बंड करूं लागलें. झांकणाला स्वस्थानावर बसूंच देईना! शेवटीं

रेल्वेच्या गार्डसारखी दडपशाही करून सामानाला दोन्ही हातानें कोंचलें व झांकण बंद केलें आणि त्यावर डॉक्टर साहेबांना उभे करून कडी बसविली व कुलूप घातलें ! आम्हांस मोटारींत बसण्याची घाई झाली होती. कारण प्यासेंजर पुष्कळ असल्यामुळें नीट जागा मिळते किंवा नाहीं हा संशय होता. ऊन अतिशय होतें. स्टेशनावर हमाल नसल्यामुळें आम्हांस स्वतःच हमाल बनावें लागलें ! **करोड-गिरींतील** सामान उचकाउचकीचा त्रास झाला. तहानही बरीच लागली होती परंतु तेथें पाणी नव्हतेंच ! भलत्याच ठिकाणीं पाण्याची अपेक्षा करणें ही आमचीच चूक होती ! भगवद्गीतेंतील "**तितिक्षा**" पुष्कळ दिवस आम्हांस समजली नव्हती व अनुभवतांहि आली नाहीं "**मात्रास्पर्शास्तु कौंतेय शीतोष्णसुख-दुःखदाः। आगमापायिनोऽनित्यंस्तां तितिक्षस्व भारत** ! ह्या श्लोकांतील '**तितिक्षा**'. कशी अंमलांत आणावी हें शिक्षण आम्हांस येथें चांगलें मिळालें ! सुपारीचें खांड तोंडांत टाकून जिव्हेची तृष्णा भागविली ! आणि मोटारमध्यें विराजमान झालों. डॉक्टरसाहेब पुढच्या–ड्रायव्हरजवळच्या मानाच्या जागीं बसले. थिएटरमध्यें फर्स्ट क्लासांतील कोचाचें जें महत्त्व, तेंच मोटारीमध्यें ड्रायव्हरजवळच्या जागेचें महत्त्व म्हणून मी त्यांना तेथें बसण्यास सांगितलें. ते तेथें बसण्यास जरा कांचकूच करूं लागले. विनयानें नव्हे ! तर ते जेथें बसणार तेथें स्प्रिंगची गादी होती. आणि त्या स्प्रिंगला आंत गादींत कोंडून घेण्याचा कंटाळा आल्यामुळें गादीस छिन्नभिन्न करून ती बाहेर पडलेली होती ! व त्यावर बसणें डॉक्टर-साहेबांस अवघड वाटत होतें। परंतु आंतहि नारळाच्या काथ्याच्या गाद्यांची तीच अवस्था होती. त्या काथ्यालाहि बंदिवास सहन न होऊन तो स्वतंत्र होत होता. या दिवसांत हिंदुस्थानच्या लोकांशिवाय बंदिवास कोणाला आवडणार ! इतर सर्व प्यासेंजरहि मोटारींत बसले. सर्वांनीं आपआपलें सामान ठेवलें. मोटारीचा प्रत्यक्ष मालक कोणीच नव्हता. ती एका कंपनीची असल्याचें समजलें. तिचे नौकर दोघे जण मोटारीच्या चाकाशीं कांहीं दुरुस्ती करीत बसले होते. अर्थात् आमचें सामान ठेवण्यांत व आम्हांला बसवण्यांत त्यांनीं कांहींच भाग घेतला नाहीं, सर्वजण बसतांच " अजी, चलो जल्दि " असें एकानें म्हणतांच " कंडक्टर साबको आने दो " असें एकानें उत्तर दिलें. कंडक्टर साहेब कोण ? ह्या विवंचनेंत आम्हीं कांहीं काळ घालविल्या-वर, पुढें कपाळावर केसांचा झुबका डोकावत आहे, व मागें रूमीटोपीचा गोंडा

लोळत आहे, अंगांतील शर्ट छातीवर फाटलेला आहे, व त्यावर काळा कोट अडकविलेला आहे अशी एक साधारण काळी कुळकुळीत व्यक्ती सिगारेटचा धूर सोडीत डुलत डुलत मोटारकडे येत असलेली दिसली. हेच कंडक्टरसाहेब ! ह्यांच्याबरोबर आणखी पांच सहा प्यासेंजर होते. कंडक्टरसाहेब येतांच त्यांनीं " सब लोक उतर जाव ! सामान तोलनेका है " असा हुकूम फर्माविला ! सामानाचें वजन करण्यास बसलेल्या लोकांस उतरण्याची काय गरज ? परंतु नोकरशाहीपुढें इलाज नव्हता. सर्वजण उतरले. सामान तोलण्याचा फार्स सुरू झाला. सामान माफ किती व शेराला चार्ज किती हें कंपनीनें, कोठेंच लिहिलेलें नव्हतें. कंडक्टर साहेबाचा शब्द हेंच त्यांस प्रमाण ! आमच्या मोटारींत रूमीटोप्या व तुमानी घातलेले वजनदार लोकहि होते व बाकीचे धोतरारुमालाचे हलके लोक होते. वजनदार माणसांचें सामान हलके भरूं लागले, व हलक्या लोकांचें सामान वजनदार भरूं लागले. डॉक्टर साहेब बूटपाटलोणमध्यें असल्यामुळें त्यांच्या ट्रंकेला कांटा लागलाच नाहीं ! कांट्याचा हा मिस्किलपणा पाहून कित्येकांना राग आला. परंतु मुक्कामाला पोहोंचण्याच्या गरजेनें व्याकुळ झालेले लोक काय करणार ! त्यांतून कंडक्टर साहेब '**दंभो दर्पोऽभिमानश्च, क्रोधः पारुष्यमेवच**' **ह्या** गुणांचे केवळ पुतळेच असल्यामुळें कोणाचाच उपाय चालेना ? परंतु ह्या एकंदर प्रकारांत प्यासेंजरांना सत्य, न्याय, निःपक्षपातित्व, दैवीगुण, आसुरीगुण इ० इ० नीतिविषयांचे वस्तुपाठात्मक शिक्षण मिळालें हें कोणीहि विसरतां कामा नये ! सामानाचे व तिकिटाचे पैसे देऊन लोक एकदांचे मोटारींत बसले. इतक्यांत चाकाचीहि दुरुस्ती संपून ट्यूबमध्यें हवा भरण्याचें काम सुरू झालें. त्यांत १०–१५ मिनिटें गेल्यावर मोटार चालू होण्यास एकदांची सिद्ध झाली. नोकरानें दांडा घेऊन मोटारीच्या नाकांत अडकवून एक, दोन, तीन चार, पांच सहा, असे स्वतःचा खांदा उखडून जाईल इतक्या जोरानें झटके दिले ? तरी मोटारींत प्राण येत असल्याचें चिन्ह दिसेना, हें काय ! आम्ही मनांत ईश्वराचा धांवा करूं लागलों ! पतिव्रता सावित्रीनें आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर स्वपतीचे गेलेले प्राण परत आणले. आमची इतक्या लोकांची इच्छाशक्ती मोटारींत प्राण आणणार नाहीं काय ? दांडा फिरविण्याचा पुनः प्रयत्न झाला. त्या मनुष्याची कींव आम्हांस येऊं लागली; इतक्यांत ईश्वराची करणी !, मोटारींतून व्हिररररर ! व्हिररर ! असा आवाज निघूं लागला व

आमच्या जीवांत जीव आला ! आमची मोटार हलूं लागली ! चालूं लागली ! व थोडी पळूंहि लागली ! ! त्यावेळचा आमचा आनंद काय विचारावा ! मोटार सारखी जात होती असें नाहीं. मध्येंमध्यें तिला थोडा अडथळा होतच असे. तो हाच कीं मध्येंच एक एक दोन दोन प्यासेंजर येऊन मोटार–गंगेंत मिळूं लागले ! आंत जागा नसली तरी "चलो जलदी बैठो" ह्या कंडक्टरच्या हुकुमानें प्यासेंजर आंत घुसत व कोणाच्यातरी मांडीवर बसत ? अर्थात् मूळच्या रहिवाशांची व बाहेरून आलेल्यांची बोलाचाली होई व शिव्यागाळीही होई ! मात्र एक सोय उत्तम होती ती ही कीं, मोटारीच्या आवाजामुळें ही बोलाचाली व शिव्यागाळी एकमेकांस ऐकूं जाणें शक्यच नव्हतें ! कांहीं शारीरिक धक्काबुक्की व्हावी तर प्रथमतः बसलेल्या लोकांचे गर्दीमुळें हातपाय एकमेकांत इतके गुंतलेले होतें कीं कोणासही हात काढण्याची सोय नव्हती मग तो उचलणें तर दूरच राहिलें ! ह्यामुळें क्रोधाच्या संयमनाचें शिक्षण मिळत असे. मोटारींतून एकच प्रकारचा आवाज निघत होता असें नव्हे ! हिंदुसमाज जातिभेदानें जसा विस्कळित झालेला आहे, त्याप्रमाणेंच मोटारीच्या फळ्या खिळखिळ्या झालेल्या होत्या. व त्यांच्या आपसांतील कलहाचा आवाज चालू होता ! मोटारीच्या चाकांना व लोखंडाच्या भागांना स्नेहयुक्त वागविलें जात नसल्यामुळें त्यांची अंत्यजाप्रमाणें किरर किरर सुरू झाली होती ! पाण्यांत पेट्रोल किंवा पेट्रोलांत पाणी जात होतें हें माहीत नाहीं. परंतु पाण्या पेट्रोलची एकी हिंदु मुसलमानांच्या एकीप्रमाणेंच अशक्य असल्यामुळें '**फटा**' '**फट**' असे मोठ मोठाले आवाज मधून मधून एकसारखे चालू होते ! आणखीहि आवाज होते. मोटारच्या ईंजनाचा आवाज चालू होता. हॉर्नहि वाजतच होता, आणि मोटार ज्या नौकरशाहीच्या ताब्यांत सांपडली होती त्यांचेंहि खिदळणें चालूच होतें. याप्रमाणें अनेक वाद्यांचा गजर चालू होता! अशी आमची मोटार चालू असतां ती एकाएकीं सरळ रस्ता सोडून बाजूच्या एका गांवच्या रस्त्याकडे वळली ! शोधाअंतीं असें समजलें कीं तेथील स्टेशन हाऊसचे 'मुंतजम' पोलीस येणार आहेत; व त्यासाठीं मोटार त्यांच्या गांवीं व घरीं चालली आहे ! हे पोलिसचे आमीनसाहेब आतां बसणार कुठें ? ह्या प्रश्नानें आमच्या मनांत धास्ती उत्पन्न केली ! परंतु नौकरशाहीला त्याचें कांहींच महत्त्व वाटलें नाहीं ! त्या गांवांतील अडीअडचणीच्या रस्त्यांतून वळणें घेत घेत, व प्यासेंजरांना बसल्या जागींच कसरत करण्याचें श्रेय देत देत मोटार एकदांची

अमीनसाहेबांच्या घरापुढें उभी राहिली! अमीनसाहेब 'जनाना' सुद्धां येणार असें समजलें! "सब लोक उतर जाव '**जनाना**' चढनेका है" हा कंडक्टर साहेबांचा हुकूम सुटला! 'जनाना' शद्धापुढें कोणाचा इलाजच नव्हता! मोठ्या मुष्किलीनें आम्ही बसलेले मोकळे होऊन खालीं उतरलों, आमचे मित्र डॉक्टर साहेब स्पिंगचें सुख अनुभवीत होते. त्यांना विनंति करण्यांत आली कीं.–" साब, आप जरा. अंदर बैठिये. " क्यों?" म्हणून डॉक्टर साहेब उद्गारले. यहां अमीन साहेब बैठनेवाले है "यह कैसा? मै पहिले बैठा हूं" "सच है मगर वोह पोलीस के अमीन है इस वास्ते मेहेरबानी करके अंदर बैठिये"

"आजी, बोह अमीन साब है तो यह डॉक्टर साब है? इनको दोसो रुपये तनखा है" मी हक्काचा वरचढपणा दाखवूं लागलों– "होंगे महाराज. डाक्तर साब होंगे मगर यह मोहीरिर बडा खराब आदमी है" असें अगदीं हळू आवाजांत मजकडे येऊन कंडक्टर म्हणूं लागला "मुस्तकिल अमीन साहब रुखसतपर होनेसे यह **मोहरीरसाब** मुन्सरम अमीन बने है अगर इनको आगे के सीटपर बैठने नहीं दियें तो हमारी सर्विस बंद हो जाएगी. इस वास्ते पांव पडता हूं! डाक्टरसाब को आपके पास अंदरहि बिठालो" असो "**मानापमानयोः तुल्यः**" या गीतेच्या शिकवणीनें म्हणा, अथवा "दयाधरम का मूल है" या उच्चतत्त्वास अनुसरून म्हणा डॉक्टरसाहेब आंत बसण्यास तयार झाले. इतक्यांत अमीनसाहेबांचा जनाना आला. दरवाज्यापासून मोटारीपर्यंत पडदे लागले. मोटारींतहि एक पडद्याचा पिंजरा तयार करण्यांत आला. जनाना 'सवार' झाला. **अमीन**साहेब उर्फ **मोहोरिर साहेब** ड्रायव्हरजवळ बसले. दोन पेट्या दोन ट्रंका, एक बळकटेश्वर, एक तुपाचा डबा; एक मुर्ग्यांचा टोकरा, एक सुरई असें सामान भराभर मोटारींत चढूं लागलें! त्यावेळेस वजनाचा काटा कोठें दडून बसला, व तिकिटाचे तांबडे हिरवे कागद कोठें लपून बसले तें कळलेंसुद्धां नाहीं! आम्हास बसण्याची परवानगी मिळाली. परंतु बसावयाचें कोठें हेंच समजेना जागेशिवाय नामरूप असलेली व्यक्त वस्तू कशी राहूं शकते हें पदार्थविज्ञानशास्त्रांतील कोडें आम्हास सोडवावयाचें होतें! मनुष्याचें अंग किती लवचिक होऊं शकतें त्याची आज परीक्षा होती. डॉक्टरसाहेबांनीं नौकर झाल्यापासून बराच कापूस जमा केला होता! त्याला 'प्रेस' ची आवश्यकता होतीच! आम्ही धडपड करून आंत शिरलों, व एकमेकांचा एकमेकांत समावेश करून घेऊं लागलों!

सर्वांपेक्षां कांसवालाच आपलें आंग ज्यास्त चोरून घेतां येतें अशी भगवंताची समजूत असली पाहिजे. म्हणूनच त्यांनीं "यदा संहरते चायं कूर्मोंगानीव सर्वशः" ही कांसवाची उपमा दिलेली आहे. परंतु भगवंतानीं जर आजचें आमचें कौशल्य पाहिलें असतें तर निःसंशय उपमेसाठीं कासवापर्यंत त्यांना धाव घेण्याची गरज पडली नसती! भगवद्गीतेंत "**विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि। शुनि चैव श्वपाकेच पंडिताः समदर्शिनः**" इ. सर्वांना एकाच दृष्टीनें पंडित लोक पाहतात असें म्हटलेलें आहे. परंतु त्यांत सर्व सजीवच प्राणी आलेले आहेत. आमच्या मोटारींत, आम्हीं, ट्रंका, पोतीं, जनाना, तुपाचा डबा, कोंबड्याचें टोपलें इ. **सर्व सजीव व निर्जीव एकजीव झालों होतों**! येवढ्यानेंच संपलें नव्हतें. मोटारीच्या दोन्ही बाजूच्या मड गार्डवर, टपवर, व मागें ट्रंका, पोतीं वगैरे सामान बांधून मोटारीची जी लांबी वाढविण्यांत आली होती त्यावर अशीं तिन्ही बाजूला माणसेंच माणसें बसलीं होतीं! माणसांनीं वेष्टिलेला हा लहानसा पर्वत रस्त्यानें धांवत चालला होता! एखाद्या मेलेल्या मोठ्या किड्याला चोहों बाजूनें अनेक मुंग्या तोंडांत धरून जशा ओढीत नेतात त्याचप्रमाणें आमच्या मोटारीला चोहों बाजूनें माणसें धरून पळवून नेत आहेत असेंच कोणास वाटलें असतें! असें हें माणसांचें अगडबंब धांवतें पोळें हिसके घेत घेत, व उड्या मारीत मारीत चाललें होतें. डॉक्टरसाहेब व दुसरा एक स्थूल मारवाडी यांच्यामध्यें मी-दोन भरलेल्या पोत्यांच्या मध्यें सापसुरळी सांपडावी त्याप्रमाणें सांपडलों होतों! त्यामुळें माझें आसन **समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः। संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं, दिशश्चानवलोकयन्**" योगाभ्यासाला योग्य असें अनायासेंच झालें होतें! योगाभ्यासानंतर **समाधी प्राप्त होण्याचींहि चिन्न्हें** मला लौकरच दिसूं लागलीं; परंतु ईश्वर कोणाचाहि अंत ज्यास्त वेळ पहात नाहीं! एकदम '**फट**' असा मोठा आवाज झाला व मोटार थांबली! "ट्यूब बर्स्ट होगया, उत्तर जाव" असा ड्रायव्हरनें निर्णय दिला! आमच्या तोंडचें पाणी पळालें! पुनः सर्व उतरले. ट्यूब टायर दुसरे नव्हतेच! तीच ट्यूब कांहींशी दुरूस्त करून पुढच्या चाकांत व पुढच्या चाकांतली मागच्या चाकांत घालण्याची क्लृप्ति ड्रायव्हरनें लढविली. कारण पुढें इतका जोर पडत नाहीं. असें समाधान करून अर्ध्या तासाच्या खटपटीनंतर मोटारींत बसण्याची शिक्षा अनुभवण्यास आम्ही पुनः सिद्ध झालों. सर्व पूर्वींसारखे जरी नाहीं तरी थोडे पुढें मागें करून बसलों. मोटार चालूं झाली. फार तर

एक मैल गेलों असूं तोंच मोटारीचा आवाज कमी होत ती **एकदम थांबली!** हा वेळ पावेतों सायंकाळ झाली. आज घराचें दर्शन होत नाहीं हा सर्वांचा निश्चय झाला! "पेट्रोल होगया" "पेट्रोल बराबर आता नहीं" "मॅग्नेट फेल हो गया "नट ढीला हो गया" "वायर तूट गई" स्पार्क बराबर नही" "डायनामी बिगड गया" इ. इ. प्यासेंजरच्या जखमेवर मीठाप्रमाणें वाटणारी भाषा वापरीत ड्रायव्हर, क्लीनर व कंडक्टर तिघेही आपल्या "मेक्यानिकल एंजिनिअरिंगचें" ज्ञान प्रदर्शित करूं लागले! अमीनसाहेब रागावले! सर्व लोक कुरकुरूं लागले! अंधेर पडूं लागला! कंदिल कोणाजवळच नव्हता. एक एक काडी ओढून त्याच्या उजेडांत, तिघांच्या अकलेप्रमाणें; मोटार दुरुस्ती होऊं लागली. हा प्रयत्न सूर्योदयापर्यंत होण्यास हरकत नव्हती. परंतु तेवढ्या लोक-वस्तींत दोनच काड्याच्या पेट्या होत्या! मेक्यानिकल एंजिनिअरिंच्या ज्ञाना-बरोबरच तिघेही त्रासून आपल्या ग्राम्य भाषेचें प्रदर्शन करूं लागले! 'वायर' कडून स्पार्क उत्पन्न होईना म्हणून तिच्या आईबापाचा उद्धार होऊं लागला! 'नट' च्या बापाच्या मदनसदनाचे उर्दू भाषेंत वारंवार उच्चार होऊं लागले! व सुरत क्रीडेचीं अश्लील भाषेंत वर्णनें होऊं लागली! ही भाषा ऐकून आम्हांस अत्यंत लज्जा वाटली! त्यांत कांहीं हिंदु स्त्रिया होत्या त्यांना आपण कोणीकडून आज मोटारींत बसलों असें झालें. अमिनसाहेबांचा 'जनाना' आंत होता. मला वाटलें. अमीनसाहेब ह्या भाषेला कांहीं आळा घालतील! परंतु चमत्कार हा कीं अमीनसाहेबानीं उलट आपल्या ग्राम्य भाषेचें सामर्थ्य कितीतरी पटीनें अधिक आहे हें सर्वांच्या प्रत्ययाला आणून दिलें! ड्रायव्हरनें निर्जीव 'वायर' च्या आईबापांची सुरतक्रीडा उत्तान अश्लील भाषेंत वर्णन केली तर अमीन सांहेबांनीं मनुष्यप्राण्याच्या मदनसदनांचें अश्लील भाषेंत उच्चारण केलें! गोषा पद्धतींत स्त्रियांच्या कानावर असली अश्लील भाषा जाणें कसें खपतें ह्याचेंच आश्चर्य वाटलें! एकादा पुल्लिंगी पदार्थहि आपल्या स्त्रियांच्या नजरेस पडूं नये म्हणून जेथें **कापडाचे पडदे** उभारण्यांत येतात तेथें कानाला वाटेल तो अश्लील शब्द ऐकलेला कसा खपतो! डोळ्यापेक्षां कान काय कमी पापप्रवण असतात? तात्पर्य, मर्यादा, सौजन्य, कुलशीलपणा व सभ्यभाषा, इ. इ. नीतितत्त्वांचें शिक्षण त्या मानानें परिपूर्ण करण्यांत आलें! प्यासेंजरमध्यें उदासीनयुक्त खिन्नपणा पसरला होता. अमीनसाहेबांनीं

पुत्र कलत्रासह भोजन उरकून घेण्याचा विचार केला. आम्हीं खिन्न अंतःकरणानें आपल्या हातून मागें कोणतें पाप झालें. त्याचें चिंतन करीत बसलों! मोटार दुरुस्त होण्याचें एकहि चिन्ह दिसेना! काळोख तर होताच. परंतु त्यांतहि एक प्रकारचा भयाणपणा आला होता! "आपलोगोंको मोटारका लायसेन्स कसा मिलता: ये तुमारी मोटार कैसी "पास" हुई" असें मी रागावून विचारूं लागलों त्यावर "क्या महाराज, हर महिनेकू मोटार पास करलो बोलते क्या! अजि गये महिनेमेही यह:मोटार पास हुई. और हमकू लायसेन्स मिला" हें चिनतोड उत्तर ऐकतांच गप्प बसावें लागलें! शेवटीं अशी कल्पना निघाली कीं, सर्वांनीं मिळून मोटारीला ढकलावें म्हणजे थोड्या वेळानें मोटार चालू होईल. अमीन साहेब, त्यांचा जनाना, व इतर एक दोन स्त्रिया आंत बसल्यावर तोही प्रयोग करण्यांत आला. आम्ही कृतज्ञ माणसांनीं मोटारनें आम्हांस इथवर आणलें, तिचे उपकार तीस ढकलून फेडण्याची पराकाष्ठा केली! परंतु तिचा रुसवा कांहीं केल्या कमी होईना! शेवटीं "**या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी**" असे आम्हीं सर्व '**संयमी**' बनून ती रात्र काढली व दुसरे दिवशीं दुसऱ्या मोटारीनें भलत्याच वेळीं घरीं येऊन पोहोंचलों.

निजाम विजय-हैद्राबाद.

दांताचे उपयोग !

आपल्या लोकप्रिय पत्रांत दंत-विशारद 'कर' द्वयांनीं (डॉ. बोरगांवकर व पळनिटकर) दांतासंबंधीं बरीच उपयुक्त माहिती लिहिली आहे. आणि 'त्यांच्या शुद्धींचे योग' ही अनेक कथन केले आहेत. परंतु दांतांचे उपयोग किती प्रकारांनीं होतात, हें त्यांच्या लेखांत कोठेंच आढळलें नाहीं. त्याची पूर्तता करण्याचें आज मीं योजिलें आहे. दांतांचा मुख्य उपयोग अन्नचर्वणाकडे होतो, हें तर आबालवृद्धांना माहितच आहे. बालांना व वृद्धांना त्यांच्या अभावामुळें आणि तरुणांना त्यांच्या अस्तित्वामुळें दांतांचें महत्त्व कळते. दांतांचा दुसरा उपयोग मुखाची शोभा वाढविण्याकडे होतो. वृद्धपणीं तोंडाचें झालेलें बोळकें किती भयप्रद दिसतें तें वृद्धावांचून इतरांना सहज पटेल! दांतांचा तिसरा उपयोग वर्णोच्चार स्पष्ट करण्याकडे होतो. दंताजीचें ठाणें उठल्यावर शद्बोच्चाराची विशेषतः दंत्यवर्णाची जी दुर्दशा होते, ती प्रत्येक 'फाफाजी' ला जाणवतच असेल! दांताचा चौथा उपयोग दर्शनी मित्रांना आहेर करण्याकडे होते! मित्रांचें दर्शन होताच अर्धवट दंतप्रदर्शन करण्यानें त्याच्याबद्दलचें प्रेम व आदर व्यक्त केल्यासारखें होतें. तसें प्रदर्शन जर झालें नाहीं, तर 'गर्विष्ट' बेपर्वा हीं विशेषणें लागतात! दांतांचा पांचवा उपयोग दांत कोरण्यांत अगर सुपारीचा रवंथ करण्यांत वेळ घालविण्यासाठीं बराच होऊं शकतो! दांतांतील अक्कल दाढेचा उपयोग मनुष्यास सज्ञान अवस्था आली किंवा नाहीं हें दाखविण्याकडे होतो. अकलेवांचून त्याचें डोकें ठणठणीत जरी रिकामें असलें तरी अक्कल दाढ आल्याबरोबर त्यास ज्ञानअवस्थेचा दाखला मिळूं शकतो! सुखाचें व आनंदाचें प्रदर्शन करण्याकडेहि दांतांचा चांगला उपयोग होतो. जितका आनंद ज्यास्त होईल तितका मोठा सूर काढून व तितके ज्यास्त दांत दाखवून मनुष्य आपल्या आनंदाचें प्रदर्शन मोठ्यानें हांसून करतो. बत्तीस दांतांचें प्रदर्शन म्हणजे आनंदाची परमावधि! बोळकें झालेल्या तोंडाचें हास्य म्हणजे हसणाराचा आनंद असला तरी पहाणाराला तो भयप्रद दुःखाचाच प्रसंग! हास्यरसाप्रमाणेंच वीर व रौद्र प्रदर्शन करण्याकडे दांतांचाच उपयोग होतो. क्रोध प्रगट करण्यास दांतओंठ खाणें व दांत करकर चावणें आवश्यकच असतें. खऱ्या

क्रोधाचें प्रदर्शन त्यानेंच होतें. दांत नसल्यास क्रोधाचा आविर्भाव आणतांच येत नाहीं. एकदां आमचे वृद्ध वक्रतुंडशास्त्री आपल्या चतुर्थ पत्नीवर सपाटून रागावले, त्या रागाच्या भरांत त्यांनीं दांत कर करून चावण्याचा प्रयत्न केला. इतक्यांत त्यांना तोंडांत दांतांची कवळी नसल्याची आठवण झाली, त्यामुळें निरुपायानें रागप्रदर्शनाचा बेत त्यांना पुढें ढकलावा लागला! दांतांची कवळी बसविल्यावर मगच रागवावें, असा त्यांनीं पोक्त विचार केला! दांत नसल्यनें रागाचा असा विरस होतो! 'नरडीचा घोट घेणें,'' दांत पाडणें,' 'मनांत दांत धरणें' इ. शत्रुत्वाचे प्रकारहि दांतांच्या सामर्थ्यावरच अवलंबून असतात! **वीर**रसाप्रमाणेंच **करुण**-रसांतहि दांत लागतातच. हास्यरसांत खालच्या व वरच्या सर्वच दांतांचें प्रदर्शन होतें. करुणरसांत फक्त वरचेच दांत दाखवावे लागतात!

'हास्य' वीर 'करुण' ह्या रसांप्रमाणेंच रसराज जो **शृंगाररस** त्यांत तर दांतांचा फारच उपयोग होतो! शृंगारक्रीडेंतलि 'चुंबनपुष्पें,' ओंठाच्या 'पाकळ्या' व दंतांच्या 'कुंदकळ्या' ह्यांनींच फुलून येतात! कोणची यौवना आपल्या प्रियकरानें केलेल्या दंतव्रणानें धन्य होणार नाहीं? इतर क्षुद्र पेयांचें पान जिभेनें करतां येईल परंतु अधरामृतपान हें ओंठ व दांत ह्यांच्याच हक्काचें आहे. त्यांत जिभेची लुडबुड उपयोगी नाहीं. अधरामृताचें पान ओंठ व दांत ह्या पुल्लिंगी अवयवां-कडूननच होतें! जीभ ह्या स्त्रीलिंगी अवयवाकडून होत नाहीं. ह्यावरून आमचे **दाते शास्त्री** असें म्हणतात कीं, प्रणयचुंबन हा केवळ पुरुषांचाच हक्क आहे. चुंबनाचा स्त्रियांना अधिकारच नाहीं! स्त्रियांनीं आपल्या मुलांचें वात्सल्यचुंबन घ्यावें परंतु नवऱ्याचें प्रणयचुंबन त्यांना घेतां येणार नाहीं! तें शास्त्रविरुद्ध होणार!!

इतर सर्व प्राण्यांस दांतांचा अन्नचर्वणाकडे उपयोग होतो. परंतु दंत–विशारद डॉक्टरांना अन्नचर्वणाप्रमाणें अन्नप्राप्तीसाठींहि दांतांचा उपयोग होतो—अर्थात् रोग्यांच्या दांतांचा! रोग्याचा एक दांत म्हणजे दंतवैद्याची एक नोट! ह्या नोटी रोग्यांच्या तोंडांतून आपल्या पेटींत केव्हां येतील असें दंदांसाजांना Dentist लोकांना होतें!

दांत पांढरे कां? ह्या प्रश्नाचें उत्तर आमचे **भग्नदंतशास्त्री** असें देतात कीं, केंस काळे म्हणून दांत पांढरे! असंबद्ध कार्यकारणभाव लावण्यांत हे जुने शास्त्री

फार कुशल असतात ! परंतु नाहीं म्हणावें तर केंस जसजसे पांढरे होऊं लागतात, तसतसे दांत '**काळे**' करण्याच्या मार्गाला लागतात ! आणि तें त्यांचें म्हणणें खरेंच वाटतें. कारण केंस संपूर्ण पांढरे होऊन झडूं लागतांच **दांत** आपलें 'काळें' करतात ! ह्यावरून केंस काळे म्हणून दांत पांढरे हें भग्नदंतशास्त्र्यांचें म्हणणें खरें मानावें लागतें.

पांढरे स्वच्छ दांत मुखास शोभा देतात म्हणून फोटोमध्येंही दांत दाखविण्याची फॅशन अलीकडे पडूं पहात आहे. काळ्या कुळकुळीत मनुष्याचे अगदीं पांढरे सफेद दांत असतात, ते अशासाठीं कीं अंधेरांतही हा मनुष्यप्राणीच आहे हें ओळखूं यावें ! परंतु रुचिभिन्नत्वामुळें पांढरे दांत कांहींजणांस आवडत नाहींत. कित्येकांची सुवर्णालंकाराची आवड दांतांनाही वेढून घेते ! युरोपियन स्त्रियांचे दांत सुवर्णावांचूनच पिवळे असतात. गुजराथी बायकांचे दांत गेरूच्या रंगाचे होतात आणि आमच्या नांदेड परभणीकडील मराठवाडींतील स्त्रिया स्वतःच्या रंगाशीं स्पर्धा करणारा काळा **दाशींना** दांतांस लावून दांत काळे कुळकुळीत करतात. अशासाठीं कीं, हंसलें तरी दांत दिसूं नयेत ! ! आणि म्हणूनच त्यांचा आनंद कधींही दिसत नाहीं !

दांतांची व जिभेची रचना पाहिली म्हणजे असा प्रश्न उत्पन्न होतो कीं ही दांतांची पलटण जिभेचें संरक्षण करण्यासाठीं आहे कीं जिभेवर पहारा करण्यासाठीं आहे ? बहुधा दोन्हींसाठींहि असावी. अबलांचें संरक्षणहि व्हावें व त्यांच्यावर पहाराहि करावा लागतो ! स्त्रीस्वभावाप्रमाणें जीभ स्नेहार्द्र असते आणि पुरुषस्वभावाप्रमाणेंच दांत रुक्ष व कठीण असतात. दांताचा दरवाजा व त्यावर ओंठाचा पडदा करून जिभेस गोषांत ठेवलें आहे, ह्यावरून आमचे मित्र **अली दांदखां** म्हणतात, स्त्रियांना गोषांत ठेवावें हीच त्या **अल्लाची** इच्छा आहे ! गोषाविरुद्ध जे कित्येक लोक बडबड करतात त्यांना खुदानें मनुष्याचें तोंड हा 'दंदा शिकंद' जबाब दिला आहे !

स्त्री–पुरुष दंपतीप्रमाणेंच जीभ व दांत परस्परांस एकमेकांचे नोकर समजतात. जिभेस वाटतें दांत माझे नोकर व दांतांस वाटतें जीभ आमची बटिक ! परंतु दोघेहि एकाच पोटाचे नोकर आहेत हें त्यांना समजत नाहीं. म्हणून आपसांत त्यांची 'दंताळी' चालू असते. खाण्याच्या गडबडींत दांत जिभेचा चावा घेतात

हें पाहून पाहून जीभ ह्याचा सूड असा घेते कीं भलत्याच प्रसंगीं जे शब्द उच्चारूं नयेत ते उच्चारून थोबाड रंगवण्यास व दांतांचें उच्चाटन होण्यास कारणीभूत होते ! जिभेच्या अंगीं अमृतहि आहे व हालाहल विषही आहे.

हृदयीं नम्र लोहींचे सळ । साहूं जातील एक वेळ ॥
परी दुष्ट शद्बांची जळजळ । मरणांतींहि शमेना ॥

असले दुष्ट शब्द जिभेनें उच्चारूं नयेत म्हणूनच बत्तीस दांतांचा पहारा तिच्या भोंवतीं ठेवलेला आहे. परंतु ती पहाऱ्यास थोडीच दाद देते ! काढूं नयेत ते शब्द ती केव्हां केव्हां काढतेच आणि मग हे पहारेवाले जागे होऊन लागलीच तिचा चावा घेतात. परंतु असें लागलीच जीभ चावण्यानें काय होणार ? पश्चात्तापानें वाटेल तें पाप नाहींसें होऊं शकेल. परंतु उच्चारलेले दुष्ट शब्द कसल्याहि पश्चात्तापानें नाहींसे होत नसतात ! तात्पर्य, दांतांकडून पहाऱ्याचें काम नीट होत नाहीं ! कारण तें त्यांचें कामच नव्हे. दांत पडले ब्राह्मण ! त्यांना द्विज म्हणतात. ब्राह्मणाप्रमाणेंच त्यांचा जन्म दोनदां होतो. त्या ब्राह्मणाच्यांनीं पहाऱ्याचें काम कसें होणार ? ब्राह्मणांनीं मिलिटरी शिक्षण घ्यावें व मांसहि खावें असें डॉ. **मुंजे** म्हणतात ! पैकीं दुसरी गोष्ट कदाचित् लौकरच सुरूं होईल, परंतु पहिलीला **अद्याप दिल्ली दूर आहे** ! दांत सवर्ण ब्राह्मण खरे परंतु त्यांच्यांतहि पोट जाती आहेतच. 'Molar, Bicuspid, Canine, व Incsior, दाढा, सुळे इ. जाती त्यांच्यांतहि आहेत, आणि ह्यावरूनच आमचे **'एकदंत'** शास्त्री म्हणतात, कीं **जाती ह्या जन्मसिद्ध आहेत**. जे सुधारक जातिध्वंसनाच्या कार्याला उद्युक्त झाले आहेत. **त्यांचे दांत लौकरच पडतील**. दांतांतील हाच **विशेष** जातिभेद सिद्ध करतो. शरीरांतील सर्व अवयवांस जरा आहे. परंतु जिभेस मात्र जरा नाहीं. ह्यावरून अशी एक सनातन गोष्ट सिद्ध होते कीं आपल्या दूरदृष्टि पूर्वजांनीं स्त्रियांविषयीं केलेला

आहारो द्विगुणः स्त्रीणां बुद्धिस्तासां चतुर्गुणा ।
षड्गुणो व्यवसायश्च कामश्चाष्टगुणः स्मृतः ॥

हा सिद्धांत जिभेच्या लीला पाहून मनाला पूर्ण पटतो !

दांतांची पलटण तारुण्यावस्था संपेपर्यंत बाकायदा (Regular) फौजेप्रमाणें असते. परंतु पुढें ती बेकायदा (Irregular) होत जाते. तारुण्यावस्थेंत जे

दांत अटेन्शननें उभे असनात, तेच पुढें देशी राजाच्या बेकायदा पलटणीप्रमाणें अव्यवस्थित होतात. कोणी पुढें झुकतो, तर कोणी मागें झुकतो! कोणी वांकडे पडतो. कोणी सछिद्र बनतात! तर कोणी खड्डायुक्त होतात! कित्येकांचे भोपळे फॅशन दांत (भोपळ्यांच्या बियाप्रमाणें) लहानपणापासूनच **पुढारी** झालेले असतात आणि हे लोक तोंडांत धरलेल्या हस्तिदंती फणीप्रमाणें शोभायमान दिसतात!

आतां दांतांचा एकच परंतु प्रमुख उपयोग सांगावयाचा राहिला. तेवढा सांगून हें दंतपुराण समाप्त करतों. हा उपयोग खाण्याच्या दांतांपासून नव्हे तर **दाखविण्याच्या दांतांपासून होतो.** हत्तीस दाखविण्याचे दांत दोनच असतात परंतु मनुष्यास तसले पुष्कळ दांत असतात. दांतांचा व अकलेचा संबंध अक्कल दाढेवरून सिद्ध झालेलाच आहे; परंतु दांतांत अकलेप्रमाणेंच **मुत्सद्दीपणाहि** भरलेला आहे हें **दाखविण्याच्या दांतांवरून** सिद्ध होतें. ह्या दाखवण्याच्या दांतांपासून अनेक व्यवहार उत्पन्न होतात व उत्कर्ष पावतात. व्यवहारी मनुष्यांचा बराच व्यवहार ह्या दांतांनींच चाललेला असतो. वकिली, सावकारी, व्यापार इ. अनेक श्रेष्ठ प्रकारच्या व्यवसायांत ह्या 'दाखविण्याच्या' दांतांचा उपयोग तर होतोच परंतु सर्वांत मुख्य जें **राजकारण** त्यांत ह्याच्यावांचून क्षणभरहि चालत नाहीं! राजे लोकांचें व राजकीय मुत्सद्यांचें जीवनच ह्या दाखविण्याच्या दांतांवर अवलंबून असतें. **तहनामे, सलाहनामे, जाहिरनामे करारनामे** व **फरमाने** हे सर्व दाखविण्याच्या दांतांचेच प्रकार आहेत! ह्यावरून खाण्याच्या दांतांपेक्षां **दाखविण्याच्या दांतांचा किती बरें उपयोग होतो?**

निजामविजय– हैद्राबाद.

'लेखक' व 'कवि' तयार करण्याचा प्रचंड कारखाना !

लौकरच महाराष्ट्रांतील एका महानगरांत एक प्रचंड इमारत तयार झाली. त्या इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारावर " **लेखक व कवी तयार करण्याचा प्रचंड कारखाना** " ह्या सोनेरी मोठ्या अक्षरांची जंगी पाटी चमकूं लागली! ह्या मुख्य वेशीवजा असलेल्या द्वाराशिवाय दोन्ही बाजूंस दोन मोठमोठाले दरवाजे होते. एका दरवाजांतून 'लेखक' व 'कवी' बनविण्यास लागणारा कच्चा माल मोटार लॉऱ्या भरभरून येत होता व दुसऱ्या दरवाजानें तयार झालेले 'लेखक' व 'कवी'चे गठ्ठे लॉऱ्या भरभरून बाहेर बाजारांत पाठविले जात. मुख्य इमारतीची रचनाही कारखान्यास आवश्यक अशीच करण्यांत आली होती. धूर जाण्यासाठीं इमारतीच्यावर पांच सहा (चिमण्या) दिसत होत्या. ह्या धुराड्यांतून 'कवी' व 'लेखक' ज्या बिड्या, सिगारेटस् व चुट्टे ओढून जें धूम्रपान करीत त्या धुराचे लोट बाहेर फेकले जात. इमारतीच्या खालच्या भागाला लोखंडाच्या नळ्या लावलेल्या होत्या, त्यांतून **लेखक** व **कवी** ह्यांच्यासाठीं तयार होत असलेल्या 'चहा,' 'कॉफी' कोको इ. पेयांची वाफ बाहेर निघून जात असे, कारखान्याच्या मध्यभागीं प्रचंड यंत्ररचना केलेली होती व त्याच्या दोन्ही बाजूंस मोठमोठालीं दालनें व अनेक खोल्या होत्या. एका दालनांत कच्चा माल येऊन पडे. इमारतीच्या डाव्या बाजूच्या फाटकांतून गाड्या भरभरून माणसांचे गठ्ठे आणले जात. प्रथमतः साधे व पदवीधर दोन्ही प्रकारचीं माणसें आणलीं जात होतीं. परंतु गिऱ्हाइकांची 'पदवीधर' व 'स्त्री' **लेखकांची** व **कवींची** मागणी वाढल्यापासून **पदवीधरांचे गठ्ठे** व **स्त्रियांचीं बंडलें** येऊं लागलीं. हे गठ्ठे व हीं बंडलें दालनांत येऊन पडल्यावर तेथें जो अधिकारी बसलेला असे तो मालाची निवड करी. स्त्रियांच्या बंडलांतील बहुधा सर्वच माल पसंत होत असे. परंतु पुरुषांच्या गठ्ठ्यांतून मात्र निवड करतांना बरीच बारीक व सूक्ष्म दृष्टि वापरण्यांत येई. बसलेलीं गालफडें, खोल गेलेले चष्मेदार डोळे, व पोंक निघालेल्या पाठी अशा प्रकारचा माल अगोदर निवडला जाई. ही निवड होऊन नंतर हे गठ्ठे, व हीं बंडलें त्याच दालनांतील दुसऱ्या भागांत, दुसऱ्या एका अधिकाऱ्याजवळ नेऊन टाकलीं

जात. तेथें हा अधिकारी गट्ठे व बंडलें सोडून प्रत्येक मनुष्याच्या कपाळावर शिक्का मारी. कोणाच्या कपाळावर 'कवि,' कोणाच्या 'नाटककार,' कोणाच्या 'निबंधलेखक,' कोणाच्या 'ऐतिहासिकलेखक,' कोणाच्या 'कथालेखक,' अशा प्रकारचे निरनिराळे शिक्के हा अधिकारी आपल्या मर्जीनुरूप भराभर मारीत असे. पोष्टांत पत्रांवर ज्याप्रमाणें छापे दिले जातात, त्याचप्रमाणें ही क्रिया भराभर व झटझट चाले. आणि त्याच्या जवळच बसलेला तिसरा अधिकारी छापे पडलेल्या कवींचे, नाटककारांचे, इतिहास लेखकांचे इ. वेगवेगळे जुडगे बांधून ठेवी. हे शिक्के अगोदरच अशासाठीं मारले जात कीं, त्या मालाचा, त्याच कामाकडे उपयोग करतां यावा आणि कारखान्यांत जे इतर मजूर काम करीत, त्यांची व ह्यांची अदलाबदल होऊं नये. कारखान्याचा माल, व कारखान्यांत काम करणारा माल ह्यांची अदलाबदल होऊं नये, म्हणून ही काळजी घेण्यांत येत असे. हे निरनिराळे जुडगे तयार झाले म्हणजे त्यांना पाळण्यांत टाकून 'लिफ्ट'नें कारखान्याच्या सर्वांत वरच्या मजल्यावर नेण्यांत येई. आणि तेथें गच्चीवर हे जुडगे पसरले जात. ह्याचा उद्देश असा कीं, '**कवीस**' व '**लेखकांस**' ज्या '**प्रतिभे**' ची आवश्यकता असते ती '**प्रतिभा**' सूर्याच्या विशिष्ट किरणापासून प्राप्त व्हावी. 'क्ष' किरणें, 'व्हायोलेट' किरणें, व ultra violet किरणें ह्यांचा रोग नाहींसा करण्याकडे जसें वैद्यशास्त्र उपयोग करून घेतें, त्याचप्रमाणें वाङ्मयशास्त्रानेंहि '**प्रतिभा**' उत्पन्न करण्याकडे सूर्यकिरणांचा उपयोग कां करून घेऊं नये ! ह्या गच्चीवर अनेक लेन्सेस लावून सूर्यकिरणें ह्या मालावर कांहीं आठवडे पाडण्याची यांत्रिक योजना केलेली असे. ह्या क्रियेला '**Thermogenation**' असा पारिभाषिक शब्द आहे. कवींना लेखकापेक्षां प्रतिभेची ज्यास्त आवश्कता आहे म्हणून कवींचे भारे ह्या उन्हांत ज्यास्त दिवस ठेवले जात. '**प्रतिभे**' नंतर कवीस व लेखकांस '**स्फूर्ति**' ची आवश्यकता असते, ती प्राप्त व्हावी म्हणून ह्या मालाच्या जुडग्यांना विजेचे सुसह्य धक्के देण्याची क्रिया होई. त्यास "**Electrization**" असा पारिभाषिक शब्द आहे. वीज उत्पन्न करण्याचा 'डायनेमो' कारखान्यांत असेच त्यांतून निघालेल्या 'नेगेटिव्ह' व 'पॉझेटिव्ह तारांच्या' संयोगानें प्रत्येक जुडग्यांतील प्रत्येक होतकरू कवीला व लेखकांना हे विजेचे धक्के कांहीं आठवडे दिले जात. आणि ह्या योगानें कवींत व लेखकांत **स्फूर्ति** उत्पन्न केली जाई. स्फूर्तीप्रमाणेंच लेखकांस कवीस '**कल्पना**' उत्पन्न झाल्या पाहिजेत. मनुष्यास आकाशांतील ढगाकडे पहात राहिल्यानें, व भांगेच्या सेव-

नानें कल्पना सुचतात. म्हणून **मेघांचे** तुकडे करून ते गांजाच्या रसांत टाकून त्याचें जें मिश्रण होतें त्या मिश्रणाच्या मोठमोठाल्या हौदांत हे कवींचे व लेखकांचे गठ्ठे कांहीं आठवडे भिजविले जात. ह्या क्रियेला "**Saturization**" असा पारिभाषिक शब्द आहे, ह्या क्रियेनें उमद्या, उमद्या कल्पना कवींत व लेखकांत उत्पन्न होतात. कल्पनाप्राचुर्याप्रमाणेंच लेखकांना **तर्कशक्तीचीहि** आवश्यकता असते. कवींना इतकी तर्काची जरूर नाहीं. ही तर्कशक्ति लेखकांत वाढावी म्हणून अग्नीच्या ठिणग्यांचा वर्षाव त्यांच्यावर कांहीं आठवडे करण्यांत येई. ह्यानंतर कवीस व लेखकांस उपमा व दृष्टांत सुचावेत, म्हणून "आरशा" च्या भट्टींत त्यांना कांहीं आठवडे घालून ठेवावें लागे. कवींचा व लेखकांच्या विचारांचा '**ओघ**' सारखा कायम रहावा म्हणून कृत्रिम पाण्याच्या प्रवाहांत त्यांना कांहीं आठवडे टाकून ठेवावे लागे. कवींच्या व लेखकांच्या हुकुमामध्यें सर्व शब्द असले पाहिजेत म्हणून महादेवाचें डमरूं वाद्य प्रत्येकांना देण्यांत येई. ह्या 'डमरूच्या' वाद्यानें त्यांचा 'शब्दा' वरील ताबा अखंड कायम राही. ह्याशिवाय कवींत व लेखकांत शृंगारादि रसांचा पूर्ण प्रादुर्भाव व्हावा म्हणून एक विशिष्ट अनुभवजन्य योजना करण्यांत आली होती. ती ही कीं, जिव्हेच्या रसांचा व वाङ्मयांतील रसाचा जन्य-जनक संबंध असलेला नवीन शोधानें दृष्टोत्पत्तीस आला आहे. म्हणून ते ते रस त्यांना भरपूर खाण्यास देण्याची विशिष्ट योजना ह्या प्रचंड कारखान्यांत करण्यांत आली होती. कोणच्या रसाच्या सेवनानें वाङ्मयांत कोणचे रस उत्पन्न होतात त्याचें कोष्टक खालीं देत आहें.

गोड व स्निग्ध	रसांच्या	सेवनानें	शृंगाररस	उत्पन्न	होतो
तिखट + गोड	"	"	वीर	"	"
आंबट + तिखट	"	"	करुण	"	"
कटु + तिखट	"	"	रौद्र	"	"
कटु + तुरट	"	"	अद्भुत	"	"
गोड + तुरट	"	"	हास्य	"	"
आंबट + कटु+तिखट	"	"	भयानक	"	"
कटु+तिखट + तुरट	"	"	बीभत्स	"	"

ह्या कोष्टकाप्रमाणें ज्या कवींत व लेखकांत जो जो रस उत्पन्न करावासा वाटेल त्या त्या रसाचे पदार्थ त्या त्या कवीस व लेखकांस मनमुराद चारण्यांत येत.

ह्या प्रमाणें शृंगाररसवाल्यांना पेढे, बर्फी व राबडी, बासुंदी, यथेच्छ खाण्यास मिळे. आणि भयानक रसवाल्यांना काळीं मिरच्या व चिंच बळजबरीनें घशांत कोंबीत असत. तसेंच लेखकांच्या लेखांत चुर-चुरीतपणा व चटकदारपणा यावा म्हणून दाल-चिनी, मिरें, लवंगा, वेलदोडे इ. मसाला लेखकांच्या तोंडांत भरला जाई. लेखक उत्तम **टीकाकार** व्हावेत म्हणून त्यांच्या गळ्यांत टीका, वज्रटीका, व बिल्व-दळी टीका अडकविण्यांत येत. आणि कवींच्या काव्यांत '**भाव**' व '**प्रसाद**' उत्पन्न व्हावा म्हणून कवींना बाजारभाव शिकविण्यांत येई व 'प्रसादा'साठीं खास सत्यनारायणाचे समारंभ करून त्यांना सत्यनारायणाचा **प्रसाद** चारण्यांत येई. ह्याप्रमाणें हा 'कवी'–'लेखका'चा माल दोन चार महिन्यांत तयार होई. परंतु हा माल अद्याप कच्चाच समजला जाई. कुंभार माती भिजवून त्यास घटाचा आकार देतो म्हणजे तीं कच्चीं मडकीं तयार होतात त्यास पक्कें करण्यास अग्नीच्या 'आवेत' भाजावीं लागतात. तेव्हां तीं पक्कीं होतात. तसेंच हे लेखक, व कवी ह्या वर वर्णिलेल्या संस्कारांनीं फक्त कच्चीं मडकीं म्हणून तयार होतात. **गोऱ्या-कुंभाराच्या** थापटण्यानें हीं मडकीं फुटावयाचींच! ह्या मालास पक्के करण्या-साठीं तीन प्रकारच्या शिक्षणाची पुढें आवश्यकता असते. हें तीन प्रकारचें शिक्षण झालें म्हणजे बाजारांत ठेवण्यायोग्य लेखक व कवी तयार होतात. हें महत्त्वाचें तीन प्रकारचें शिक्षण देण्याची योजना ह्याच कारखान्याच्या दुसऱ्या दाल-न्नांत केलेली आहे. पहिलें व अत्यंत महत्त्वाचें शिक्षण हें कीं, कवींना व लेख-कांना आपल्या कवितेचीं व लेखांचीं 'बाडें' बगलेंत मारून प्रकाशकांच्या दारोदार जाऊन त्यांची मनधरणी करण्याचें. **प्रकाशकांना** 'वश' करण्याची एक महत्त्वाची 'कला' आहे ती साध्य होण्यास कित्येक वर्षं घालवावीं लाग-तात. ती कला शिकविण्याची ह्या कारखान्यांत खास योजना केलेली आहे. ह्यानंतरचें शिक्षण म्हणजे कोणी **साहित्य सम्राट** प्रस्तावनालेखक, कसा गांठावा व त्याची प्रस्तावना कशी मिळवावी हेंही एक अवघडच काम असतें. व तें शिकविण्यासाठीं कारखान्यांत दोन वर्षांचा कोर्स ठेवलेला आहे, तो पूर्ण झाल्यावर लेखकांना व कवींना ही कलाहि चांगली साध्य होते.

तिसरें शिक्षण हें कीं, लेखकांस व कवींस आपले लेख व कविता छापून काढण्यास जो खर्च येतो त्यासाठीं **कर्ज** कसें काढावें हें शिकविणें अत्यंत आवश्यक असतें. हें शिक्षण न मिळाल्यास आतांपर्यंतचा सर्व खटाटोप व्यर्थच

समजावयाचा, म्हणून हें अत्यंत महत्त्वाचें शिक्षण समजलें पाहिजे, व शेवटचा कोर्स म्हणून ह्या कारखान्यांत हा कोर्स शिकविण्यासाठीं खास तज्ज्ञाची योजना केलेली आहे. त्यामुळें कवींस व लेखकांस कर्ज काढण्याची कला ह्या कारखान्यांत चांगली साध्य करतां येते. हें तिन्ही प्रकारचें शिक्षण झालें म्हणजे कारखान्यांत घडविलेलें **कवी** व **लेखक** पूर्ण झाले असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु अद्याप ते बाजारांत विकाऊ माल म्हणून ठेवण्याच्या योग्य नसतात. कारण शेवटचा "**झिलई**" चा संस्कार अद्याप त्यांच्यावर व्हावयाचा असतो. तो संस्कार हा कीं, कर्जदारांनीं कोर्टांत दावे केल्यानंतर 'नादार' कसें व्हावें; बगला कशा वर कराव्यात व शेवटीं कर्जातील रुपयाबद्दल **कवितेच्या व लेखांच्या पुस्तकांचे गठ्ठे धनकोच्या दारांत कसे नेऊन टाकावेत** हें शिक्षण कवीस व लेखकांस आवश्यक असतें. हें शिक्षण मिळालें म्हणजे **परिपूर्ण लेखक** व **कवि** झाला असें समजावें. यासाठीं ह्या झिलईच्या शिक्षणाची ही योजना ह्या कारखान्यांत उत्तम केलेली आहे. हा कोर्स एक दोन महिन्यांचाच असतो, ह्याप्रमाणें ह्या प्रचंड कारखान्यांत 'लेखक' व 'कवी' प्रचंड प्रमाणांत तयार करण्याची योजना झालेली आहे. म्हणून गरजूंनीं ह्या प्रचंड कारखान्याचा अवश्य उपयोग करून घ्यावा!

निजामविजय-हैद्राबाद.

हिंदु मुसलमानांच्या एकीची वाटाघाट !

[ही वाटाघाट इ. स. १९२७ च्या मद्रास काँग्रेसच्या दिवसांत, स्टेशनांचे प्लॅटफॉर्मस्, प्रतिनिधींचीं वसतिगृहें, व भोजनगृहें, कॉफीरेस्टॉरंटस्, काँग्रेस कॅम्पस व टिळक मंडप इ. इ. अनेक ठिकाणीं व अनेक व्यक्तींत चालू होती. त्यांपैकीं एक मनोरंजक वाटाघाट संवादरूपानें खालीं देत आहें. ह्या संवादांतील भाषा व व्यक्ती काल्पनिक आहेत. परंतु एकंदर सध्यां होत असलेल्या वाटाघाटीचें स्वरूप व त्यांतील तात्पर्य मात्र खरें आहे.]

पंडितजी—हा एक प्रश्न सुटला कीं, स्वराज्यमंदिरांत आपण प्रवेश केलाच असें समजा !

मौलाना—स्वराज्यमंदिर कां म्हणतां ! स्वराज्याच्या दर्गेंत अथवा स्वराज्य मशिदींत आपण गेलोच असें समजा. अहो, हिंदु मुसलमानांत एकी झाली कीं, स्वराज्य हातांत आलेंच ! बाकीच्या जातींची पर्वा करण्याची जरूर नाहीं !

मि. सुखवाला—एका पार्शी जातीला मात्र तुम्हीं मान दिला पाहिजे. म्हणजे मग स्वराज्याच्या मार्गांत कोणताच अडथळा नाहीं.

मि. षण्मुखम्—अहो, तें तर होणारच ! मॉयनॉरिटीजचें आम्हीं संरक्षण करणारच ! परंतु प्रिन्सिपल कम्युनिटीज म्हणजे हिंदु व मुसलमान; ह्यांच्यांत एकी झाली पाहिजे !

पंडितजी—तीच कशी होणार ?

मि. चातर्जी—त्याचाच आपण आतां विचार करूं. आणि **कॉमन अंडरस्टँडिंगला** येऊं शकतो किंवा नाहीं हें पाहूं.

मि. षण्मुखम्—हिंदु मुसलमानांच्या लढ्याचे दोन भाग आहेत. एक राजकीय व दुसरा धार्मिक.

मि. चातर्जी—राजकीय भाग जाऊं द्या. राजकीय भागांत परस्परांचीं डोकीं फोडण्याची वेळ अद्याप आली नाहीं. म्हणून प्रथमतः धार्मिक भाग घेऊं.

मि. सुखवाला—असें म्हणूं नका, मि. चातर्जी, हिंदु मुसलमानांच्या दंग्यांतील मुळाशीं खरा खरा राजकीय तंटाच आहे! हा राजकीय तंटा नाहींसा झाला कीं, हे दंगे थांबलेच म्हणून समजा !

मौलाना—बरोबर! मि. सुखवाला म्हणतात तें अगदीं बरोबर आहे! मुसलमानांच्या राजकीय हक्कांचा जोंपर्यंत समाधानकारक निकाल लागणार नाहीं तोंपर्यंत हे दंगे होणारच.

पंडतजी—मुसलमानांच्या राजकीय हक्कांचा विचार आणखी किती व्हावयाचा! मुसलमानांना राजकीय सवलती जेव्हढ्या देणें योग्य होतें त्यापेक्षां जास्त दिलेल्या आहेत. आणखी काय पाहिजे.

मौलाना—येवढ्यानें काय होतें! मुसलमानांच्या जेवढ्या मागण्या आहेत तेवढ्या सर्व आम्हांस मिळाल्या पाहिजेत!

मि. चातर्जी—तें जाऊं द्याहो. त्याचा विचार आपण मागाहून करूं. "We have come here to accommodate ourselves to the general wish" प्रथमतः धार्मिक लढा घेऊं. हिंदू मुसलमानांच्या दंग्याचें हेंच खरें कारण आहे.

मि. खरे—धर्माला हें नुसतें बदनाम करणें आहे! दंगे करणारांना धर्म ही काय वस्तु आहे हेंही माहीत नाहीं.

मौलाना—असें म्हणूं नका. मि. खरे. A Mohomadan will sacrifice every thing in the name of religion. आम्ही धर्मासाठीं वाटेल तें करूं.

मि. खरे—हो, हें मात्र अगदीं खरें. धर्माचें नांव पुढें करून खऱ्या धर्माचाहि बळी देण्यास तुम्ही मागें पुढें पहाणार नाहीं. त्याबद्दल संशयच नाहीं.

पंडतजी—ह्याच धर्मांच्या बाबतींत तंट्याचें मूळ कशांत आहे. प्रत्येकानें आपआपला धर्म आचरावा.

मि. षण्मुखम्— हिंदुमुसलमानांचे तंटे व्हावयाचे म्हणजे **Cow** and **Music**, गाय आणि वाद्य, हेंच दोन प्रश्न महत्त्वाचे आहेत.

मि. चातर्जी—बस बस, तंट्याच्या मुळाशीं ह्याच दोन वस्तू आहेत. एक सजीव व एक निर्जीव!

मि. खरे—हा निव्वळ तुमचा भ्रम आहे! मुसलमानांना असंतुष्ट होण्याचें कारण Music before the mosque असें सांगण्यांत येत असतें; Before the

mosque वरच एवढा जोर कां? Music behind the mosques संबंधीं त्यांची फारशी तक्रार कां नाहीं? मशिदीसमोर वाद्यें वाजलीं काय किंवा मागें वाजलीं काय Disturbance सारखाच होणार! थोडक्यांत सांगावयाचें तर दंगे होण्याचीं कारणें फारच निराळीं आहेत!

मि. षण्मुखम्—अहो, कारणें जरी निराळीं असलीं तरी हे प्रश्न सुटले पाहिजेत ना! तुम्ही मधें हा नुसता अडथळा करतां! मि. खरे!

मौलाना--असे अडथळेच करावयाचे असतील तर मग एकीची भाषाच नको. 'Cow and Music' हे दोन प्रश्न सुटले कीं, हिंदू मुसलमानांचे दंगे थांबलेच म्हणून समजा!

पंडतजी--तेच कसे काय सोडवावयाचें! प्रथमतः गोहत्येसंबंधीं विचार करूं.

मौलाना—तसें नव्हे, प्रथमतः वाद्यासंबंधींचा विचार करूं, कारण मुसलमानांना वाद्यांचीच फार चीड आहे!

मि. चतर्जी—बरें तसें करा. मशिदीवरून वाद्य वाजविण्यासंबंधीं.

मि. षण्मुखम्—No, no, we must go to the root प्रथमतः वाद्य म्हणजे काय? वाद्याची डेफिनेशन करा.

मि. सुखवाला--That's right पहिल्यानें वाद्याची Definition केली पाहिजे. वाद्य म्हणजे any music.

मि. खरे—वाद्य आणि म्युझिक यांच्यांत फरक आहे. मराठींत वाद्य हा शब्द Musical Instrument ला लावतात. म्युझिकला लावीत नाहींत.

मि. चातर्जी--तर मग म्युझिक व म्युझिकल इन्स्ट्रमेंट्स दोन्हींची व्याख्या केली पाहिजे.

मि. षण्मुखम्--म्युझिक म्हणजे Succession of Sound

मि. सुखवाला--म्युझिक म्हणजे नुसतें Succession of Sound नव्हे ही डेफिनेशन केली तर बोंब मारणें सुद्धां वाद्यच होईल!

मि. खरे—बोंब मारण्याला मराठींत शंखवाद्यच म्हणतात. (हंशा)

मि. सुखवाला—अहो, मग रडणें सुद्धां वाद्यच! मशीदीवरून कोणी रडत सुद्धां जाऊं नये, असें होईल! (हंशा)

मौलाना—रडतहि जाऊं नये व हंसतहि जाऊं नये ! कारण दोन्हीमध्यें Succession of Sound आहेच ! (हंशा)

मि. चातर्जी—छेः छेः तसें नव्हे. Music ची डेडिफेशन नुसतें Succession of Sound नव्हे तर Succession of Sound so modulated as to please the ear, Melody, Harmony ही वेब्स्टरची डेफिनेशन आहे.

पंडतजी—मग या डेफिनेशनप्रमाणें 'ताशाचा' आवाज Music होऊं शकत नाहीं, आणि मशीदीवरून ताशा वाजवीत जाण्यास हरकत नसावी, असें ठरेल !

मौलाना—ही आमच्या शत्रूनीं इंग्रजीभार्षेत केलेली म्युझिकची डेफिनेशन आम्हांस नको ! ज्याच्या योगानें आमच्या Congregational prayer मध्यें Disturbance होईल तेंच वाद्य, व तेंच Music अशी वाद्याची व म्यूझिकची Definition केलेली बरी, Be practical

मि. खरे—वाः मग सकाळीं दुपारीं बहुधा तुमच्या प्रेयरच्या वेळेलाच ओरडणाऱ्या गिरण्यांच्या शिट्याहि म्युझीकच ठरणार !

मि. चातर्जी—सायकलची घंटी वाद्य होऊं शकेल कीं नाहीं ?

मौलाना—सायकालची घंटी जर सारखी वाजूं लागेल तर तें वाद्यच होणार (हंशा)

षण्मुखम्—मग मोटारीचा आवाज ? मोटारींचे हॉर्न्स व त्याची धडधड ह्यांनीं तर खात्रीनें प्रेयर डिस्टर्ब होणार ! सनईपेक्षां हे आवाज तर खात्रीनें कर्कश असतात !

मि. खरे—शिवाय 'सनई' सारखें मधुर वाद्य हिंदूंच्या मिरवणुकींत वर्षाच्या कांठीं फार तर दोन चार वेळ मशीदीपुढें वाजणार. परंतु ह्या मोटारीच्या आवाजाचा सुळसुळाट रोज सारखा चालू असतो. मग त्यानें प्रेयर का डिस्टर्ब होऊं नये !

मि. सुखवाला—हें मात्र अगदीं खरें, माझें घर सडकेवर आहे व मला तर ह्या मोटारींच्या आवाजानें साधी कादंबरी वाचतांनाहि डिस्टर्बन्स होतो, मग प्रेयरला किती तर होत असेल.

मौलाना—अहो, पण हा आवाज सारखा नसतो.

मि. खरे—सारखा नसेल तरी दर तीन मिनिटांनीं तो होतोच! मोठमोठ्या शहरांतून त्याचें हेंच प्रमाण निघेल!

मौलाना—मला वाटतें, आपण विषय सोडून भलतीकडेच वहावत चाललों आहोंत.

पंडतजी—तसें नव्हे. मशीदीवरून वाद्याला बंदी करण्याचें खरें कारण काय तें आम्हांस समजलें पाहिजे.

मौलाना—महात्मा गांधी काय म्हणतात पहा. If complete stoppage of Music before Mosques will be the only thing that will share the Muslim's feelings. It is the duty of the Hindus to do so without a moment's thought. मुसलमानांच्या भावनांचा व आतांपर्यंत चालत आलेल्या रूढींचा तुम्ही विचार कराल किंवा नाहीं?

मि. खरे—रूढीचाच विचार केला, तर मशीदीवरून वाद्यांची बंदी ही आतांच निघाली आहे. आणि वाद्यानें त्रास होतो असें गृहित धरलें तर ती मशीदीपुढें जशी बंदी तशीच ती देवळापुढें व चर्चपुढेंहि पाहिजे.

मौलाना—पण हें प्रॅक्टिल आहे कां? D'ont think of impracticabilities.

मि. षण्मुखम्—तें जाऊं द्या. हो! आज आपल्याला एकीचा विचार करावयाचा आहे. and we have to answer to the insult implied in Birkenheads Challenge.

मि. चातर्जी—असो. Musie ची डेफिनेशन झाली. आतां Musical Instrument ची डेफिनेशन घेऊं. कोणीकडून तरी हिंदुमुसलमानांच्या तंट्याचा प्रश्न आज सुटलाच पाहिजे.

मि. षण्मुखम्—Instrument is any contrivance from which music is produced हीच वाद्याची डेफिनेशन.

मि. चातर्जी—ही डेफिनेशन झाली. परंतु मुसलमानांच्या मनोवृत्ति ज्या Indian instruments नेंच दुखतात, त्या वाद्यांची यादीच केलेली बरी. नव्हे का?

पंडतजी—मृदंग, ढोलकें, सनई, बाजा, ताशा, वीणा, सतार, हार्मोनियम, घंटा, झांज, टाळ, चिपळ्या, करताल.

मि. षण्मुखम्--रुद्रवीणा, भेरी, शंख, तुतारी, पांवा, नगारा.

मौलाना--पियानो घ्या, परंतु ह्या सर्वांपेक्षां वाद्याची Practicable for our purpose अशी डेफिनेशनच केलेली बरी.

मि. षण्मुखम्--ठीक आहे. Any contrivance from which succession of harmonious or inharmonious sounds are produced is वाद्य?

मि. चातर्जी--त्याच्या पुढें which is likely to produce disturbance in the prayer हें एक वाक्य घालून ठेवा.

मौलाना--Likely or not likely to disturb the prayers असे दोन्ही घालून ठेवा.

मि. चातर्जी--ठीक आहे. तसें कां होईना!

मि. खरे--अहो, पण त्याचा अर्थ काय होतो!

मि. षण्मुखम्--मि. खरे; आतां तुम्ही उगीच शंका काढूं नका. This is the best that could be had at this stage.

मि. चातर्जी—आपल्याला बर्कनहेडनीं जो आपला अपमान केलेला आहे, त्याचें उत्तर दिलें पाहिजे हें लक्षांत ठेवा, मि. खरे!

मि. सुखवाला—आतां Cow Slaughter बद्दलहि असाच समाधानकारक निकाल लागला कीं हिंदू मुसलमानांच्या एकींत कोणताच अडथळा रहाणार नाहीं.

पंडतजी—गोहत्यासंबंधीं मुसलमानांनींहि हिंदूंच्या मनोवृत्तीकडे लक्ष दिलें पाहिजे.

मि. चातर्जी—तें जाऊं द्या; प्रथमतः गाईची व्याख्या करूं या!

पंडतजी—Cow is a Sacred animal हीच Cow ची डेफिनेशन.

मौलाना—अहो! ही तुमची डेफिनेशन झाली. आमची डेफिनेशन म्हणजे Cow is an eatable animal अशी आम्ही करणार! (हंशा)

मि. षण्मुखम्—ह्या धार्मिक डेफिनेशन्स झाल्या. आणि ह्या ज्याच्या त्याच्या पुत्यां खऱ्याच आहेत. परंतु Clash कुठें होतो हें पहावयाचें म्हणजे मीमांसकांच्या पद्धतीनें गाईची Definition काय ती पाहिली पाहिजे. 'गोः कपिलत्वं अव्याप्ति । गोः श्रृंगित्वं अतिव्याप्ति । गोः एकशफत्वं असंभवः ! एतद्दूषणत्रय विवर्जितं गोः लक्षणं किम् ? Cow चें Definition काय ?

मि. चातर्जी—हें पहा; तुमचीं न्याय–मीमांसा–तर्कशास्त्र राहूं द्या बाजूला. गोहत्या करतांना हिंदूंच्या मनोवृत्ति दुखवल्या जातील अशा पद्धतीनें गोहत्या होऊं नये हें आम्हां हिंदूंचें मागणें आहे.

मौलाना—जवळ जवळ बेचाळीस लक्ष गाई दरवर्षी हिंदुस्थानांत कापल्या जातात, त्यांपैकीं चाळीश लक्ष गोऱ्या सोल्जरांना पोसण्यासाठीं कापल्या जातात आणि मुसलमानांच्या उदरांत फक्त दोन लक्ष जात असतील ! त्यासाठीं हिंदूंनीं एवढें अकांड तांडव कां करावें हें मला समजत नाहीं !

मि. खरे—आमचें म्हणणें सगळ्या गोहत्येसंबंधां आहे. आणि बेचाळीस लक्ष व दोन लक्ष ही हिस्सेरशी कोणत्या हिशेबानें करतां ? शिवाय सोल्जरांसाठीं गाई कापल्या जातात त्यांना हिंदूंच्या वस्तींतून मिरवत नेत नाहींत व त्या हिंदूंना दिसत तरी नाहींत !

मि. चातर्जी--गोहत्या बंद होणें शक्य नाहीं, परंतु हिंदूंना चीड उत्पन्न होऊं नये हेंच त्यांत धोरण ठेवलें पाहिजे.

मि. षण्मुखम्—'झटका' 'बली' व 'बिसमिल्ला' गाई कापण्याचे तीन प्रकार आहेत, त्यांपैकीं झटक्याचा उपयोग केलेला बरा.

मौलाना—ह्या पद्धति निरनिराळ्या प्रसंगावर अवलंबून असतात.

मि. सुखवाला—गोहत्या होईना का ? परंतु ती हिंदूंना समजूं न दिली म्हणजे झालें.

मौलाना—तें कसें शक्य आहे ! एवढ्या गाई समजल्याशिवाय कशा कापल्या जाणार ? हिंदूंनीं त्याची चीड मानूं नये, असा निर्बंध घाला.

मि. खरे—वा.

मि. चातर्जी—Liberty of Conscience and liberty of action, these are the gifts of English Education.

मौलाना—आणि म्हणूनच We can slaughter cows for sacrifice or food whenever and wherever we please.

मि. षण्मुखम्--हेंच खरें Liberty of conscience should be guaranteed कोणत्याही कायद्यानें त्यांत ढवळाढवळ होऊं नये.

मौलाना—Liberty of conscience means liberty of belief and worship हें तुम्हांस मान्य केलेंच पाहिजे.

मि. सुखवाला—हें तर आम्ही केव्हांही मान्य करणारच !

मि. चातर्जी--चला, हाहि प्रश्न समाधानकारकच सुटला !!

मि. षण्मुखम्--'Cow' and Music दोन्ही प्रश्न समाधानकारक सुटले; ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे.

मि. खरे--अहो, पण झालें काय ? समाधानकारक काय सुटलें ?

मि. चातर्जी--We must pass this Unity Resolution मि. खरे, तुम्ही असे निराशावादी होऊं नका !

मि. षण्मुखम्—अहो, कांहीं जरी नसलें झालें तरी We have laid the foundation of Hiudus Muslim unity !!!

मौलाना--हेंच खरें. आणि ह्याजबद्दल वर्कनूहेडचेच आभार मानले पाहिजेत!!

निजामविजय- हैद्राबाद.

येथूनतेथून चुकलेली खानेसुमारी !

सध्या हिंदुस्थानांत जी मनुष्य–गणतीची गडबड चालू आहे आणि खानेसुमारी करणाऱ्या स्वयंसेवकांची जी येथें नेमणूक झाली आहे त्यांत माझ्याकडे 'तनकीकुनिंदा' (Supervisor) चा अधिकारी कांहीं दिवस आला होता. गणती करणाऱ्या या स्वयंसेवकांनीं जें काम केलें असेल यांची तपासणी करणें मजकडे होतें. माझ्या हाताखालीं २० — २५ गणती करणारे अ. "पुमारकुनिंदा" होते. मनुष्य–गणतीची रात्र १८ मार्च ठरविलेली होती. परंतु त्या रात्रीं घोटाळा व त्रास होऊं नये म्हणून अगोदरच कच्चे खाने भरून ठेवण्याची वहिवाट आहे. माझ्या हाताखालील 'गणकां' नी जे कच्चे तख्ते भरून ठेवलेले होते त्यांची कच्ची तपासणी करण्याकरितां २–३ दिवसांची सुटीहि मिळाली होती. त्यांपैकीं एके दिवशीं मी सर्वांस बोलावून त्यांच्या तपासणीचें काम सुरू केलें तों काय सांगावें ! सर्वांनीं भयंकर घोडचुका केलेल्या माझ्या नजरेस आल्या ! येवढ्या ढोबळ चुका ह्या लोकांनीं केल्या तरी कशा ? ह्याचें मला फार आश्चर्य वाटलें ! हे लोक शुद्धींत होते, किंवा कसल्या धुंदींत होते हेंच कळेना. 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' ह्या न्यायानें ह्या सर्वांनीं पहिल्यानेंच एक मोठी चूक केली ! मनुष्यांप्रमाणेंच पशूंचीही गणती होत असते, त्यास **"दुमषुमारी"** असें नांव आहे. परंतु सध्यां चालू असलेली '**मर्दुमषुमारा**' आहे. दुमषुमारी नाहीं. असें असून ह्या लोकांनीं माणसांमध्यें पशूंचाही समावेश केलेला दिसला !

नांवावरून मनुष्य ओळखण्याचीही फारच गांवढळ व ढोबळ पद्धत आहे. **"आहार, निद्रा भय मैथुनंच सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम् धर्मोहितेषा माधिको विशेषो"** परोपकार, भूतदया, स्वार्थत्याग, देशप्रीती इ. आत्मिक व धार्मिक सद्गुण; ज्यांच्या योगानें पशूहून मनुष्यास ओळखतां येतें. जे गुण पशूंत कधींही न दिसतां मनुष्यांत मात्र दिसतात. मनुष्यपणा Humanity ज्यांच्या योगानें सिद्ध होतो, असल्या गुणांचा लवलेशही अंगीं नसलेल्या किती तरी द्विपादांना ह्या गणकांनीं मनुष्यांच्या खानेसुमारींत दडपून दिलें होतें ! पशूप्रमाणेंच अष्टौ प्रहर चरणार, व उंच उंच गाद्यांवरून सदासर्वदा निद्रा घेण्यांत पशूंसही मागें सारणारे अशा आळशांची गणती ह्यांनीं खुशाल मनुष्यांत केली होती !

मैथुनांत निसर्गाची मर्यादा पशूंनीं अद्याप सोडलेली नाहीं. परंतु ज्या कांहीं नरपशूंनीं ह्या कामांत पशूंइतकेंही तारतम्य ठेवलेलें नाहीं अशांनासुद्धां ह्या गणकांनीं मनुष्यच गणिलें होतें! अशा रीतीनें मनुष्यांची खानेसुमारी वाढविण्यांत ह्या गणकांना काय फायदा वाटला असेल तो असो! ह्या शिवाय सूर्याच्या प्रकाशांत व लौकिकांच्या भीतीनें दिवसा मनुष्यप्रमाणें वागणारे रात्रीच्या वेळीं व एकांतामध्यें वारुणीसेवनानें पशूसही लाजविणारीं कृत्यें करून आपली मूळची जात सिद्ध करीत असतात! अशा ग्राम्य सुखांत रममाण होणाऱ्या पशूंची गणती 'दुमषुमारींत' न करतां ह्या मनुष्यगणतींतच त्यांनीं केली होती! मनुष्यगणतीचें काम रात्रीं होणारें होतें. तेव्हां वस्तुतः **रात्रींच्या वेळीं ज्या प्राण्याची जी जात असेल,** त्यास त्याच जातीच्या खानेसुमारींत घातलें पाहिजे, एवढेंही तारतम्य ह्या गणकांना नव्हतें! खानेसुमारीच्या तक्त्यामधील दुसरा खाना '**धर्मा**' चा आहे. ह्यांत सुद्धां ह्या लोकांनीं मनस्वी चुका केलेल्या दिसल्या! साधा मनुष्यधर्मच ज्यांना अवगत नव्हता, अशांच्या नांवापुढें **हिंदु** धर्म, **मुसलमान** धर्म, **ख्रिश्चन** धर्म, **बौद्ध** धर्म अशा उच्च व पवित्र धर्मांचीं नांवें बेधडक घातलीं होतीं. **मृत्यूला तुच्छ लेखणें** व **परोपकार करणें** हीं ज्या हिंदुधर्मांचीं मुख्य तत्त्वें तीं पायांखालीं तुडवून मृत्यूला अतिशय भिणाऱ्या व अगदीं स्वार्थ परायण—व्यक्तिगत स्वार्थपरायण—अशा असंख्य लोकांना हिंदु म्हणून म्हटलेलें होतें, '**तौहीद**' म्हणजे एकाच शक्तीला मानणें व **प्रेमालाच** मुख्य स्थान देणारा असा इस्लाम धर्म; परंतु ह्याच्या उलट वागून कलहप्रिय असलेल्या आणि क्रूर कृत्यें करणाऱ्या अशा किती तरी लोकांना मुसलमानी धर्माचें म्हणून लेखलेलें होतें. "**एका गालांत मारली असतां दुसरा गाल पुढें करावा**" हें सहिष्णुत्वतेचें तत्त्व झुगारून देऊन उलट दुसऱ्या माणसांनाच नव्हे, तर राष्ट्रांनाहि निष्कारण लाथाडणाऱ्या इसमांच्या नांवापुढें ख्रिश्चन धर्म लिहिलेला होता! म्हैस, बैल, घोडा, इ. जनावरेंच नव्हेत तर, 'बेडूक, झुरळ, बागुरडें, इ. लहान प्राण्यांनाही स्वाहा करणाऱ्या कित्येक जपानी व चिनी लोकांना अहिंसा प्रतिपादन करणारा **बौध**' धर्म चिकटविला होता! त्याचप्रमाणें व्याज, चक्रवाढ व्याज, ताबेगहाण, खोट्या साक्षी, व खोटें दस्तैवज इत्यादि इत्यादि हत्यारांनीं गरीब शेतकऱ्यांचा फन्ना उडविण्यांत तरबेज झालेल्या कित्येक सावकारांच्या गळ्यांत, प्राणिमात्रास न

दुखविणारा **जैन** धर्म लटकावून दिला होता! अशा विलक्षण चुका ह्या 'गणकांनीं' केलेल्या होत्या त्याची किती म्हणून सुधारणा करावी? तिसरा खाना **पुरुष किंवा स्त्री** हें भरण्याचा होता. मला वाटलें ह्यांत तरी चुका होण्याचा संभव नाहीं, परंतु दुर्भाग्य ! ह्याही खान्यांत बऱ्याच अक्षम्य चुका आढळून आल्या ! खानेसुमारींतील बाकी सर्व खाने घरच्या मालकांना प्रश्न विचारून भरतां येतात परंतु तुम्ही स्त्री आहांत किंवा पुरुष आहांत असा प्रश्न विचारणें अपमानास्पदच ठरेल, स्त्री व पुरुष ओळखूनच गणकांनीं लिहिलें पाहिजे, ओळखावयाचें कशावरून? तर प्रथमतः गुणावरून. परंतु पराक्रम, धैर्य, शौर्य, कर्तृत्व इ. पुरुषार्थांचे धर्म अंगीं किंचितही नसणाऱ्या कित्येक लोकांना ह्या लोकांनीं **पुरुषांत** घातलें होतें व 'यस्य भार्या शुचिर्दक्षा भर्तारमनुगामिनी। नित्यं मधुरवक्त्रीच सारमानरमारमा" ही बायका ओळखण्याची स्पष्ट रीत असतांही ह्याच्या उलट गुण असलेल्यांना खुशाल बायकांच्या खान्यांत घातले होते ! पुरुष व स्त्री ओळखण्याची दुसरी सोपी रीत म्हणजे बाह्य वेशावरून. परंतु त्यांतही चुका झाल्याच !

हिंदुस्थानांत बांगड्या घालणाऱ्या व बांगड्या न घालणाऱ्या अशा दोन तऱ्हेच्या बायका असतात ! ह्याशिवाय सुधारणेनें स्त्री–पुरुषांतील बाह्य वेषाचें अंतर किती कमी कमी होत आहे हें आमचें गणक अगदीं मागसलेल्या देशांतील असल्यामुळें त्यांना माहीत नसावें. व त्यामुळें त्यांच्या हातून फारच चुका झालेल्या होत्या ! डोक्यावरील भांगयुक्त केशकलाप, हातांत कंकणवजा असलेले रिस्टवॉच, व मिशा काढून टाकल्यामुळें गुळगुळीत दिसणारा ओष्ठप्रांत इ. बाह्य वेषास फसूस अशा पुरुषांना ह्या गणकांनीं खुशाल बायका करून टाकलें !

तसेंच मनगटापर्यंत पोलकें घालणाऱ्या, चष्मा व जोडा वापरणाऱ्या, नाकांत नथा नसलेल्या, व हातांत छत्री घेणाऱ्या कित्येक बायकांना पुरुषाच्या वर्गांत घातलें ? ब्रह्मदेवानें पुरुष व स्त्री उत्पन्न करून अगोदरच जो जगांत घोटाळा उत्पन्न केला आहे, त्यांतच ह्या गणकांनीं पुरुषांना बायकांच्या खान्यांत व स्त्रियांना पुरुषांच्या खान्यांत घालून अनंत घोटाळे करून ठेवले ! ह्याशिवाय खानेसुमारीच्या तक्त्यामध्येंही एक चूक झालेली आहे. ज्या पुरुषही नाहींत व स्त्रियाही नाहींत, अशा तृतीय प्रकृतीच्या लोकांची त्यांत मुळींच सोय केलेली नाहीं ! हा अन्याय नव्हे काय ? हे सगळेच लोक प्रच्छन्न असतात असेंही नव्हे ? पांच पांच, सहा सहा जणांचा घोळका करून टाळ्या वाजवीत आपल्या अमंगल दर्शनानें गृह-

स्थाश्रमाच्या पुत्रोत्सवाचा आनंद घालविणारे, व जें मिळेल तें बक्षिस घेऊन त्यावर उपजीविका करणारे हे लोक निदान भागानगरांत तरी अपरिचित नाहींत! ह्याच्या पुढचा खाना विवाहित किंवा अविवाहित हें दाखविणारा आहे.

गणकांनीं आपल्या ढोबळ दृष्टीनें ह्या खान्यांतही विलक्षण चुका केलेल्या दिसल्या ! वाजंत्री वाजून देव ब्राह्मणासमक्ष झालेल्या विधीसच लग्न समजणें ही चूक सर्व समाजाकडूनच होत आहे, **'धर्मेच अर्थेच, कामेच नातिचरामि'** ही प्रतिज्ञा पालनाच्या दृष्टीनें हें लग्नाचें कोष्टक भरलें पाहिजे. परंतु तसें जर भरूं जाल तर जिवंत असलेल्या नवराबायकोच्या कितीतरी जोडप्यांस विवाह-सुखाच्या दृष्टीनें **अविवाहित** ह्या सदरांतच घालावें लागेल. नवरा जिवंत असू-नही पतिसुख नसल्यानें झालेल्या विधवा व बायको जिवंत असूनही स्त्रीसुख नसल्यानें असलेले विधुर समाजांत थोडे थोडके नाहींत, परंतु अशांना **विवाहित** ह्या सदरांत चापून दडपून दिलें होतें! त्याचप्रमाणें वैवाहिक सुखाचा नित्य अनु-भव घेणारे पुष्कळ लोक **ब्रह्मचारी, विधुर** ह्या सदरांत दडपले होते. वैवाहिक सुखाचा अनुभव घेणाऱ्या स्त्रियाही कांहीं विधवांच्या व कुमारिकांच्या सदरांत घातल्या गेल्या. पांचवा खाना 'वया'चा आहे. व गणकांनीं ह्या खान्यांतही पुष्कळ चुका केल्या असल्याचें दिसून आलें ! ह्या बाबतींत गणकांची मोठी चूक ही झाली कीं, लोकांच्या सांगण्याप्रमाणें त्यांनीं त्यांचीं वयें लिहिलीं. अतिशय खरें बोल-णारा मनुष्यहि वय सांगण्यांत बहुधा खोटें बोलतो हा नेहमींचा अनुभव आहे. सरकारी नोकर आपल्या कारनाम्यांत (सर्व्हिस बुकांत) खऱ्या वयापेक्षां नेहमीं पांचसहा वर्षांनीं लहान असतो. तरुणांत गप्पा मारण्यास बसल्यावर आपलें वय जास्त आहे, व जास्त वय असूनही मी तुमच्यासारखाच तरुण दिसतो हें दाखविण्याकडे आणि वृद्धांत बसल्यावर मी तरुण आहे हें दाखविण्याकडे बहुधा सर्वांची प्रवृत्ति असते. तरुणीस वय सांगण्याचा प्रसंग आल्यास म्हातारे मनुष्यही तरणे होतात. एरव्ही कितीही मनुष्य म्हातारा असला, तरी श्मश्रू करण्याच्या दिवशीं तरी तो तारुण्याची ऐट आणतोच !

श्लोक

अपाण्डुरा शिरसि यत्र वली कपोले ॥
दन्तावली विगलिता न च मे विषादः ॥
एणीदृशो युवतयः पथि मां विलोक्य ॥
तातेति भाषणपराः शतकुन्त घातः ॥

"केंस पांढरे झाले त्याचें मला वाईट वाटत नाहीं, दांत पडले त्याचेंही वाईट वाटत नाहीं; अंगावर सुरकुत्या पडल्या त्याचेंही वाईट वाटत नाहीं परंतु रस्त्यांतून जाणाऱ्या सुंदर तरुणी माझ्याकडे पाहून मला 'बाबा' म्हणतात ह्याचें मात्र फार वाईट वाटतें."

जरेचीं चिन्हें वयपरत्वें प्राप्त झालेलीं आहेत हें मनुष्य कधींही कबूल करीत नाहीं तर अत्तर डोक्यास लावल्यानें केंस पांढरे झाले व मूर्ख वैद्यानीं दिलेल्या रसायनानें दांत पडले हें सांगण्यांतच प्रत्येकास प्रौढी वाटते!

वय चोरण्याकडे लॉर्ड कर्झनसारख्या मुत्सद्यांचीच नव्हे तर कित्येक साधुसंताचीही प्रवृति असलेली स्पष्ट दिसते. अर्थात् 'वय' चा खाना सर्व चुकलेला होता.

ह्या सर्व चुकांनीं माझें डोकें त्रासून गेलें व पुढचे खाने पहाणें मीं सोडून दिले. कित्येक गणकांनीं फारच हास्यास्पद आणखी चुका केल्या होत्या. लहान एका वर्षाच्या मुलाचा धंदा कसाई, असा लिहिला होता व सहा महिन्यांच्या एका मुलीची जन्मभाषा कानडी लिहिली होती. जातीच्या खान्यांत "मास्तरकी" म्हणून घातली होती व लग्नाच्या खान्यांत हैद्राबाद लिहिलें होते. हीं लिहिलेलीं नांवें तरी बरोबर आहेत काय ह्याची चाचणी करण्यासाठीं गणकांना बरोबर घेऊन मी एका मोहोल्यांत गेलों व तेथील एका पठाणाच्या घरीं जाऊन त्याच्या बायकोचें नांव विचारूं लागलों. त्यासरशीं तो पठाण जो रागावला व "किसका नाम पुच्छता बे साले." असें म्हणून कांठी घेऊन आमच्या आंगावर धांवून आला. त्यांनीं जोडलेल्या नात्याप्रमाणें भावानें बहिणीचें नांव विचारण्यांत काय गुन्हा होता हें मला कळेना. परंतु त्या वेळेस विचार करण्यापेक्षां आत्मसंरक्षण करणें जरूर होतें म्हणून मी तत्काळ तेथून पळत सुटलों. आम्ही सर्व पुढें पळत होतों, व तो पठाण सोटा घेऊन आमचा पाठलाग करीत होता. ह्याप्रमाणें पळतां पळतां सुदैवानें आम्ही एका बोळवंडींत शिरून त्यास झुकांडी दिली आणि शेवटीं सेन्सेसचें ऑफिस गांठून अधिकाऱ्यांपुढें सर्व कागद फेंकून दिले. झालेला प्रकार व गणकांनीं केलेल्या चुक्या मीं अधिकाऱ्यांस सर्व दाखविल्या. परंतु चमत्कार हा कीं, अधिकाऱ्यांनीं मलाच **बेवकूब** ठरविलें आणि माझा तनखिकुनिंयाचा सुपरवाइझरचा अधिकार काढून घेतला!

मी बेवकूब कां जग बेवकूब याचा विचार करीत जड पावलानें मी घरीं आलों!!

निजाम विजय, हैद्राबाद.

दाम्पत्य--कलह !

'**मानवसमाजाबाद**' नामे एके शहरीं **सदाचारपंत** नांवाचे एक अत्यंत शीलसंपन्न सद्गृहस्थ रहात होते. त्यांना '**नीति**' व '**सदसद्विवेकबुद्धि**' अशा दोन मुली होत्या. **नीति** ही सदसद्विवेकबुद्धीपेक्षां थोडी वडील होती. तरी दोन्ही बहिणी सारख्याच दिसत आणि स्वरूपानीं तर त्या इतक्या सारख्या होत्या कीं, लोकांस त्या जुळ्या बहिणीच असाव्यांत असें वाटे. दोघी बहिणी स्वरूपानीं फारच सुंदर होत्या. तशाच त्या अत्यंत गुणवानही होत्या. दोघीहि सरळ, नम्र, आज्ञाधारक, पापभीरू व उद्योगशील होत्या. अशा ह्या सद्गुणसंपन्न व रूपसंपन्न मुली जसजशा वयांत येत चालल्या तसतशी **सदाचारपंतांना** काळजी उत्पन्न झाली. ती काळजी हीच कीं अशा आपल्या आवडत्या मुलींना योग्य वर कसे मिळतील ! **सदाचारपंतांनीं** पुष्कळ ठिकाणीं फिरून वरसंशोधन चालविलें. परंतु त्यांच्या मुलींना योग्य असे वर कोठेंहि आढळेनात ! शेवटीं **सदाचारपंत** त्रासले. मुलींना लग्नावांचून जर ठेवतां आलें असतें तर **सदाचारपंतांनीं** तसेंहि केलें असतें. परंतु लौकिकीदृष्ट्या व मुलींच्या सुखाच्या दृष्टीनेंहि तें योग्य नव्हतें म्हणून स्थलसंशोधनाचा त्यांनीं जोरानें प्रयत्न चालविला. शेवटीं पहातां पहातां '**धर्म**' व '**कायदा**' हे दोन तरुण विवाहायोग्य असे वर त्यांनीं निवडून काढून पसंतहि केले. त्या तरुण मुलांनाहि मुली पसंत झाल्या. अशा रूपवान व सद्गुणी मुली कोणास पसंत होणार नाहींत ! '**धर्मा**'-चें वय थोडें मोठें होतें; आणि '**कायद्या**' पेक्षां तो रूपानें व गुणानेंहि बराच श्रेष्ठ होता. आपल्या दोघी मुलींना सारख्याच रूपाचे व गुणांचे वर असावेत अशी **सदाचारपंतांची** फार इच्छा, परंतु ती त्यांची इच्छा फलद्रूप होण्याचें चिन्ह दिसेना ! शेवटीं जिच्या नशीबीं जसा वर असेल तसाच तीस मिळणार, ह्या दैववादावर भरंवसा ठेवून '**नीति**' '**धर्मास**' व सद**सद्विवेकबुद्धि** '**कायद्यास**' देण्याचें त्यांनीं ठरविलें. मात्र आपल्या भावी जामातांनीं आपल्या कन्यांना विवाहानंतर अगदीं दुखवूं नये असें **सदाचारपंतांनीं** त्यांच्याजवळ वचन मागितलें. वस्तुतः लग्नविधींमध्यें समंत्रकपद्धतीनें हें वचन घेतच असतात, परंतु **सदाचारपंतांचें** आपल्या मुलींवर निःसीम

प्रेम असल्यामुळें व त्यांना ह्या दोनच मुली असल्यामुळें त्यांनीं ही वचनाची अट घातली. आणि ही अट दोघांही जांवयांनीं मोठ्या आनंदानें कबूल केली. '**धर्मा**' नें असें वचन दिलें कीं "**सदाचारपंत,** तुमची कन्या जी माझी भावी पत्नी '**नीति**' हिला मी कधींही दुखविणार नाहीं; हिच्या संमतीवांचून मी कोणचेंहि कृत्य करणार नाहीं आणि हिला अत्यंत सुखांत ठेवीन, असें मी शपथपूर्वक वचन देतों!" त्याचप्रमाणें '**कायद्यानेंहि**' शपथपूर्वक असें वचन दिलें कीं "मी '**सदसद्विवेकबुद्धी**'स कधींही दुखविणार नाहीं. तिच्या आज्ञेशिवाय मी पाऊलहि टाकणार नाहीं. आणि तिचें जें सुख तेंच माझें सुख अशा एका विचारानें आम्ही राहूं!" भावी जामातांकडून अशीं वचनें घेतल्यावर **सदाचारपंत** बरेच निर्धास्त झाले. आणि एकाच शुभ मुहूर्तावर दोघींचींहि लग्नें यथाविधी, यथासांग व थाटानें करण्यांत आलीं. लग्नानंतर मुली आपआपल्या सासरीं गेल्या आणि वेगवेगळा संसार करूं लागल्या. आरंभींचे कांहीं दिवस ह्या मुलींचा संसार फार सुखाचा झाला असें म्हणतात. आणि आपल्या मुलींचें हें सुख पाहून **सदाचारपंतांनाहि** फार समाधान झालें, परंतु दुर्दैवानें **सदाचारपंतांचें** हें समाधान फार दिवस टिकलें नाहीं. जावयाची जात बेमान म्हणतात, त्याप्रमाणें पुढें पुढें हे दोन्ही जांवई बेमान झालेले त्यांना दिसून आलें. प्रथमतः **धर्माचा** दिसणारा सात्त्विकपणा दिवसेंदिवस लोपूं लागला आणि **कायद्याची** वृत्ति तर स्पष्टच राजस व तामस झालेली दिसली. ह्यामुळें दोघांहि जावयांना दिलेल्या वचनांचें व घेतलेल्या शपथांचें विस्मरण झालेलें दिसलें. हें पाहून **सदाचारपंतांचें** मन फारच दुःखी झालें. '**नीता**'स मी कधींहि दुखविणार नाहीं असें **धर्मानें** वचन दिलें होतें; परंतु लग्न होतांच **नीतीचें** मन त्यानें दुखविलें! **नीतीस समतेची** भक्ति असे. सर्व माणसें येथून तेथून सारखीं; त्यांत श्रेष्ठ, कनिष्ठ, अथवा आपपर असले भेद नसावेत असें **नीतीचें** मत; परंतु ह्या मताविरुद्ध माणसांमाणसांत भेद पाडण्याचा गर्ह्य उद्योग **धर्मानें** आरंभिला! तो कोणास 'ब्राह्मण' म्हणून श्रेष्ठ म्हणूं लागला, व कोणास 'शूद्र' **चांडाल** म्हणून कनिष्ठ म्हणूं लागला; कोणास 'काफर' म्हणून द्वेष्य समजूं लागला! तर कोणास अस्पृश्य म्हणून समजूं लागला! 'धर्माधिकारी' 'पोप' व 'काजी' ह्यांना तो फारच श्रेष्ठ समजूं लागला. आणि ह्या मताविरुद्ध बोलणारांना 'नास्तिक' म्हणून अत्यंत नीच समजूं लागला.! ह्याप्रमाणें

धर्मानें मनुष्यसमाजांत विषमतेचें व द्वेषाचें साम्राज्य सुरू केलें ! हें नवऱ्याचें कृत्य **'नीतीस'** बिलकुल आवडलें नाहीं. **धर्मानें** नुसता माणसांमाणसांतच भेद पाडला नाहीं तर, स्त्री व पुरुष ह्यांच्यांतहि भेद पाडला ! त्यानें स्त्रियांना हलक्या दर्जाचें ठरविलेलें पाहून **नीतीस** संताप आला. पुरुष सत्ताधारी व स्त्रिया गुलाम, जवळ जवळ असाच निर्बंध **धर्मानें** केला ! स्त्रियांना विद्येचा अधिकार नाहीं ! स्त्रिया नेहमीं बंदींत अथवा गोषांत राहिल्या पाहिजेत ! पुरुषांनीं वाटेल तितकी लग्नें करावींत, परंतु स्त्रीचा पति लहानपणीं मेला तरी पुन्हां तिनें लग्नाच्या भानगडींत पडूं नये ! एवढेंच नव्हे तर तिनें विद्रूप बनलें पाहिजे ! असें एक कीं दोन ? अनेक कायदे करून धर्मानें स्त्रियांची गळेचेपी चालविली ! हें पाहून **नीतीला** फार दुःख झालें; परंतु ती बिचारी अबला काय करणार ? धर्मानें मनुष्यसमाजांत उत्पन्न केलेली विषमता तर पुढें पुढें इतकी वाढली कीं मनुष्या-मनुष्यांत कलह होऊं लागले. धर्माच्या नांवावर भयंकर कत्तली होऊं लागल्या. आणि ' क्रूसेड ' नांवाचीं अघोर युद्धें होऊं लागलीं. हें पाहून **नीतीच्या** अंगा-वर शहारे आले ! ह्यांत तर आश्चर्यच नाहीं; कारण **नीति** तर बोलून चालून कोमल हृदयाची अबलाच ! परंतु **अंध धर्माभिमाना**मुळें झालेलीं अनन्वित कृत्यें, जुलूम, जबरदस्ती, जाळपोळ, रक्तपात, मनुष्यहानि हीं सर्व अघोर कृत्यें पाहिलीं म्हणजे पाषाणालाहि दुःखाश्रू उत्पन्न होतील ! इतकें **धर्मानें** विषमतेचें साम्राज्य जगावर माजविलें ! अर्थात् नवराबायकोचें तर अलिकडे एक दिव-सही जमेना. आणि **धर्म** इतका तामसी होऊं लागला कीं त्यास **नीतीचीं** बिलकूल पर्वा वाटेना. हें **नीतीचें** दुःख पाहून **सदाचारपंताना नीति** धर्मास दिल्याबद्दल फार पश्चात्ताप झाला. **नीतीचा** कल नेहमीं अहिंसेकडे असे, परंतु ही अहिंसा धर्मानें केव्हांच छपरावर बसविली होती. मनुष्यहानीची तर त्यास दरकार नसेच. परंतु पशुहिंसेचीहि त्यानें खुशाल परवानगी दिली. यज्ञीयहिंसा हिंसा नव्हे असेंही त्यानें कांहीं दिवस चालविलें. त्याचप्रमाणें **नीतीस** मादक पदार्थांचा तिटकारा असे तर धर्मानें कांहीं प्रसंगीं मादक पदार्थांना सदरपर-वानगी दिली होती. सोम नांवाचें मादक पेय बरींच वर्षें चालूं होतें. नंतर 'सुरे'-चीहि एक देवी उत्पन्न होऊन दारूचाहि प्रचार होत गेला. येवढेंच नव्हे तर विशिष्ट संस्कार झालेल्या 'दारूला' **ख्रिस्ताच्या** रक्ताचें स्वरूप येतें. व ही प्याल्यावर ख्रिस्ताचें व आपलें तादात्म्य होऊं शकतें असेंहि **धर्मानें** ठरविलें.

आणि **नीतीच्या** मनाविरुद्ध दारूचा प्रसार **धर्मानें** केला. **नीतीची** प्रवृत्ति अंतर्मुख होऊन आत्मज्ञानानें आत्मविकास करून घेण्याकडे असे, तर **धर्मानें** ह्या प्रवृत्तीस गौणत्व देऊन बाह्य शिस्तीचें बरेंच अवडंबर माजविलें आणि ह्या बाह्य आचाराच्या पोरचेष्टा **धर्मानें** तर इतक्या उत्पन्न केल्या कीं त्या पाहून हंसावें कीं रडावें हेंच **नीतीस** समजेना !

मनुष्यानें अमुक प्रकारचींच शेंडी ठेवावी व अमुक प्रकारचीच दाढी ठेवावी, कपाळाला व अंगाला अमुक प्रकारचाच रंग लावावा व अमुक प्रकारानेंच गोंदून घ्यावें. अमुकच पोषाख करावा. अमुक प्रकारांनींच मुद्रा ठोकून ऊर्फ डागून घ्यावें; अमुक प्रकारांनींच सुंता करून घ्यावी. मनुष्य जन्मला कीं कांहीं विधि, तरुण झाला कीं कांहीं विधि, मृत्युसमयींचे तऱ्हेवाईक विधि, आणि सर्वांपेक्षां मृताची आठवण म्हणून करण्याचे हास्यास्पद विधि ! ह्या विधींनीं व संस्कारांनीं **धर्मानें** व्यक्तिस्वातंत्र्य इतकें संपुष्टांत आणलें आणि त्यायोगें मनुष्यें इतकीं बुद्धिहीन झालीं कीं कांहीं काळ तरी मनुष्यास बुद्धि दिल्याबद्दल ईश्वरासहि पराकाष्ठेचा पश्चात्ताप झाला. आपल्या नवऱ्याची ही शोचनीय अवस्था पाहून **नीतीला** दुःखाच्या वेदना होऊं लागल्या. परंतु ह्यापेक्षांही **धर्माचें** वर्तन पुढें पुढें इतकें बिघडलें कीं, तें **नीतीस** असह्य व संतापजनक वाटूं लागलें. आणि **नीतीच्या** डोळ्याचें पाणीहि खळेना. '**रूढी**' नांवाची तात्पुरत्या घरकामासाठीं म्हणून एक दासी ठेवली होती. परंतु **धर्म** इतका निर्लज्ज झाला कीं ह्या दासीशींच त्यानें सलगी आरंभिली आणि "कामातुराणां न भयं व लज्जा" ह्या वचनाप्रमाणें "**शास्त्राद्रूढिर्बलीयसी**" असें म्हणून ह्या रूढीस त्यानें **उपवस्त्र** म्हणून खुशाल घरांत बाळगलें. हें पाहून **नीतीच्या** तळपायाची आग मस्तकाला गेली. परंतु एकदां लग्नाची बायको म्हणविल्यावर '**नीति**' बिचारी करते काय ? मनांतल्या मनांत कुढून ती अगदीं झुरणीस लागली. तिला क्षयाची बाधा झाली असेंहि लोक म्हणूं लागले. **रूढी** मात्र दिवसेंदिवस फुगत चालली. **रूढीच्या** नादीं लागून **धर्म** तर पुढें पुढें भलभलतेच ढंग करूं लागला. तो फाल्गुन शुद्ध पूर्णिमेच्या दिवशीं मोठ्यानें शंखध्वनी करूं लागला ! स्त्रियांची बेअब्रु करावी ! रंग फेंकावा ! व चिखल आणि धूळ उडवावी ! आणि मोहरममध्यें 'हायदोस' 'धूला' करून नाचावें ! 'एप्रिलफूल' म्हणून वाटेल तशा शिव्या द्याव्यात; त्याचप्रमाणें गुरूला आपली पत्नी समर्पण करावी; मुली देवाच्या नांवावर मुरळ्या सोडून त्यांना व्यभिचार करण्याची परवानगी द्यावी !

असे एक का दोन ? **रूढीच्या** नादीं लागून **धर्मानें** भलतेंच ढंग सुरूं केले. ही **धर्माची** अवनती पाहून **नीतीनें** धर्माशीं आपला बहुतेक संबंध तोडूनच टाकला. नांवाचींच तीं नवराबायको म्हणून एके जागीं निरुपायानेंच राहूं लागलीं. आपल्या नवऱ्याची सुधारणा होणें तीस अशक्य वाटूं लागलें, व त्यामुळें ती फारच निराश झाली. अशा निराश स्थितींत असतां एके दिवशीं तिची मैत्रीण '**सरस्वती**' तीस भेटली. तिच्या दुःखाचें कारण तिनें मोठ्या चतुरपणानें समजावून घेतलें. **सरस्वती नीतीस** म्हणाली, " सखे, तूं अशी निराश होऊं नकोस. **धर्मा**मध्यें सध्यां ज्या तामसी व राजसी वृत्ती आलेल्या आहेत त्या नाहींशा करून '**धर्म**' सात्विक बनेल अशी व्यवस्था मी लवकरच करतें." परंतु **सरस्वतीचें** हें भाषण केवळ आपल्या मनाचें समाधान करण्यापुरतेंच आहे. आपल्या नवऱ्याचा होत असलेला अधःपात इतःपर सुधारणें कठीण दिसतें. ईश्वरी निष्ठेच्या एका पौरुष गुणामुळें माझ्या बाबांनीं मला ह्यांच्या घरीं दिलें परंतु तो गुणहि आतां लोपत चालला आहे. त्या गुणाचें नुसतें ढोंग आतां शिल्लक आहे. आतां **धर्माची** सुधारणा होणें शक्य नाहीं असें **नीतीस** वाटलें व त्याप्रमाणें तिनें आपल्या मैत्रिणीस स्पष्ट बोलूनही दाखविलें. तरी **सरस्वतीनें** तीस पुन्हां धीर दिला. **सरस्वती** धर्मांत उत्पन्न झालेल्या राजसी व तामसी वृत्ति नाहींशा करण्याच्या प्रयत्नास लागली आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, कांहीं दिवसांनीं **सरस्वतीच्या** ह्या प्रयत्नास थोडेंसें यश आलेलें दिसलें. प्रथमतः **सरस्वतीनें धर्माच्या** हें प्रत्ययास आणून दिलें कीं, "ईश्वरीनिष्ठेचा जो तुझा पूर्वीचा पौरुषी सद्गुण तो तुझ्यांतून नाहींसा होऊं लागला आहे—नव्हे जवळ जवळ नाहींसाच झाला आहे. डोळे उघडून नीट पहा—" **धर्माचें** हें बिंग जसें **सरस्वतीनें** उघडकीस आणलें, तसें **धर्माचें** वजन आपोआप कमी होऊं लागलें. **सरस्वतीनें** नंतर आपली मैत्रीण व **धर्मपत्नी** जी **नीति** तिचे सद्गुण पुढें मांडले व अशा सात्त्विक व सच्छील पत्नीस **धर्मानें** आजपर्यंत कसें छळलें हेंही उघडकीस आणलें. हें लोकांस कळतांच **धर्माचा** बडेजाव बराच कमी झाला. आणि त्या मानानें **धर्माचें** वर्चस्वहि संपुष्टांत येऊं लागलें. हा परिणाम पश्चिमेकडील देशांत तर स्पष्टच दृग्गोचर झाला. पूर्वेकडे विशेषतः हिंदुस्थानांत **सरस्वतीच्या** प्रयत्नास यावें तसें यश अद्याप आलें नाहीं. **धर्म** आपल्या तामसी वृत्ति पश्चिमेकडे आतां फारशा चालवीत नाहीं. परंतु हिंदुस्थानांत अद्यापि धर्माच्या तामसी वृत्ति कलह व रक्तपात ह्या क्रीडा दृष्टीस पडतातच.

पश्चिमेकडील देशांत आपला नवरा अगदीं गोगलगाय बनला आहे, हे पाहून **नीतीस** बरेंच समाधान वाटलें व तिनें आपल्या मैत्रिणीचे त्याबद्दल फार उपकारही मानले. परंतु काय असेल तें असो, नवरा गोगलगाय बनलेला पाहून **नीतीस** खरें समाधान झालें नाहीं. किती केलें तरी पतिप्रेम थोडेंच कमी होणार? आपल्या नवऱ्याच्या तामसी वृत्ति नाहींशा व्हाव्यात ही तिची इच्छा खरी; परंतु त्याचा बडेजाव व वैभव कमी व्हावें अशी तिनें कधींहि इच्छा केली नव्हती; पण आपल्या मैत्रिणीच्या प्रयत्नानें तामसी वृत्तीबरोबर त्याचा बडेजाव व वैभवहि कमी झालेलें पाहून **नीतीस** थोडासा विषादच वाटला. पण आपल्या पतीनें नुकतीच हिंदुस्थानांत केलेलीं धांगडधिंग्याचीं कृत्यें जेव्हां तिच्या कानावर आलीं तेव्हां **सरस्वतीनें** केलें तें ठीकच केलें असेंहि तीस एकपरीं वाटूं लागलें. **सरस्वतीच्या** दीर्घ प्रयत्नानें **धर्माचा** स्वभाव कांहींसा निवळत आहे, परंतु **नीतीचें** व त्याचें अद्याप पटत नाहीं. तात्पर्य **दाम्पत्यकलह चालूं आहे**.

वडील मुलीच्या संसाराची ही स्थिति! आतां धाकटीकडे तरी जाऊन पहावें, हा विचार करून **सदाचारपंत** '**सदसद्विवेकबुद्धीच्या**' घरीं गेले तों काय? तेथेंही **दाम्पत्यकलह** चालूं असलेला दिसलाच! '**कायदा**' तर बोलून चालून राजस, व तामसवृत्तीचा. "**सदसद्विवेक बुद्धीच्या** आज्ञेशिवाय मी पाऊलहि टाकणार नाहीं व तिचें जें सुख तेंच माझें सुख" असें वचन कायद्यानें आरंभीं **सदाचारपंतांस** दिलें होतें परंतु लग्न होतांच तें त्यानें मोडलें.

कयद्याला दोस्तमंडळी पुष्कळ, त्यांत '**स्वार्थ**' नांवाचा त्याचा एक जीवश्च कंठश्च दोस्त असे. हा दोस्त सगळ्या मुलखाचा छचोर! अर्थात् त्याच्या मैत्रीमुळें पहिल्या पहिल्यानें तर **कायद्यानें** अनन्वित कृत्यें केलीं. **सदसद्विवेकबुद्धीची** तर त्यास मुळींच पर्वा राहिली नाहीं. येवढेंच नव्हे तर आपल्या दोस्ताची सेवा करण्याबद्दलही **कायदा सदसद्विवेकबुद्धीस** हुकूम सोडीत असे! हा नवऱ्याचा अन्यायी हुकूम तिनें कधींच मानला नाहीं, ही गोष्ट वेगळी, परंतु नवऱ्याचें हें कृत्य पाहून ती झुरणीस लागली. '**स्वार्था**' प्रमाणेंच '**सुराज्य**' व '**शांतता**' हेहि कायद्याचे संवगडी होते. हे सवंगडी सत्य- स्वरूपाचे असते तर इतकी हरकत नव्हती, परंतु हेहि खऱ्या दिलाचे नव्हते. अंतःशांततेपेक्षां बाह्य शांतता व खऱ्या सुराज्यापेक्षां दिखाऊ सुराज्याकडेच **कायद्याचा** ओढा जास्त. हें पाहून **सदसद्विवेकबुद्धीस** फार वाईट वाटूं लागलें! जशी **नीतीस** तशीच

सदसद्विवेकबुद्धीसहि समता फार प्रिय होती. परंतु कायद्यानें ह्या समतेस आरंभीं तर अगदींच छपरावर बसविलें. राजाचे कायदे निराळे व प्रजेचे निराळे! बड्या लोकांसाठीं वेगळे कायदे! कोठें कोठें तर **कायद्यानें** धर्म व जात; काळा आणि गोरा; स्वदेश आणि परदेश; असे अनेक भेद उत्पन्न करून **धर्मा**प्रमाणेंच विषमतेचें व द्वेषाचें, मत्सराचें आणि चुरशीचें साम्राज्य माजविलें! त्याचा परिणाम कलह व युद्धें; मनुष्यहानी व रक्तपात ह्यांत होऊं लागला. **कायद्याची** ही हिंसामय वृत्ति पाहून **सदसद्विवेकबुद्धीच्या** अंगावर शहारे आले! परंतु बिचारी करते काय? लग्नाची बायको! **कायदा** हा सरळ स्वभावाचा नसे. **सदसद्विवेकबुद्धी** जितकी सरळ तितका हा वांकडा. त्याचप्रमाणें **कायदा** अस्थिर स्वभावाचा तर **विवेकबुद्धि** निश्चयी स्वभावाची. **विवेकबुद्धि** न्याय पहाणार, तर **कायदा** न्यायाचा अविर्भाव आणून मतलब साधणार! **कायदा** शब्दांच्या डावपेंचांत पटाईत, तर **विवेकबुद्धीस** हे शब्दाचे डावपेंच मुळींच समजावयाचे नाहींत. ह्या विरुद्धस्वभावामुळें नवराबायकोंत रोज कलह होत असत. हें पाहून **सदाचारपंतास** पराकाष्ठेचें दुःख झालें! **विवेकबुद्धीस** मादक पदार्थांचा तिटकारा असे, परंतु **कायद्यानें** वाटेल त्या मादक पदार्थांचें सेवन व विक्री यांस सदर परवानगी दिली! **कायद्याची** वृत्ति कधींकधीं एकाद्या व्यक्तीप्रमाणें लहरी व चंचल होते; त्या वेळेस तो वाटेल तसें वागतो. **विवेकबुद्धीस** अतिशय संताप येणारी **कायद्याची** एक गोम म्हणजे त्याची शिथिल नीति. **'प्रेस्टीज'** ऊर्फ **'इभ्रत'** नांवाच्या बाजारबसवीच्या नादीं **कायदा** कधीं कधीं फार लागतो. आणि मग अनेक चाळे करतो. अशा वेळेस **विवेकबुद्धि** जर आपल्या नवऱ्यास कांहीं चार उपदेशाच्या गोष्टी सांगूं लागली तर नवरोजीपंत मुळींच ऐकत नाहींत. ह्या बाजार बसवीच्या नादी लागूनच हे राजश्री **'मार्शललॉ'** अथवा **'आर्डिनेन्स'** ह्या स्वरूपांनीं इतकें भयंकर रूप धारण करतात कीं **विवेकबुद्धीस** त्यांच्या समोर उभे रहाणेंहि भीतिप्रद वाटतें!!

तात्पर्य, स्वार्थी, चंचल, वक्र, निष्ठुर आणि वावदूक अशा **कायद्याचें** व **विवेकबुद्धीचें** मुळींच जमत नाहीं. आणि ह्या दांपत्यांतहि नेहमीं **दांपत्यकलह** चालूं असतो. **सरस्वतीची** मात्रा अद्याप येथेंहि लागू व्हावी तशी लागु होत नाहीं!!

अरुणोदय माला-औरंगाबाद.

शकुन, फलज्योतिष व मंत्रशास्त्र !

विलसितसदसद्वा जन्मपत्रं जनानां !
फलति यदि तदानीं दर्शयत्यात्मदास्यम् ॥
न फलति यदि लग्नं द्रष्टुरेवाह मोहं ।
हरति धनमिहैवं हन्त दैवज्ञ–पाशः ॥

शकुन, फलज्योतिष व मंत्रशास्त्र ही अज्ञानाची औरस संतति असून ज्ञानाच्या उच्च घराण्याशीं आपला संबंध आहे, असा हे बहाणा करतात ! कारण, ह्यांचा जन्म अज्ञानापासून होत असला तरी ज्ञानाची मर्यादा संपली म्हणजे त्यांचें राज्य सुरूं होतें. मनुष्य ज्ञानाचा भुकेला आहे. जेव्हां त्यास खरें ज्ञान मिळेनासें होतें, तेव्हां तो ज्ञानाभासावर आपली भूक भागवतो. मनुष्याला कांहीं मर्यादेपर्यंतच स्पष्ट दिसतें. ह्या मर्यादेच्या पलीकडे जें दिसत नाहीं परंतु भासतें अशा त्या भ्रांत प्रांतांत वरील त्रयींचें वास्तव्य आहे. अर्थात् मृगजल, गंधर्व नगर अशा कोटींतच ह्यांची गणना केली पाहिजे ! ज्या मनुष्याची जेवढी ज्ञानमर्यादा व जेवढी दृष्टि त्यांच्या पुढील भ्रांत प्रांतांत ह्या भ्रमाचें अस्तित्व त्या मनुष्याच्या मेंदूंत असतें. शकुन, फलज्योतिष व मंत्रशास्त्र ही जुळी संतति आहे. त्रिळी म्हणा पाहिजे तर, परंतु ही त्रिळी अशी विचित्र आहे कीं ह्यांत दोन नपूंसक व एक पुरुष असें हें त्रांगडें आहे. फलज्योतिष व मंत्रशास्त्र दोघे नपूंसक व शकून हाच काय तो पुरुष. परंतु साहचर्यानें हा बेटा नपुंसकापेक्षांहि नपुंसक झालेला आहे. इतका नपुंसक असला तरी आमच्या बगु**नानांना** मात्र तो फलदायीच वाटतो. डोळा लवणें, मांजर आडवें जाणें, विधवा स्त्री पुढें येणें, तास उजवा डावा जाणें, सवाष्ण स्त्री पाण्यानें भरलेल्या घागरी घेऊन सामोर येणें, बोडखा ब्राह्मण समोर येणें, हजामत केलेला मनुष्य दिसणें, रेडा किंवा म्हैस दिसणें इ. इ. शुभाशुभ शकुनांची जंत्री **नानांना** मुखपाठ आहे. कोणत्याहि कार्याचें यशापयश ह्या शुभाशुभ शकुनांच्या स्वाधीन आहे, अशी त्यांची समजूत आहे. नाना कोणतेंहि कार्य करतांना अगोदर शकुन पाहतात. हा शकुन ते दोन्ही तऱ्हेनें पहातात. फांसे टाकून व यदृच्छया होणाऱ्या सजीव व निर्जीव वस्तूंच्या हालचालींवरून. दोन्ही शकुनांचा मेळ बसला तरच ते कोणत्याहि

कार्यास प्रवृत्त होतात. ह्यामुळें लोक त्यांना कर्तृत्वशून्य म्हणतात. परंतु नाना म्हणतात, अपयश संपादण्यापेक्षां कर्तृत्वशून्य झालेलें पुरवलें. त्यांचें म्हणणें असें कीं माझ्या कार्यांत यश यावें असें तुम्हांस वाटत असेल तर गांवांतील मांजरांच्या हालचाली अगोदर बंद करा आणि गांवांत विधवा स्त्री दिसणार नाहीं असा बंदोबस्त करा. सुदैवानें नानांना वडिलार्जित थोडी संपत्ति प्राप्त झाल्यामुळें त्यांना शकुनावर विश्वास ठेवणें परवडतें. **नाना** घराच्या बाहेर पडलेले कधीं कोणास दिसतच नाहींत. घराबाहेर पडल्याबरोबर लागलीच त्यांना परत फिरावें लागतें. कारण रस्त्यांत त्यांना मांजर तरी आडवें जातें, बोडखा ब्राह्मण तरी दिसतो, अथवा विधवा स्त्री नजरेस पडते! ह्यासाठीं ते बाहेर जातांना अगोदर आपल्या नोकरांना बाहेर पाठवून रस्त्यांत अपशकुनाच्या यादींतील एकादा सजीव अगर निर्जीव पदार्थ वावरत नाहींना, ह्याची खात्री करून घेतात, आणि मग नाकाला हात लावून उजवा सूर वहात असेल तर झपाट्यानें बाहेर पडतात. परंतु **नानांची** इतकी खबरदारी बेटें मांजर एखादे वेळेस व्यर्थ घालवितेंच! अर्ध्या रस्त्यांत तें कोणाच्या तरी खपरेलावरून उडी मारून नानांना आडवें जातेंच. दुर्दैवानें त्यावेळेस नानाजवळ बंदुक नसतें नाहीं तर नानांनीं आजपर्यंत कितीं तरी मार्जारसत्रें केलीं असतीं! नाना म्हणतात मला ह्या अपशकुनांचा इतका अनुभव आहे कीं शौचास जातांना जर विधवा स्त्री समोर आली तर शौचासहि चार चार दिवस होत नाहीं! नाना राहतात त्या गांवीं पायखान्यांची चाल नसल्यामुळें त्यांना बहिर्दिशेला बाहेर जावें लागतें. आणि बाहेर जातांना ते शकुन पाहिल्याशिवाय कधींही जात नाहींत!

एकदां नानांची फारच गंमत झाली. एका वैद्यानें नानास जुलाब होण्याचें औषध दिलें. त्याचा अंमल सुरूं होतांच नाना तंबाखूची फक्की तोंडांत टाकून डोकीवर पागोटें चढवून, कानांत जानवें अडकवून आणि तांब्या व काठी हातांत घेऊन बहिर्दिशेस निघाले. दरवाजाच्या बाहेर पडतात तोंच एक बोडखा तेलंगी ब्राह्मण समोर आला. लागलीच नाना परतले व थोडा वेळ बसले. परंतु औषधानें आपला अंमल जोरानें सुरू केल्यामुळें नाना पुन्हां तांब्या घेऊन घराबाहेर पडले. अर्ध्या रस्त्यांत जातांच एक विधवा स्त्री पाण्याची घागर घेऊन समोर आली! 'काय शिंचा त्रास आहे' असे उद्गार त्या स्त्रीस ऐकूं जातील इतक्या मोठ्यानें काढून नाना लागलीच परतले. ते मनांत म्हणूं लागले 'हीच बाई सवाष्ण असती

तर ही भरलेली घागर किती उत्तम शुभ शकुन झाला असता ! ' ह्या शकुनासाठीं तरी स्त्रियांचा पुनर्विवाह प्रचारांत आला पाहिजे, असें नानांचें मत झालें आहे. घरी येऊन नाना थोडे टेकले परंतु शौचाचा वेग आवरेना म्हणून लागलीच पुन्हां ते शौचास निघाले. आतां ते पाऊण रस्त्यापर्यंत निर्विघ्नपणें आले परंतु लागलेच एक मांजर पटकन् त्यांना आडवें गेलेंच ! 'आतां ह्या भोगाला काय करणार' असें निराशेचे उद्गार काढीत नाना घाई घाईनें पुन्हां घराकडे परतलेच ! परंतु देहधर्मावर त्यांचा ताबा न चालल्यामुळें घरीं येऊन त्यांना **सचैल मलशुद्धी** करावी लागली. एवढा प्रकार झाला तरी नानांचा शकुनावरील विश्वास अद्याप उडाला नाहीं. !

शुकुनांनीं पृथ्वीवरील सजीव अथवा निर्जीव वस्तूंच्या यदृच्छया होणाऱ्या हालचालींचा मनुष्याच्या कार्यावर होणारा परिणाम दाखविला जातो; परंतु फलज्योतिषाची पायरी ह्याच्यावरची आहे. फलज्योतिषानें अंतरिक्षांत यदृच्छया होणाऱ्या ग्रहांच्या व नक्षत्रांच्या हालचालीनें मनुष्याच्या एकंदर चरित्रावर होणारा परिणाम दाखविला जातो. पृथ्वीवरील विधवा स्त्री, व बोडखा ब्राह्मण ह्यापेक्षां अंतरिक्षांतील कन्या व मिथुन आणि पृथ्वीवरील मांजरारेड्यापेक्षां अंतरिक्षांतील मेष, व वृषभ ह्यांचा ताबा मनुष्याच्या कार्यांत प्राप्त होणाऱ्या यशापयशावर जास्त मानला जातो.

शुक्र, शनी, बुध, गुरु इ. ग्रह केवढेहि मोठे असले आणि मनुष्यवस्तीपासून कितीही दूर अंतरिक्षांत असले, तसेंच ते आपल्या गतीप्रमाणें कितीहि स्वेच्छ विहार करणारे असले तरी आमचे भिकंभट ज्योतिषी त्यांना आपल्या बाहुबलानें पृथ्वीवर खेचून आणून कागदावर शाईनें काढलेल्या बारा घरांच्या कोंडींत सहज कोंडून टाकतात. एवढेंच नव्हे तर त्यांच्या नाकांत वेसण घालून त्यांना मनुष्यांच्या सुखदुःखांच्या संसाराच्या गाड्यास जुंपून टाकितात ! भिकंभटांनीं ह्या ग्रहांना एवढी शिक्षा कां करूं नये ? त्यांचा अपराध तसाच जबरदस्त असतो ! हे ग्रह अंतरिक्षांत कितीही दूर असले तरी ते तेथून पृथ्वीवरील मनुष्याच्या खोड्या करतात ! ते कोणास सुखी करतात, तर कोणास दुःखी करतात; कोणास बायको देतात तर कोणाची बायको हिरावून नेतात; कोणास संतती देतात, तर कोणाची मारून टाकतात; कोणास शरीरपीडा देतात, तर कोणास शरीरसुख देतात; कोणास श्रीमंत करतात तर कोणास दरिद्री करि-

तात. अशा ह्या ग्रहांच्या किती खोड्या सांगाव्यात! आम्हां मनुष्यांस ताब्यांत ठेवून आम्हांस सुखदुःख देतां यावें म्हणून त्यांनीं एक मोठा कटच केलेला दिसतो! आणि ह्या कामांत ग्रह व नक्षत्रें ह्यांचें संगनमत झालेलें दिसतें. मनुष्यांना सुखदुःख देणें आपल्या स्वाधीन असावें म्हणून या लबाड ग्रहांनीं मनुष्यांचाच कित्ता उचलेला दिसतो. ते आपापसांतच कोणी स्वामी झाले; व कोणी सेवक झाले; कोणी शत्रु झाले; कोणी मित्र झाले; कोणी उच्च झाले, कोणी नीच झाले; व कोणी क्रूर झाले, व कोणी सौम्य झाले! ह्याप्रमाणें सेव्यसेवक, शत्रुमित्र, शुभाशुभ, उच्चनीच, क्रूरसौम्य अशीं द्वंद्वें मनुष्याप्रमाणेंच ह्यांनींहि आपणांत उत्पन्न केलीं! ह्यांचा धुमाकूळ हिंदूंच्या विवाहांत फारच दिसतो. ब्राह्मणकन्येचा विवाह जमवितांना हे ग्रह व हीं नक्षत्रें विशेषतः मुलीच्या बापाला बरीच पीडा देतात. विवाह शब्दाला ‘लग्न’ संज्ञा ह्यांच्या प्रतापामुळेंच प्राप्त झाली आहे. **भिकंभट** म्हणतात, वधूवरांना खाऊन खाऊनच मंगळ हा ग्रह लालबुंद झालेला आहे! आम्हां मनुष्यांना त्रास देऊं नये म्हणून शनीच्या भोंवतीं ईश्वरानें एक कडें अडकविलें आहे, परंतु इतकें करूनहि तो प्रत्येक मनुष्यास साडेसात वर्षें त्रास देतोच! ब्राह्मणकन्येचें लग्न जुळविण्याच्या वेळेस तें बिघडून टाकावें म्हणून वर्ण, वश्य, योनी, ग्रह, गण, कूट, आणि नाडी असे आठ घटित टपून बसलेले असतात! आणि ह्या आठ घटितांतून उत्पन्न होणाऱ्या छत्तीस गुणांनींयुक्त जरी विवाह झाले असले, तरी कित्येकांचें दांपत्यसुख छत्तीसच्या आंकड्याप्रमाणेंच असतें हेंहि अनुभवसिद्ध आहे. उपरोक्त आठ घटितांची काथ्याकूट करून जुळविलेल्या ब्राह्मणजातीच्या विवाहानंतर सर्व वर्णापेक्षां ब्राह्मणांतच **बालविधवांची** संख्या जास्त कां असावी, असा प्रश्न निघाला असतां आमचे **भिकंभट** त्याचें उत्तर असें देतात कीं, वर्णाश्रमधर्माप्रमाणें सर्व वर्णापेक्षां ब्राह्मणांनींच वैराग्यसंपन्न असलें पाहिजे; परंतु ह्या कलियुगांत ब्राह्मणांच्यानें तसें वैराग्ययुक्त रहाणें शक्य नाहीं; म्हणून सर्व ब्राह्मणांनीं मिळून यमधर्माची अशी प्रार्थना केली कीं कलियुगांत आम्ही वैराग्यसंपन्न रहाणें कठीण; ह्यासाठीं आम्ही आमच्या तर्फें आमच्यांतील कांहीं स्त्रियांनाच हा वैराग्याचा मक्ता देतो. त्या पूर्ण वैराग्ययुक्त राहतील. आणि तेणेंकरून वैराग्ययुक्त न राहण्याची आमच्या वर्णावरील दोषापत्तिहि टळेल! ही ब्राह्मणांची प्रार्थना ‘तथास्तु’ शब्दानें यमराजानें मान्य केली. ह्यामुळेंच कितीहि घटित पाहून ब्राह्मणांत लग्न जुळविलें

तरी **विधवांची** संख्या कायम राहणार, आणि प्रत्येक कुटुंबांत एखादा तरी बीजवर दिसणारच ! असा **भिकंभटांचा** सिद्धांत आहे.

गुंडोपंतांनाही फलज्योतिषाचा फार नाद. ते म्हणतात, माझ्या पत्रिकेप्रमाणें मला बरोबर अनुभव येत गेले. त्यांनीं आपल्या जन्मपत्रिका नऊ नऊ, दहा दहा ज्योतिषांकडून करवून घेतल्या आहेत. आणि त्यांची प्रत्येक पत्रिका नऊ नऊ, दहा दहा हात लांब झालेली आहे. जितकी पत्रिका लांब होईल तितकें आयुष्य लांबतें असाहि त्यांचा विश्वास आहे. नऊ दहा पत्रिका करविण्यांत असा एक फायदा असतो कीं एका पत्रिकेंप्रमाणें न जुळणारा अनुभव दुसऱ्या पत्रिकेप्रमाणें जुळतो ! उ. गुंडोपंतांना मातृसुख मुळींच मिळणार नाहीं असें एका पत्रिकेंत लिहिलेलें आहे. आणि गुंडोपंतांचें चाळिसावें वर्ष आहे तरी त्यांची माता अद्याप जिवंत आहे; परंतु दुसऱ्या पत्रिकेंत त्यांना मातेचें सुख पूर्ण लाभेल असें स्पष्ट लिहिलें आहे. अथात् दुसऱ्या पत्रिकेप्रमाणें अनुभव बरोबर आहे. ह्याप्रमाणें एका पत्रिकेंतील चुका दुसऱ्या पत्रिकांनीं दुरुस्त झाल्यावर **ज्योतिष-शास्त्र** खोटें ठरत नाहीं. ह्यासाठीं प्रत्येकानें आपल्या नऊ दहा वेगवेगळ्या पत्रिका कराव्यात असें त्यांचें आग्रहाचें सांगणें आहे, **पंत** म्हणतात माझ्या आयुष्यांतील प्रत्येक गोष्ट तंतोतंच ह्या सर्व पत्रिकांप्रमाणें जुळून आली. पंताच्या पत्रिकेंत सप्तमस्थानीं चंद्र हा शुभ ग्रह पडल्यामुळें त्याचें फल पंतास बायको चांगली पाहिजे. परंतु पंताची बायको **भावबंधनांतील** इंदु बिंदूप्रमाणें सुंदर आहे ! पंत याची उपपत्ति अशी लावतात कीं शरीरसौंदर्य हें खरें सौंदर्यच नाहीं. ‘ Handsome is that handsome does ’ ज्याची कृति सुंदर तेंच खरें सुंदर; आणि ह्याप्रमाणें माझी बायको **सुंदरच** आहे. आणि सप्तमस्थानांत असलेल्या चंद्राचें फल बरोबर दिसतें. तसेंच पंताच्या पत्रिकेंत गुरू पंचम स्थानांत आहे. त्याचें फल पंत बुद्धिमान् व विद्वान् होतील असें आहे. आणि त्याप्रमाणें त्यांना स्वतःला बरोबर अनुभव आला आहे ! आतां इतर लोकांना जर ते बुद्धिमान अगर विद्वान् दिसत नसतील तर त्यांत पंचम स्थानांतील गुरूकडे काय दोष आहे ! त्याचप्रमाणें पत्रिकेंत मंगळ दशमस्थानांत केंद्रांत आहे. त्याचें फल ते महाउद्योगी, ऐश्वर्यवान्, कुलदीपक, स्वधर्मरत, राज्यमान्य, कीर्तिवान् होतील असें आहे. हें फल मात्र अद्याप प्राप्त झालें नाहीं.

पंत म्हणतात, हा योग पुढें **सत्तरावें** वर्षी आहे. त्या वर्षी बुधाचे महादशेंत व

अंतर्दशेंत हें फल प्राप्त होणार. त्याच वर्षी **पंतांना** आणखी एक योग आहे. बुधमध्यें गुरूचे अंतर्दशेंत सुंदर स्त्रीपासून मोठें विलासादि सौख्य मिळून तीस गर्भ राहील असें स्वच्छ एका पत्रिकेंत लिहिलेलें आहे. नुसतें पत्रिकेंतच लिहिलेलें नाहीं तर अनेक ज्योतिषांनींहि हा योग त्या वेळेस सांगितलेला आहे. तेव्हां तें खोटें कसें होणार म्हणून आमचें **गुंडोपंत** सत्तराव्या वर्षाची व बुधाच्या महादशेची व अंतर्दशेची सारखी वाट पहात आहेत! **पंतांचा** ज्योतिषावर इतका विश्वास आहे कीं ते कोणतीहि गोष्ट फलज्योतिषाचा पूर्ण विचार घेतल्याशिवाय करीतच नाहींत! लग्नकार्य अथवा घर बांधणें व विहीर खोदणें ह्या मोठ्या कार्यांना तर ते मुहूर्त पाहतातच परंतु गांवाला जाणें अगर हजामत करणें ह्या क्षुल्लक कार्यासाठीं ते जेव्हां नक्षत्रांचा कीस पाडतात तेव्हांच मुहूर्त कायम करतात! एकदां आमच्या पंतांना हैद्राबादेस कांहीं सरकारी कामासाठीं जावयाचें होतें. तेथील कचेरींत त्यांची हाजर राहाण्याची तारीख ठरलेली होती; त्या तारखेला जर पंत तेथें हाजर झाले नाहींत, तर त्यांचें पांचसहाशें रुपयांचें नुकसान होणार होतें. म्हणून हैद्राबादेस जाण्यासाठीं ते मुहुर्त पाहूं लागले. ते राहतात त्या गांवापासून हैद्राबाद दक्षिणेस असल्यामुळें धनिष्ठेपासून पांच नक्षत्रें वर्ज्य, गुरुवार वर्ज्य, त्रयोदशी वज्य, पंचमी वर्ज्य, मंगळ दशमस्थानीं असला तर वर्ज्य व दक्षिण दिशा असल्यामुळें अभिजात नक्षत्रहि वर्ज्य. ह्या शिवाय पंतांची जन्मराशी व तीपासून १, २, ४, ५, ७, ८, ९, व १२ ह्या राशा, कुंभराशी, अस्तंगत ग्रहाच्या राशी, जन्मराशीच्या स्वामीच्या शत्रूराशी त्यापासून षष्ठ राशी मेष, वृषभ, कर्क, धन, मकर, ह्या पृष्ठोदय राशी, राशींच्या आणि जन्मलग्नाच्या स्वामीचा शत्रुग्रह, खलग्रह, जन्मकाली बलहीन असणारा ग्रह, **ह्या सर्व राशी व ग्रह वर्ज्य केले पाहिजेत**! प्रयाणलग्नापासून केंद्रस्थानीं वक्र झालेला ग्रह, त्याचा वार व लग्नीं वक्रग्रहाचा वर्गहि सर्वगमनाला वर्ज्य. इ. इ. अनेक बाबींचा खल पंतांनीं १०—१२ दिवस केल्यावर त्यांना एक दिवस उत्तम सांपडला; परंतु तो हैद्राबादेस ज्या तारखेस हजर रहावयाचें होतें. त्याच्या **दुसरे** दिवशीं येत होता! म्हणून तो उपयोगी नव्हताच. तेव्हां त्यांनीं विचार केला. काम द्रव्यप्राप्तीचें होतें म्हणून **सन्मुख चद्र** तर पाहिजेच होता. शेवटीं जन्मकाळीं, स्वग्रहीं, स्वोच्चीं स्वमित्रग्रहीं असणारे खलग्रह देखील प्रयाणलग्नीं शुभ समजावें. हा गौणपक्ष स्वीकारून सन्मुख चंद्र पाहून व पुष्प नक्षत्र

पाहून हैद्राबादेस हाजर होण्याच्या तारखेच्या अगोदरचा एक दिवस आपल्या गांवाहून निघावयाचा मुहूर्त त्यांनीं कायम केला. पंतांचें गांव स्टेशनापासून अठरा मैलांवर होतें व घरून निघावयाचा मुहूर्त साडे बारा वाजतां दिवसां ठरला होता. साडे बारा वाजतां निघून अठरा मैल चालून रात्रीं आठाची गाडी गांठावयाची होती. पंताच्या गाडीचे बैल चांगले होते. त्यामुळें त्यांना काळजी नव्हती. ठरलेल्या सुमुहूर्तावर बरोबर **पंत** साडेबारा वाजतां घरून निघून बैलगाडींत '**यत्रयोगेश्वर**' म्हणून बसले, परंतु दुर्दैवानें त्या दिवशींचे योग असे चमत्कारिक होते कीं पंतांची गाडी एक दोन मैल जातांच गाडीच्या एका चाकाची धांव पडली ! हें विघ्न येतांच **पंतांचें** मन चरकलें. धांव बसवून जाणें शक्य नसल्यामुळें त्यांनीं मनुष्यास पाठवून एक घोडें आणविलें. घोड्यावर आपण लवकर जाऊं असें पंतांस प्रथमतः वाटलें परंतु दुर्दैवानें तें घोडें होतें हरिदासी तट्टू. पंतांचें तोंड व हात सारखा चालू असला तरी तें आपल्या गतीस वेग देईना. त्यामुळें **पंत** फार त्रासले. आतां काय करावें हें **पतांस** कळेना. त्या घोड्यावर 'इया इया' करीत पंत सायंकाळपर्यंत अकरा मैल कसे तरी आले. अद्याप सात मैल जावयाचें होतें. परंतु सुदैवानें त्यांना तेथें एक मित्र भेटला. तोहि घोड्यावर बसून परत गांवाकडे जात होता. पंतांनीं त्याची विनवणी करून व कामाचें महत्त्व सांगून त्याचें घोडें आपणा स्वतःस घेतलें व आपलें त्याला दिलें. हें घोडें मात्र फारच चपळ होतें. हें घोडें आपणास खात्रीनें वेळेवर स्टेशनवर पोंचवील, असें वाटून **पंतांना** आनंद झाला. शेवटीं सुमुहूर्त पाहून घरून निघाल्यानें कितीही संकटें आलीं तरी काम होतेंच असें त्यांना वाटूं लागलें. परंतु हें घोडें फारच चपळ होतें. गुंडोपंत त्यावर बसतांच त्यांनीं त्यास एक फटकारा लगावला; तेव्हां तें जें उधळलें तें कांहीं केल्या त्यांना आवरेना. घोडा त्यांच्या ताब्यांत राहण्यापेक्षां हेंच घोड्याच्या ताब्यांत गेले ! **पंत** फारच घाबरून त्यांनीं घोड्यास घट्ट धरलें आणि तोंडानें 'कृष्णाय वासुदेवाय हृदये परमात्मने। प्रणतः क्लेशनाशाय गोविंदाय नमोनमः।' हा जप सारखा चालविला होता. पंतांची पडशी घोड्यावरून खालीं पडली ती आतां घ्यावी कशी ! वेळ रात्रीचा असल्यामुळें रस्त्यांत कोणी मनुष्यहि दिसेना ! तेव्हां गुंडोपंतांनीं उदार अंतःकरणानें **कृष्णार्पण** बुद्धीनें त्या पडशीवर पाणी सोडलें ! ते स्वतः त्या दुष्ट घोड्याचा सहवास सोडावा म्हणन प्रयत्न करीत होते, परंतु तें

शक्यतेच्या बाहेर होतें. परंतु ह्या सर्व संकटांत एक गोष्ट मात्र चांगली होती. घोडें सरळ स्टेशनच्या सडकेनेंच पळत सुटलें होतें. त्याच्या मालकाचें घर तिकडेंच असलें पाहिजे असें दिसलें. ही घोड्याची दौड सारखी कायम राहिली. शेवटीं एका वळणाला घोडें वळालें. व वळतांना विचार न राहिल्यामुळें त्यानें एका झाडाशीं टक्कर घेतलीच. त्या धक्क्यानें गुंडोपंत घोड्याच्या खालीं पडले व घोडें पुढें पळालें. **पंतांना** मृत्यूंतून आज सुटका झाली असें वाटूं लागलें. पंत ज्या ठिकाणीं घोड्यावरून खालीं पडले, तेथून अर्ध्या मैलावर स्टेशन होतें. स्टेशन गाठावें; गाडी सांपडली तर सांपडेल ह्या विचारानें पंत त्याचें सर्व अंग ठेचलें होतें तरी तसेच झपाझप पावलें टाकात व लंगडत **स्टेशनकडे** चालूं लागले. इतक्यांत गाडीची शिटीहि त्यांना ऐकूं आली म्हणून ते पळूं लागले. पडशीचें ओझें अगोदरच कमी झालें असल्यामुळें त्यांना पळणें सोपें झालें. स्टेशनांत पाऊल टाकतांच गाडी आलेली त्यांना दिसली. तिकिटासाठीं त्यांनीं खिडकींत पैसे फेंकले व तिकीट घेऊन ते गाडीकडे धावूं लागले, इतक्यांत गाडीनें कर्कश शिटी देऊन ता हालूंहि लागली. गुंडोपंत पळत पळत जाऊन डब्यांत शिरूं लागले, परंतु **पंतांनीं** डब्याचा दरवाजा जो मजबूत धरला तो सोडला नाहीं. गाडीचा वेग वाढला. शेवटीं रेल्वेपोलिसांनीं गुंडोपंतांना ओढले. त्यांत त्यांचा हात बराच दुखावला; गाडीही चुकली; व हैद्राबादेस तारखेवर हजर राहतां आलें नाहीं; म्हणून पांच सहाशेंचें नुकसान झालें; पडशी नाहींशी झाली; ह्या सर्व आपत्ति चांगला मुहूर्त पाहून मी घरून निघालों नाहीं म्हणून आल्या असें आमचे **गुंडोपंत** अद्याप म्हणतात ! !

मंत्रशास्त्राची गंमत ह्यापेक्षांहि जास्त आहे. परंतु स्थलकालाच्या अभावामुळें त्याचें विवरण पुढें केव्हांतरी करूं.

व्यासानें न लिहिलेली
विश्वामित्राची दुसरी एक कथा !

राजा हरिश्चंद्राची ' सत्त्वपरीक्षा ' करणारी विश्वामित्राची एक कथा प्रसिद्धच आहे. परंतु आपल्या शिष्यांचेंहि सत्त्व, कसास लावणारा **विश्वामित्र,** अद्यापि कोणास माहीत नाहीं. विश्वामित्र ऋषींची ही दुसरी कथा अठरा पुराणांपैकीं कोणच्या हि भागांत लिहिलेली नाहीं. तरी ती मला नुकतीच ऐकावयास सांपडली. ही कथाहि करुणरसपरिप्लुत परंतु बोधपर असल्यामुळें ती आज यथाश्रुत वाचकांपुढें मांडण्याचा विचार केला आहे. पूर्वीच्या कालीं उपनयनानंतर त्रैवर्णिक विद्यार्थ्यांचें वेदविद्या, धनुर्विद्या इ. सर्व अध्ययन बारा, चोवीस अथवा छत्तीस वर्षें गुरूगृहीं **गुरुकुलांतच** राहून होत असे. संसारी व व्यवहारी लोकांपासून दूर वनांत व रम्य सृष्टिसौंदर्याच्या ठिकाणीं गुरूचे आश्रम असत. येथें गुरूची व गुरुपत्नीची सेवा, शुश्रूषा करून गुरूस प्रसन्न करून घेऊन विद्या मिळवावी लागे आणि सांग विद्या झाल्यावर मग गृहस्थाश्रमी होण्याची परवानगी मिळे. त्यावेळेस गुरुही शिष्यावर पुत्रापेक्षांहि जास्त प्रेम करीत. आपल्या जवळची सर्व विद्या आपल्या सर्व शिष्यांस उदार अंतःकरणानें शिकवीत व शिष्यहि गुरूची नानाप्रकारची सेवा करीत व ब्रह्मचर्य व्रतानें रहात आणि विद्या पूर्ण झाल्यावर मग यथाशक्ति गुरूस दक्षणा देत अशी पूर्वपरंपरा ह्या आर्यावर्तांत अनेक शतकें चालली. त्याकालीं अनेक ठिकाणीं अनेक गुरुकुलें असत. ह्याप्रमाणें **विश्वामित्र** ऋषींचाहि भरतखंडांतील एका वनामध्यें प्राचीन कालीं एक गुरुकुलाश्रम होता. ह्यांच्याजवळ अध्ययन करण्यासाठीं त्रैवर्णिकांची अनेक मुलें होतीं. विश्वामित्र स्वभावानें तामसी हें सर्वप्रसिद्धच आहे; परंतु ह्या तामस स्वभावांत एके कालीं कपटाचेंहि मिश्रण झालें. तें कसें व कां झालें ही कथा वेगळीच आहे. ती अन्य प्रसंगीं कथन करण्यांत येईल. येवढें खरें कीं त्यावेळच्या ऋषींच्या व गुरूच्या स्वभावाविरुद्ध **विश्वामित्राच्या** मनांत विचार प्रवर्त झाले! हे कपटी विचार कशा प्रकारचे होते? त्यांना असें वाटलें कीं आपल्या या शिष्यांना विद्या शिकवूं नये. जर मी ह्यांना पूर्ण विद्या लौकर शिकविली तर ते कृतविद्य होत्साते हा माझा आश्रम सोडून

जातील आणि ही शिष्यमंडळी जर माझा आश्रम सोडून गेली, तर मग माझी सेवा कोण करणार? आज हे शिष्य लागेल तेवढें पाणी ओढून काढतात, वनांतून लांकडें आणतात, तीं लांकडें फोडतात, तसेंच वनांतून नानाप्रकारचीं फळें, फुलें, मध इ. गोळा करून आणतात. माझ्या इतक्या गाई आहेत त्यांचें दोहन करतात; मथन करतात; पुनः माझें व माझ्या पत्नीचें पादसंवाहन करतात. हे शिष्य इतके **गुलामा**प्रमाणें रावतात, त्यांना जर मीं विद्या शिकविली तर ते माझ्या आश्रमांतून सुटून **स्वतंत्र** होतील. व मग माझी सेवा कोण करणार? अशा कपटबुद्धीनें विश्वामित्रांनीं आपल्या शिष्यांस अध्यापन करण्याचें अगदींच सोडून दिलें. सर्व शिष्यांना विश्वामित्रांनीं इतकें काम नेमून दिलें कीं त्यांना बिचाऱ्यांना अध्ययन करण्याची निमिषाचीहि फुरसत मिळूं नये. **क्षत्रिय** विद्यार्थ्यांच्या दृष्टीसहि धनुष्य अथवा इतर शस्त्रास्त्रें पडूं नयेत अशी व्यवस्था केली; मग त्याचें शिक्षण तर दूरच राहिलें. ब्राह्मण काय, क्षत्रिय काय अथवा वैश्य काय सर्वांनीं **पाणी ओढावें**, व **लांकडें फोडावीं** ही एकच विद्या सर्वांना मिळूं लागली. असा प्रकार कांहीं दिवस चालला. शिष्य अज्ञानी होते तोंपर्यंत हा प्रकार ठीक चालला. परंतु वयोमानाप्रमाणें शिष्यांत जशी समज येऊं लागली तसें गुरूचें हें वर्तन त्यांना चमत्कारिक वाटूं लागलें! शिष्य जसजसे सज्ञान होऊं लागले तसें गुरूंचें हें कपट त्यांच्या लक्ष्यांत येऊं लागलें. अर्थात् शिष्यांच्या मनांतील गुरुभक्तीही लयास जाऊं लागली. उघडच आहे. शिष्यप्रेमच नाहीं तर गुरुभक्ति कोठून उत्पन्न होणार? परंतु विश्वामित्राला हा विचार कुठचा! माझ्या मनांत शिष्यांविषयीं प्रेम आहे किंवा नाहीं हें अंतर्मुख होऊन पहाण्याची त्यांच्या तामसी मनाला गरजच वाटली नाहीं। शिष्यांची **गुरुभक्ति** कमी होत आहे हें नजरेस पडलें कीं ते क्रुद्ध होत. शिष्यांनीं दिवसेंदिवस जास्त गुरुभक्ति दाखवावी अशीच ते इच्छा करूं लागले. प्रत्येक शिष्यानें मला पाहतांच नमस्कार करावा, नव्हे साष्टांग दंडवत घालावा, माझे व माझ्या पत्नीचे पाय चुरावेत, आमच्या गळ्यांत पुष्पांचे हार घालावेत, आमची, आमच्या रूपाची, आमच्या वस्त्रांची, आमच्या दयाळू वर्तनाची खूप स्तुती करावी. आम्हांस खूप फळें आणून द्यावीत, अशी इच्छा विश्वामित्र करूं लागले. ही इच्छा शिष्यांकडून त्यांच्या मनाप्रमाणें अर्थात् तृप्त होत नसे. आपल्याला जन्मभर 'गुलाम' ठेवण्यापलीकडे विश्वामित्राचें

आपल्याविषयीं दुसरें कसलेंच प्रेम नाहीं ही गोष्ट जसजशी स्पष्ट होऊं लागली तसतसा विश्वामित्राबद्दलचा आदर कमी होत चालला. हे शिष्य आर्यपरंपरेचे आर्यावर्तांतील होते. जरी गुरूबद्दलचा आदर सकारण कमी होत होता तरी त्यांनीं गुरूचा अपमान केला नाहीं! व जेवढा आदर दाखविणें शक्य तेवढा ते दाखवीतच. तरी शिष्यांच्या मनांतील आपल्याविषयींचें प्रेम शुष्क होत चाललें आहे हें विश्वामित्राच्या दृष्टीस पडेच! व ते संतापून जात. हें प्रेम पहिल्यासारखें उत्पन्न व्हावें म्हणून शिष्यांना ते अत्यंत कठोर शब्दानें वाक्ताडन करीत. उपरोधिक शब्दानें त्यांना गालीप्रदानही करीत. विश्वामित्रास वाटलें माझ्या ह्या रागाच्या व कठोर शब्दांच्या प्रयोगानें ह्यांच्या मनांत गुरुभक्ती उत्पन्न होईल, परंतु परिणाम उलटा झाला. असल्या कठोर भाषणानें राहिलें साहिलें प्रेमहि शिष्यांच्या मनांतून उडून जात आहे, हें तामसी विश्वामित्रहि लौकरच उमजले म्हणून विश्वामित्रांनीं दुसरी युक्ति योजिली. मायावी–कपटी भाषा बोलण्यास त्यांनीं प्रारंभ केला. विश्वामित्र म्हणत शिष्यानों! " असे निराश होऊं नका. अहो तुमच्या अध्ययनाची मीं व्यवस्था चालविलीच आहे. ती व्यवस्था आतां लौकरच अमलांत येईल व एकदां ती व्यवस्था अमलांत आली म्हणजे लौकरच तुम्ही सज्ञानी व्हाल आणि एकदां सज्ञानी झालांत म्हणजे ह्या आश्रमांतून मुक्त व्हाल व **स्वतंत्र** व्हाल. तुम्ही सज्ञानी व्हावें व स्वतंत्र व्हावें ह्या एकाच इच्छेमुळें मला दुसरें कांहीं सुचत नाहीं; परंतु अशी घाई करूं नका ह्या गोष्टी घाईनें होत नसतात वगैरे वगैरे" अशीं गोड गोड भाषणें करण्याचा विश्वामित्रांनीं क्रम ठेवला. परंतु अशीं भाषणें जरी होत तरी एकाहि शिष्याचें पाणी ओढणें व लांकडें फोडणें कमी झालें नाहीं हीं कष्टाचीं कामें कमी तर झालींच नाहींत परंतु आणखी वाढत गेलीं हें कपटहि शिष्यांना समजलें. परंतु या मायावी भाषणांनीं विश्वामित्राचा एक फायदा झाला. सर्व शिष्य सारख्या बुद्धीचे थोडेंच असतात! कुशाग्रबुद्धीचे जे शिष्य होते ते नुसत्या ह्या गोड भाषणांना फसेनात; परंतु मठ्ठ, व मंद बुद्धीच्या शिष्यांना **विश्वमित्राची** गोड भाषा खरीच वाटली व ते ह्या कुशाग्रबुद्धीच्या शिष्यांचा द्वेष करूं लागले. ह्याप्रमाणें शिष्यांमध्यें **आपसांत दुफळी** झाल्यामुळें सर्वच शिष्यांची गुलामगिरी जास्त वाढली! ह्यांचें आपसांत वैर वाढावें म्हणून विश्वामित्रांनीं मठ्ठ व मंद शिष्यांना शिळ्या भाकरींचे तुकडे व चोखून टाकलेलीं फळें मधल्या वेळेस फराळास देण्याचें आमिष

दाखविलें ! व असंतुष्ट शिष्यांना उपाशी ठेवण्याचा धाक घातला. परंतु विश्वामित्राची ही युक्ति फार दिवस टिकूं शकली नाहीं. कितीही मंदबुद्धी झाली तरी अभिलाष दाखविल्याप्रमाणें कांहीं मिळत नाहीं हें प्रत्यक्ष प्रत्ययास येतांच आपण फसलों असें त्या मठ्ठ शिष्यांनाहि वाटलें व गुरूबद्दल अनादर पुनः सर्व शिष्यांत सारखाच उत्पन्न झाला. हें पाहतांच विश्वामित्रानें आपल्या शिष्यांत पुनः फूट पाडण्याची दुसरी युक्ती योजिली. तो म्हणाला शिष्यांनो, तुम्हा त्रैवर्णिक शिष्यांचा सारखाच अधिकार नाहीं. तुमच्यामध्यें जे **ब्राह्मण** वर्णाचे आहेत, ते फार **स्वार्थी** व **मतलबी** आहेत. त्यांच्या नादीं लागून तुम्हीं आजपर्यंत फसत आलांत. मी ब्राह्मण शिष्यांना मुळींच विद्या शिकवूं इच्छीत नाहीं. तर फक्त **क्षत्रिय** व **वैश्य** ह्या वर्णांना मी विद्या शिकवून त्यांना लौकर स्वतंत्र करावें अशी माझी इच्छा आहे. ह्या भाषणानें कांहीं भोळे व मूर्ख क्षत्रिय व वैश्य फसून **ब्राह्मणाचा द्वेष** करूं लागले ! ह्याप्रमाणें शिष्यांमध्यें वर्णद्वेषाचें भूत शिरून हे शिष्य आपसांत एकमेकांचा द्वेष करूं लागले व ह्या युक्तीनें विश्वामित्राला सर्व शिष्यांवर गुलामगिरी लादतां आली. परंतु विश्वामित्राची ही युक्तीहि फार दिवस टिकली नाहीं. एखाद्याला सर्वकाळ फसवितां येतें, सर्वांना एखादे वेळेस फसवितां येतें. परंतु **सर्वांना सर्वकाळ फसविणें** मात्र सृष्टि करणारा विश्वामित्रच काय परंतु त्यांच्या प्रपितामहासहि शक्य नाहीं. ह्यामुळें मूर्ख, क्षत्रिय व वैश्यही फार दिवस फसले नाहींत. कारण गोड भाषणाशिवाय त्यांच्याहि पदरांत कांहींच पडेना ! त्यांचें 'पाणी ओढणें' व 'लांकडें फोडणें' हीं कामें नाहींशीं होईनात ! ह्याचा परिणाम असा झाला कीं त्रिवर्ण शिष्यामध्यें सारखाच असंतोष वाढला आणि गुरूबद्दल कोणासच प्रेम राहिलें नाहीं. ही स्थिति विश्वामित्रास चांगलीच जाणवूं लागली. शिष्यांच्या मनांत आपणांविषयीं नुसतें प्रेमच नव्हे तर चांगली भक्ती असली पाहिजे ही त्याची इच्छा, परंतु हें प्रेम मानापसून कोणाच शिष्यांत दिसेना, तेव्हां तो संतापी **विश्वामित्र** फारच संतापला व कांहीं असो, दंडानें आपल्या शिष्यांच्या मनांत आपणांविषयीं प्रेम उत्पन्न करण्याचा त्यांनीं निश्चय केला ! कोणी शिष्यांनीं जर नीट नमस्कार केला नाहीं, तर त्याला रात्रंदिवस कान धरून उभे रहाण्याची तो शिक्षा करी. साष्टांग नमस्कार न घातला तर शिष्याचे दोन्ही गुढघ्यांतून हात घालून कान धरावयास लावी व अशा स्थितींत त्यास

रात्रंदिवस ठेवी ! कोणी थोडी कुरकूर केली तर तो त्यांना उलटे टांगी व कोणी जर त्याची स्तुती केली नाहीं तर त्याच्या जिभेस तो डाग देई. जे शिष्य फुलाचे हार आणन आपल्या गळ्यांत घालणार नाहींत त्यांना तो घोडीवर देई. जे शिष्य त्याचे पाय चुरण्यास मागेंपुढें पहात त्यांना तो उपाशी ठेवी. लांकडें फोडण्यास जे कुरकुरत त्यांना तो दळावयास लावी व शिवाय त्यांच्या कानाला चापहि लावी. दधिमंथन करून जितकें लोणी काढलें पाहिजे तितकें जर निघालें नाहीं, तर विश्वामित्र त्या शिष्यांना फटक्याची शिक्षा करी. अशा प्रकारच्या कडक व जबरदस्त शिक्षा विश्वामित्र करूं लागला ! हेतु हा कीं, ह्या उपायानें आपल्या शिष्यांच्या मनांत आपणाविषयीं प्रेम उत्पन्न होईल. अशा प्रकारें शिक्षांचा सपाटा चालू असतां शिष्यांनीं आरडाओरड करूं नये म्हणून त्यांच्या तोंडाला चामड्याचे पट्टे बांधून त्यांनीं त्यांची **मुस्कुटदाबी** केली. आपसांत हे शिष्य एकमेकांस भेटून आपल्या विरुद्ध संगनमत करतील म्हणून जर दोघां शिष्यांची भेट झाली तर दोघांसहि उपाशीं अंधार कोठडींत कोंडण्यांत येई. ह्याप्रमाणें ' गुरुनिष्ठा ' उत्पन्न होण्यासाठीं विश्वामित्रांनीं आपल्या शिष्याचा अनन्वित छळ चालविला. ह्या छळामुळें कित्येक तरुण शिष्यांच्या मनांत विश्वामित्राबद्दल अतिशय द्वेष उत्पन्न झाला ! व सर्वांनीं मिळून ह्या गुरूसच शिक्षा करावी असा ते विचार करूं लागले. व हा विचार त्यानीं आपल्यामधील प्रमुख अशा " **गाधिज** " नांवाच्या शिष्यवरांना कळविला. हा विचार ऐकतांच गाधिज म्हणाला, छेः छेः असा भलताच अविचार तुम्ही करूं नका. आपण आर्यावर्तांतील आर्यपुत्र आहोंत. हे अनार्य विचार तुम्ही क्षणभरहि मनांत आणूं नका. आर्यावर्तांत अद्यापपर्यंत गुरूशीं शत्रुत्व कोणीच केलें नाहीं. विश्वामित्राबद्दल आपणांस प्रेम उत्पन्न होणें शक्य नाहीं. कारण त्यांनीं शिष्यप्रेम असें कधींच दाखविलें नाहीं परंतु ते गुरु आहेत हें विसरतां कामा नये. 'प्रेम ' नसलें तर नसूं दे, व तसें तें प्रेम नाहीं असें सर्वांनीं गुरूस सांगणें हेंच आपलें कर्तव्य आहे; परंतु **शत्रुत्व मात्र नको**. सर्व शिष्यांना हा विचार जरी पटला नाहीं तरी **गाधिजा**बद्दल सर्व शिष्यांच्या मनांत एक प्रकारची पूज्य बुद्धि होती म्हणून तूर्त ' **गाधिजा** ' च्या मताप्रमाणें चालूं या असा सर्वांनीं निश्चय केला. ' गाधिज ' पुढें म्हणाला, ह्यावेळेस वाटेल तो छळ झाला तरी तो सोसणें हेंच आपणा शिष्यांचें कर्तव्य आहे. हीच आपली **तपश्चर्या** आहे. ह्या-

वेळेस आपण भलताच अनार्य विचार अमलांत आणला तर सर्व आर्यावर्ताला **काळिमा** लागेल. मित्रांनों, प्रत्येक प्राण्यामध्यें व देशामध्यें ईश्वर एक विशिष्ट गुण देत असतो. व त्या गुणानेंच याचें संरक्षण होतें. आम्हा आर्यांना ' सहनशीलता व संयमन ' हेच गुण ईश्वरानें सर्वांपेक्षां जास्त दिले आहेत, तर ह्याच गुणांचा आपण **हत्यारा**प्रमाणें आपल्या संरक्षणाकडे उपयोग करूं व ह्या **अनत्याचारा**च्या तत्त्वाप्रमाणेंच आपण आपल्या गुरूस वठणीवर आणूं व स्वतंत्र होऊं हा निश्चय समजा. सहनशीलता हा आमचा राष्ट्रीय सद्-गुण आहे व तोच आम्हांस तारील. ह्याप्रमाणें अत्यंत सत्त्वशील असें **गाधिजाचें** भाषण सर्व शिष्यांना पटलें व ते बहुतेक सर्व शिष्य निमुटपणें छळ सोसण्यास सिद्ध झाले. असे कांहीं दिवस गेल्यावर विश्वामित्रास वाटलें शिष्यांचा आपण बराच छळ केला, आतां ते वठणीवर आले असतील म्हणून तो शिष्याच्या तोंडाचे पट्टे सोडून शिक्षा झालेल्या प्रत्येक शिष्यास विचारूं लागला. प्रथम तो शिष्यप्रमुख जो ' गाधिज ' त्याच्या जवळ जाऊन त्याच्या तोंडाचा पट्टा सोडून विचारता झाला. शिष्या गाधिज ! अरे, मी तुझा इतका छळ केला आतां तुझ्या मनांत माझ्याविषयी भक्ती उत्पन्न झाली असेल तर बोल, मी तुला शिक्षेंतून मुक्त करतों. गाधिज म्हणाला, गुरूजी तुमच्याबद्दल मला मुळींच प्रेम उत्पन्न झालें नाहीं तर भक्ती कोठली ! हें ऐकून विश्वामित्र फारच संतापला व पुनः गाधिजाची मुस्कटदाबी केली व पुनः त्याला अंधारकोठडींत कोंडून टाकलें. ह्याचप्रमाणें देवदत्त, युधिष्ठिर, सेनगुप्त, मैत्रेय, विष्णु, शर्मा, कौण्डिण्य, भार्गव, रत्नपाल इ. इ. अनेक शिष्यांना ज्यांना ज्यांना कडक शिक्षा केल्या होत्या त्या प्रत्येकाला विचारले परंतु प्रत्येकानें गुरूजी तुमच्याबद्दल आमच्या मनांत प्रेम नाहीं. हेंच सत्य आहे व हें सत्यच आम्ही सांगतों. हीं उत्तरें ऐकून विश्वामित्र फारच क्रोधायमान झाला व त्यानीं त्यांच्या शिक्षा फारच कडक केल्या व आणखी असंख्य शिष्यांना त्यानीं कडक शिक्षा ठोठावण्यास प्रारंभ केला. माझ्या ह्या छळांनीं माझ्या शिष्यांत मजबद्दल प्रेम उत्पन्न झालेंच पाहिजे ह्या हट्टाला विश्वामित्र पेटला. ह्या क्रूर व सार्वत्रिक शिक्षांच्या सत्रांनीं कांहीं उपयोग झाला नाहीं. मात्र दोन चार भेकड शिष्य हा प्रकार पाहून फारच भेदरले व घाबरून विश्वामित्राला सांगूं लागले, विश्वामित्रा, आम्हांस शिक्षा करूं नका. गुरो ! तुमच्याविषयीं आमच्या मनांत प्रेम आहे. खरो-

खरच प्रेम आहे, ही पहा ही आमच्या यज्ञोपविताचा ब्रह्मगाठ. ह्या गाठीची शपथ घेऊन आम्ही सांगतों कीं हे गुरो तुमच्याबद्दल आमच्या मनांत खरंच प्रेम आहे. असें ह्या घाबरट शिष्यांनीं ढोंग करतांच विश्वामित्राला आनंद झाला व तो म्हणाला शिष्यानों ! जयंतशर्मा सर्पशर्मा व चिंतामणीशर्मा या या, तुमच्या मनांत माझ्याबद्दल प्रेम आहे तर या असे या. मी तुम्हांस माझ्याजवळ बसवितों. तुमच्या व माझ्या विचारानें आपण ह्या सर्व शिष्यांचें आत्यंतिक कल्याण कशानें होईल ह्याचा आतां विचार करूं. आपल्या ढोंगानें विश्वामित्र फसलेला पाहून शिष्य मनांत हर्षित झाले व एकमेकाकडे पाहून डोळे मिचकवूं लागले. ही गोष्ट त्या चाणाक्ष विश्वामित्राच्या लक्षांत आली नाहीं असें नाहीं. **विश्वामित्र** मनांत म्हणाला. ' अरे ह्यांचें हें ढोंग असूं दे, **आज-काल ढोंगी प्रेम तरी कुठें मिळतें** ? दोन चार शिष्यांच्या ह्या ढोंगी प्रेमावरच आपणांस आपल्या गुरुपणाचें ढोलकें वाजवतां येईल. ह्यांना ह्यांच्या ढोंगीपणाबद्दल जर शिक्षा केली, तर मग मला कोणीच शिष्य रहाणार नाहीं ! मग केवळ ह्या गोठ्यांतील गाईंवर व वृषभांवर ज्यांना कांहींच बोलतां येत नाहीं व ज्यांना कोणत्याच प्रकारची बुद्धिही नाहा, त्यांच्यावरच आपलें गुरुत्व गाजवावें लागेल. विश्वामित्र असें जरी मनांत म्हणाला तरी ह्या गोष्टीनें त्याच्या मनांत दुःख झालेंच ! मजवर शिष्याचें प्रेम नाहीं ह पाहून त्याचा संताप अनावर झाला ! त्यामुळें त्यास रात्रीं झोप येईना व दिवसा चैन पडेना ! बाह्यतः मात्र तो मी गुरू आहे, मी सत्तावान आहे, हे शिष्य माझे गुलाम आहेत, माझे गुरूपण जगांत गाजलेंच पाहिजे, शिष्यांच्या असंतोषांची मी काडीइतकीहि पर्वा बाळगीत नाहीं, इतक्या सर्व शिष्यांना शिक्षा केल्या तरी माझे सर्व व्यवहार जसे चालावे तसेच चालत आहेत. असें नाटक दाखवी. परंतु नाटक तें नाटकच ! ह्या दिखाऊ सत्तेनें विश्वामित्राचें मन आंतल्या आंत जळूं लागलें. कर्मधर्म संयोगानें ह्याच वेळेस **वसिष्ठ**, **व्यास** व **वाल्मिकी** ही महामुनींची त्रयी गुरुकुलाश्रमांत उपस्थित झाली. त्यांनीं **विश्वामित्रास** विचारलें, **विश्वामित्रा** तुझ्या गुरुकुलाची स्थिति कशी आहे ? सर्व यथास्थित आहे ना ? शिष्यांचा **समावर्तनांचा** काल आला आहे ना ? ह्यावर विश्वामित्रांनीं मुनित्रयांचें यथोचित आदरातिथ्य केलें व उत्तर दिलें. वसिष्ठा, सर्व यथास्थित आहे. माझ्या **गुरुकुलांत**

सर्व शांतता आहे. **आनंद** आहे. सर्व शिष्यवर्ग **सुखांत** आहे. **समृद्धी व सुव्रता येथें प्राचूर्यानें** वास करीत आहे. पहा गोठ्यांतलि सर्व **गाई, वृषभ** व इतर जनावरें आपला काल आनंदांत व शांततें काढीत आहेत. गाईंनां चारा मिळत आहे. म्हशींला सरकी दिली जाते. शिष्याचाहि समावर्तन काल प्राप्त झाला आहे व त्याच विचारांत मी आहे. शिष्यांतहि मज-विषयीं गुरुभाक्ति वसत आहे. व त्याचें प्रत्यंतर हे पहा माझे आवडते शिष्य **जयशर्मा, सर्पशर्मा** व **चिंतामणीशर्मा** माझी पादसेवा करीत बसलेले आहेत! **वसिष्ठ** म्हणाले, राजर्षे! तूं कांहीं म्हण परंतु मला **तुझ्या आश्रमांत शांतता असलेली दिसत नाहीं.** अरे, हे पहा हे तुझे किती तरी शिष्य येथें दिसत नाहींत व जे दिसतात ते सर्व दुःखी व कष्टी झालेले दिसतात. तुझ्या शिष्यांना अनन्वित शिक्षा झालेल्या आम्हाला समजल्या आहेत. हे तीन शिष्य तुझी पादसेवा करीत असले तरी ह्यांच्या तोंडावर आनंदापेक्षां **भेदरटपणाच** जास्त दिसत आहे. काय ह्याला आनंद व शांतता म्हणतात? असल्या स्थितीला स्वास्थ्य व शांतता तुझ्याच्यानें म्हणवतें तरी कसें? ह्यावर **विश्वामित्र** म्हणाला, कांहीं बंडखोर शिष्यांना मला शिक्षा करावी लागली, तरी ह्या माझ्या आश्रमांत **शांतता** व सुख नांदत आहेच असें मला वाटतें. आाणि ह्या बंडखोर शिष्यांनाही शिक्षा करणें मला भाग पडलें. ह्या शिक्षांनीं त्यांच्या मनांत लौकरच 'गुरुनिष्ठा' उत्पन्न होईल अशी मला पूर्ण आशा आहे. त्यांच्या मनांतून जें गुरुप्रेम नाहींसें झालेलें आहे तें पाहून माझ्या ह्या गोठ्यांतील जनावरांतील मजविषयींचें प्रेम नाहींसें होईल व सर्वत्र अशांतता माजेल म्हणून ह्या माझ्या शिष्यांना त्याच्यांच बऱ्यासाठीं मला कडक शिक्षा द्याव्या लागल्या. आतां आम्ही ह्या शिष्यांच्या मुक्ततेबद्दलच विचार करणार आहोंत. **वसिष्ठ** म्हणाला, राजर्षे, तुझे तामसी विचार अद्याप नष्ट होत नाहींत. आाण तुला **ब्रह्मर्षी म्हणावें** म्हणून तुझा किती आग्रह! अरे ज्यांच्या सुखाची व स्वातंत्र्याची वाटघाट करावयाची त्य ना अगोदर कडक शिक्षा देऊन दुखवावयाचें हा प्रकार विस्मयकारकच आहे! छळानें प्रेम उत्पन्न करण्याची विश्वामित्रा, ही तुझी रीत तर फारच आश्चर्याची आहे आणि आनंद, सौख्य, शांतता हीं मनुष्यासाठीं पाहिजे का जनवरासाठीं? हीं गोठ्यांतलीं मुकीं जनावरें ह्यांच्यांत शांतता नांदत आहे ह्यांत तुझें कर्तृत्व कसलें? ज्यांना बुद्धि आहे, ज्यांना विचार आहे अशा तुझ्या मानवी शिष्यांत तुजविषयीं प्रेम असतें तर त्यांत तुझें कर्तृत्व सिद्ध झालें असतें. तुजविषयीं त्या शिष्यांच्या मनांत प्रेम

असतें तर त्यांच्यांत असंतोष कधींही माजला नसता, आणि मग तुला त्यांना शिक्षा देण्याचें कारणच पडलें नसतें. विश्वामित्रा, पहिल्यापासूनच जर तूं आपल्या शिष्यांवर शिष्यप्रेम दाखवून त्यांना सुविद्य केलें असतें तर आज ते स्वतंत्र होऊन **गृहस्थाश्रमी** होण्यास योग्य झाले असते. परंतु राजर्षी, तं आपलें गुरूचें कर्तव्यच केलें नाहींस हेंच सिद्ध होत आहे. त्यावर **विश्वामित्र** म्हणाला, **वसिष्ठा,** तूं ब्रह्मर्षी झालास म्हणून माझा अपमान करण्याचा तुला अधिकार नाहीं. अरे, माझी योग्यता मीच जाणतों. दंडानें प्रेम उत्पन्न झालेंच पाहिजे. कसें होत नाहीं हें मी पहातों. ह्यावर वसिष्ठ म्हणाले, तुझा अपमान करण्याची माझी मुळीं इच्छा नाहीं. परंतु मी हें सांगून ठेवतों कीं हरिश्चंद्राच्या छळांत जसा तुझा पराजय झाला तसाच आतांही होणार आहे. अरे, हे शिष्यही त्या हरिश्चंद्राचेच वंशज आहेत असें म्हणून मुनित्रय तेथून निघून गेले. ह्यानंतर विश्वामित्रांनीं आपल्या शिष्यांना छळण्याची पराकाष्ठा केली. प्रत्येक वेळेला तो शिक्षा झालेल्या शिष्यांना 'आतां तरी माझ्याविषयीं तुमच्या मनांत प्रेम उत्पन्न झालें का' असें विचारी व प्रत्येक वेळेला सर्व जण 'नाही' हेंच उत्तर देत. छळाच्या योगानें सर्व शिष्य मरणोन्मुख झाले ! परंतु विश्वामित्राचीही तीच स्थिति झाली. विश्वामित्रास फळें मिळेनात, मध मिळेना, त्यांच्या गाईचें दूध काढण्यास कोणी मिळेना, व त्यांच्यासाठीं धान्य पिकविण्यासही कोणी शिष्य तयार होईना. ह्यामुळें व विशेषतः मानसिक संतापामुळें विश्वामित्रही मरणोन्मुख झाला. त्यास वेड लागण्याची वेळ आली. ही स्थिति **विश्वामित्राच्या पत्नीनें** जाणून सर्व शिष्यांना **बंधमुक्त केलें** व त्यांना आपत्यप्रेमानें वागविण्याचा निश्चय केला. नंतर लवकरच विश्वामित्रास आपला पराजय कबूल करावा लागला, व लकरच आपल्या सर्व विद्यार्थ्यांस सज्ञान करून त्यांना **स्वातंत्र्य द्यावें** लागलें !

अर्थशास्त्रांतील एक क्रान्ति !

व काट-कसर कामिटीस सूचना !!

'Demand and Supply' 'मागणी तसा पुरवठा' असें अर्थशास्त्रांतील एक तत्त्व समजलें जातें; परंतु अलीकडे ह्या तत्त्वांत क्रांति होण्याचीं चिन्हें दिसू लागलीं आहेत. ह्याच्या उलट 'Supply and Demand' 'पुरवठा तशी गरज' असें तत्त्व सिद्ध होऊं पहात आहे.

जशी गरज असेल तसा पुरवठा झाला पाहिजे; गरजेच्या पोटांतून पुरवठा उत्पन्न होतो 'Necessity is the Mother of Invention' इ. अर्थशास्त्रमूलक समजुती आजपर्यंत प्रचारांत आहेत; परंतु ह्याच्या उलट असा अनुभव येऊं लागला आहे कीं, **पुरवठा अगादर** व **गरज मागाहून उत्पन्न होते!** एवढेंच नव्हे तर, जसजसा पुरवठा जास्त होऊं लागतो तसतशी गरज जास्त भासूं लागते. संपत्तिवान् मनुष्यासच पैशाची जास्त गरज भासते; विद्वान् मनुष्यच ज्ञानाचा भुकेला असतो; आणि ज्या स्त्रीस नखशिखांत—चुकलों, नख वेण्यांत डागीने मिळालेले असतात तिलाच डागिन्यांची आणखी हांव सुटलेली दिसते! ह्या व्यवहारांतील अनुभवांची उपपत्ति 'गरज तसा पुरवठा' ह्यापेक्षां 'पुरवठा तशी गरज' अशा व्युत्क्रम तत्त्वानेंच जास्त चांगली लागते. एवढें कशाला? आज हिंदुस्थानचा इतर देशांशीं जो व्यापार वाढलेला आहे, त्याचा इतिहास पाहिल्यास हेंच तत्त्व सिद्ध होतें. चहाची आम्हांस अगोदर गरज उत्पन्न होऊन मग आमच्या देशांत चहा येऊं लागला, अथवा पिकूं लागला, असें नसून अगोदरच, चहाच्या झालेल्या भरपूर पुरवठ्यानें आम्हांमध्यें चहाची गरज उत्पन्न झाली. त्याचप्रमाणें विलायती दारूचा मुबलक पुरवठा दुकानांतून अगोदरच झाल्यानें तिच चहाते आमच्यांत उत्पन्न झाले! नाना प्रकारच्या कापडाचा पुरवठा अगोदरच भरपूर विलायतेहून झाल्यानंतर, आम्हांस निरनिराळ्या कापडांची व तऱ्हेतऱ्हेच्या पोषाखांची गरज भासूं लागली. रेल्वे, तारायंत्र, मोटारी इ. सोयीसुद्धां पुरवठ्यानंतर गरजेच्या वाटूं लागल्या. चिमण्या, कपबशा, तऱ्हेतऱ्हेच्या गुंड्या, अनेक फॅन्सी व शोभेचे पदार्थ, मुलांचीं खेळणीं इ. इ. अनंत विलायती घटोत्कची मायेच्या वस्तूच्या बोटी भरभरून अगोदर हिंदुस्थानांत

आल्या, आणि नंतर मग त्यांची मागणी वाढूं लागली. तात्पर्य हिंदुस्थानचा सर्व व्यापार Demand and Supply ह्या पेक्षां Supply and then demand ह्या तत्त्वावर उभारला गेला !

निर्जीव मालाच्या पुरवठ्याप्रमाणेंच सजीव मालाच्या 'पुरवठ्या' नंतरच मनुष्यांस त्यांची गरज वाटते. लोकांना वकीलांची व ब्यारिस्टरांची गरज उत्पन्न झाल्यावर मग शेंकडेशें वकिलांच्या व ब्यारिस्टरांच्या पाट्या झळकूं लागल्या असें नसून शेंकडोशे वकील अगोदर उत्पन्न झाल्यावर मग प्रत्येक कुटुंबास वकिलांची जरूर भासूं लागली. त्याचप्रमाणें डाक्तरांचीही स्थिति आहे. पूर्वी आमच्या चंद्रघाटावर एक राजाराम या नांवाचा डाक्तर सर्वांस पुरून, ओट्यावर बसून गप्पा मारण्यास उरत असे, तेंच आतां रेन्सिडेन्सीपासून कोतवालचावडीमधील टीचभर जागेंत खच्चून डाक्तरांचीं व वैद्यांचीं दुकानें उघडलेलीं असूनही आणखी डाक्तरांची व वैद्यांची गरज लोकांस भासतच आहे ! तात्पर्य, पुरवठ्यानेंच गरज उत्पन्न होते, व जसा पुरवठा जास्त, तशी गरज जास्त हाच सिद्धांत सिद्ध होत नाहीं काय ? ' Demand and Supply ' ह्या तत्त्वांत होणाऱ्या क्रान्तीचा फायदा व्यापारी व कारखानदार लोक करून घेऊं लागले आहेत व पुढेंही घेतील. परंतु ह्या उलट्या तवत्तापासून प्रत्येक ' काट–कसर कमेटीनें'ही बोध घ्यावा अशी फिरस्त्याची सूचना आहे. महायुद्धानंतर काटकसर करण्याची आवश्यकता राजापासून रंकापर्यंत सर्वांसच वाटूं लागली आहे. ज्यांच्या राज्यांत सूर्य कधींहि मावळत नाहीं अशा साम्राज्यापासून ज्यांच्या राज्यांत सूर्य अद्याप उगवलाच नाहीं, अशा लहान मोठ्या संस्थानिकांपर्यंत, सर्वांनाच खर्चांत काटकसर करण्याची सध्यां अत्यंत आवश्यकता वाटूं लागली आहे. आणि प्रत्येकांनीं आपल्या ऐपतीप्रमाणें काट–कसरकमेट्या नेमलेल्या आहेत. ह्या सर्व काट–कसरकमेट्यांतील सभासदांनीं "जितका पुरवठा ज्यास्त तितकी गरज ज्यास्त" हें नवीन तत्त्व विसरूं नये हेंच फिरस्त्याचें सांगणें आहे. नवीन तत्त्वाला अनुसरून काट–कसरीचा बराच विचार करण्यासारखा आहे. त्याचें थोडें दिग्दर्शन मात्र येथें करतों. 'पुरवठा तशी गरज' ह्या तत्त्वाप्रमाणें ज्यांना अगोदरच पगार कमी आहेत, त्यांचे पगार आणखी कमी करण्यास हरकत नाहीं ! ह्याप्रमाणें पुष्कळशा कारकून मंडळींचा पगार कमी करतां येणार आहे. या कारकून लोकांच्या गरजा फार कमी असतात.

दोन वेळ जेवण्याचीहि वस्तुतः त्यांना गरज नसते ! कारकुनांतील हिंदू लोकांना निराहार, उपास करण्याची तर संवयच असते. शिवाय अलीकडे **लंघानाचेंहि** महत्त्व फार वाढलेलें आहे. **'चित्रमयजगतांत'** ह्या **विचित्र** विषयाचें अजीर्ण होईपर्यंत प्रतिपादन झालेलें आहे. तेव्हां ' काट-कसर ' कमेटीस लागणारी मनोभूमि रा. किनऱ्यांनीं अगोदरच तयार केली आहे. पुरवठा तशी गरज ह्याप्रमाणें ज्यांचे पगार १००, ७५, ५०, २५ असे आहेत त्यांचे त्या त्या मानानें कमी करीत करीत अगदीं हलक्या पगारदारांना, अजीबात काढून टाकण्यासही हरकत नाहीं ! कारण ज्यांना अगदींच कमी पैसे मिळतात ज्यांना पैशाचा पुरवठाच नाहीं, त्यांना पैशाची गरज उत्पन्न होण्याचें कारणच काय ? ह्या तत्त्वाप्रमाणें शेंकडा २५ किंवा जास्तही लोक कमी करतां येण्यासारखे आहेत. हे लोक कमी करून त्यांचें काम दुसऱ्या उरणाऱ्या कारकुनांवर लादण्यास मुळींच हरकत नाहीं ! फक्त ज्यांना आतां ८।१० तास काम करावें लागतें त्यांना १२।१५ तास काम करावें लागेल एवढेंच ! परंतु ज्यांना दहा तास काम करण्याची संवय आहे, त्यांना १२ तास काम करण्यास लावण्यानें दुहेरी फायदा होणार आहे.

एक बऱ्याच लहान पगारदारांना एकदम खर्ची केल्यानें सरकारच्या खर्चांत काटकसर होईल, आणि दुसरें दहा तासांच्या कामाच्या पुरवठ्यानें ज्यांची कामाची गरज वाढलेली आहे, तें काम त्यांना देऊन त्यांची ती गरज भागविण्याचें पुण्य काट-कसर कमिटीस अनायासें मिळणार आहे. ह्याप्रमाणें सरकारी खर्च पुष्कळ वांचवितां येईल ! ' काटकसर कमिटीनें ' नुसते खर्च कमी करण्याकडेच आपलें लक्ष देऊं नये, तर प्रत्येक ऑफिसची " एफिशियन्सी " म्हणजे उपयुक्तता वाढविण्याकडेही लक्ष दिलें पाहिजे आणि ही उपयुक्तता वाढवावयाची म्हणजे आफिसच्या मुख्य अधिकाऱ्यांच्या कांहीं गरजा वाढल्या असल्यास त्या दूर करणें, हें सुद्धां काट-कसर कमिटीचें मुख्य काम आहे.

' पुरवठ्यानें गरज वाढते ' ह्या तत्त्वाप्रमाणें बड्या बड्या अधिकाऱ्यांची सध्यां पैशाची गरज अतिशय वाढलेली आहे ! कामाच्या भरपूर पुरवठ्यानें कनिष्ठ प्रतीच्या नोकरांची कामासंबंधीं गरज वाढलेली आहे; व मोठमोठ्या पगाराच्या भरपूर पुरवठ्यानें वरिष्ठ अधिकाऱ्यांची पैशाची गरज जास्त वाढलेली आहे व वाढत आहे. तेव्हां कनिष्ठांना भरपूर काम, व वरिष्ठांना भरपूर

पैसा वांटून ह्या दोघांच्या गरजा काट–कसर कमिट्यांनीं भागविल्यास **समतेचें** साम्राज्य माजविण्याचें बरेंच श्रेय ह्या काट–कसर कमिट्यांस मिळणार आहे ! खोऱ्यांनिशीं पगार घेणाराला मोटार अलाउन्स दिला जातो. हें तर Supply and demand ह्या तत्त्वाला धरूनच आहे ! परंतु ह्या मोटारी वरचेवर बिघडतात व वरचेवर त्यांना दुरुस्त करावें लागतें, त्यांतहि ह्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना बराच पैसा खर्चावा लागतो. तेव्हां अशा अधिकाऱ्यांस मोटार अलावन्स बरोबरच "मोटार रिपेअर अलावन्स" मिळाल्यास बिचाऱ्यांची बरीच सोय होईल ! तेव्हां 'काट–कसर कमिट्यांनीं' ही सूचना जरूर अमलांत आणावी ! त्याच-प्रमाणें वरिष्ठ अधिकाऱ्याला आपली 'पोझिशन' राखण्यासाठीं पोषाखांतहि बराच पैसा खर्च करावा लागतो. हजार बाराशें रुपड्या मिळणारांना हा खर्च अलीकडे झेपेनासा झाला आहे !

ह्यासाठीं प्रत्येक वरिष्ठ अधिकाऱ्याला एक "**ड्रेस अलावन्स**" म्हणून पोषाखासंबंधीं खर्च सरकारांतून मिळाला पाहिजे, तरच त्यांची पोझिशन कायम राहून सरकारी काम चांगलें होईल व रयतेवर अधिकाऱ्यांचा दाब राहील. सर-कारी वरिष्ठ अधिकाऱ्यांचा रुबाब राखण्यासाठीं अशा प्रकारचे अलावन्सेस देणें ही उधळपट्टी नव्हे, तर ती एक प्रकारची काट-कसरच आहे! पोझिशन उत्तम विलायती कपड्याच्या पोषाखानें जशी रहाते, तशीच ती 'चिरूटा' नें वाढते, म्हणून प्रत्येक मोठ्या अधिकाऱ्यानें चोवीस तास चिरूट हे ओढलेच पाहिजेत. परंतु २४ तास सारखे चिरूट ओढावयाचे म्हणजे बराच खर्च येतो, तेव्हां त्याबद्दलहि जर सरकारांतून कांहीं थोडा कां होईना–अलावन्स मिळाल्यास ह्या अधिकाऱ्यांना बराच हातभार लावल्यासारखें होईल ! बसावयाला मोटार, अंगावर भारी व नमु-नेदार पोषाख, डोळ्याला चष्मा व तोंडांत चिरूट ह्या सर्व सामुग्रीशिवाय बड्या लोकांनीं सरकारी काम बिनबोभाट कसें काय करावयाचें ! हाताखालील लोकांवर आपलें वजन ठेवावयाचें म्हणजे ह्या सर्व गोष्टी आवश्यक होत. अधि-काऱ्यांचा राग जसा नागव्या डोळ्यांपेक्षां, चष्म्याच्या भिंगांतून परावर्तन पाव-ल्यानें जास्त प्रकट होतो, तसेंच साध्या तोंडांतून निघालेल्या शब्दापेक्षां, तोंडाच्या एके बाजूस दातांनीं दाबून धरलेल्या चिरूटामुळें होणाऱ्या बोबड्या बोबड्या उच्चारानेंच हाताखालील कारकून लोक जास्त वचकतात हें विस-रतां कामा नये ! म्हणून प्रत्येक अधिकाऱ्यास '**चिरूट अलावन्स**' मिळालाच

पाहिजे ! 'चिरूट' ही कांहीं 'लक्झरी' म्हणजे ऐषआराम नव्हे, तर ती अधिकाऱ्यासंबंधीं एक 'नेसेसिटी' म्हणजे गरज आहे. अर्थात् ती गरज भागविणें जरूरच आहे.

ह्याप्रमाणें "Supply and demand" ह्या तत्त्वाप्रमाणें सर्व काट-कसर कमिट्यांनीं योग्य तो विचार करून माझ्या अल्प व नम्र सूचना मान्य कराव्यात च बहुधा त्या ते मान्य करतीलच अशी आशा प्रकट करून लेखणी थांबवितों !

निजामविजय- हैद्राबाद.

आगंतुक ब्राह्मणांचा रुसवा !

नाना प्रकारच्या चांगल्या व वाईट मार्गानें संपत्ति मिळवून गबर झालेल्या एका चिक्कु सावकारच्या मनांत एके दिवशीं ब्राह्मणभोजन घालण्याचीं प्रेरणा उत्पन्न झाली. हीं प्रेरणा खऱ्या धर्मबुद्धीनें अथवा उदार बुद्धीनेंच झालेली होती असें नाहीं. लोकांचीं घरें बुडवून, व लांडीलबाडी करून जो अनन्वित पैसा मिळविला होता त्याची रुखरुख मनांत डांचत होती, ती कांहीं तरी पुण्यकर्म केल्यानें नाहींशी होईल आणि थोडें पुण्यकृत्य केल्यावर मागचें पाप लोक विसरून पुढील आपला मार्ग ज्यास्त सोपा जाईल या स्वार्थी इच्छेनेंच त्या सावकारानें ब्राह्मणभोजनाचा घाट घातला. त्याच्या चिक्कू स्वभावाप्रमाणें त्याला फारसे ब्राह्मण बोलवावयाचे नव्हते. फक्त दीडशें १५० ब्राह्मण बोलवावे असा त्याचा संकल्प होता. त्याप्रमाणें त्यानें भोजनास निमंत्रण देण्याची यादी तयार केली. अर्थात् त्या सावकाराच्या अगदीं घरोब्याचे ब्राह्मण प्रथमतः लिहिले गेले. त्यानंतर ज्यांचा त्या सावकारास नेहमीं उपयोग होत असे अशांचीं नांवें आलीं. नंतर दुसरे ऋणानुबंधी लोक, ज्यांच्या येथें तो सावकार नेहमीं जेवण्यास जात असे अशांचीं नांवें घातलीं. त्यानंतर आपण जेवण्यास ज्यांना बोलावूं ते पुढें आपणांस खात्रीनें जेवण्यास बोलावतील अशांचींच त्या यादींत नांवें घातलीं. दुसरे कित्येक असे लोक होते कीं, जे त्या सावकाराचा मोठेपणा व वैभव गांवांत फुगवून सांगत, व जे त्याच्या प्रत्येक कामांत उपयोगी पडत, असे हरकामे मोठ्या आदरानें सांगण्यांत आले. याप्रमाणें कशीतरी एकंदर शंभर ब्राह्मणांची यादी तयार झाली. परंतु पन्नास ब्राह्मण कमी पडूं लागले म्हणून गांवांत जे दुसरे कित्येक विद्वान् व सत्पात्र ब्राह्मण होते त्यांना "त्यांनीं वाटल्यास आमच्या येथें जेवण्यास यावें" असा निरोप भिक्षुकांच्या अड्ड्यावर आपल्या एका हस्तकामार्फत पाठविला. हा सावकाराचा उद्दामपणा पाहून भिक्षुकांच्या अड्ड्यावर फारच जंगी चळवळ उडाली. टाकणें टाकल्याप्रमाणें दिलेल्या अशा या निमंत्रणावरून त्या सावकाराच्या येथें जेवण्यास जावें किंवा नाहीं असा प्रश्न भिक्षुकांच्या अड्ड्यावर उत्पन्न झाला. ह्या ब्राह्मणांत **घनांत** अध्ययन केलेले

विद्वान् व तेजस्वी ब्राह्मण होते; **दशग्रंथ** म्हटलेले असे वैदिक होते; **षट्-शास्त्राचें** अध्ययन केलेले विद्वान् शास्त्री होते; नेमनिष्ठ, कर्मनिष्ठ, तपस्वी, व्रती, असे अनेक सत्पात्र ब्राह्मण होते. तो गांव भिक्षुकांचाच असल्यामुळें सावकाराच्या मनांत असतें तर दीडशें सत्पात्र ब्राह्मण त्यास सहज मिळाले असते. परंतु सावकार फक्त व्यवहार जाणणारा असल्यामुळें त्यानें पात्रापात्राचा विचार कांहींच केला नाहीं. अशा अपमानास्पद प्रकारामुळें त्या सावकाराच्या येथें भोजनास जाऊं नये असेंच सर्व विद्वान् ब्राह्मणांचें मत पडलें. "आमंत्रण देण्याची ही रीत नव्हे. आपण जेवण्यास यावें अशी त्या सावकाराची खरी इच्छा दिसत नाहीं. या ब्राह्मणभोजनांत पुण्यांश थोडा आहे. सावकाराचा ब्राह्मणभोजन घालण्याचा उद्देशहि फारसा धर्ममूलक नाहीं. अशा अन्नाच्या सेवनानें जेवणाराला व तें घालणाराला दोघांनाहि पापच लागण्याचा संभव आहे. आज आपणास अन्न मिळत नाहीं असें नाहीं. अशा जेवणापेक्षां उपाशी रहाणें चांगलें. जर आमच्या अंगांत शक्ति असेल तर अशीं ब्राह्मणभोजनें घालण्यास आम्ही, स्वतः समर्थ होऊं, आणि असें भिक्षुकी जेवण जेवण्यापेक्षां स्वकष्टानें मिळवून आपण जेवावें व दुसऱ्यासहि आदरपूर्वक घालावें हाच खरा पुरुषार्थ आहे. परान्नपुष्ट होण्यांत अर्थ नाहीं " असे तेजस्वी विचार त्या ब्राह्मणांत उत्पन्न झाले.

तीक्ष्णा धारेण खड्गेण वरं जिव्हा द्विधाकृता ॥ न तु मानं परित्यज्य देही देहीति भाषितम् ॥ याप्रमाणें भवति न भवति होऊन त्या तेजस्वी व विद्वान् ब्राह्मणांनीं त्या सावकाराच्या येथें जेवावयास जावयाचें नाहीं असा एकमतानें निश्चय केला, व त्या भोजनसमारंभावर त्यांनीं Boycott घातला.

ह्या विद्वान् ब्राह्मणांत सगळेच तेजस्वी व वैराग्यसंपन्न ब्राह्मण होते असें नाहीं. त्यांत कांहीं आशाळभूत, परान्नसेवनाची चटक लागलेले लोभी, असेहि ब्राह्मण होते !

त्यांना हा Boycott चा सर्वानुमतें झालेला ठराव पाहून फार वाईट वाटलें ! परंतु 'सर्वांबरोबर आपण' असें म्हणून ते चरफडत कांहीं वेळ स्वस्थ बसले. इकडे सावकारानें ब्राह्मणांची थोडा वेळ वाट पाहून नंतर ब्राह्मण मंडळी येत नाहींत असें कळतांच तेली, तांबोळी, हलवाई अशा दुसऱ्या लोकांस जेवण्यास बोलावलें व आपल्या दीडशें पात्रांची कशी तरी त्यानें भरती

केली. त्या सावकारानें सर्वांस निमंत्रण दिलें. स्वयंपाकाचा बेत अगदीं साधाच म्हणजे **फक्त झुणका व भाकर** !! परंतु बाहेरील थाट मात्र झोकदार होता. रांगोळ्या काढल्या. पाट मांडले. उदबत्त्या लावल्या. मोठालीं केळीचीं पानें दिलीं. हा बाहेरचा थाट पाहूनच भिक्षुकांच्या अड्ड्यावरील तेलंगी आशाळभूत ब्राह्मणांना फारच चुटपुट लागली ! सावकार आपणास आतां तरी अगत्यानें जेवण्यास बोलावील अशी त्यांना फार आशा होती. परंतु बिचाऱ्यांची तीहि आशा निष्फळ झाली. इकडे पंगत जेवण्यासहि बसली, तशी ह्या **नरसय्या, लक्ष्मणय्या, दासय्या, लोकारामय्या** इ. तेलंगांची फारच धांदल उडाली. "आतां तरी दाराशीं जाऊन आम्हास जेवण्यास द्या हो" म्हणून ओरडावें असें त्यानीं सर्व भिक्षुकांस सुचविलें ! परंतु या सूचनेस कोणीच कबूल होईना. कोणी अगदीं विरुद्ध बोलूं लागले, कोणी थोडें अनुकूल बोलूं लागले, कोणी "आंत घ्या हो" असें न ओरडतां फक्त दरवाजाच्या फटींतूनच पहावें असें सुचवूं लागले. या उडालेल्या गोंधळानें "स्वकष्टानें आपण आपलें अन्न मिळवावें" असा जो महत्त्वाचा ठराव पूर्वीं ह्या विद्वान् ब्राह्मणांनीं केला होता त्याकडे दुर्लक्ष होऊन ह्या तेलंग्यांच्या आगंतुक धांदलीनें **सर्वांच्या उत्साहावर पाणी मात्र पडलें** ! ह्या तेलंगानीं आपली एक कमिटी केली व आगंतुकी करावी किंवा करूं नये याचा साधकबाधक फार विस्तृत विचार करून त्याचा **रिपोर्ट** त्या भिक्षुक ब्राह्मणांच्या अड्ड्यावर प्रसिद्ध केला. ह्या आगंतुकांच्या कमिटीचा हा रिपोर्ट फार वाचण्यासारखा आहे. या रिपोर्टाच्या आरंभीं भिक्षुकीची स्तुति केलेली आहे, आणि त्यांत **दुर्वास ऋषींचें** उदाहरण पुढें ठेवून त्यांनीं जशी रात्रीच्या दोन प्रहरीं पांडवांच्याच येथें आगंतुकी करून आपल्या तेजानें पांडवांचें सत्व पाहिलें तसें आपणहि ह्या चिक्कू सावकाराचें सत्व पाहिलें पाहिजे अशा तऱ्हेचें प्रतिपादन केलें आहे.

ब्राह्मणांची मुख्य दीक्षा ।
मागितली पाहिजे भीक्षा ।
ॐ भवति ह्या पक्षा ।
रक्षिलें पाहिजे.

हा **समर्थांचा** आधार दाखविण्यांत आला.

रिपोर्टांत आरंभीं.

The very thought of going to भोजनसमारंभ is very repugnant to many of us, and rightly too ह्याप्रमाणें कबूल करून, "परंतु करावयाचें काय ! सर्व परिस्थितीच बदलली" "The position in which we now find ourselves is materially different to that we occupied before the commencement of पंगत." The times have now changed. "The circumstances have altered" ह्याप्रमाणें हें आगंतुक स्वतःच बदलून सर्व जग बदललें असा रिपोर्टभर घोष करतात ! आपल्या मनगटाच्या जोरावर आपण आपली भाकरी मिळवायची असें भिक्षुकांच्या अड्ड्यावर ठरलेलें असतांना तसा कोणच्याही प्रकारचा प्रयत्न न करतां उलट लोकांचा बुद्धिभेद करून त्यांच्या उत्साहावर पाणी ओतून हे रिपोर्ट लेखक अशी फुशारकी मारतात.

"The work was carried on in right earnest with a view to secure speedy success, but we have had failures" ह्याप्रमाणें उतावीळपणानें अपयशाचा डांगोरा पिटून, रिपोर्टलेखक आगंतुकी करण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं असें भासवीत होत्साते म्हणतातः "If our colleagues meant to show that we are going behind our settled convictions we refuse to plead guilty to the charge."

आगंतुकी करणें हा प्रतिष्ठितपणाचा रुसवा आहे असेंहि त्यांत म्हटलेलें आहे. "Only fitting answer to the यजमान for not inviting us to भोजनसमारंभ is to smash the पंगत" असें ह्या आगंतुकांचें सूत्र आहे ! रिपोर्ट पुढें म्हणतोः—ही आगंतुकी नव्हे. जरी आम्ही यजमानांच्या दाराशीं गेलों, दाराशीं जाऊन दार ठोठावलें व 'अहो आम्हांस जेवण्यास आंत घ्या असें म्हटलें तरी ही आगंतुकी होत नाहीं. येवढेंच नव्हे तर आपला मुकटा आंत फेंकून अहो, मी जेवणास येत नाहीं, 'मी आपला मुकटा आंतून घेऊन येतों' असें म्हणून आंत जाऊन चापून एका पानावर बसलें तरीहि, ती आगंतुकी (Co-operation) नव्हे. कारण पानावर बसलों तरी आम्हांस तेथें जेवावयाचें नाहीं हें पक्कें लक्ष्यांत ठेवा ! असें हे म्हणतात.

"We see no act of आगंतुकी in these" तर हीं सर्व प्रतिष्ठितपणाचींच लक्षणें आहेत असें हे तेलंग ठांसून सांगतात!

ते म्हणतात अहो, आपण आतांपर्यंत बाहेर राहून आपला रुसवा दाखविला. परंतु आतां आंत जाऊन पंक्तींत बसून आपला रुसवा दाखवूं. या पंक्तींत पानशोभेसाठीं बसलों म्हणून काय झालें? जर आम्ही पानावरील एकही घास खात नाहीं तर आमचा रुसवा यजमानांच्या लक्ष्यांत येणार नाहीं काय? आतांपर्यंत आमचा 'नेगेटिव्ह' रुसवा होता. आतां हा रुसवा Active केला पाहिजे!! That is to say enter the पंगत for actively obstructing and paralysing the भोजनसमारंभ" पंगतींत पानावर बसून आपण रुसलेलों आहोंत हें कसें दाखवावें त्याबद्दल रिपोर्टांत खालील मार्ग दाखविले आहेत:–

१. पंक्तींत बळेंच शिरून व पाटावर मांडीचा चौकडा घालून बसावें.

२. परंतु पानावरील एकाहि पदार्थास शिवूं नये.

३. जो जो पदार्थ येईल तो तो नको नको म्हणून परत करावा. असें अगदीं मिठापासून तों मागील दहींभातासुद्धां कांहीं घेऊं नये.

४. एवढ्यानेंहि जर यजमानांच्या लक्ष्यांत आम्हीं खरे खरे रुसलेलों आहोंत हें आलें नाहीं तर सर्व आगंतुकांनीं एकदम भर पंक्तीमधून पानावरून उठून जावें. Walk out करावा!

आगंतुकीच्या आक्षेपांचें मजेदार खंडन ह्या रिपोर्टांत केलेलें आहे तें असें:–

कोणी म्हणेल कीं अशा रीतीनें पंक्तीचा घात करणें धर्मदृष्ट्या निंद्य आहे (Fatwa) तर त्यावर ह्यांचें उत्तर असें आहे "All actions depend upon intention." कोणी अन्नदात्याच्या निंदेचा दोष लावील तर We are dealing here with general movement and its principles तेव्हां निंदेचा दोष लागत नाहीं असें ह्या आगंतुकांचें म्हणणें आहे! अशा तऱ्हेनें पंक्तींत रुसणें शास्त्राविरुद्ध आहे असें जर कोणाचें म्हणणें असेल तर त्यावर हे आगंतुक असें सांगतात. "We can think of no higher form of रुसवा than entering into the पंगत" अशा रीतीनें आगंतुकी करून बळेंच पक्तींत शिरल्यानें भोजनसमारंभास नसतें महत्त्व दिलें जाईल असें जर कोणास वाटेल तर हे लोक असें म्हणतात, As soon as the party of आगंतुकस् commands a majority its आगंतुकपणा

instead of giving vitality to the भोजनसमारंभ results in its total Paralysis. असल्या दांडगाईच्या आगंतुकींनें अन्नदात्याच्या हाताचा चावा घेण्यासारखें अनीतीचें कृत्य होतें असें जर कोणी म्हणेल तर त्यास ह्या रिपोर्टांत असें उत्तर दिलें आहेः No honourable man need be ashamed by the objection of immorality. " ह्यानंतर जर कोणी अशी शंका घेईल कीं, पानावर बसल्यावर व समोर गोड गोड पक्वानें आल्यावर आम्हा आगंतुकांना तीं खाण्याचा मोह आवरणार नाहीं तर तें म्हणतात, " छेः छेः आम्ही आपला मोह खात्रीनें आवरून धरूं. We आगंतुकस् can claim as many if not more men of robust moral stamina as any other Nation ×××× as many as half a dozen Natfons put togeher " **अन्नांचें नांव** घेतांच तोंडास पाणी सुटतें असें आपल्यांत अद्याप पुष्कळ लोक आहेत. हें माहीत असूनहि ह्या वैराग्याच्या बढाया मारलेल्या पाहून कोणास हसूं येणार नाहीं!

सरतेशेवटीं जर कोणी असा आक्षेप घेईल कीं, इतकी मानखंडना झाल्यावर आमच्यांतील अत्यंत कर्मनिष्ठ व वैराग्यशाली अशा अनेक ब्राह्मणांचा यजमानानें अक्षम्य अपमान केल्यानंतरहि पुनः त्याच्या दाराशीं जाऊन तोंड वेंगाडणें हें अत्यंत लाजिरवाणें आहे. त्यावर हे आगंतुक उत्तर देतातः—

" It is precisely because the यजमान has dealt with us so badly it becomes our clear duty to enter into the पंगत with all energy we can command and spare no pains to destroy it. "

अहो! हें खरें, पण जर यजमानांनीं तुम्हांस मुळीं आंतच येऊं दिलें नाहीं, कारण तुम्ही कबूल करतां कीं " There are indications that the यजमान and other भोजनभाऊज् will use all means fair and unfair to prevent us. If they thus deliberately keep us out" तर तुम्ही कसा यजमानाचा सूड घेणार? तर त्यावरही ह्या आगंतुकांचें उत्तर आहेच तें हें कीं, " अहो, यजमानांनीं नुसते धक्के मारूनच हांकून दिलें आहे, अद्याप **अर्धचंद्राचा** प्रयोग कोठें झाला आहे, तों होऊं द्या. तो प्रयोग होऊं द्या त्यानें आम्हा आगंतुकांचा लोचटपणा जरी जगजाहिर झाला, तरी यजमानाची

आम्हांस जेवण्यास बोलावण्याची इच्छा नाहीं हें तरी सर्व जगांस कळेल! जणूं काय ती अद्याप कळलीच नाहीं!

ह्याप्रमाणें ह्या आशाळभूत ब्राह्मणांनीं आपली बाजू पुढें मांडली आहे. व आपल्या ह्या विचारसरणीनें गावांत बरेच आगंतुक तयार होतील असें त्यांना वाटत आहे. तसें झालें म्हणजे त्यांच्या मतें मरू घातलेल्या आणखी दोन बहिष्काराबरोबर ह्या बहिष्कारत्रयींचें सपिंड श्राद्ध गयेस उरकून घेऊन मोकळें व्हावें अशी त्यांची सदिच्छा आहे!*

निजामविजय–हैद्राबाद.

---

*टीप– पहिल्या 'स्वराज्य पार्टी'च्या वेळेला हा लेख लिहिला आहे. सध्याची स्थिति तर अपरंपार बदललेली आहे! सध्याच्या स्वराज्य, व डेमोक्रॅटिक पार्थ्यांना ही थट्टा लागूं नाहीं.

प्रकाशक.

लगाम !

ह्या विश्वामधील अनेक सजीव व निर्जीव पदार्थांचा उपयोग करून आपली सुधारणा व सुखाभिवृद्धि करीत करीत मनुष्यप्राणी आज ह्या युगापर्यंत येऊन पोहोंचला आहे.

मानवी संस्थांशीं व सुधारणेशीं संबद्ध अशा हजारों वस्तूंचें जर सूक्ष्मपणें निरीक्षण केलें तर त्यावरून मानवी सुधारणांचा एक मनोरंजक इतिहास तयार होईल. सकृद्दर्शनी अत्यंत क्षुल्लक व साध्या दिसणाऱ्या अनेक वस्तूंचा जर खोल बुद्धीनें विचार केला तर ह्याच वस्तु मानवी सुधारणेचे अनेक टप्पे दाखविण्यास समर्थ होतील.

लगाम ही एक अशीच साधी व क्षुल्लक वस्तु दिसते. परंतु लगामाच्या उत्पत्तीशीं मनुष्याच्या कोणत्या वृत्ति निगडित झाल्या आहेत ह्याचा बोध करून घेणें फार महत्त्वाचें आहे. मनुष्याचा व जनावरांचा प्रथमतः केव्हां व कसा परिचय झाला ह्याची माहिती आपणांस नाहीं, परंतु एवढें खरें कीं इतर जनावरांपेक्षां मनुष्यास अगोदर शेळीचा, गाईचा व घोड्याचा परिचय झाला असला पाहिजे. मनुष्यप्राण्यांचा जुन्यांतील जुना असा उल्लेख काढला तरी त्यांत मनुष्याबरोबर ह्या तीन जनावरांचा उल्लेख सांपडतोच ! मानवाचा सर्वांत जुना ग्रंथ जो ऋग्वेद त्यामध्येंहि शेळी, गाय व घोडा ह्या जनावरांचे उल्लेख आहेत. मनुष्य हा फार **परोपकारशील** प्राणी आहे. मनुष्याशिवाय परोपकाराची बुद्धि इतर प्राण्यांत मुळींच आढळून येत नाहीं ! ह्या आपल्या परोपकारबुद्धीनें प्रेरित होऊन मनुष्यानें ह्या तीन जनावरांवर फार फार उपकार केलेले आहेत ! व सध्यांहि मनुष्य इतरांपेक्षां ह्या प्राण्यावरच आपलें परोपकाराचें शस्त्र जास्त चालवीत असतो. मनुष्याचा घोड्यांना व घोड्याचा मनुष्यांना उपयोग पूर्वीं झालेला आहे व सध्यांहि होत आहे. मनुष्याची व घोड्याची फार पुरातन दोस्ती आहे. घोडा हा प्राणिही इमानदार आहे. म्हणून त्यास **इमानदार मित्र** असें म्हणण्यास हरकत नाहीं. आपल्या ह्या इमानदार मित्रावर मनुष्यानें अनंत उपकार केलेले मागें सांगितलेंच आहे. मनुष्य हा परोपकारी प्राणी आहे. शिवाय त्याचा परोपकार हा बैठा परोपकार कधींहि नसतो तर **धांवता परोपकार** असतो. आपल्या दाराशीं जो येईल त्यावर

परोपकार करावयाचा हा बैठा परोपकार, परंतु आतां दुःखी जेथें असेल तेथें जाऊन त्याला धुंडून काढून त्यावर परोपकार करणें ह्यास **धांवता परोपकार** असें म्हणतात. घोड्यास वाचा नाहीं परंतु घोड्याचीं दुःखें काय आहेत हें जाणून तीं नाहींशी करण्याचा मनुष्य सदोदित प्रयत्न करीत असतो. घोड्याला हिरवें गवत आवडतें असें समजतांच मनुष्य घोड्यास हिरवें गवतच घालूं लागला, त्यापेक्षां मौल्यवान 'लुसन' गवतहि देऊं लागला. त्याचप्रमाणें त्याला प्रमाणशीर दाणा देणें, त्याची मालिश करणें, त्याचा तबेला उत्तम ठेवणें, त्याला स्वच्छ पाणी पाजणें, त्यावर शोभिवंत जीन घालणें, त्याच्या डोळ्यास त्रास होऊं नये म्हणून त्यास झांपडी बांधणें, त्याच्या पायास इजा होऊं नये म्हणून नाल ठोकणें, त्याची शेपटी डौलदार कातरणें, अनीतीपासून त्याचें संरक्षण होऊन तो तेजःपुंज दिसावा म्हणून त्याचें अंड ठेचणें इ. इ. कितीतरी परोपकाराच्या गोष्टी आपल्या ह्या **इमानदार मित्रासाठीं** मनुष्य करीत असतो ! आणि विशेष हें कीं, घोड्याकडून कोणच्याहि प्रकारची मागणी नसतांना मनुष्य केवळ आपल्या धांवत्या परोपकारबुद्धीनेंच ह्या सर्व गोष्टी करतो. इतकें झालें तरी मनुष्याच्या परोपकारबुद्धीस समाधान होईना. आपल्या इमानदार मित्राला कोणाच्याहि प्रकारचें दुःख नाहींना ! त्यास सर्व सुखें आहेत ना? ह्या विवंचनेंत मनुष्याची धांवती परोपकारबुद्धि एके दिवशीं गढून गेली असतां मनुष्याच्या त्या धांवत्या परोपकारबुद्धीस एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत आली ! घोड्याचें एक महत् संकट त्याच्या एकदम लक्ष्यांत आलें. तें हें, कीं कधीं कधीं चुकून,–एखादे वेळीं–घोड्याचे दांत घोड्याच्या जिभेला लागत असावेत व त्यामुळें खात्रीनें घोड्याला फार दुःख होत असलें पाहिजे असें मनुष्याच्या धांवत्या परोपकार बुद्धीस वाटलें. हें दुःख घोडें आपणास सांगत नाहीं म्हणून काय झालें ! परंतु घोड्याचें ह्या संकटापासून आपण सरंक्षण केलेंच पाहिजे !

जीभही घोड्याची व दांतही घोड्याचेच, परंतु ह्या संकटापासून आपण घोड्याचें संरक्षण केलें नाहीं तर मग आपली मैत्री ती काय ! व आपली धांवती परोपकार बुद्धि ती काय ? असा विचार करून घोड्याचें ह्या संकटापासून कसें संरक्षण करावें ह्या विवंचनेंत मनुष्य कांहीं वेळ पडला. दांत पाडले तर घोड्यास चावतां येणार नाहीं व जीभ कापली तर घोड्यास घांस

गिळता येणार नाहीं, तेव्हां अशा प्रकारच्या परोपकारानें घोड्याच्या प्राणास इजा होणार, ह्यासाठीं दांतांची व जिभेची जास्त मैत्री जमूं देऊं नये असा एक उपाय केला पाहिजे, म्हणजे चुकून एखादे वेळेला दांतांचा जिभेस जो चावा बसतो, तो बसणार नाहीं. ह्या प्रीत्यर्थ मनुष्यानें आपल्या कल्पनेनें **लगामाची** योजना तयार केली ! ह्या लगामानें जीभ, चावणाऱ्या दांतांपासून अगदीं वेगळी राहूं लागली. शिवाय दांतानें मध्यें येऊन जिभेस दंश करूं नये म्हणून लगामास **कांटेहि** लावण्यांत आले ! ह्याप्रमाणें ह्या लगामाच्या योजनेनें घोड्यावरील दांतांचें संकट अजीबात टळलें ! असा या लगामाच्या उत्पत्तीचा इतिहास आहे. ह्यावरून मनुष्याच्या परोपकार बुद्धीनें व दयार्द्र अंतःकरणानेंच लगामाची उत्पत्ति झाली ही गोष्ट स्पष्ट आहे. असें असून कित्येक अविचारी लोक लगाम, हा मनुष्यानें घोड्याला आपल्या ताब्यांत ठेवण्यासाठीं केवळ मतलबी बुद्धीनें काढला असें म्हणतात, परंतु त्यांच्या ह्या म्हणण्याला मनुष्यांच्या इतिहासांत मुळींच आधार नाहीं. **केवळ परोपकार बुद्धीनें घोड्याच्याच दांताचा आघात** घोड्याच्याच जिभेवर होऊं नये, हें संकट टळावें म्हणूनच लगाम मनुष्यानें उत्पन्न केला ! ! येवढेंच नव्हे तर ज्या काळीं प्रथमतः **लगाम** मनुष्यानें तयार केला तेव्हां त्या लगामास Horses protection Bill असें कायसें नांव दिलेलें होतें असें एका पुरातनच्या शिलालेखांत लिहिलें असल्याचें फिरस्त्यास कोणीं तरी सांगितलेलें आठवतें. ह्यावरून तरी मनुष्याच्या धांवत्या परोपकार बुद्धीची पूर्ण खात्री होईल !

निजामविजय– हैद्राबाद.

‘ दिरंगाई ’ ऊर्फ ‘ हळूबाई ’ इचा अर्ज !

ह्या कायद्याच्या युगामध्यें वाटेल त्यानें अर्ज करावेत, चांगल्या मनुष्यांनीं अर्ज करावेत व वाईट मनुष्यांनींही अर्ज करून आपल्या वाईट मार्गाची दाद लावून घ्यावी. शहाण्यांनीं अर्ज करावेत. व वेड्यांनींहि अर्ज करावेत. **फिरस्त्यास** प्रवासांत नाना प्रकारचे लोक भेटतात, एके दिवशीं त्यास ‘ दिरंगाई ’ ऊर्फ ‘हळूबाई’ ह्या विलक्षण नांवाची एक बाई भेटली, व तिनें निझाम राज्यांतील मुख्य न्यायाधिशास लिहिलेला एक विलक्षण अर्ज त्यास दाखविला. वाचकांच्या मनोरंजनासाठीं तो विलक्षण अर्ज जशाचा तसा खालीं देत आहें.

“ निझाम राज्यांतील सदर न्यायाधीश महाराज,

मी खालीं लिहीत असलेली माझ्या वनवासाची कहाणी आपण सदय अंतःकरणानें वाचाल आणि माझ्या दुःखाचें व भीतीचें निवारण करून येथें मला कायमचें आश्रयस्थान द्याल अशी मला पूर्ण आशा आहे.

महाराज ! मी एक दुःखी कष्टी व अनाथ बाई आहें ! मला ‘ **आळसोबा** ’ नांवाचा पती आहे परंतु सध्यां आम्ही दोघेंही अनाथ होण्याच्या पंथास लागलों आहोंत ! महाराज ! सध्या जगामध्यें माझी व माझ्या नवऱ्याची अतिशय नालस्ती होत आहे ! जो उठतो तो आम्हांस नांवें ठेवतो आणि शिव्या देतो ! ‘ आळस वाईट ’ ‘ आळस वाईट ’ व दिरंगाई कुचकामाची हीच मेल्यांची रड ! सगळ्यांनीं मेल्यांनीं आमचा छळवाद मांडला आहे ! महाराज ! माझी कर्मकहाणी काय सांगूं ? आम्ही फार पुरातन काळीं पश्चिमेकडे रहात असूं. तेथें आमचे पुष्कळ दिवस फार सुखाचे गेले परंतु आम्हांस ‘ **उद्योग** ’ व त्याची बायको ‘**शीघ्रता**’ हे शत्रू उत्पन्न झाले आणि ह्यांनीं मेल्यांनीं आम्हांस छळण्यास सुरवात केली. आमचा एक एक अधिकार जाऊं लागला, आणि होनां होतां लौकरच आम्हांस ह्यांनीं देशोधडीला लावलें !

आमचा देश सोडून आम्ही हिंदुस्थानांत येऊन राहिलों. येथेंही आमचीं कित्येक वर्षें फार सुखांत व आनंदांत गेलीं, परंतु दुष्ट **उद्योगाला** आमचें सुख सहन झालें नाहीं. हा दुष्ट विश्वामित्रासारखा येथेंही आमच्या पाठीस लागला. त्याच्या छळाचा प्रकार किती म्हणून सांगावा. पूर्वीं माझे भक्त सुखानें लोडाशीं

टेकून स्वस्थ पडत होते ते ह्याच्या त्रासानें पडेनासे झाले. तासचे तास, दिवसांचे दिवस, येवढेंच नव्हे तर महिनेच्या महिने, व वर्षांची वर्षें निरुद्योगीपणानें आरामशीर पडून आयुष्याचा काळ स्वस्थपणानें घालविणारे हजारों माझे भक्त ह्या उद्योगाच्या चरकांत सांपडून धांवपळ करूं लागले. बरीब बिचारे श्रीमंत लोक! स्वस्थनिद्रेची दगदग सोसूनही जे सदोदित माझ्याच भजनांत दंग असावयाचे तेही ह्या उद्योगाच्या मोहक गप्पा ऐकण्यांत निष्कारण काळ चालवूं लागले.

पूर्वी हिंदुस्थानांत सर्व लोक रस्त्यानें चालतांना प्रत्येक पाऊल विचारपूर्वक सावकाश टाकीत होते, तेच आतां झप झप चालूं लागले! संथपणें चालणाऱ्या बैलगाड्या नाहींशा होऊन झर झर पळणारे टांगे व धड धड चालणाऱ्या मोटारी व सायकली जिकडे तिकडे दिसूं लागल्या! चोहोंकडे रेल्वे धांवूं लागल्या आहेत, आणि रेल्वेचा वेगही कमी वाटून नवीन मुक्काम तात्काळ गांठणारीं आकाशयानेंहि सुरू होऊं पहात आहेत! त्याचप्रमाणें पूर्वी मनुष्याच्या द्वारें अथवा सांडणीच्या पाठीवर इकडून तिकडे जाणारी बातमी आतां तारेच्या व टेलिफोनच्या द्वारें झटकन् जाऊं लागली आहे. तसेंच पूर्वी सावकाश व वळणदार अक्षरानें थोडकेंसें लिहिणारे लोक सध्यां 'टाइपरायटिंग, शॉर्ट हॅंड व प्रिंटिंग' इ. कलांच्या माऱ्यांत सांपडून दोन दोन वार लांबींचीं वर्तमान पत्रें रोजच्या रोज काढण्यांत गढून गेलेले आहेत. ह्याप्रमाणें ह्या '**उद्योगानें**' व '**शीघ्रतेनें**' सर्व मामला बिघडून टाकला! ह्या चंचल '**शीघ्रते**'नें '**स्थल**' व '**काल**' Time and space ह्या दोन महातत्त्वांचा निर्दयपणानें संकोच करण्याचें काम चालविलें आहे!

महाराज! निसर्गामध्यें सुद्धां त्वरा नाहीं. झाडास जेव्हां फुल यावयाचें तेव्हांच फूल येतें व जेव्हां फळ यावयाचें तेव्हांच फळ येतें. कोणतेंहि काम लौकर करणें म्हणजे निसर्गाविरुद्ध जाण्याचा गुन्हा करणें नाहीं काय? आणि म्हणूनच "धीर सो गंभीर" "दम बडी चीज है" व Slow and sure, Haste, makes waste इ. इ. शहाणपणाच्या म्हणी पूर्वींच्या शहाण्या लोकांनीं करून ठेवलेल्या आहेत. परंतु ह्या शहाणपणाच्या म्हणीकडे सध्या शहाण्या लोकांचेंहि दुर्लक्ष होऊं लागलें आहे. चपलपणानें चाऱ्ही पायांवर उड्या मारीत धांवणाऱ्या हरिणीकडेच लोकांचें लक्ष जातें. संथपणें चालणाऱ्या गोगलगाईकडे कोणीच पहात नाहीं!

हा कलियुगाचा महिमा दुसरें काय! बरें तर बरें ह्या '**शीघ्रतेचा** प्रवेश निसर्गाच्या कायद्यांत अद्याप झाला नाहीं नाहीं, तर ह्या चांडाळणीनें सूर्यास रोज रात्रीं तीन वाजतांच उगवावयास लावलें असतें आणि माझ्या भक्तांची रात्रीची झोंपमोड केली असती. महाराज! हिंदुस्थानांत '**उद्योग**' व '**शीघ्रता**' ह्या आमच्या शत्रूनें ह्याप्रमाणें सर्वत्र आम्हांस छळण्यास आरंभ केला. ह्यांनींच मुदतीचा कायदा आणि वेळेचा कायदा असे दुष्ट कायदे उत्पन्न केले व शांततेचा भंग करणारीं घड्याळें उत्पन्न केलीं! ह्या घड्याळांनीं माझ्या गळ्याला तांत लावली आहे! पंधरा पंधरा मिनिटाला ओरडणारीं घड्याळें निघालीं आणि माझ्यावर पहारा करण्यासाठीं टॉवरवर उभीं राहिलीं! मेल्यांना कांहीं उद्योग नसतो. सारखीं ठण ठण ठण ठण ओरडत असतात! ह्याप्रमाणें चोहोंकडून गांजणूक होऊं लागल्यामुळें त्रासून आम्ही हिंदुथानभर सर्वत्र पसरलेला आमचा प्रपंच आवरून घेण्याचा उपक्रम केला आणि आपल्या ह्या **चारमिनारच्या** राज्यांत आम्हीं आपलें मुख्य ठिकाण केलें.

महाराज! येथें आमची जीवितयात्रा फार सुखानें चालू आहे. येथील हवा-पाणी माझ्या प्रकृतीला फार मानवलेलें आहे आणि माझा नवरा '**आळसोबा**' ह्याचाही येथें चांगला अधिकार चालू आहे. आमचे भक्तगण येथें भरपूर आहेत. नुसत्या श्रीमंत वर्गांतच आमची मानमान्यता नाहीं तर मध्यम व गरीब वर्गा-लाही आमचीच चहा आहे! येथील अधिकारी लोक तर माझ्याच अंकित आणि प्रजेंतही माझीच पूजा चालू आहे. महाराज! माझा जयजयकार येथें तुह्मास सारखा ऐकूं येईल. 'आज फुरसत नाहीं, उद्या या,' 'मग या' 'थांबून या,' 'अमळशानें या' 'पुन्हा या' 'थोडे थांबा' 'दम धरा,' अत्ताच काय गडबड' 'पुढें पाहू' 'बघूं' ह्या प्रमाणें सावकाश संथपणानें 'धीमे धीमे.' 'हळू हळू,' आस्ते आस्तें ह्या माझ्या आवडत्या शब्दांचा जप येथील माझ्या सर्व भक्तगणाकडून मोठ्या प्रेमानें होता असतो! कोणचाही वर्ग, समाज, जात, अथवा लोक येथें माझ्या आज्ञेच्या बाहेर जात नाहींत. येथील विद्यार्थी आजचें काम सहज उद्यावर टाकतात. येथील वकील महत्त्वाचीं कामेंही सहज पुढें ढक-लून देतात! कारकून लोक गरजू लोकांना 'तुझी मिसल (फाईल) आज सांपडत नाहीं उद्या ये असें महिनों गिणती खुशाल' सांगूं शकतात. अधिकारीवर्ग तारीख पेषी बदलण्यांत तरबेज झालेला आहे "**बामिसल पेषहों**" व "**दफ्तफरसें**

कैफियत पेषहों " ह्या माझ्या दोन, महावाक्यांनीं कोणत्याही जरूरी अर्जाला महाफिजखान्याच्या समुद्राचा तळ सहज दाखवितां येतो! येथें कोणाचीहि-एखाद्या फाटक्या वकीलापासून मोठ्या अधिकाऱ्यापर्यंत–एक वेळच्या प्रयत्नानें भेट होणार नाहीं व भेट झाल्यावरहि कामासंबंधानें रोजच्या रोज अतिशय आशा दिसली तरी वेळेवर काम होण्याची कधींही भीति बाळगण्याचें कारण नाहीं! असा माझा उत्तम बंदोबस्त आहे. आजपर्यंत भक्तांनीं आपल्या देवतेचीं अनेक स्तोत्रें केलीं असतील परंतु येथील माझ्या भक्ताविषयीं मींच एक स्तोत्र केलेलें आहे, महाराज तें आपल्यास सांगतें.

'अभी' तिं शब्देन पक्षांतराणाम्
'आज कल' शब्देन मासांतराणाम्
'करूंगा देखुंगा' वर्षांतरणाम्
'देऊंगा दिलाउंगा' युगांतराणाम्

महाराज! ह्याप्रमाणें माझ्या भक्तांच्या लीला मी कोठवर वर्णन करूं! महाराज! मध्यंतरीं माझा हा बंदोबस्त ढिला होतो कीं काय अशी मला भीति उत्पन्न झाली होती. रेल्वे व मोटारी; तारायंत्र व टेलिफोन, घड्याळें व छापखाने हे उद्योगाचे व शीघ्रतेचे दूत येथें आले, तेव्हां मला फार धास्ती उत्पन्न झाली होती. ह्या दुष्टांच्या संपर्कानें इतर ठिकाणचे लोक जसे बिघडले तसे येथील लोक बिघडतात कीं काय असा धाक कांहीं वेळ उत्पन्न झाला परंतु त्या वेळेस माझ्या नवऱ्यानें मला फार धीर दिला आणि सुदैवानें माझी भीति लौकरच नष्ट झाली. प्रत्येक अधिकाऱ्याजवळ मोटार आली व प्रत्येक ऑफिसला टेलिफोन झाला; प्रत्येकाच्या मनगटावर घड्याळें चमकूं लागलीं व प्रत्येकाच्या खिशाला चिकटलेलीं फाऊंटन पेनें दिसूं लागलीं; ह्या अनन्वित प्रकारांमुळें बापाची विरासत मुलाच्या नांवानें एका पिढींतच मंजूर होऊं लागते कीं काय व लोकमान्यांच्या स्मारकार्थ जमलेल्या सभेंतील रुपयांचे आंकडे एका तपाच्या आंतच वसूल होतात कीं काय अशी धागधुग माझ्या पोटांत उत्पन्न झाली! परंतु ईश्वरी कृपेनें माझ्या ह्या शंका व भीति फार लौकरच नाहींशी झाली. शिक्षणाचा प्रसार झाला व उद्योगाचे दूत वावरूं लागले तरी येथील श्रद्धावान् लोक आपल्या पुरातनच्या दिरंगाईच्या मार्गावरून फारसे च्युत झाले नाहींत!

पूर्वीप्रमाणेंच दुष्काळ संपण्याचीं चिन्हें दिसूं लागण्यापूर्वीं दुष्काळकामें सुरू होत नाहींत व प्लेग पसरण्यापूर्वीं प्लेगप्रतिबंधक उपाय सुरू होत नाहींत. पूर्वीप्रमाणेंच नेमलेल्या तारखेला कोणचीही सभा होत नाहीं व नेमलेल्या वेळेला सभेंत कोणीही येत नाहीं.

महाराज ! ह्याप्रमाणें मी व माझा नवरा येथें आनंदांत रहात अहोंत ! परंतु महाराज ! हें आमचें सुख दुष्ट उद्योगाला देखवत नाहीं असें दिसतें आणि येथेंही त्यानें थोडा आंतून आंतून उपद्रव देण्यास सुरवात केली आहे आणि म्हणूनच वेळींच सावध होऊन हा अर्ज घेऊन मी आपणांकडे आलें आहें, महाराज ! हळूं हळूंच कां होईना परंतु येथें शिक्षणाचा प्रसार होऊं पहात आहे आणि उद्योगाचे दूत येथें राजरोस फिरूं लागले आहेत. शिक्षणाचें महत्त्व लोकांच्या मनावर ठसूं लागलें आहे व येथील लोकहि वर्तमानपत्रें काढूं लागले आहेत. कोठें कोठें सभाही होतात व दीड दमडीचा फंडही जमा होतो. रेव्हेन्यू व न्याय खातें अगदीं वेगळें वेगळें होणार अशा बातम्या आहेत व लेजिस्लेटिव्ह कौंसिलें सुधारणार असेंही म्हणतात ह्याप्रमाणें वातावरण बिघडल्यासारखें दिसतें आहे! ह्यावरून माझे शत्रु '**उद्योग व शीघ्रता**' ह्यांचा गुप्तकट कोठें तरी असला पाहिजे असा जबरदस्त संशय येऊं लागला आहे. तरी महाराज ! न्यायाधीश महाराज ! आपण कृपा करून त्यांचा शोध लावाल आणि ह्या दुष्टांना येथून पळवून लावाल अशी मला पूर्ण आशा आहे. ही माझी नम्र विनंति आहे. कारण ह्यांचें प्राबल्य झाल्यावर मला व माझ्या नवऱ्याला येथून निघूनच जावें लागेल. परंतु न्यायानें मीं येथील वहिवाटदार आहें येथें माझा हक्क ज्यास्त आहे. महाराज, सर्व जग सोडून मीं सध्यां येथें आलेलें आहें आणि येथूनही जर माझी उचलबांगडी झाली तर मीं कोठें जावें ? मला कोण थारा देणार ? तरी महाराज आपण माझ्या दुःखाची कहाणी ऐकून, माझ्या वहिवाटीचा हक्क लक्षांत घ्यावा व माझ्या शत्रूचीं गुप्त चिन्हें दिसतात तोंच त्यास येथून हांकून लावाल अशी मला पूर्ण आशा आहे.

आपली नम्र **दासी,**
'**दिरंगाई ऊर्फ हळुबाई**' भ्रतार '**आळसोबा**'
सहीची निशाणी **आरामखुर्ची**
निजाम विजय, हैद्राबाद.

दारूची बेअब्रू !

प्रायेण धनिनामेव । धनलोभो निरन्तरम् ॥
पश्य कोटिद्वयोपेतं । लक्षाय प्रणतं धनुः ॥ १ ॥

प्रवासांत कधीं कधीं वेळ फार कंटाळवाणा जातो. प्रत्येक स्टेशनावर खाण्याचें पदार्थ तरी पुष्कळ मिळावेत अथवा कोणी तरी रसभरित गप्पा मारण्यास भेटावा तर वेळ सहज निघून जातो, **फिरस्त्यास** एके प्रवासांत **वर्तमान शास्त्री** नांवाचे धारवाडच्या बाजूचे रहाणारे एक जाडे गृहस्थ भेटले होते. बऱ्याचशा गप्पा झाल्या तरी वेळ जाईना. शेवटीं 'न्यायाचा मासला' म्हणून त्यांनीं एक कहाणी सांगितली, ती बोधपर वाटल्यावरून खालीं देत आहें:—

"**आटपाट**" नगरांतील एका "न्यायमंदिर" नांवाच्या इमारतींत मि. **कव्हेशियस मनी मॉगर**, केडेन्शियल म्यॅजिस्ट्रेट समोर श्रीमती **मदिराबाई बेशुद्धे** जहागिरदार **व्यसनाबाद** यांनीं अब्रूनुकसानीबद्दल फिर्याद दाखल केली. **धर्माजीराव पुण्यात्मे, सद्गुणराव, सदाचारपंत प्रामाणिके, ईमानअली व अलीउद्दीन** इ. हिंदु मुसलमान कुटाळांनीं आजकाल माझी अतिशय बेअब्रू चालविलेली आहे. माझ्याबद्दल नाहीं नाहीं त्या कंड्या हे लोक पिकवून चोहोंकडे माझें नांव बदनाम करीत आहेत. माझा व **दारिद्र्याचा** गर्हणीय संबंध आहे व **गुन्ह्यांशीं** माझा चोरटा संबंध आहे अशा कुटाळ्या करून माझ्या नांवाला निष्कारण कालिमा ह्या लोकांनीं लावला आहे. ह्यांत माझ्या इभ्रतीला व अब्रूला बट्टा लागणारा आहे. ह्यासाठीं ह्या लोकांनीं माझी जी बेअब्रू केलेली आहे त्यास योग्य शिक्षा व्हावी, व माझ्या अब्रूचें नुकसान म्हणून दोन कोटी रुपये मला ह्याच्याकडून सरकारनें द्यावेत" अशा आशयाची ती फिर्याद होती. जहागिरदारीण बाईनीं अतोनात पैसे खर्च करून आपल्यातर्फे मोठमोठे वकील व बॅरिस्टर दिले होते. त्यांत मुख्य बॅरिस्टर म्हणजे बॅरिस्टर **ब्रॅंडीशा शॅंपेनशा दारूवाला** व इंग्लंडचे प्रसिद्ध बॅरिस्टर **व्हिस्की** हे फिर्यादीतर्फे काम चालवीत होते. आरोपीतर्फे दोनच वकील हजर होते. **विवेकराव** B. A. LL. B व दुसरे जुने वकील **पंडित सुबुद्धि.**

बॅ. **ब्रॅंडीशा शॅंपेनशा दारूवाला** ह्यांनीं आपल्या अशीलातर्फे फिर्याद मांडली ती अशीः–मुख्य न्यायाधीश महाराज, माझे अशील एक खानदानी, अब्रूदार, उच्चकुलांतील श्रीमंत जहागिरदारीण औरत आहे. ही एक पडदान-

र्शीन कुलीन स्त्री असून आपल्या सरळ व्यवहाराखेरीज इतर भानगडींत जाणारी स्त्री नव्हे. असें असून आरोपी नं. १ धर्माजीराव पुण्यात्मे व नं. २ सदाचारराव प्रामाणिके ह्यांनीं ह्या कुलीन स्त्रीसंबंधानें नसत्या कुटाळ्या सुरू केल्या व बाकीच्या तीन आरोपींनीं त्यांना पूर्णपणें मदत केली. मुख्य न्यायाधिश महाराज! आपण हें लक्ष्यांत घ्यावें कीं माझे अशील एक श्रीमंत व खानदानी कुलांतील आहे. देव व दानव ह्यांनीं ज्या वेळेस समुद्रमंथन करून त्यांतून जीं चवदा रत्नें बाहेर काढलीं त्या रत्नांपैकीं अमोल रत्न **सुरादेवी** अर्थात् माझें अशील आहे.

आपमतलबी देवांनीं 'अमृत' आपल्या जवळ ठेवलें, परंतु दानवांच्या वांट्यास आलेली **सुरा** दानवांनीं उदार अंतःकरणानें **मनुष्यास** दिली. ह्या सुरेपासून मानव जातीचा अतिशय फायदा झाला आहे! मानवांच्या खऱ्या सुधारणेस प्रारंभ **सुरे**पासून झालेला आहे. अशा ह्या खानदानी स्त्रीबद्दल **धर्माजीराव** व **सदाचारपंत** असल्या यःकश्चित मनुष्यांनीं वाटेल ते उद्गार काढावेत व सद्गुणरावांनीं तिची निंदा भर चव्हाठ्यावर करावी हा खरोखर असहनीय अन्याय आहे!

न्यायाधीश महाराज! माझे अशील फक्त उच्च कुलांतील आहे इतकेंच नव्हे, तर तिचें वर्तनही धुतल्या तांदुळाप्रमाणें स्वच्छ आहे! माझें अशील श्रीमंत जहागिरदारीण असून ही फार मर्यादेची आहे. होतां होईल तों ती कोणाच्या दृष्टीस सुद्धां पडत नाहीं! गोषा पडद्याचा रिवाज माझ्या अशीलाप्रमाणें कोणतीहि संभावित स्त्री पाळीत नसेल! श्री मदिराबाई थोरा मोठ्यांच्या घरीं आपल्या महालांतील आंतल्या खोलींत व आंतल्या खोलींतील आंतल्या चोर कपाटांत सदोदित बसलेल्या असतात. त्या उघड्यावर कधींही येत नाहींत! चार सारखे "**ग्लासफ्रेंडस**" असले, तरी पुढचा दरवाजा बंद केल्यावर व खिडक्यांवर पडदे घातल्यावरच आपल्या घरोब्याच्या मंडळीपुढें **मदिराबाई** येतात. **देशी दारूला** इतकी लाजलज्जा नसली तरी तीही सहसा चव्हाठ्यावर उघडी होऊन कधींही मिरवत नाहीं. पिणारा उजव्या हातानें तोंडाला बाटली लावीत असला, तरी आपल्या डाव्या हाताचा अडोसा करतोच करतो! ह्याप्रमाणें माझें अशील कुलीन व बालबोध चालींचें असून आरोपींनीं तिच्यासंबंधानें वाटेल तीं विधानें केलेलीं आहेत.

"श्री. **मदिराबाईचा** व दारिद्र्याचा गर्हणीय संबंध आहे" आरोपींनीं हा घाणेरडा आरोप उघडपणें केलेला आहे. परंतु ह्यास पुरावा काय ?

मदिराबाईचा व **दारिद्र्याचा** संबंध कसा असूं शकल ह्याचा न्यायाधीश महाराजांनीं विचार करावा. मनुष्य दरिद्री होतो त्याला अनेक कारणें आहेत. परंतु दारिद्र्याचा व दारूचा यत्किंचित्ही संबंध नाहीं. दरिद्री मनुष्यास मदिरा आपल्या जवळही येऊं देणार नाहीं. आरोपींना अर्थशास्त्राचें ज्ञान बिलकुल दिसत नाहीं. अर्थशास्त्र असें सांगतें कीं, देश श्रीमंत होण्यास देशांतील माणसांच्या गरजा वाढल्या पाहिजेत. ज्या देशांतील लोकांच्या जितक्या मानानें गरजा वाढलेल्या असतील तितक्या मानानें तो देश श्रीमंत असतो. कारण त्या गरजा भागविण्यास तितकें उत्पादन त्यास करावें लागतें. दारूच्या वाढीबरोबर देश श्रीमंत होतो. आपण देशी दारूचेंच उदाहरण घेऊं. रोज एक बाटली पिणारास आठ आणे लागतात व दोन बाटल्या पिणारास एक रुपाया लागतो. हिंदुस्थानांतील प्रत्येक मनुष्य जर रोज दोन बाटल्या नुसती देशी दारू पीत जाईल, तर रोज ३० कोटी रुपये हिंदुस्थानांत उत्पन्न होत जातील आणि विलायती दारू पीत गेल्यास ह्यापेक्षां कितीतरी पटीनें हिंदुस्थानाची संपत्ति वाढेल. गरजा वाढल्या कीं, त्या भागविण्यासाठीं संपत्तीची उत्पत्ति झालीच पाहिजे, व दारूची गरज जर सर्वेषाम् वाढेल तर प्रत्येक मनुष्य ती गरज भागविण्याचा आटोकाट प्रयत्न करील. अर्थात् देशांत उत्पन्नाचें प्रमाणही वाढेल हें साधें अर्थशास्त्रही आरोपींना माहीत नसावें ह्याचें आश्चर्य वाटतें. आरोपींनीं दुसरें किळसवाणें विधान असें केलेलें आहे कीं, श्री. **मदिराबाईचा** व **गुन्ह्यांचा** चोरटा संबंध आहे. हें विधान तर अत्यंत संतापदायक व कोणाही संभावित मनुष्याची अब्रू घेणारें आहे न्यायाधीश महाराज, आपण विचार करा. गुन्हे कोणच्या स्थितींत होतात ? दारिद्र्यानें गुन्हे वाढत असतात आणि जर दारूच्या प्रसारानें देश ढळढळीत श्रीमंत होत आहे तर दारूनें गुन्हे वाढतात असें म्हणणें सपशेल खोटें व अपमानास्पद नाहीं काय ?

मनुष्य गुन्हा केव्हां व कसा करतो हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. हा एक मानसशास्त्राचा विषय आहे. मनुष्य जेव्हां उदास होतो; निराश होतो व लोभी असतो त्या वेळेस तो गुन्हा करण्यास प्रवृत्त होतो; परंतु सुरादेवीच्या आराधनेनें मनुष्याची वृत्ति आनंदी होते, त्याचा उल्हास वाढतो, त्याचें

औदार्य वाढतें. तो इतका एकाग्र होतो कीं मग बायकांमुलांचीसुद्धां पर्वा करीत नाहीं. हे सद्गुण मदिरेशिवाय जगांत दुर्लभ आहेत, तालिमबाज मनुष्य. एकटाच दुधाची सर्व चरवी आपल्या तोंडास लावील, त्यांतला एक थेंबही दुसऱ्यास देणार नाहीं.परंतु दारू पिणाऱ्या मनुष्याकडून असला कार्पण्य दोष कधींही घडणार नाहीं. दारू पिणाऱ्यास जितके सवंगडे मिळतील तितका त्याचा आनंद वाढतो. ह्या मदिरेच्या आतिथ्यांत एखादी मदिराक्षी असली तर आणखी मजा येतो. पौर्वात्यांत कधींही न दिसणारें स्त्री-दाक्षिण्य मदिरेच्या सेवनानें आपोआप येते ! न्यायाधीश महाराज! आपण विचार करा. स्त्रीदाक्षिण्य, औदार्य, आनंदी व उल्हासी वृत्ति इ. सद्गुण ज्या मदिरेने प्राप्त होतात तिचा व गुन्ह्यांचा संबंध जोडणें म्हणजे अत्यंत दुष्टपणाचें कृत्य आहे ! जाणून बुजून माझ्या अशीलाची बेअब्रू करावी म्हणून आरोपींनीं हीं विधानें केलेलीं आहेत. मदिरेच्या सेवनानें शरीर खराब होतें असेंही आरोपींनीं एक अपमानास्पद विधान केलेलें आहे. परंतु तें खोटें आहे. उलट शरीरप्रकृति सुदृढ होते आणि शरीरावर लाली चढते. शरीरांतील सर्व अवयवांत '**नाक**' प्रधान आहे. हें नाक नेहमीं तरतरीत व वर असलें पाहिजे, ह्या नाकावर मदिरेच्या सेवनानें उत्तम प्रकारची लाली प्राप्त होते ! आणि म्हणूनच दारू पिणाराचें नाक जिवंतपणीं नेहमीं लाल असतें व मेल्यावरही त्यामुळें त्यास 'नाक' म्ह० स्वर्ग प्राप्त होतो ! न्यायाधीश महाराज! माझ्या अशीलाच्या अब्रूस धक्का लावणारीं अशीं खोडसाळपणाचीं अनेक विधानें आरोपींनीं केलेलीं आहेत. वस्तुतः माझ्या अशीलास ह्या संसारांत मुळींच आसक्ती नाहीं. वेदांताचे खरेखुरे विचार कृतींत आणण्याचें सामर्थ्य मदिरेच्या निस्सीम सेवनानेंच प्राप्त होतें. विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे ग विहस्तिनि । शुनि चैवश्वपाकेच पंडिताः समदर्शिनः ॥

हे वेदांताचे अद्वैताचे विचार मनुष्य मदिरासक्त होऊन जेव्हां तो जनावरापेक्षांही जनावर स्वतः होतो तेव्हांच ते कृतींत आले असें समजलें पाहिजे. त्याचप्रमाणें स्वच्छतेची प्रौढी मारणाऱ्या मनुष्यांच्या देहांत काय भरलेलें आहे व जें देहांत भरलेलें आहे तें बाहेरील देहावर पडलें तरी विधिनिषेध बाळगूं नये हें उच्चतत्त्व शिकविण्यासाठींच अनेक माणसांचें मलमूत्र वाहून नेणाऱ्या गटारांत मदिरासक्त मनुष्य कधीं कधीं पडलेला दिसतो ! हें गटारतीर्थ

प्राशन करण्याचें महद्भाग्य खऱ्या खऱ्या मदिराभक्तांसच प्राप्त होतें. न्यायाधीश महाराज कुलीन व अब्रूदार अशा माझ्या अशीलाची नालस्ती सदाचारपंत वगैरे आरोपींनीं चालविलेली आहे.

My Lord, सदाचारपंत धर्मजीराव, ईमान अली, अलिउद्दीन इ. हिंदू मुसलमान आरोपींनीं माझ्या अशीलाची गल्लोगल्लीं बदनामी करावी, केवळ ह्याच उद्देशानें अलीकडे ह्या कुटाळ लोकांनीं "**पिकेटर**" नांवाचे टोळभैरव उत्पन्न केलेले आहेत. हे रिकामटेकडे विद्यार्थी, कॉलेजमध्यें जाऊन मदिराचे घुटके घेत शेक्सूपिअरप्रणीत प्रणयाचें अध्ययन करण्याचें पवित्र काम सोडून सध्या खादीच्या टोप्या घालून दारूच्या गुत्त्याभोंवतीं फिरतात व व्यवहारासंबंधी माझ्या अशीलाकडे येणाऱ्या प्रत्येक मनुष्यावर टेहाळणी करतात व माझ्या अशीलाची बदनामी करतात. ह्यामुळें माझ्या अशीलाचें अतोनात नुकसान होत आहे, भित्र्या माणसावर ह्या खादीच्या टोपीनें सध्यां गैरवाजवी रुबाब टाकलेला आहे. ह्यामुळें माझे अशील भयग्रस्त झालेलें आहे. आणि न्यायाधीश महाराज, ह्याचा वेळींच बंदोबस्त न झाला तर बाटलींतील दारूप्रमाणेंच बंदुकींतील दारू सुद्धां ह्या **खादीच्या टोपीस** भिऊं लागेल ! दारूची निंदा करणारे हे **पिकेटर**, खरे गुन्हेगार आहेत. ह्याच गुन्हेगारांना कैदेंत टाकलें पाहिजे, हिंदुस्थानचे सर्व कैदखाने ज्या वेळेस पिंकेटरांनीं भरून जातील त्याच वेळेस दारूचा व गुन्ह्याचा चोरटा संबंध नसून खादीचा व गुन्ह्याचा मात्र राजरोस संबंध आहे, ही सत्य गोष्ट जगापुढें येईल ! शेवटीं न्यायाधीश महाराज, ह्या दारूपासून दोन कोटींचें उत्पन्न होत असतें, ही एक महत्त्वाची गोष्ट माझ्या अशीलातर्फेची आहे. ह्याचाही जज्जसाहेबांनीं विचार करावा. ह्या सर्वांचा विचार होऊन माझ्या अशीलास न्याय मिळावा हीच प्रार्थना आहे," ह्याप्रमाणें ब्यॉ. **ब्रँडीशा शॅम्पेनशा** दारूवाला ह्यांचें मुद्देसूद व वक्तृत्वपूर्ण भाषण झाल्यावर कोर्टानें फिर्यादीतर्फेचे साक्षीदार **पापनजी पित्रनजी बाटलीवाला वडे, पापडदास, शेव, बोटी, भजीवाला, गुत्तेशा, शराबशा, पीपवाला दगडूजी जमादार,** इ. इ. ह्या मातबर साक्षिदारांच्या साक्षी घेतल्या. "आरोपीनीं श्री. मदिराबाईंच्या अब्रूस बट्टा लागेल अशीं अनेक विधानें आमच्या समक्ष केलीं" असें सर्व साक्षीदारांनीं सांगितलें.

नंतर लोभाजीराव, क्लार्क ऑफ दि कोर्ट ह्यांनीं आरोप वाचून दाखविला व ह्याच्या बचावार्थ तुम्हांस काय सांगावयाचें तें सांगा असें कोर्ट तुम्हांस फर्मा-

वीन आहे असें सांगितलें. आरोपीतर्फेच्या वकीलांनीं फिर्यादीच्या साक्षीदारांची उलट तपासणी करण्याचें नाकारलें कारण उलट तपासणींत आम्हांस उलटी होण्याचा संभव आहे, असें ते म्हणाले. **विवेकराव** वकिलानीं प्रथमतः आपल्या बचावार्थ धर्मशास्त्र, कुराण, बायबल व इतर साधुसंतांचे ग्रंथ पुढें केले. परंतु कोर्टानें हें भारूड पहाण्याचें नाकारलें. नंतर विवेकरावांनीं आरोपींच्यातर्फे इतिहासरावाची साक्ष दिली; त्यास ही साक्ष सर्वस्वी विश्वसनीय नाहीं, अशी **ब्यॉ. व्हिस्कीनीं** हरकत घेतली व कोर्टानींही ती मानली. असें जर आहे तर आम्हांस कोणचाच डिफेन्स देणें नाहीं असें सर्व आरोपींनीं सांगितलें.

कोर्टाचा निकाल.

श्री. मंदिराबाई जहागिरदार व्यसनाबाद ह्यांच्यातर्फे झालेल्या एकंदर साक्षीदारांच्या जबानीवरून व आरोपींनीं जो लंगडा डिफेन्स दिला आहे त्यावरून आरोपी **धर्माजीराव** वगैरे पांच इसमांवर गुन्हा पूर्णपणें शाबीत होत आहे. फिर्यादी श्री. **मंदिराबाई बेशुद्धे** जहागिरदार **व्यसनाबाद** ही एक कुलीन व घरंदाज स्त्री आहे व आरोपींनीं तिच्यासंबंधानें केलेलीं अश्लाघ्य विधानें, निःसंशय कोणाही संभावित स्त्रियेच्या अब्रूस बट्टा लावणारीं आहेत. दारूचें व्यसन वाईट ह्यांत संशय नाहीं. परंतु दोन कोटींचा फायदा दारूपासून होतो ही विचार करण्यासारखी बाब आहे. आरोपींचें विधान दारूचा व दारिद्र्याचा संबंध आहे हें सर्वस्वी खोटें आहे. कारण दारूपासून दोन कोटींचा फायदा सरकारास होत आहे. दारूचा व गुन्ह्याचा चोरटा संबंध आरोपींनीं प्रतिपादन केला आहे त्यासही वस्तुतः आधार नाहीं. कारण दोन कोटी उत्पन्न देणाऱ्या वस्तूंत गुन्हा करण्याचें सामर्थ्य बहुधा नसतें.

मदिरेपासून दुसरेही अनेक तोटे प्रतिपादन करण्यांत आले, ते जरी घटकाभर कबूल केले तरी व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेणें कधींही न्यायाचें होणार नाहीं. त्यांतून ज्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या रक्षणानें **दोन कोटी हें उत्पन्न होतें त्या व्यक्तिस्वातंत्र्यांत न्यायदेवता कधींही हात घालणार नाहीं.** विवेकरावानें आपल्या भाषणांत अमेरिकेचें उदाहरण दिलें आहे. परंतु प्रत्येक देशाचें अर्थशास्त्र निराळें असतें हें लक्षांत ठेवलें पाहिजे. दोन कोटींची किंमत कदाचित् अमेरिकेला नसेल. मदिरेपासून बायकापोरांचे हाल होतात वगैरे किरकोळ गोष्टीही आरोपींतर्फे सांगण्यांत आल्या आहेत, परंतु हा

ज्याचा त्यानें विचार करावा. ह्या बाबतींत जहागिरदारीणबाईचा कोणावर जुलूम नाहीं आणि ज्याअर्थीं दोन कोटींचें उत्पन्न दारूपासून होतें त्याअर्थीं तिच्याकडून जुलूम होणेंही शक्य दिसत नाहीं. दारू वाईट असें जरी सिद्ध झालें असलें तरी दुसऱ्या चांगल्या पेयांत जोंपर्यंत दोन कोटी उत्पन्न देण्याचें सामर्थ्य उत्पन्न होत नाहीं तोंपर्यंत मदिराबाईची अब्रू घेण्याचा कोणासही हक्क पोहोंचत नाहीं. ह्या सर्वांचा **न्यायाच्या** दृष्टीनें विचार करतां हे कोर्ट आरोपींस पूर्ण गुन्हेगार समजत आहे व ह्या अब्रूनुकसानीबद्दल आरोपींनीं दोन कोट रुपये तावडतोब दाखल करावेत. शिवाय इतःपर आरोपींकडून असले गुन्हे होऊं नयेत म्हणून पांचही आरोपींना **नास्तिकपणाच्या जेलमध्यें** ठेवण्यांत यावें असें हें कोर्ट फर्मावितें. "सद्गुणाचा वाली परमेश्वर व दुर्गुणाचा वाली पैसा!!" असें म्हणून शास्त्रीबुवांनीं आपली कथा संपविली. शास्त्रीबुवांनीं ही कोणच्या युगांतली गोष्ट सांगितली कोण जाणे! सध्यां आपल्या ह्या न्यायी युगांत तर असा अन्याय कोठेंही दिसत नाहीं!!

कांहीं कां होईना प्रवासांतील वेळ ह्या गोष्टीनें गेला खरा!

—निजाम विजय, हैद्राबाद.

' जल्से बिदाई ! '

' जल्से बिदाई ' हा उर्दुशब्द इकडील वाचकांच्या पूर्ण परिचयाचा आहे. त्याचा मराठी अर्थ ' गमनोत्सवसमारंभ ' असा करतां येईल. येणाराचें स्वागत करणाऱ्या समारंभास ' स्वागतसमारंभ ' म्हणतात व जाणाराबद्दल आदरदर्शनार्थ जो समारंभ केला जातो त्यास 'गमनोत्सवसमारंभ' म्हणण्यास हरकत नाहीं. ' बिदाई जल्से ' हैद्राबाद शहरापेक्षां जिल्ह्यांतून व तालुक्यांतून जास्त दृष्टीस पडतात. कारण अधिकाऱ्यांच्या बदल्या होतात त्या वेळेसच हे ' जल्से ' बहुधा त्यांच्या हाताखालील लोकांकडून होत असतात आणि ह्या बदल्या हैद्राबादशहरापेक्षां जिल्ह्यांतून व तालुक्यांतूनच जास्त होतात. हैद्राबाद राजधानी ही सरकारी नौकरांच्या मोक्षपटांतील मोक्षाच्या स्थानीं आहे. एखादा अधिकारी अथवा सामान्य नौकरहि एकदां हैद्राबादेस बदलून गेला म्हणजे सहसा तो जिल्ह्यां–तालुक्यांतील मृत्युलोकावर परत येत नाहीं. अर्थात् मृत्युलोकावरील '**बिदाई**' जलशांची मजा हैद्राबादच्या-स्वर्गींच्या अधिकाऱ्यांस फारशी अनुभवास मिळत नाहीं हें त्यांचें एक प्रकारचें दुर्दैवच आहे !

आम्हां हिंदू लोकांत जसे अवताराचे जन्मदिवस व साधुसंतांच्या पुण्यतिथ्या पाळण्यांत येतात तसेंच जिल्ह्या-तालुक्यांस अतिशय वरिष्ठ अधिकाऱ्यांचे स्वागतसमारंभ व स्थानिक अधिकाऱ्यांचे गमनोत्सवसमारंभ करावेत असा सांप्रदाय पडलेला आहे. थोर व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे गमनोत्सवसमारंभ सहसा व्हावयाचें नाहींत व स्थानिक अधिकाऱ्यांचे स्वागतसमारंभहि व्हावयाचे नाहींत. त्यावरून थोरांच्या आगमनाबद्दल व कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या गमनाबद्दल सारखाच आनंद होत असतो असें मात्र कोणीं समजूं नये. थोर अधिकाऱ्यांच्या आगमनानें होणारें दुःख व गैरसोय आनंदप्रदर्शनानें घालवावयाची व स्थानिक अधिकारी बदलून जात असल्यामुळें होणारा आनंद दुःखप्रदर्शनानें दाखवावयाचा अशी ही रूढी पडलेली आहे. अधिकाऱ्यांच्या बदलीनिमित्त होणारे हे ' बिदाई ' जलसे फार उपयुक्त असतात. ते अधिकाऱ्यांच्या दृष्टीनें अशासाठीं उपयुक्त असतात कीं, अधिकाऱ्यांस अत्यंत प्रिय असलेली स्तुति त्यांच्या प्रत्यक्ष कानांस ऐकावयास सांपडते. स्वतःची स्तुति ऐकणें म्हणजे 'ह्याचि देहीं ह्याचि डोळा पाहे मुक्तीचा सोहळा' ह्याप्रमाणें अत्यंत आल्हादाचा प्रसंग. हा प्रसंग कोणचा अधिकारी वांया दवडील ? कित्येक

अधिकाऱ्यांना तर केवळ ह्याच आल्हादक प्रसंगासाठीं वारंवार बदल्या करून घ्याव्याशा वाटतात ! बदलीचा हुकूम आल्याबरोबर आपल्या 'बिदाई जलशा' ची तयारी करण्याच्या खटपटीस प्रवृत्त करण्यास आपल्या हाताखालच्या लोकांस खुषीची सक्ती करण्यासहि ते मागें पुढें पहात नाहींत. सद्‌गुण अंगीं नसले तरी त्यांचें स्तोत्र ऐकण्याची मनुष्याच्या मनांतील-विशेषतः अधिकाऱ्यांच्या मनांतील ही तीव्र जिज्ञासा पाहून जगाच्या शेवटीं केव्हांतरी सद्‌गुणांचाच विजय होणार आहे ही खूणगांठ मनांत बांधण्यास कोणती हरकत आहे ?

हाताखालच्या लोकांच्या दृष्टीनें 'बिदाई' जलसे अशासाठीं उपयुक्त असतात कीं, ह्या निमित्तानें चार दिवस कचेरीच्या कामास सुट्टी घेतां येते. 'चंदा' (वर्गणी)ची 'फेरिस्त' करण्यांत वेळ घालवितां येतो. 'चंदा' वसूल करण्याचा आनंद उपभोगण्यास सांपडतो व जलशाचें सामान आणण्यासाठीं म्हणून कोणा एका दोघांस हैद्राबादेस जाण्यास सांपडतें ! परंतु हे सर्व फायदे क्षुल्लक आहेत. मुख्य फायदा हा कीं, सुखाचें व आनंदाचें संयमन कसें करावें ह्याचें शिक्षण ह्या लोकांना मिळतें ! दुःखाचें संयमन करणें सोपें असते. कनिष्ठ व मध्यमप्रकारच्या नोकरांना दुःखसंयमनाची संवयच झालेली असते. कारण त्यांच्या आयुष्यांत तें नेहमींचेंच असतें व त्याचें त्यांना संयमनच करावें लागतें. परंतु आनंदाचें संयमन कसें करावें हें ह्या लोकांना माहित नसतें. त्यांना आनंदाचे प्रसंग केव्हां येणार ? असेच त्यांच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या तरच ते प्रसंग येणार! आणि त्या आनंदाचें त्यांना तोंडानें तरी संयमनच करावें लागतें. पोटांत आनंदाच्या ऊर्मि येत असल्या तरी ओठानें 'क्या अफसोस है, हमारे सरकारका तबादला हुवा' म्हणून अनेक वेळां बिचाऱ्यांना दुःखोद्गार काढावेच लागतात !

'बिदाई जलसे' बहुधा ठराविक तऱ्हेचेच असतात व ते निर्विघ्न पार पाडण्यास फारसा खटाटोपहि लागत नाहीं. वीसपंचवीस माणसें मावतील एवढी जागा, पांचसहा खुर्च्या, दोनतीन बाकें, एक टेबल, एक दिवा, एक हार, पानसुपारी, अत्तर, सिगारेट, विड्या चहा, व 'एटहोम' चें सामान म्हणजे, बदाम पिस्ते, मनुका, कांहीं फळें, मिठाई, एकदोन स्तुतिपाठक व टाळ्या. एवढें सामान झालें म्हणजे कोणाचाही गमनोत्सवसमारंभ सहज पार पाडतां येतो. देशकाल, व अधिकाऱ्यापरत्वें ह्यांत भर घालावी लागली तर एक फोटोग्राफर व गाणारा 'तायफा' ह्या दोन सजीव मालाची भर पडली कीं अत्यंत थाटाचा बिदाई

जलसा होऊं शकतो. आणि हें सर्व सामान आतां बहुधा प्रत्येक तालुक्याच्या गांवीं मिळूं शकतें. परंतु हें सर्व सामान जरी आपल्या गांवांत मिळत असलें तरी बदलून जाणाऱ्या अधिकाऱ्यांबद्दल खरें प्रेम जर दाखवावयाचें असेल तर बहुतेक सामान हैद्राबादेहून आणणें हेंच श्रेयस्कर असतें. त्यांतच त्या अधिकाऱ्यांचा व जलसा करणाऱ्या मंडळीचाहि आनंद असतो; म्हणून शेंकडा नव्याण्णव **बिदाई** जलशासाठीं कोणास तरी हैद्राबादेस हें जावेंच लागतें व त्यासाठीं वर्गणी दुप्पट द्यावीच लागते. गाणारा 'तायफा' जितक्या लांबून येईल व फुलांचा कमालखानी हार जितका लांब असेल, तितकें अगत्य जास्त दिसतें, ह्याचें कारण उघडच आहे. **तायफ्यांत**, जलसा घेणारा व देणारे ह्या दोघांचीं मनें एकत्रित केलीं जातात व फुलाला संस्कृतांत 'सुमन' हें नांव असल्यामुळें जितका हार लांब तितकीं जास्त मनें अधिकाऱ्यांच्या गळ्यांत अडकविलीं जातात.

एकदां एका अधिकाऱ्याच्या गळ्यांत इतका लांब हार घातला होता कीं बिदाई जलसा संपून तो अधिकारी जाण्यासाठीं मोटारींत बसला तरी त्याच्या गळ्यांतील हाराचा मेरुगुच्छ जलशाच्या जागेवरील त्याच्या खुर्चीवरच लोळत होता! आणि हाताखालच्या लोकांस वांटलें असतें तर त्यांस ओढून अधिकाऱ्याच्या गळ्याला हाराची तांत लावून परत जलशाच्या जागेवर आणतां आलें असतें! हारासंबंधीं कधीं कधीं थोडे गमतीचे प्रकारहि होतात.

एकदां एका तहसिलदाराच्या बिदाई जलशांत एकच हार आणला गेला. आणि आयत्या वेळेला त्या जलशांत दुव्वम व अव्वल तालुकदारसाहेब, मोहतमीम आबपाषी व आणखी कोणी बडे अधिकारी दुसऱ्या गांवाहून अगदीं आयत्या वेळेस आले व ह्या अधिकाऱ्यांना सोडून एकट्या तहसिलदाराच्या गळ्यांत हार कसा घालतां येतो? म्हणून व्यवस्थापक मंडळींतील एका समयसूचकानें एकाच हाराचे चारपांच तुकडे करून चार हार तयार केले. हे हार डोक्यांतून कसे जातील अशी मला भीति पडली होती. परंतु प्रायः डोकीं लहान असल्यामुळें हे हार डोक्यांतून सहज गेले, मात्र वाटेल तें खाण्याच्या व्यवसायामुळें गळे मोठे झालेले होते. म्हणून गळ पट्ट्याप्रमाणें हार गळ्याला मात्र ठीक चिकटून बसले.

व्यवस्थापकांना ह्या गमनोत्सवसमारंभांतील अत्यंत अवघड काम म्हणजे, 'ॲड्रेस' तयार करणें व एकदोन स्तुतिपाठक वक्ते पैदा करणें. त्यांतहि 'ॲड्रेस' सोपा आहे. कारण तो कोणाकडून तरी लिहून घेतां येतो; अथवा तसाच अव

काश असेल तर हैद्राबादेहून कमालखानी हाराबरोबरच आणवितां येतो. आणि अवकाश फारच कमी असेल तर मागील संग्रहित असलेल्या ॲड्रेसमधून एखादा घेऊन त्याचाहि उपयोग करतां येतो. फक्त त्यांच्या पूर्वीच्या अधिकाऱ्याचें नांव चिमट्यानें काढून घेऊन तेथें प्रस्तुत अधिकाऱ्याचें नांव डकवावयाचें! एकदां अशी गम्मत झाली कीं, दुव्वम तालुकदारसाहेबांच्या बदलीचा हुकूम एकदम आला व त्यांना ताबडतोब जावें लागलें. अड्रेस लिहून देणारा कोणीच भेटला नाहीं, परगांवाहून आणविण्याइतकीहि सवड नव्हती, पूर्वीचे 'ॲड्रेस' संग्रहांत नाहींत; अशा पंचाइतींत मीरमुनशीसाहेब सांपडले. ॲड्रेस तर झाला पाहिजे, त्याशिवाय 'बिदाई जल्सा' कसा? शेवटीं आयत्या वेळेला त्यांच्या डोक्यांतून एक शक्कल निघाली. एक महिन्यापूर्वीच तामीरातच्या सब्डिव्हिजनल ऑफिसरची बदली झाली होती व त्यांना दिलेला 'ॲड्रेस' त्यांच्या संग्रहीं होता. तो आणून त्यांतून चिमट्यानें तामीरातच्या मददगारसाहेबाचें नांव काढून टाकून त्या जागीं मददगार तालुकदार उर्फ दुव्वम तालुकदारसाहेबांचें नांव घातलें व 'ॲड्रेस' तयार केला. समारंभाला सुरवात झाली. मीरमुनशी साहेबांनीं ॲड्रेस वाचण्यास सुरुवात केली 'खुषअखलाक' रहमदिल! वस्तीत जरुबा! देरीनामुलाजमत! इन्साफपसंद! इ. इ. सद्गुणांच्या राजरस्त्यावरून 'अड्रेसची' गाडी चालली होती तोंवर असल्या समारंभांतून नेहमीं दिसणारें श्रोत्यांचें औदासिन्य फारसें लयास गेलें नाहीं. परंतु 'अड्रेस मध्यें जेव्हां सडकांची दुरुस्ती,' 'नवीन सडका,' 'नवीन इमारती,' 'तलावाचे कट्टे,' इ. इ. शब्द वारंवार येऊं लागले त्याबरोबर श्रोते तर खडबडलेच परंतु दुव्वमसाहेबहि वांकडी मान करून चष्म्यांतून 'ॲड्रेस' वाचणाराच्या तोंडाकडे आश्चर्यानें पाहूं लागले! आपली ही अज्ञात कारगुजारी पाहून तेहि बिचारे थक्क झाले!

असें असलें तरी स्तुतिपाठक वक्ते शोधून काढण्यापेक्षां 'ॲड्रेसचें' काम सोपेंच असतें. वक्तृत्वावांचून बिदाईजल्सा अगदींच आळणी म्हणून एकदोन तरी वक्ते शोधून काढावेच लागतात. आणि वक्तृत्वाची कला विशेषतः तालुक्यांतून तर कोणालाच अवगत नसतें. अर्थात् कोणच्याहि डिपार्टमेंटमधला बिदाईजल्सा असला तरी ही वक्तृत्वाची माळ एखाद्या मास्तरच्याच गळ्यांत पडते व त्यांतहि एखाद्या मौलवीसाहेबालाच उभें करावें लागतें. हे मास्तर लोक

च त्यांतूनहि मौलवीलोक म्हणजे पहिल्या नंबरचे व्यवहारज्ञानशून्य ! त्यांना बोलतां येत असलें तरी काय बोलावें हें मात्र मुळींच कळत नाहीं ! एका मुन्सफसाहेबांच्या बिदाई जलशामध्यें एक मौलवीसाहेब जे उठले ते मुन्सफसाहेबांच्या सद्गुणांची तारीफ करावयाची तें सोडून त्यांनीं विद्यार्थ्यांस जो उपदेश करावयाचा तोच उपदेश मुन्सफसाहेबांस करण्यास आरंभ केला ! आणि उपदेशाचा विषय ' रुषवत् '(लांच) हाच घेतला ! मुन्सफसाहेब रुषवत् घेत नव्हते हें तर त्यांनीं सांगितलेंच, परंतु दुसरे लोक कसे घेतात वगैरे बरेंच पुराण आपल्या वक्तृत्वांत केलें ! दुसऱ्या एका बिदाई-जलशांत एक मौलवीसाहेब बोलण्यास उभे राहिले. त्यांनीं आरंभ तर चांगला केला. ते म्हणाले * * * साहेबांचा येथून तबादला झाला ही फार दुःखाची गोष्ट आहे. हें दुःख येथें जमलेल्या सर्व लोकांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत आहे. एवढेंच नव्हे तर गांवांतील प्रत्येक मनुष्य आज दुःखी दिसत आहे, आज सर्व जगांत दुःख झालेलें आहे. (म्हणजे हे अधिकारी ज्या गांवीं बदलून जाणार तेथेंहि) आज दगडांत दुःख भरलेलें आहे, मातींत दुःख भरलेलें आहे, ह्या इमारतींतील विटांत दुःख भरलेलें आहे, झाडांत दुःख भरलेलें आहे. शेवटीं ' झाडोंके पत्तों पत्तों में अफसोसकी हवा बहरही हैं ! ' असा त्यांनीं Climax केला ! आणि पुढें ' तबादला ' ही काय वस्तु आहे त्याची Analytical चिकित्सा करण्यास सुरवात केली. मौलाना साहेब म्हणाले, 'तबादला म्हणजे स्थलांतर. ह्या स्थलांतराबद्दल आपणास वाईट कां वाटावें ? हजरात ! ह्या जगांतून आपला तबादला होणारा आहे हें विसरूं नका. साहेबमौसूफचाच काय परंतु आपणां सर्वांचा हा तबादला होणार आहे. कियामतच्या दिवस पर्यंत सर्वांनां कबरस्थानांत अडकून पडावें लागेल. आज मुन्सफ साहेब जात आहे. ' * * * मौलवी साहेबांचें हें वक्तृत्व ऐकून श्रोते मंडळी सर्व घाबरली ! मौलवी साहेबांना खुणा केल्या, इषारे केले, परंतु त्यांचें स्मशानाभिमुख झालेलें वक्तृत्व कांहीं केल्या थांबेना. शेवटीं एकानें जाऊन त्यांच्या कानांत वक्तृत्व थांबविण्याची सूचना केली. त्याबरोबर मौलावी साहेब रागावले. अलीकडे लोकांना धर्माच्या गोष्टी ऐकूं नयेत असें वाटूं लागलें आहे हें इस्लामी धर्माचें दुर्दैव आहे असे उद्गार काढून मौलवी साहेब बिदाई-जलशांतूनच एकदम रागानें निघून गेले. मौलवी साहेब जातांना सर्वांस सुटल्यासारखें झालेंच ! त्या अधिकाऱ्याला तर आपला पुनर्जन्म झाल्यासारखें वाटलें व मागून चार शब्दांत समारंभ समाप्त झाला.

आणखी एके प्रसंगीं अशी गम्मत झाली कीं, मोहतमीम साहेब आबकारीचा बिदाई जलसा होता. सर्वजण जमले. ॲड्रेसही वाचला गेला. आतां कोणी तरी वक्तृत्व करणार ह्या आपेक्षेनें लोक उत्सुक झाले. १०, १५, २० मिनिटें झालीं, तरी शुकशुकाट-स्मशान शांतता ! कोणी कांहीं बोलेना. पुढें काय होणार हेंहि कळेना. दोघांतिघांची आपआपसांत कुजबुज व कानगोष्टी सुरू झाल्या. काय चाललें आहे हें कोणासच कळेना. शिष्टाचार पाळण्यासाठीं सर्व लोक गप्प बसले, शेवटीं एक मौलवी साहेब भाषण करण्यास टेबलाजवळ आले. हे मौ. सा. त्या गांवास अपरिचित असेच होते. त्यांनीं भाषणास सुरवात केली. आरंभ चांगला झाला. परंतु त्यांच्या भाषणांत दुव्वम तालुकदारांच्या तबादल्याबद्दल वारंवार अफसोस जाहिर होऊं लागला, तेव्हां लोकांना फार आश्चर्य वाटलें. तरी एकाचेंहि बोलण्याचें धैर्य होईना. दुव्वम साहेबांचा तबादला केव्हां झाला ह्याचें लोकांना कोडें पडलें. शेवटीं एकानें प्रश्न केला व मौलवी साहेबांस सांगितलें कीं, ' आज जो बिदाई जलसा आहे तो मोहतमीम साहेब आबकारीचा आहे. आमचे लोकप्रिय दुव्वम साहेबांचा नाहीं. ईश्वर त्यांना येथें चिरकाल ठेवो. (आमीन) हें ऐकतांच मौलवी साहेबांच्या लक्षांत त्यांची घोडचूक आली- तरी ते ओशाळले नाहींत. ते म्हणाले हजरत ! मी परगांवचा आहें. मला आयत्या वेळेला बोलण्यास उभे केलें व दुव्वम साहेबांच्या गळ्यांतहि मी हार पाहिला त्यामुळें मला वाटलें त्यांचाच बिदाई जलसा आहे. परंतु आतां हें निश्चित समजा कीं, खुदा ह्यांचा तबादला येथून लौकर करणार नाहीं ! मी मौजिज शाद्री दुव्वम तालुकदार साहेबांची हात जोडून क्षमा मागतों. [टाळ्या.] तरी पण त्यांचे मी आतांपावेतो जे सद्गुण वर्णन केले तेच आमचे खलिक दोस्त मोहतमीम साहेब अबकारी ह्यांच्यांतहि पूर्णपणें आहेत. त्यांचा तबादला व्हावा ह्याबद्दल आम्ही फार दिलगीर आहोंत इ. इ. " मौलवी साहेबांनीं फार सुंदर वक्तृत्व केलें. आणि तालुकदार साहेबांचें गुणवर्णन करतांना त्यांनीं जितकी जिव्हा सैल सोडली होती तितकीच मोहतमीम साहेब अबकारीचें गुणवर्णन करतांनाहि सोडली. व्यक्तिभेदानें त्यांत फरक करण्याचें कारणच नव्हतें ! ह्या बिदाईजलशांत वक्ते ज्याप्रमाणें रंग आणतात तितकेच श्रोतेहि रंग आणतात. कारण वक्त्याच्या जिव्हेंत रंग आणण्याचें सामर्थ्य असतें तर श्रोत्यांच्या हातांत तें सामर्थ्य असतें. ह्याप्रमाणें हातातोंडाच्या गांठीनें बराच रंग येत असतो. सध्यां 'टाळ्यांचें ' स्वातंत्र्य सभेंतील श्रोत्यांना अनिरुद्ध दिलेलें आहे आणि त्याचा दुरुपयोग पुण्यामुंबईसारख्या ठिकाणींहि

कधींकधीं झालेला दृष्टीस पडतो. मग इकडील तालुक्या-जिल्ह्याच्या गांवीं व बिदाई जलशाच्या प्रसंगीं नेहमीं होत असल्यास त्यांत आश्चर्य कसलें ? एका बिदाई जलशाच्या प्रसंगीं खालीं दिल्याप्रमाणें नेमक्या टाळ्या पडल्या.

"अमूक अमूक साहेबमौसूफचा येथून तबादला झाला (टाळ्या) ही फार दुःखाची गोष्ट आहे. (टाळ्या नाहींत.) साहेबमौसूफ येथें फक्त दोनच वर्षें होते, परंतु येवढ्या थोड्या अवकाशांत त्यांचें त्यांच्या अमल्याशीं व रयतेशीं वर्तन फार चांगलें राहिलें ही आनंदाची गोष्ट आहे. (टाळ्या) जगांत सर्वसद्गुणी असा कोण आहे ! असा फक्त एक परवरदिगारच आहे. तसे साहेबमौसूफमध्यें कांहीं दुर्गुण असतील, (टाळ्या) परंतु मी खात्रीनें सांगतों कीं दुर्गुणापेक्षां सद्गुणच जास्त आहेत हें सर्वांच्या प्रत्ययाला आलेंच आहे. इतक्या अवकाशांत हे इतके लोकप्रिय झाले ही फार आश्चर्याची गोष्ट आहे. (टाळ्या) येथें त्यांनीं जसें नांव कमाविलें तसेंच त्यांनीं दुसऱ्या ठिकाणीं नांव कमवावें अशी माझी त्यांना विनंति आहे. ते आम्हांस विसरतील (टाळ्या) परंतु आम्हीं त्यांना कधींहि विसरणार नाहीं (टाळ्या) ते जेथें रहातील तेथें खुप राहोत, आबाद राहोत ! व वारंवार त्यांची बढती होवो हें मी त्या खुदातालाजवळ मागतों.' (व्याख्यान संपल्यामुळें टाळ्या) 'ॲड्रेस' व 'स्पीचेस' संपल्यावर बिदाई जलशांतील क्रमानें शेवटचा परंतु सर्वांच्या मनांत मुख्यतः घोळत असलेला 'ॲटहोम' मधील उपाहार येतो. श्रोत्यांची सर्व धडपड त्यासाठींच असते. 'गायन' व 'ॲटहोम' हे बिदाई जलशाचे प्राण होत. व्यवस्थापक उपाहारासाठीं आंत येण्याची विनंति करतांच शिष्ट व संभावीत मंडळी हळूंहळूं मेव्याचा व फळफळावळीच्या तबकड्या मांडून ठेवलेल्या टेबलाजवळ येतात. त्यांच्यामुळें इतरजनांनाहि संयमन करून हळूहळू यावें लागतें. परंतु हें संयमन फक्त टेबलाजवळ पोहोंचेपर्यंतच असतें. तेथें पोहोंचल्यावर एकदां सुरुवात झाली म्हणजे ज्यांच्यासाठीं हा समारंभ झालेला असतो ते साहेबमौसूफ व कांहीं शिष्ट अधिकारी हे बाजूलाच गप्पा मारीत उभे रहात असले तरी सटरफटर इतरे जन टेबलावरील उपाहारावर इतक्या जोरानें हल्ला करतात कीं, टेबल व त्याच्यावरील मेव्यांनीं व फळांनीं भरलेल्या तबकड्या कोठें कोलमडून खालीं पडतात ह्यांची वारंवार भीति उत्पन्न होते. एकमेकांना ढकलून व एकमेकांच्या हातावर हात टाकून उपाहाराचा सप्पा उडविला जातो ! कित्येकांना उपाहारासाठीं एक हात अपुरा

वाटून दोन्हीं हातांचा, एवढेंच नव्हे तर तोंडाबरोबरच खिशांचाहि उपाहारांतील पदार्थ 'स्वाहा' करण्याकडे उपयोग होतो! ही स्थिति सुरू होतांच शिष्ट लोक तेथून आपला पाय काढतात व ऍटहोमच्या टेबलावर अशिष्ट लोकांचा पूर्ण कबजा होतो. अशी स्थिति प्रायः होत असल्यामुळें व्यवस्थापक लोक ह्या ऍटहोमच्या बाबतींत थोडा गनीमी कावा लढवितात. म्हणजे 'ऍटहोम' साठीं म्हणून जें सामान आणलें जातें त्यापैकीं बराच भाग मागें वगळून ठेवावा लागतो. एका बिदाई-जलशांत तर जें सामान आणलें गेलें, त्यांपैकीं फक्त एक-दशांशच टेबलावर ठेवलें गेलें व नऊ दशांश बाजूला वगळून ठेवलेलें दिसलें. तें माझ्या दृष्टीस पडतांच व्यवस्थापक पेष्कारसाहेब होते त्यांना मी विचारलें अहो! हें इतकें सामान बाजूला कां ठेवलें? ते म्हणाले, 'वाः तुम्ही इंग्रजी शिकलेले असून ह्याचा अर्थ तुमच्या लक्ष्यांत येत नाहीं. तरीहि माझ्या लक्ष्यांत कांहीं येईना. शेवटीं त्यांनीं एका चप्राशास बोलावून, 'यहांसब सामान उठाके मेरे घरकू पोहोंचा देव चलो! घरकू लेजाव, 'ऍटहोम. जलदी' असा निर्वाणीचा हुकूम दिला. त्याबरोबर 'ऍटहोम' चा अर्थ माझ्या चटकन् लक्ष्यांत आला! बिदाई जलशांत तायफांच्या गाण्यांचा गोंधळ रात्रभर चालत असतो. परंतु त्याचें वर्णन करतां येत नाहीं. कारण सध्यां गाण्याचे जलसे बंद करण्याबद्दल सर्क्युलर निघाल्याचें ऐकतों.

विहंगमाला, नांदेड.

गिरसप्पाचा धबधबा

'मिरज' स्टेशनापासून पुढें कानावर कानडी शब्दाचे आघात होऊं लागतात. महाराष्ट्रापेक्षां कर्नाटकांतील लोक बहुभाष असावेतसें वाटतें. निदान रेल्वेच्या डब्यांत तसा अनुभव येतो. डब्यांत बसल्यापासून जी त्यांची कर्णकठोर कुडबुड सुरू होते तीस, बहुधा मुक्काम गांठीपर्यंत खंड पडत नाहीं! **लोंढा** ते **धारवाड** स्टेशनांच्या दरम्यान जी लहान स्टेशनें आहेत तेथें पारधी लोक गव्याचीं शिंगें, फण्या, वगैरे वस्तु विकण्यास आणतात. ती फार सुबक असतात व स्वस्त मिळतात. **हुबळी** शहर बरेंच मोठें आहे. लिंगायत लोकांचा भरणा ज्यास्त, व्यापार चांगला, आम्ही गेलों त्या दिवशीं शहरांत धरपकडीची गडबड चालूच होती. तेथील कॉंग्रेसच्या लोकांनीं आपल्या ऑफिससमोर रस्त्यावर एक बोर्ड ठेऊन त्यावर दिवसांतील धरपकडीच्या बातम्या व पुढील प्रोग्राम प्रसिद्ध करण्याचा क्रम ठेवला होता. तो पहाण्यास तेथें लोकांचा जमाव जमा होई. ही योजना अर्थात् आतां बंद झाली असेल. आम्ही तेथें पोहोंचलों त्या दिवशीं सोमवार होता, गांवापासून मैलभर लांब असलेल्या **सिधराम** मठांत दर सोमवारीं लहानशी जत्रा भरते. ती पहाण्यास गेलों. स्त्रीपुरुषांची दाटी होती. तेथें समाधीशिवाय कांहींच पहाण्यासारखें नव्हतें. **हुबळीस** एक दिवस मुक्काम करून दुसरे दिवशीं जेवून दहा वाजतां **गेरसप्पास** जाण्यासाठीं मोटारींत बसलों. तेथून गेरसप्पा ११० मैल आहे. मोटारभाडें २॥ रु. पडतें. हुबळीहून **शिर्सी** साठ मैल आहे. शिर्सीहून दुसऱ्या मोटारींत बसावें लागतें. शिर्सीपर्यंत सर्व भूभाग आपल्या महाराष्ट्रासारखा आहे. शिर्सीपासून गेरसप्पापर्यंत सारखी दाट झाडी आहे. शिर्सीचीं केळीं प्रसिद्ध आहेत. फार गोड असतात. येथें मुख्य पीक सुपारी व वेलदोड्यांचें आहे. मोटार जसजसी पुढें जाऊं लागली, तसतशी अधिकच दाट झाडी लागली. मोटारीच्या सडकेशिवाय जमिनीचे अस्तित्व आजूबाजूला कोठेंच दिसत नाहीं. झाडें उंचच उंच व एकमेकाला भिडलेलीं असल्यामुळें बऱ्याच ठिकाणीं वरील आकाशहि नजरेस पडत नाहीं. रस्ता उताराचा असल्यामुळें मोटार दाट झाडीच्या खोल गुहेंत कुठें जात आहे कीं काय असेंच वाटतें. झाडें अनेक प्रकारचीं आहेत परंतु मुख्यतः सागवान, सुपारी, नारळ, केळी, नारळांचीं तर बनेंच्या बनें लागतात. मध्यंतरीं एके ठिकाणीं

जंगलसत्याग्रहाचे चौघे जण पकडलें गेले. आम्ही सायंकाळचे पांच वाजतां गेरसप्पाजवळ पोहोंचलों; ह्यासच '**जोग**' **फॉल** असेंहि म्हणतात. धबधब्याला **जोग** हा कानडी शब्द आहे. ज्या नदीच्या पतनानें हा धबधबा जन्मास आला त्या नदीचें नांव **शरावती** आहे. ही तीस मैलांवरून म्हैसूर राज्यांतील एका डोंगरांतून वाहत येते. गेरसप्पाजवळील डोंगराच्या विस्तीर्ण कड्यावरून खालीं पडून पुढें ३०–३२ मैल पश्चिमेकडे वाहत जाऊन **हॉनोवर** येथें ती समुद्रास मिळते. ही पूर्व-पश्चिम वाहिनी आहे. येथें उतरण्यास दोन बंगले आहेत. शरावती नदीच्या अलीकडे ब्रिटिश हद्दींत ब्रिटिश बंगला, व दुसरा नदीच्या पैलतीराला म्हैसूरच्या हद्दींत म्हैसूर–बंगला. ब्रिटिश बंगल्यांत चांगली सोय नाहीं व तेथून देखावाहि पूर्ण दिसत नाहीं. ब्रिटिश बंगला उत्तरेकडील पर्वताच्या शिखराजवळ आहे. म्हैसूर बंगला दक्षिणेच्या पर्वतराजीच्या शिखराजवळ असून जरा खालीं आहे. दोन्ही पर्वतांवर झाडी आहे. आम्ही नदींतून नावेनें पैलतीरास गेलों व तेथून बंगला एक मैलभर आहे तेथें पायींच गेलों. रस्त्यांत एक तरुण व उत्साही विद्यार्थी प्रवाशी मित्र मिळाले हे विद्यार्थी बडोद्याचे प्रसिद्ध माजी दिवाण **सर टी. माधवराव** यांचे नातू मि. रामचंद्रराव M. Sc. झालेले आहेत, बंगलोरची Science Congress पाहून हा धबधबा पहाण्यास एकटेच इकडे आले. ह्यांच्यांत महाराष्ट्रीयत्वाचा अभिमान अद्याप कायम आहे. महाराष्ट्रीय भेटल्यामुळें त्यांना फार आनंद झाला. आम्हां दोघां अभिमानी महाराष्ट्रीयांचें संभाषण मात्र इंग्रजीतच चालू झाले. दोघांनीं मिळून बंगल्यांतील फर्स्टक्लासची खोली घ्यावी असें ठरलें. फर्स्टक्लास खोलीला रोज तीन रुपये भाडें पडतें. ह्या खोल्या धबधब्याजवळ असून प्रशस्त आहेत व आंत टेबलें खुर्च्या, पलंग, आरसे इ. सर्व सुखोपभोगाचीं साधनें असतात. आम्ही दिवे लागणीला बंगल्यांत आलों. अर्थात् आवाजाशिवाय व श्वेतधारांशिवाय त्यावेळेस धबधब्याचें फारसें दृश्य दिसलें नाहीं. दुसऱ्या खोल्यांतूनहि माणसें होतींच. दोघेहि थकलेलों असल्यामुळें जेवण होतांच हांथरुणावर पडलों व भाषण करतांच झोंपीं गेलों. झोंप चांगली गाढ आली. सकाळीं सहा वाजतां धबधब्याच्या धों धों आवाजानें जागे झालों. दरवाजा उघडून बाहेर व्हरांड्यांत येतांच समोर धबधब्याचें नितांतरमणीय असें मनोहर दृश्य दृष्टीस पडलें. धबधब्याच्या चार श्वेतधारा स्पष्ट दिसतात. ज्या कड्यावरून ह्या धारा पडतात तो पूर्वेस आहे. समोरच म्हणजे

उत्तरेस पर्वताची उंच भिंत दिसते व त्याच्यावर ब्रिटिश बंगला धबधब्याच्या पहिल्या धारेजवळ असलेला दिसतो. ह्या पर्वतावरहि बरीच झाडी आहे. आम्ही उतरलों दक्षिण बाजूचा हा बंगला तो पर्वताच्या टोकांच्या बराच खालीं आहे. पर्वताचीं पांच सहा शिखरें व सभोंवतालीं दाट झाडी आणि मध्यभागीं हा बंगला ह्यांकडे पाहिलें म्हणजे गणपति मखरांत बसवावा त्याप्रमाणें म्हैसूर सरकारचा बंगला अत्यंत शोभायमान दिसतो. उत्तर व दक्षिण पर्वतांच्या रांगांमधून खोलच खोल व लांबचलांब दरी आहे. शरावती नदी पूर्वेकडील कड्यावरून खालीं आपटल्यावर ह्या खोल दरींतूनच पश्चिमेकडे वाहत जाते. धबधब्याच्या धारा खालीं आपटल्यावर त्यांच्यातून धुक्यासारखे अथवा धुरासारखे जलकण वायुरूप होऊन वर चढतात व धबधब्याला वेढून घेतात. हा देखावा पहात असतां शौच मुखमार्जनाचीहि आम्हांस शुद्ध राहिली नाहीं! हॉटेलवाल्यानें कॉफीचे कप आमच्यापुढें केल्यावर मग आम्हांस प्रातर्आन्हिकाचें स्मरण झालें। आमच्या मित्रानें कॉफीचा कप रिकामा दिला. त्याचें पाहून आम्हीहि एक घोट घेतला, परंतु लागलीच आम्हांस स्ट्रॉंग कोयनेल मिक्श्चराचा अनुभव आला! तोंड वाईट करून तो कप तसाच त्यांस परत केला. व **टी** आणावयास सांगितलें. '**नो टी प्लीज**' हें उत्तर आलें! ही सूचना आम्हास अगाऊ होतीच म्हणून आम्ही चहाची पूड ठेवलीच होती. व्यसनी मनुष्य इतर कांहीं जरी विसरला तरी आपलें व्यसन विसरणें शक्य नाहीं. नसतां पुढील व्यसनांच्या दुःखाचा ठेवा कमी होणार नाहीं काय? शौचमुखमार्जन स्नान, फराळ इ. लौकर आटोपून आमूलाग्र धबधबा पहाण्यास आम्ही आठ वाजतां सिद्ध झालों. आमचा वाटाड्याहि न बोलावतांच आला. पुस्तकें फोटो विकत घेण्याचा आग्रह करूं लागलो. परंतु आम्ही "चक्षुर्वैसत्यं" वादी लोक त्यांच्या पुस्तकांतील शब्दप्रमाणांची मातब्बरी आम्हांस नको, म्हणून त्यास सांगितलें. धबधबा पहाण्याचीं दोन प्रकरणें आहेत. डोंगर चढून कळसावर जाऊन धबधबा पहाणें व खालीं उतरून धबधब्याच्या पतनस्थळीं जाऊन पहाणें. खालीं उतरणें असेल तर दहाच्या पुढें उतरणें चांगलें, कारण दंव पडून दगडावर निसरडें होतें म्हणून दंव वाळेपर्यंत खालीं उतरूं नये असें आमच्या वाटाड्यानें सांगितलें. अर्थात "आधीं कळस मग पायारे" ह्या निंद्यमार्गाचें अवलंबन आमच्या वाटाड्यानें आम्हांस करावयास लावलें! कळसाकडे वर आम्ही चढूं लागलों. वर चढावयाचें म्हणजे दाट झाडींतच शिरावयाचें. वरचेवर अशी भीति

वाटे कीं, ज्या **वनराजाचा** हा प्रांत असेल, तो आम्हास कुठें भेटतो कीं काय! दुसऱ्याच्या राज्यांत चोरासारखेंच जावें लागतें; परंतु म्हैसूर सरकारची व्यवस्था उत्तम, पाय वाट झाली तरी ती स्वच्छ होती. चढून गेल्यावर टप्याटप्यावर बसण्यासाठीं ठिकठिकाणीं सुंदर लोखंडी कोचें ठेवलेलीं आहेत. कोठेंही बसा, प्रत्येक ठिकाणीं धबधब्याचा निराळाच देखावा दिसतो. पहिलें विश्रांतिस्थान लागलें त्यास **लेडी कर्झन सीट** असें नांव दिलेलें आहे. लेडी कर्झन येथें कधीं आल्याहि नाहींत व बसल्याहि नाहींत; परंतु वर्चस्वाचा प्रभाव अनेक प्रकारांनीं प्रगट होत असतो, त्यांतलाच हा एक लहानसा प्रकार आहे. येवढें खरें कीं येथून देखावा फारच रम्य दिसतो. त्यानंतर बरेंच चढून गेल्यावर **वाणिविलास प्लॉट फार्म** नांवाचें विश्रांतिस्थान दिसतें, पुढें **लक्ष्मीविलास** व सर्वांत वरचा **महाराजा प्लॉट फार्म** आहे. येथें बसून आम्हीं थोडी विश्रान्ति घेतली. आसमंतात जिकडे पहावें तिकडे अतिशय रम्य देखावे दिसतात. धबधब्याचा वरचा भाग पहाण्यास सांपडतो परंतु धबधब्याची सर्वांत मोठी धारा जी Raja Fall **राजा फॉल** तिचा वरचा भाग ब्रिटिश बंगल्याच्या बाजूनेंच सुंदर दिसतो. त्याचें वर्णन पुढें येईल. आम्ही अगदीं डोंगराच्यावर आलों होतों. येथेंहि दाट झाडी आहेच, परंतु सूर्य वर आल्यामुळें कोवळ्या उन्हाचा थोडा लाभ झाला. कितीहि वेळ बसलों तरी डोळ्याची तृप्ति होईना, परंतु मनाला पुढील जिज्ञासेची ओढ असल्यामुळें डोळ्याचा हिरमोड करून आम्ही खालीं उतरलों. उतरून बंगल्यांत बसून थोडा वेळ विश्रान्ति घेतली व अकरा वाजतां अवलोकनाचें दुसरें प्रकरण जें धबधब्याजवळ तळाशीं जाण्याचें, त्यासाठीं कंबर बांधली. हा धबधबा ९९० फुटांवरून खालीं पडतो व आम्हांस सरासरी पांच सहाशें फुट खालीं उतरावयाचें होतें व पुनः तितकेंच चढावयाचें होतें. चारशें फूट उतरण्यास पायऱ्या आहेत, परंतु पुढें मात्र खांचखळग्यांतून व तुटलेल्या दगडांतून उतरावें लागतें. त्यामुळें बऱ्याच ठिकाणीं बसूनच उतरावें लागतें व हातानीं बाजूचा भाग धरावा लागतो. पायांना हाताची गरज लागते. हात क्षत्रिय असले, तरी शूद्र–पायांना मदत करण्यानें आपण शूद्र होऊं असा दुरभिमान त्यावेळेस हातांना उत्पन्न होत नाहीं, कारण जीवनसंरक्षण हेंच त्यावेळेस सर्व अवयवांचें ध्येय असतें व त्यामुळें मोठें जपून उतरावें लागतें. हातापायांत फूट पडल्यास व डोळ्यांनीं त्याकडे दुर्लक्ष्य केल्यास घसरून खोल गर्तेंत खितपत पडण्याची पाळी ठेवलेलीच!

म्हणून आम्ही फार जपून उतरलों. व साडेबारा वाजतां धबधब्याजवळ तळाशीं आलों. जवळ म्हणजे धबधब्यापासून पांच पन्नास यार्ड लांबच उभें रहावें लागलें. कारण खालीं पडल्यावर त्यांतील अभिमानी जलकणांना इतका अपमान वाटतो, व राग येतो कीं, ते जोरानें पुन्हां वर चढण्याचा प्रयत्न करतात ! हे रागवून सैरावैरा धावणारे जलतुषार जरी वर चढूं शकले नाहींत तरी जवळ जाणारांना भिजवून टाकतात ! तळापासून वर धबधब्याकडे पहण्याची कांहीं अपूर्व मजा आहे. ह्या धबधब्याच्या चार प्रचंड धारा आहेत. सर्वांत मोठी धारा जिला **राजाफॉल** म्हणतात ती उत्तरेकडे ब्रिटिश बंगल्याजवळून खालीं पडते. हिचा आकार आठ, दहा हत्तींच्या सोंडा एके ठिकाणी केल्यास जेवढा होईल तेवढा सहज असेल ! येवढा हा जबरदस्त पाण्याचा लोंढा नऊशें फुटांवरून खालीं पडतो ! इतक्या उंचावरून खालीं पडणारा हाच एक धबधबा जगांत आहे असें म्हणतात. ह्यामुळें उगमाची ह्याची रुंदी पसरत पसरत खालीं जाऊन शेवटीं पांढरी स्वच्छ चादर बनते. ह्या प्रचंड धारेस दुसरी जी धारा आहे— जिला Roarer **रोअरर** असें नांव आहे, ती तिच्या मध्यभागीं मिळते. रोअरर कड्याच्या मध्यांतून निघते, ही धारा उंचींत व लठ्ठपणांत पहिल्या धारेपेक्षां लहान असली तरी मूर्ति लहान पण कीर्ति मोठी ह्याप्रमाणें ह्या धारेचा खळखळाट सर्वांत मोठा आहे. ही धारा उगमाला स्वतंत्र असली तरी मध्यावर पहिल्या धारेंत मिळते व त्यामुळें धबधब्याच्या खालचा भाग फारच मोठा होतो ह्या दोन धारांच्या संगमाचें दृश्य अत्यंत चित्ताकर्षक आहे व तें पहाण्यास ब्रिटिश बंगल्याशेजारीं जावें लागतें. तेथें धबधब्याचा वरचा भाग दिसतो. **राजाफॉलच्या** डोक्याजवळच एक पातळ शीला आहे, त्यावर पालथें पडून खालीं डोकावून पाहिलें म्हणजे ह्या दोन धारांचा **खडासंगम** पहाण्यास सांपडतो. तो कधींहि पाहिल्याशिवाय सोडूं नये. पालथें ह्यासाठीं पडावयाचें कीं उभें राहून अथवा बसून खालीं डोकावतांच चक्कर आल्यासारखें वाटतें. पालथें पडूनही बरोबरचा वाटाड्या आपले दोन्ही पाय धरतो, नंतर निर्धास्त डोकें खालीं करतां येतें. हा संगम पहाण्यांत फारच मौज वाटते. अनेक युरोपिअनस् व त्यांच्या लेडीज तास तास पालथे पडून हा देखावा पहातात; त्यामुळें आमच्यासारख्या काळ्या आदमीस बरेंच थांबावें लागतें ! येथें धारांचे जलबिंदू पडतांना अगदीं मोत्यासारखे दिसतात ! असें वाटतें कीं मोत्यांच्या आलेल्या पिकाची चाळणी चालू आहे व दोन मोत्यांच्या प्रचंड

धारा एकमेकांत मिसळत आहेत! ह्या मोत्यांत कधीं सूर्यकिरण परावर्तन पावले म्हणजे मोत्यास अनेक रंग प्राप्त होतात तेव्हांचा देखावा अपूर्व असतो, तो शब्दानें वर्णन करणें शक्य नाहीं! तिसरी धारा पूर्वेकडून कड्याच्या मध्यावरून खालीं पडतें. तीस ROCKET रॉकेट असें इंग्रजी नांव आहे. हिला आरंभीं जरी नाहीं तरी मध्यावर पाठीमागें कड्याचा पाठिंबा मिळतो. हीहि चार, पांच सोंडे इतकी लठ्ठ आहे. चवथी धारा संथपणें वहाते. तीस **लेडी ब्लॉच** असें नांव आहे. हीस वाहते असें म्हणण्याचें कारण हेंच कीं, हिला उगमापासून अखेरपर्यंत कड्याचा पाठिंबा आहे म्हणून हिची गति हळूहळू मृदुमधु अशी आहे. "विनाश्रयेन न शोभन्ते पण्डिता वनिता लताः" ह्या संस्कृत वचनाप्रमाणें ह्या धारेस **लेडी ब्लॉंच** असें नांव दिलेलें आहे. हीं जीं इंग्रजी नांवें दिलेलीं आहेत तीं अर्थात् इंग्रज प्रवाशांनींच दिलीं आहेत. असल्या देखाव्यांचे खरे शोकी तेच. आमचा शोक देखादेखीचा. ह्या वेळेस युरोपियन प्रवाशांची येथें साधारण गर्दीच असते. येतांना कॅमेरे, दुर्बिणी आणण्याचें ते कधीं विसरत नाहींत. निरनिराळ्या ठिकाणांहून हे लोक फोटो घेत असतात. तळाशीं आम्हीं बराच वेळ घालविला व तो कसा गेला हें समजलेंही नाहीं. तळापासून वर धबधब्याकडे पहाण्यांत अत्यंत चित्ताकर्षण होतें. हा नयनमनोहर देखावा किती पाहूं व किती नको असें होऊन जातें. धबधब्याच्या धारा खालीं आपटल्यावर धारांचे जलबिंदू इतके उंच पुनः उड्डाण मारतात कीं ते आतां जणू पुनः वरच जाऊन पोहोंचतील असें वाटतें. कापसांची पिंजणी चालली आहे असें वाटतें. खालीं पडून नंतर उंच उडणाऱ्या जलबिंदूचा नुसता धिंगाणाच फार असतो. त्यांच्या चळवळीला व्यवस्थित स्वरूप येतच नाहीं. उघडच आहे, अधःपात झाल्यावर पुनः उन्नति होणें जवळ जवळ अशक्यच. खालीं पडणें सोपें आहे तितकें वर चढणें सोपें असतें तर काय पाहिजे होते? हे आरंभशूर जलकण जोरानें कांहींसे वर जातात तोंच पुनः खालीं येतात! घसरतांना सर्व एकविचारांनीं घसरले, परंतु चढतांना एकविचार कुठला? हिंदुस्थानांतील लोकांप्रमाणें जेथें एक विचार नको तेथें झाला व जेथें पाहिजे तेथें मुळींच होत नाहीं! घसरतांना त्यांची प्रचंड शक्ती दृष्टोत्पत्तीस पडली! खाली पडल्यावर चढणारा प्रत्येक जलकण हिंदुधर्माच्या शिकवणुकीप्रमाणें फक्त आपल्या एकट्याच्याच आत्मोन्नतीच्या मागें लागतो व धुराप्रमाणें निर्जीव बनून वितळून जातो. सामुदायिक प्रयत्नाची व प्रार्थनेची

जाणीवच त्याला नाहीं. पतित झालेल्या ह्या जलकणांची ही धडपड पाहून पहिल्यानें वाटलेला आनंद नाहींसा होतो. बराच वेळ झाला असें समजल्यावर आम्ही परत जाण्यास निघालों व चढून एका रम्य जागीं पुनः धबधबा पहात बसलों असतांना त्यांतील असंख्य जलबिंदूप्रमाणेंच आमच्या मनांत असंख्य कल्पना आल्या! त्या कोठवर म्हणून सांगाव्यात? पुराणोक्त एखाद्या दुग्धसमुद्राला भरती येऊन त्यांतून तर ह्या प्रचंड धारा पडत नसाव्यात! अथवा आधुनिक एखाद्या प्रचंड गिरणीच्या यंत्रांतून हे कापसाचे हजारो पेळू एकत्रित होऊन तर बाहेर पडत नसावेत! धो धो आवाज सारखा चालूं असतो. भयंकर पतन, व आवाज ह्यांचें साहचर्य पाहून भयाच्या ऐवजीं एकप्रकारच्या आनंदाच्या व सुखाच्याच भावना मनांत उद्भूत होतात. मन ह्या ठिकाणीं सृष्टीशीं समरस होतांना दिसत नाहीं. मनांत उदात्त व गंभीर भावना उत्पन्न होतात. परंतु त्यांत भय नसतें आनंद असतो. धों धों हा सारखा आवाज धबधब्याचा विलाप वाटत नाहीं. आनंदाचें हास्य व ताण्डव वाटतें. धबधब्याच्या धारा इतक्या वेगानें खालीं कां पडतात बरें? काय ही धडपड! केवढी घाई! ही धडपड व ही घाई कशासाठीं! कशासाठीं म्हणजे? स्त्रियांचें प्रेम असेंच जबरदस्त असतें! वयांत आल्यावर त्यांना माहेर गोड कसें वाटणार? आपल्या पितृगृहांतून त्यांना कितीहि जबरदस्त किल्ल्यांत व शीलाशृंखलांतून डांबून ठेवलें असलें, तरी **शरावती नदी**प्रमाणें त्या आपल्या प्रियकराला भेटण्यासाठीं कोणचें साहस करणार नाहींत? हे **शरावती**! आपल्या प्रियकर रत्नाकराला भेटण्यासाठीं तूं केवढें हें साहस केलेंस? अगे, ९९० फुटांच्या कड्यावरून खालीं उडी घेणें म्हणजे केवढें साहस! प्रेमापुढें जीवाची तूं पर्वा केली नाहींस! परंतु समुद्राला त्याचें कांहीं आहे काय? इतक्या उंचावरून उड्या मारून लगबगीनें **शरावतीनें** आपणास आलिंगन दिलें, ह्याचें महत्त्व त्या चवचाल समुद्रास कांहीं तरी आहे काय? त्याच्या सहवासानें तूं आपला गोड स्वभाव मात्र गमावून त्याच्यासारखी खारट झालीस! तुझ्या येवढ्या प्रेमाचें त्यानें काय चीज केलें? **शरावती**, समुद्र तुझ्या प्रेमाला समजो अथवा न समजो, परंतु प्रेमासाठीं तूं केलेलें हें साहस सर्व जगाच्या आनंदाचा व सौख्याचा विषय झालेलें आहे ह्यांत मात्र संशय नाहीं! आतां समजलें. तुझा तो धों धों आवाज विलापरव नसून येवढी उडी घेऊन प्रियकराची भेट घेतां आली म्हणून तुझा तो

आनंदच आहे ! तुझ्या ह्या लग्नासाठीं तो सहस्त्ररश्मिकरही बघ तुला केवढा आहेर आणीत आहे ! केवढा भारी रंगीबेरंगी व जरीचा शालू त्यानें तुला आणला आहे ! प्रवाशांना हा शालू पहावयाचा असेल तर दुपारीं दोनच्या व तीनच्या दरम्यान रोज त्यांना तो दिसेल. सूर्य पूर्वेकडून जसजसा पश्चिमेकडे कलूं लागतो, तसतशीं त्याचीं किरणें ह्या धबधब्यांतून परावर्तन पावून इंद्रधनुष्याच्या सप्त-रंगाचा पटच्या पट धबधब्यास कोणी पांघरण्यास घातला आहे असा भास होतो ! हा देखावा एक तासच असतो. सूर्य ज्यास्त कलला म्हणजे हा देखावा नाहींसा होतो. आहेराचेंच वस्त्र तें! ज्यास्त वेळ कशाला नेसा; म्हणून **शरावती** तें काढून घडी करून पुनः ठेवून देते. ऊदा, नीळा, जांभळा, हिरवा, पिंवळा, नारिंगी व तांबडा अशा सप्तरंगाचा शालू येथें पहाण्यास सांपडतो ! शेवटचे रंग अगदीं जरीसारखे फैलेले दिसतात ! हा नयनमनोहर देखावा आणखी एक दिवस पाहून आम्ही तेथून तिसरे दिवशीं परतलों.

निजामविजय-हैद्राबाद.

धौम-महाबळेश्वर

समुद्रसपाटीवर असलेल्या गोकर्ण महाबळेश्वराचा, समुद्रसपाटीपासून जवळ जवळ पांच हजार फूट उंचीवर असलेल्या महाबळेश्वरांशीं संभ्रम उत्पन्न होऊं नये म्हणून उंचीवरील महाबळेश्वरास धौम-महाबळेश्वर संबोधण्याचा प्रघात आहे. 'धौम' हें एक लहानसें क्षेत्र कृष्णातटाकावर वांईपासून सात मैलांवर आहे. महाबळेश्वराशीं वस्तुतः त्याचा कांहींएक संबंध नाहीं. उंचीवरील महाबळेश्वर हें सध्या उन्हाळ्यामुळें गव्हर्नराचें, सरकारी अधिकाऱ्यांचें व सुखवस्तु श्रीमंत लोकांचें क्षेत्र झालेलें आहे. ह्या क्षेत्रास जाण्यास पुण्यापासूनच चढण सुरू होते. पुण्यापासून वांई, वांईपासून पंचगणी, पंचगणीपासून महाबळेश्वर असा सारखा चढ आहे. महाबळेश्वराच्या देखाव्याच्या आनंदास पुण्यापासूनच सुरवात होते. जसजसें वर चढत जावें, तसतसा चढता आनंद अनुभवास येतो. वर चढूंन खालच्या देखाव्याकडे पाहिल्यानें कां आनंद व्हावा ? हा आनंद व्यापक दृष्टीचा आनंद असतो.

पहाडांच्या नागमोडी सडकेवरून सारखी चढत जाणारी मोटार जसजशी धांवत वर जाते तसतसें खालील डोंगरांच्या कडा, त्यावर दिसणारी वनश्री, मधील रस्ते गांवें घरें, माणसें, जनावरें इ. इ. पदार्थांचें होत असलेलें सूक्ष्म व बारीक स्वरूप पाहून मनास एक प्रकारचा आल्हाद होतो. पुण्यापासून वांईस बरीच चढण आहे, परंतु वांईपासून पांचगणी म्हणजे एक प्रकारची भिंतीचीच चढण वाटते. हा घाट चढतांना डोळे जरी आनंदांत पोहोत असले, तरी मोटार घसरल्यास जीवाची होणारी गच्छंति मनांत आल्याशिवाय रहात नाहीं ! पुण्याहून सकाळीं ८ वाजतांच मोटारी निघतात व त्या महाबळेश्वरास ११-११॥ वाजतां पोहोंचतात. ह्या ७५ मैलांच्या प्रवासास २ रु. ते ३ रु. च्या दरम्यान भाडें पडतें. मोटारींच्या चढाओढीमुळें प्रवाशांचा प्रवास स्वल्पांत, सुखाचा व सोयीचा होतो. आपल्या इकडे अनुभवास येणारा सर्व्हिस मोटारीचा त्रास येथें अनुभवास येत नाहीं. महाबळेश्वराजवळ आपण जसजसें येतों, तसतशा लाल सडका व सडकांच्या दुतर्फा असलेली दाट झाडी दिसूं लागते आणि विशेष जवळ आल्यावर हवाखोरी, व फेरफटका करावयास निघालेल्या स्त्री-पुरुषांचे घोळके नजरेस पडूं लागतात. नेत्रास होणाऱ्या त्या आनंदाबरोबरच गार, व सुखदायी वारा आंगास

स्पर्श करूं लागतो. महाबळेश्वराचें सारें सुख ह्या वाऱ्यांत व खालीं मान करून देखावे पहाण्यांत आहे. मी बरोबर ११॥ वाजतां आपल्या निवासस्थानास पोहोंचलों. एरव्हींच्या प्रवासांत वैशाखांत प्रवासाचा थकवा आंगांतून कपडे काढण्यानें व तोंड, हात पाय धुण्यानें नाहींसा होतो. परंतु येथें मात्र उलट अनुभव आला! गारवा इतका होता कीं अंगांतून कपडे काढण्यापेक्षां अंगांत, बनियन घालावेसें वाटूं लागलें! उघडच आहे. १०० डिग्रीच्या हवामानांतून एकदम ७० डिग्रीच्या हवामानांत आल्यावर कपडे काढण्यापेक्षां अधिक घालावेसे वाटणें साहजिक आहे. आंगातून कपडे काढण्याचा धार्मिक आचार बदललेल्या वातावरणांत व परिस्थितींत कायम ठेवण्यास मनाचें संयमन तर पाहिजेच, परंतु अव्यावहारिकपणाहि पदरांत घेतला पाहिजे! भोजनानंतर थोडी विश्रांति घेतली. ती फारशी घ्यावी लागली नाहीं; लागलीच बाहेर पडण्याची इच्छा उत्पन्न झाली. इच्छेप्रमाणें कार्य घडून येण्यास एखाद्या बाह्य शक्तीचीहि आवश्यता असते. त्याप्रमाणें माझ्या सुदैवानें एक उत्साही, आनंदी, तरुण मि. जगमोहोनदास, तलाठी सबजज्ज राजापूर हे गुजराथी सद्गृहस्थ त्या वेळेस तेथें उपस्थित झाले. त्यांची माझी पूर्व ओळख नव्हती परंतु तेही एकटेच होते. त्यांच्या माझ्या वयांत व उत्साहांत अंतर असलें तरी समविचार व समानशील ह्यामुळें लौकरच आमची चांगलीच ओळख झाली; मी कांहींसा रोगी असल्यामुळें महाबळेश्वरास विश्रांतीसाठीं आलों होतों, परंतु ह्या गृहस्थानें मला फारशी विश्रांति घेऊं दिली नाहीं! आम्ही दोन वाजतांच बाहेर पडलों. कार्य निर्विघ्न पार पडण्यास पूर्वीं कार्यारंभीं आदौ गणपतिपूजन अवश्य असे. परंतु आतां कार्यारंभीं आदौ चहापान अवश्य झालेलें आहे, तें उरकून आम्ही बाहेर पडलों. मि. तलाठी हे येथील वारकरी असल्याचें समजलें. म्हणजे प्रत्येक मे महिन्यांत ते येथें येतात त्यामुळें मला अनायसें एक न्यायाधीश 'गाईड' मिळाला. "तूर्त आपण सबजज्ज नसून मजसारख्या अशक्त मनुष्याचें गाईड आहांत हें विसरूं नका" हें मीं त्यांना आरंभींच बजावलें. "अन्यायानें जाणाऱ्यांना न्यायाचा सरळ मार्ग दाखविणें हें माझें कामच आहे." असें म्हणून त्यांनीं ही कामगिरी आनंदानें कबूलहि केली. ह्यावर मीहि विनोद केला व म्हटलें, तुम्ही न्यायाधीश खरें, परंतु डोळ्यांनीं नसले तरी तुम्ही लोक मनानें आंधळेच असतां. कारण तयार झालेले कागदपत्र, धरून आणलेले साक्षीदार, व वकीलांनीं रचलेलें

वाग्जाल ह्यांनीं तुमच्या आंधळ्या मनास जिकडे धरून न्यावें तिकडे तुम्ही जाणार! ह्यावर "हें जरी कांहीं अंशीं खरें असलें तरी ह्या ठिकाणीं तिन्हींचाहि अभाव असल्यामुळें चूक होण्याचा संभवच नाहीं" असें त्यांनीं उत्तर दिलें. ह्याप्रमाणें विनोदांत आम्हीं मार्गक्रमणास आरंभ केला आज जवळ असलेला **वुईल्सन पॉइंट** पहावा व बाकीचे पॉइंट उद्यां पहावें असें ठरविलें; महाबळेश्वर उन्हाळ्यांतील तीन महिने जरी नंदनवनासारखें असलें, तरी बाकीच्या नऊ महिन्यांत तें काळ्या पाण्यासारखेंच असतें! अर्थात् येथील कायमची दीड दोन हजाराचीच वस्ती. मात्र सीझनमध्यें ती दहा हजारांजवळ जाते. म्हणजे आठ हजार लोक उन्हाळ्यांतील तीन महिन्यांत येथें येतात. सरकारी अधिकारी, संस्थानिक, युरोपियन, पारशी, गुजराथी व्यापारी व इतर सुखवस्तु लोक येथें हवेसाठीं येतात आणि ह्यांना लुबाडण्यासाठीं अनेक प्रकारचे हॉटेलवाले, व्यापारी धंदेवाले, मोटारवाले, तांगेवाले, बग्गीवाले, गौळी इ. इ. अनेक लोक येतात. हवा खाण्यास आलेले लोक रिकामेच असतात, व त्यांच्या खिशांत पैसे खुळखुळत असतात. ह्यामुळें हवा खाण्यास आलेल्या ह्या लोकांस कापडविके, फळवाले, खेळणी विकणारे, वेताच्या नानाप्रकारच्या वस्तू विकणारे, असे अनेक फिरते व्यापारी मधमाशांप्रमाणें वेढून टाकतात! त्यांच्यापासून सुटका होण्यास खात्रीचा उपाय म्हणजे खिशांत एकही पैसा न ठेवणें हाच असतो! आम्ही बाहेर पडतांच एका स्ट्राबेरी, व रासबेरीविक्यानें आमचा पिच्छा पुरविला. ह्या फळांचें बरेंच वर्णन इंग्रजी पुस्तकांत वाचलें होतें म्हणून तीं महाग फळें घेऊन मीं चाखलीं. स्ट्रॉबेरी लाल रंगाची लहानशा सैतूतासारखी रसवंती परंतु आंबट गोड अशी फळें असतात. आपल्या करवंदापेक्षां ह्यांची किंमत ज्यास्त (गुणानें) नाहीं. ही फळें खात खात आम्हीं रस्त्यानें चाललों होतों. आमच्या बरोबर आणखी अनेक लोकहि होते. खावें व हिंडावें हाच बहुधा येथील सर्वांचा व्यवसाय बनतो. त्यामुळें जिकडे पहावें तिकडे स्त्रीपुरुषांचे, लहान लहान मुलांचे घोळके, नजरेस पडतात. एकटे, दोघे, स्त्रीपुरुषांची जोडपी, टेकड्यावर, खालीं झाडींत अशी विखुरलेली दिसतात. ह्यांच्या आंगावर उंची रेशमी वस्त्रांचीं प्रदर्शनें पहाण्यास सांपडतात. परंतु स्त्रियांच्या पोशाखांत, शृंगारांत व नटण्यामुरडण्यांत बराच फरक झालेला दिसतो. एक वेळ असा होता कीं, स्त्रियांचें नखहि दृष्टीस न पडणें हीच उच्च संस्कृति समजली जाई. आज स्त्रियांच्या

शरीराचा जेवढा भाग दृष्टीस पाडतां येईल तितका पाडणें हीच उच्च संस्कृति समजली जाते ! येवढ्या थंडींतहि नवयुतींचेच नव्हे, तर वृद्ध स्त्रियांचेहि दंड, पोटऱ्या, व अर्धवक्षस्थलें नग्न ठेवण्याचा शृंगार पाहून कींव वाटते ! युरोपियनांचें देखादेखी अनुकरण पारशी, गुजराथी व कांहीं दक्षिणी स्त्रियाहि करूं लागल्या आहेत ! हाच प्रकार अव्याहत चालू झाल्यास लौकरच रानटी जातींची नग्नावस्था आपल्या दृष्टीस पडेल असें वाटतें !! हे प्रकार पहात हंसत, खेळत व रमत गमत आम्ही चालत होतों. चालत होतों म्हणण्यापेक्षां, चढत होतों म्हणणेंच खरें; कारण वुईल्सन पॉइंट हें सर्वांत उंच असें सह्याद्रीचें शिखर आहे. चढतां चढतां थकवा आल्यावर थोडा वेळ बसावें, व पुढें चालावें, रस्ता चांगला आहे. परंतु चढण बरीच आहे. रस्त्याच्या दुतर्फा दाट झाडी आहे त्यामुळें आसमंतांतील देखावा फारसा दिसत नाहीं. परंतु वर चढल्यावर ह्याचा वचपा निघतो. वर सपाट असें मैदान आहे. आणि ह्या मैदानावर आणखी एक लहानसें सपाट मैदान आहे ह्या मैदानावर तिन्ही बाजूंस तीन लहान बुरूज बांधलेले आहेत आणि त्या प्रत्येकावर एक एक कोच ठेवलेला आहे. ह्या कोचावर बसतांच समोर जें नयनमनोहर दृश्य दिसतें व सर्व गात्रें आनंदानें पुलकित करून सोडणारा जो गार वारा सुरू होतो तो अनुभवतांच सर्व श्रमांचा परिहार तात्काळ होतो ! सर्व महाबळेश्वर येथून दिसतें. प्रतापगड येथून नजरेस पडतो. खालीं नजर टाकतांच पर्वताच्या राशी व त्यामधील दाट झाडी नजरेस पडते. झाडी इतकी विपुल आहे कीं झाडांचा व वेलींचा सागरच येथें उपस्थित झाला कीं काय असें वाटतें ! तिन्ही बुरुजांवरून निरनिराळे देखावे दिसतात. निसर्गानें उत्पन्न केलेलीं हीं नैसर्गिक चित्रें कितीही पाहिलीं तरी समाधान होत नाहीं. "वाः काय सुंदर देखावा" हे उद्गार आपोआप बाहेर पडतात ! येथील दृश्यांचें कितीहि वर्णन केलें, तरी त्याची यथार्थ कल्पना अनुभवाशिवाय येणार नाहीं. शरीर उंच चढविण्यानें खालील देखाव्याचें जर इतकें सुख होतें, क्षणिक प्राप्त झालेल्या भौतिक विश्वव्यापक दृष्टीनें जर इतका आनंद होतो तर मनाला शाश्वतचे उंच चढविणारे महात्मे किती सुखी व आनंदी असले पाहिजेत बरें ! शरीरास कांहीं काल उंचस्थानीं नेऊन बसविणाऱ्या मोटारी आहेत, परंतु मनाला शाश्वतचें उच्चस्थान प्राप्त होण्यास 'मोटारी' सारखें एकादें सुखसाधन कधीं तरी प्राप्त होईल काय ? मनाला उच्चस्थान प्राप्त होण्यास व विश्वव्यापक दृष्टि येण्यास स्वार्थ-

त्यागाच्या तपश्चर्येचेंच अवलंबन केलें पाहिजे. असे नानाप्रकारचे उच्च, उदात्त व गंभीर विचार माझ्या मनांत उत्पन्न झाले. अनेक कल्पनांची गर्दी उसळली. एखादें लोकप्रिय नाटक पहाण्यास शोकी लोकांची जशी गर्दी उसळते, तद्वत् माझ्या मनांत अनंत कल्पनांची गर्दी उसळली. हें उच्चस्थान सोडूंच नये असें वाटलें. परंतु इतक्यांत आकाशांत चोहींकडून मेघांचें सैन्य जमा होऊं लागलें आणि पहातां पहातां सर्व आकाश त्यांनीं कज्जलमय करून सोडलें! अर्थात् आम्हांस निवासस्थान जवळ करावेसें वाटलें. आम्हीं उठून भराभर खालीं उतरूं लागलों आणि लौकरच मुक्कामास पोहोंचलों. रात्रीं थंडीमुळें बाहेर पडणें शक्यच नव्हतें म्हणून गुरफटून पांघरूण घेऊन लौकरच निद्रावश झालों. दुसरे दिवशीं सकाळचा वेळ जवळच असलेल्या राणीच्या बागेंत व नेटिव्ह जनरल लायब्ररींत घालविला आणि दुपारीं भोजनोत्तर तीन रुपयांस टांगा ठरवून मुख्य मुख्य पॉईंटस पहाण्यांत वेळ घालविला. ब्रह्मारण्य, एलफिन्स्टन, सावित्री, कॅसलरॉक, आर्थर इ. इ. पॉईंटस व जुने महाबळेश्वर क्षेत्र इ. पाहिलीं. ह्या सर्व पाईंटसमध्यें **आर्थर पॉईंट** व **एलफिन्स्टन पाईंट हीं** पहाण्यासारखीं आहेत, विशेषतः मला **एलफिन्स्टन** पॉईंट फार आवडला. ह्या पॉईंटवर उभें राहून खालीं पाहिलें म्हणजे अनन्यसाधारण असा अत्यंत चित्ताकर्षक देखावा दिसतो! पर्वतांच्या रांगांच्या रांगा खालीं भुईसरशी पसरलेल्या दिसतात आणि ह्या रांगा सारख्या–दृष्टीचा टप्पा जेथपर्यंत जातो–त्या क्षितिजापर्यंत सारख्या पसरलेल्या दिसतात. हा जणूं काय पर्वतांचा समुद्र पसरलेला आहे असें वाटतें! डोंगरांच्या कडा व त्यांचीं शिखरें ह्या, त्या, समुद्रावरील लाटांप्रमाणें भासमान होतात. हा देखावा खरोखर फारच अद्भुतरम्य वाटतो! एरव्हीं ज्या डोंगराकडे, व त्यांच्या शिखरांकडे पहावयाचें म्हणजे आम्हांस आमच्या माना उंच कराव्या लागतात व आपली टोपी संभाळून त्यांच्या शिखरांकडे दृष्टि वळवावी लागते ते डोंगर व त्यांचीं तीं शिखरें भुईसरशी पसरलेलीं पहातांच एक प्रकारची गम्मत वाटते. जे मिजासखोर अधिकारी उच्चासनावर बसून लोकांचे मुजरे घेण्याचा दिमाख दाखवितात तेच अधिकारी **आला हजरतांच्या** दरबाराच्या वेळेस आपल्या ढेऱ्यांच्या व्यासाला '**बगलूस**' चा बांध घालून लुटुलुटु पळतांना, व हात जोडून अधोमुख उभे राहतांना पाहून सामान्य दृष्टीला जें एक प्रकारचें चमत्कारिक कुतूहल वाटतें, तेंच कुतूहल ह्या पॉईंटवरून

ह्या डोंगरांची झालेली स्थिति पहाण्यांत वाटतें! ह्या पर्वताच्या श्रेणीमध्यें झाडी फारशी नाहींच. वाळलेलें सोनेरी गवत जेथें तेथें कुठें दिसतें. ह्या डोंगरांच्या ओळीही एकमेकाला लागून असलेल्याच दिसतात. मध्यंतरींचे रस्ते वगैरे कांहीं दिसत नाहींत. आम्हीं पहात होतों ती वेळ सूर्यास्ताची झाली होती त्यामुळें सूर्य-किरण तिरकस पडून ह्या पर्वतांनीं 'धूप छांव 'चें नवीन प्रकारचें एखादें वस्त्रच परिधान केलेलें आहे कीं काय असें वाटे आणि ह्याशिवाय ज्याप्रमाणें अत्यंत सुबक तीन रंगी चित्रांस एखादा मासिककार झिर-झिरीत पातळ कागद देतो त्याप्रमाणें ह्या वेळेस पडलेल्या धुक्यानें ह्या मनोरम चित्रावर निसर्गानें झिरझि-रीत आवरण घातलें कीं काय असेंच भासे. ह्या देखाव्याकडे किती वेळ तरी पहावेसेंच वाटे. ज्या सह्याद्रीच्या डोंगरांनीं व त्यांतून निघणाऱ्या गोदा व कृष्णा ह्या नद्यांनीं शिवाजीचें व ज्ञानेश्वर, रामदासांचें महाराष्ट्र जन्मास आणलें, त्या आवडत्या भूमातेच्या मांडीवर नव्हे तिच्या उराशीं आपण ह्या वेळेस बसलों आहोंत. मातृभूमीनें मला प्रेमानें कवटाळलेंच आहे असा भास सह्याद्रीच्या शिखरावर बसलों असतांना मला झाला! मातृप्रेमाचें अननुभूत असें सुख मीं घटकाभर अनुभवलें परंतु हें किती वेळ? फार थोडा वेळ! लागलीच असा विचार आला कीं, अरे, ह्या माझ्या मातृभूमीसाठीं मीं काय केलें? जिच्या अंगा-वर मी लडिवाळपणानें बसलों त्या माझ्या मायदेशासाठीं मी काय केलें? मला येथें बसण्याचा अधिकारच काय? माझ्या कृति अशा कीं ह्या सह्याद्रीनें अंगावर घेण्यापेक्षां आपल्या कड्याखालीं ढकलून द्यावें! आणि रागानें ती आतां ढकलणारच कीं काय? असाच क्षणभर मला भास झाला! "कुपुत्रो जायेतः क्वचि-दपिचकुमाता नभवति ॥" हें चरण मी विसरलोंच! आणि मि. **तलाठी** बसा, बसा, असा आग्रह करीत असतांनाहि मी विमनस्कपणानें तेथून उठलोंच! अर्थात् त्यांनाहि उठावें लागलें. ह्यापुढें ब्रह्मारण्य, सावित्रीपॉइंट, **क्यासलरॉक, आर्थर-पॉइंट** इ. दृष्टिरम्य देखावे आम्हीं पाहिलें हे देखावे पहातांना गंभीर उदात्त, उच्च व पवित्र अशा वातावरणांत आपण वावरत आहोंत असें वाटे. **आर्थरपॉइंट** थोडा भयंकर आहे. अगदीं पर्वताच्या निमुळत्या कडांवर उभे रहावें लागतें. झोंक जाऊं नये म्हणून लोखंडाचे गज लावलेले आहेत. येथील देखावा एलफिन्स्टन पॉइंट-सारखाच आहे; परंतु येथें पर्वतांच्या रांगांमधील जमीन, घरे, रस्ते, सावित्री नदी, इ. दिसतात. येथेंहि आम्ही थोडा वेळ बसलों, परंतु मागून २५-३० माणसांचा

घोळका आल्यामुळें आम्हांस तेथून उठावें लागलें. कारण जागा फारच लहान. तेथून आम्ही परतलों ते थेट क्षेत्र महाबळेश्वरास उतरलों. हें अगदींच लहानसें स्थान आहे. तेथें कृष्णा नदीच्या उगमाचें स्थान पहाण्यास देवळांत जावें लागतें आणि तेथून खालीं भुयारांत उतरावें लागतें. येथून पांच नद्यांचा उगम आहे असें तेथील ब्राह्मण सांगतो. परंतु मुख्यतः कृष्णा नदीचा उगम दिसतो. हा उगम पाहिल्यावर महाबळेश्वराचें देऊळ पाहिलें. शिवाचें दर्शन घेतलें. ह्या देवळांतून बाहेर आल्यावर एक जुनें लहानसें हेमाडपंती देऊळ दिसलें. ते **अतिबळेश्वराचें देऊळ** म्हणून सांगण्यांत आलें. हें **महाबळेश्वर** व **अतिबळेश्वर** सध्या आम्हांसंबंधीं निर्बळेश्वर कसें झालें ह्याचाहि खेद झाला ! निवासस्थानांत परत येण्यास सायंकाळचे ७॥ वाजले. पाय बरेच दुखूं लागले म्हणून जेवण आटोपून आम्ही गप्पा मारीत निद्रावश झालों. महाबळेश्वरास आठ दिवस मुक्काम झाला. रोज निरनिराळे पॉइंट पहात होतों. वर वर्णन केलेल्या पॉइंटापेक्षां विशेष पहाण्यासारखें कांहीं नाहीं. बहुतेक आठवडा फिरण्यांत, फणसाचे गरे, स्ट्रॉबेरी, करवंदें, आंबे इ. फळें खाण्यांत केव्हांच निघून गेला. नंतर मि. **तलाठी** कोल्हापुरास गेले, व मी वांईस मुक्काम केला आणि पाहिजे असलेली विश्रान्ति येथें दोन दिवसांत घेतली. वाईची हवा फारच आल्हादक वाटली. येथील देवळें व प्राज्ञपाठशाळा पहाण्यासारखी आहेत. तेथें दोन दिवसांत कीर्तनेंहि ऐकण्यास सांपडलीं. येथून पुण्यास मुक्काम झाला. तेथें वसंत व्याख्यान मालेंतील दोन चार पुष्पांचा सुवास घेतला, श्री. **अत्र्यांचें** विडंबनप्रचूर व हास्यरसोत्पादक नवीन " साष्टांग नमस्कार " हें नाटक पाहिलें. ह्याप्रमाणें उत्तमोत्तम देखावे, आल्हादकारी हवा, सुश्राव्य कीर्तनें, विद्वत्ताप्रचुर व्याख्यानें, हास्यरसाची नाटकें, देशोद्धाराच्या चळवळी अशा अनेक प्रकारच्या बोधप्रद व मनोरंजक अशा शुद्ध पक्षांतून निघून जेथें देखावे नाहींत, व्याख्यानें नाहींत, कीर्तनें नाहींत, वर्तमानपत्रें नाहींत, चळवळी नाहींत अशा वद्यपक्षांत दाखल झालों !

निजाम-विजय हैद्राबाद,

पंढरपूर.

महाराष्ट्रांत जन्मास आल्यानंतर, ज्ञानेश्वर, तुकारामादि साधुसंतांचे ग्रंथ वाचल्यानंतर, व भागवत धर्माचा इतिहास अवगत झाल्यानंतर जर एखाद्याच्या मनांत एखादी उत्कट जिज्ञासा उत्पन्न होत असेल तर ती हीच कीं ह्या भागवत धर्माची प्रख्यात राजधानी जें **पंढरपूर** क्षेत्र तें एकदां डोळ्यांनीं पहावें, व तेंही आषाढी–कार्तिकीच्या गर्दींत पहावयास सांपडावें. अशा प्रकारची जिज्ञासा माझ्या मनांत बरेच दिवसांपासून उत्पन्न झाली होती, परंतु अनेक कारणांमुळें गत कार्तिकी एकादशीपर्यंत ती तृप्त होऊं शकली नाहीं. शके १८५३ च्या कार्तिक शुद्ध एकादशीस मात्र ती तृप्त झाली व त्याच दिवशीं **विठोबारायाचें** दर्शन घडलें ! ह्या विठोबांच्या व पंढरपूरच्या दर्शनानें जे विचार मनांत उद्भवले त्याचें शब्दचित्र अल्पांशानें चित्रित करण्याचें आज योजिलें आहे. वाचकांस ह्यांत नवीन असें कांहींच आढळणार नाहीं हें मी जाणून आहें. परंतु नाम-माहात्म्य ज्याच्या अंतःकरणांत ठसलेलें आहे, त्यांना नवीनाची अपेक्षाच नसावी अथवा नामाच्या प्रत्येक वेळच्या उच्चारांत प्रत्येक वेळेस नवीन गोडी त्यांना अनुभवास येते हाहि अनुभव भक्तजनांस आहेच. कांहीं नसलें तरी भजन-माहात्म्याच्या दृष्टीनें हा प्रयत्न व्यर्थ जाणार नाहीं अशी आशा आहे.

आमच्या गांवापासून पंढरपूर क्षेत्रापर्यंत १२५ मैल आम्हीं ' मोटार 'नेंच प्रवास केला. बरोबर एकदोन समविचारी नसले, तरी समवयस्क मित्रहि मिळाले. कार्तिक महिना लहानमोठ्या कोणत्याहि प्रवासास अत्युत्तम काल होय. पावसाळा संपलेला असतो व तीव्र हिवाळा अद्याप लागलेला नसतो. हरिततृणां कुरांनीं, अनेक धान्याच्या नवनवांकुरांनीं व विविध पुष्पांनीं तसेंच स्थळीं स्थळीं नद्या, नाले, ओढे, जलाशय इ. भरलेलीं असल्यामुळें भूपृष्ठभागावर जिकडे नजर जाईल, तिकडे पृथ्वीदेवता टवटवीत झालेली दिसते. मोटारीचें वाहन द्रुतगामी असल्यामुळें सृष्टीच्या सौंदर्याचा मोहकपणा नजरेस पडतो व तद्द्वारां अंतःकरणाची प्रसन्नता शतगुणित वाढते. आमची मोटार सृष्टिसौंदर्यांतील एका अत्यंत मोहक भागांतून धावत होती. त्यामुळें १२५ मैलांचा हा प्रवास फारच आल्हादक झाला. शिवाय सर्व्हिस मोटार असली तरी तिनें आमच्या

ह्या अल्प काळाच्या आल्हाददायक प्रवासांत आपल्या नेहमींच्या दुर्गुणांनीं व्यत्यय आणला नाहीं. ह्याबद्दलहि मोटारचालकांचे आभार मानणें अगत्याचें आहे. पंढरपूर १५।२० मैल असेल तोंच निरनिराळ्या रस्त्यांतून "**पुंडलीक वरदे हारि विठ्ठल**" ह्या प्रेमळ शब्दांचे गजर आमच्या कानावर येऊं लागले, व पादचारी, मोटारींतून, बैलगाड्यांतून, घोड्यावरून व सायकलीवरून असे असंख्यात लोक पंढरपुराकडे जात असलेले दिसले. हातांत भगवे झेंडे व टाळ मृदंग घेतलेले असे अनेक लोक दृष्टीस पडूं लागले. आमची मोटार पंढरपुराजवळ आली तीं देवळाचीं शिखरें, व चंद्रकोरी सारखी अर्धवर्तुळ झालेली **चंद्रभागा** आमच्या दृष्टीस पडली. मोटारींतून आम्ही जेथें उतरलों तेथून पंढरपूरचें जें अपूर्व दृश्य दिसलें त्यांनीं अवर्णनीय आनंद झाला. **चंद्रभागानदी** पंढरपूर क्षेत्राच्या गळ्यांत अडकवलेली मोठी चांदीच्या सरीसारखी दिसली! प्रथमतः नदीवर आलों. व पुलावरून शहरांत पायींच जाऊं लागलों. त्या वेळेस सकाळचे आठ ८ वाजलेले होते. चंद्रभागेच्या तीरावर लोकांची गर्दी झालेली होती. स्त्री, पुरुष बाल वृद्ध असंख्य लोक स्नानें करीत होते व वस्त्र धूत होते व नेसत होते व तोंडानें साधुसंतांचें भजन चालूं होतें व तेथून शहरांत पुढें जसजसे आम्ही जाऊं लागलों तसतशी माणसांची गर्दी अतोनात वाढूं लागली, आम्हास ज्या मुक्कामावर उतरावयाचें होतें तें स्थान गांठण्यास पुढें इतकी माणसांची दाटी झाली कीं आम्हांस आमच्या पायापेक्षां हाताच्या बलाचाच जास्त उपयोग झाला. पाय मिळेल त्या अवकाशांत पाऊल टाकीत होते. आणि दोन्ही हात गर्दी बाजूला करण्यांत गढलेले होते. डोळे ह्या प्रचंड मनुष्यसमुदायांतील लोकांचें विविधरूप व विविध वस्त्रप्रावरणें पहाण्यांत गर्क झाले होते व कानावर '**विठ्ठल**' नामाचा गजर पडत होता. अशा आनंदमय वातावरणांत आमचा पादचारी प्रवास संपून आम्ही मुक्कामावर पोहोंचलों. आषाढी, कार्तिकीच्या यात्रेस पंढरपूरास आल्यावर मुख्यतः **विठोबारायाच्या** दर्शनाचा प्रश्न उत्पन्न होतो हें दर्शन कसें होईल हेंच कोडें ज्याच्या त्याच्या पुढें पडतें त्यावेळेस बाहेर गांवचा पांच सहा लाख मनुष्यसमुदाय जमतो, व प्रत्येकास विशेषतः एकादशीच्या दिवशीच दर्शन घेण्याची उत्सुकता लागलेली असते; नव्हे त्याचसाठीं ते शेंकडों मैलांवरून आलेले असतात. देऊळ जरी मोठें असलें तरी विठोबाराय ज्यांत उभे आहेत, ती खोली अगदीं लहान आहे.

अशा स्थितींत सर्वांना दर्शन व्हावयाचें म्हणजे दोन चार माणसें चेंगरूनहि तें सुलभ व शक्य नाहीं. आणि पूर्वी अशीच स्थिति होती म्हणतात, परंतु सध्यांची व्यवस्था जेवढी चांगली करणें शक्य तेवढी केलेली आहे. बारीबारीनें प्रत्येकास दर्शन व्हावें ह्यासाठीं देवळांतील महाद्वारांतून दोन-तीनशें माणसें सोडणें व त्यांतही बायकांनंतर पुरुष व पुरुषांनंतर बायका आळीपाळीनें सोडणें, आणि देवळांत प्रवेश झाल्यानंतर ओळीनें एका पाठीमागें एक अशी कतार लाऊन एक एकास विठोबाच्या मंदिरांत सोडणें व तेथेंही तो ज्यास्त वेळ उभा राहूं नये म्हणून 'त्यांस बाहेर काढून देण्यासाठीं एक दोन गलेलठ्ठ बडवे सिद्ध असणें, विठोबा रुखमाई व इतर देव ह्यांचें दर्शन भराभर घेऊन बाहेर निघण्याची घाई केली जात असल्यामुळें दक्षिणेचाहि यात्रेकरूस फारसा त्रास न होणें, ह्या एकंदर व्यवस्थेमुळें दर्शन सुकर झालें आहे. ह्या व्यवस्थेंत जर दोष असेल तर तो एवढाच कीं, बाऱ्यांतील जागेंत दोन-चारशें जणांना चार चार तास कोंडून घ्यावें लागतें, तेव्हां कोठें **बारी** सुटते व पुनः दुसरी भरते. अर्थात् पुरुषांच्या व बायकांच्या बाऱ्या कोंडण्याच्या जागा वेगळ्या असतात. परंतु हा दोष अपरिहार्य असा आहे. प्रतिष्ठित लोकांना ह्या बाऱ्यांतून कोंडून घेण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून, ज्याचें उत्पन्न महिन्याला दोनशें रुपयांच्या वर आहे अशा लोकांना '**पास**' देऊन निराळ्या दरवाजानें सोडण्याची व दर्शनाची निराळी व्यवस्था कमिटीनें केलेली आहे. परंतु ह्या पासाचीहि संख्या इतकी वाढते कीं त्यांनाही दोन दोनशेंप्रमाणें निराळ्या जागेंत कोंडून घेऊन बसावेंच लागतें. व बारीप्रमाणें दर्शन घ्यावें लागतें. फरक एवढाच कीं फार वेळ तिष्ठत बसावें लागत नाहीं. ओळख, व शिफारस ह्यांचा ज्यास्त उपयोग व्हावा हेंहि साहजिक असेंच आहे. आम्हांलाहि एक दिवसाच्या प्रयत्नानंतर पास मिळाले, व एकादशीच्या संध्याकाळीं ८ वाजतां आमचें दर्शन झालें व बारींत विशेष म्हणजे एक तासापेक्षां ज्यास्त तिष्ठत न बसतां दर्शन झालें म्हणून विशेष आनंद वाटला !

देऊळ प्रशस्त व प्रेक्षणीय आहे. परंतु गर्दीमुळें, व लौकर बाहेर पडण्यामुळें, त्याचें यथार्थ वर्णन वाचकांस देतां येईल इतकें हें देऊळ आम्हांस पहातां आलें नाहीं. बाहेर देवळाभोंवतीं तर अतीशयच गर्दी होती व एकंदर पंढरपूर शहरांतील रस्त्यांवरूनहि गर्दीच गर्दी दिसत होती. देवळाची प्रदक्षिणा, आणि नगर-

प्रदक्षिणा अनेक लोकांची व दिंड्यांचीं चालू होती. त्यांतच रथाचीहि मिरवणूक निघाली. खारकांचा व बुक्क्यांचा वर्षाव चालू होता. अनेक ठिकाणच्या दिंड्या, पालख्या, भजनसमुदाय, टाळ मृदंग, व, पताका घेऊन भजन करीत रात्रंदिवस सारखे उभे राहिलेले अनेक लोक दिसत होते. पंढरपुरास नव्या, जुन्या साधुसंतांचे अनेक लहान मोठे मठ आहेत आणि या सर्व मठांतून यात्रेकरूंस उतरण्याची सोय उत्तम असते. कित्येक मठांतून रहाण्यास जागा तर फुकट मिळतेच परंतु अन्नहि फुकट मिळतें. ह्या सर्व मठांत आम्हांस **गाडगे** बुवाच्या मठांतील स्वच्छता, व्यवस्था व टापटीप विशेष प्रेक्षणीय वाटली. ठिकठिकाणीं पाट्या लावलेल्या दिसल्या. हा मठ स्टेशनच्या रस्त्याला एका विस्तीर्ण जागेंत तीन मजली बांधलेला आहे व अनेक शोभिवंत रंग दिलेले आहेत. **गाडगे** बुवा ही एक पहाण्यासारखी व्यक्ति आहे. चित्रविचित्र चिंध्यांचा पायजमा व कोट ह्यांच्या अंगांत सदोदित चढविलेला असतो. हे जातीनें धोबी असून ह्यांच्या वाणींत विनोद बराच असतो. **वंकट**बुवांचाहि एक मठ पहाण्यासारखा आहे. तेथील बुवा ज्ञानेश्वरीचें निरूपण चांगलें करतात. गांवाबाहेर दोन मैलांवर 'गोपाळपुराचें' एक प्रशस्त व विस्तीर्ण देऊळ आहे तेंही पहाण्यासारखें आहे. पंढरपुरासच गेल्यावर तेथील **बालहत्याप्रतिबंधक गृह** आणि **अनाथ बालकाश्रम** पाहिल्याशिवाय कोणी येऊं नये. येथील व्यवस्थाहि चांगली आहे. गेल्या वर्षी ह्या संस्थेंत १२९ स्त्रिया दाखल केल्या गेल्या. पैकीं ४१ ब्राह्मण व ८८ विधवा ! ह्यांवरून ह्या संस्थेचा उपयुक्तपणा आतां कोणासहि पटण्यासारखा आहे. साधुसंतांचे जे मठ आहेत त्यांतून निरूपण चाललें असतें. परंतु ह्या मठांतील निरूपणापेक्षां वाळवंटांतील निरूपण प्रेक्षणीय असतें. कार्तिक मासांतील पिठासारख्या स्वच्छ, व शितल चांदण्यांत, **चंद्रभागे**च्या वाळवंटांत ठिकठिकाणीं भजनाचे व निरूपणाचे समुदाय येथून तेथून पसरलेले दिसतात. ह्या प्रत्येक समुदायांतून पेट्रोम्यॉक्सचे दिवे ठायीं ठायीं लावलेले, शोभायमान दिसतात ! हजारों लोक रात्रभर भजनांत व निरूपण ऐकण्यांत व **हरिजागर** करण्यांत सबंध रात्र घालवितात. सर्व वाळवंट ह्या वेळेस माणसांनीं फुलून गेलेलें दिसतें मनुष्यसमुदाय एवढा प्रचंड असतो कीं, जणूं काय वाळूच्या कणागणिक तेथें मनुष्य असतो कीं काय असाच भास होतो ! निरूपण करणारे ब्राह्मणच असतात असें नव्हे तर धोबी, न्हावी, लोहार, वाणी, कुणबी, असे नानाजातींतील व धंद्यांतील

'बुवा' भगवद्भजन व निरूपण करीत असतात. उलट आम्ही ज्यांचीं नांवें टिपलीं त्यांत एकहि ब्राह्मण आढळला नाहीं. हिंदुस्थानांतील इतर कोणच्याही यात्रेंतून असा उद्बोधक देखावा दिसत नाहीं. चार पांच दिवस 'पंढरी' **हरी** नामाच्या गजरानें दुमदुमून जातें !

येवढा हा पांच सहा लाख लोकांचा जनसमुदाय बाहेरगांवाहून येतो, परंतु वर्णनीय गोष्ट ही कीं त्या मानानें तेथील म्युनिसिपालिटी आपल्या शहरास मुळींच गलिच्छ होऊं देत नाहीं. मुख्यतः पाण्याची स्वच्छता व Disinfection चांगलें राखलें जातें. नळाच्या पाण्याचें फिल्टर तर उत्तम आहेच परंतु सर्व सार्वजनिक पाणवठ्यांवर व खाणावळींतून पोटॅश-पर-म्यांग्नेनेट दर रोज पाण्यांत टाकण्यांत येतें. इतक्या प्रचंड लोकांची शेतखान्यांची व्यवस्थाहि उत्तम केलेली आहे. चंद्रभागेचें पाणी दूषित होऊं नये म्हणून विशेष व खास खबरदारी घेतली जाते. येवढ्या प्रचंड यात्रेंतहि रोज दोन्ही वेळ मोठमोठाले रस्ते व गल्ल्या झाडल्या जातात. मुत्र्यांतून व सडकेवर जेथें जेथें मूत्राची खूण दिसेल तेथें तेथें उजाडण्याचे आंत पावडर टाकली जाते. सफाईची प्रशंसनीय व्यवस्था ठेवली जाते. ह्याशिवाय जर एखादी संशयित कॉलऱ्यांची केस आढळल्यास **आयसोलेशन** हॉस्पिटलमध्यें तावडतोब पाठविण्यांत येतें. हें हॉस्पिटल पहाण्यासारखें आहे. येथें शें दोनशें बीमार राहाण्याची व त्यांच्या इलाजाची खास व विशेष सोय केलेली आहे. आज तारखेपर्यंत ह्या रोगासंबंधीं जेवढें संशोधन झालेलें आहे, त्याचा पूर्ण उपयोग करून घेण्यांत येथील म्युनिसिपालिटीनें बिलकुल कसूर केलेली नाहीं. अशा ह्या उत्तम व्यवस्थेमुळें अलिकडे प्रायः यात्रेच्या वेळेस विशेषतः कार्तिकांत येथें कॉलऱ्याची मुळींच भीति राहिलेली नाहीं असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. त्या यात्रेंत व एरव्हीं पंढरपुरास जीं दुकानें असतात तीं कुंकू, बुक्का, तुळशीच्या माळा, गोपीचंदन सहाणा, चंदन, भजनी पुस्तकें, मिठाई व खेळणीं ह्यांचीच विशेष गर्दी झालेली असते.

पंढरपूर व तेथील यात्रा पाहिल्यावर, नवशिक्षित मनुष्याच्या डोक्यांत हटकून जो विचार येतो तो हा कीं, येवढे अठरा पगड जातीचे लोक इतके लांबून इतके कष्ट सहन करून, येवढा खर्च सोसून दर वर्षीं एकदां दोनदां निव्वळ विठोबाच्या दर्शनास येतात, तें कां ? प्रेमानें अगदीं गहिंवरून व नेत्र आर्द्र, करून मोठ्या भक्तियुक्त अंतःकरणानें हे लोक विठोबाचें कडकडून

दर्शन घेतात ! एक कुणबी, यंदा त्यांस एकादशीच्या दिवशीं विठोबारायाचें दर्शन होऊं शकलें नाहीं म्हणून खळखळून आमच्यासमोर रडला ! आज तीस वर्षांत माझें एकादशीचें दर्शन कधीं चुकलें नाहीं, तें यंदा चुकलें म्हणून त्यास खरोखर अतोनात वाईट वाटलें ! अशीच स्थिति आणखी कित्यकांची दिसली. येवढी भक्ति कां उत्पन्न व्हावी ? ही कशी उत्पन्न होते ? दर्शनासाठीं ते प्राणसमर्पण करण्यासही मागें पुढें पाहणार नाहींत असें आम्हांस आढळून आलें. ही सारी अंध श्रद्धाच काय ? गम्मत ही कीं, ही श्रद्धा दिवसमानाप्रमाणें कमी व्हावी परंतु अद्यापि तरी ती कमी झालेली दिसत नाहीं. मानवी मनाचे पापुद्रे उलगडण्याचा प्रयत्न केल्यास ह्या भक्तींत मग ती अंध असो अथवा कशीही असो, एक प्रचंड **आत्मबल** दृग्गोचर होतें. आमच्या प्राचीन मराठी कवि व साधुसंतांनीं लावलेलें हें झाड आहे. आणि तें तसेंच बळकट, विस्तृत व फलद्रूप झालेलें आहे. **रानडे** म्हणतात मराठी कवि, व साधुसंतांनीं मराठी राज्याचा पाया घातला. **राजवाडे** म्हणतात ह्या टाळकुट्यांनीं मराठी राज्याची इमारत ढांसळून टाकली ! ह्या दोन इतिहासज्ञांपैकीं राजवाडे इतिहासाचार्य व कळकळीचे देशभक्त खरे, परंतु त्यांचा ह्या भगवद्भक्तांवरील आरोप फार कठोर वाटतो ! साध्याभोळ्या भक्तजनांच्या सद्गुणांनीं राज्य ढांसळून टाकण्याचें महत्कार्य घडेल असें मनाला मानवत नाहीं, ही गोष्ट तरी विचारवंतांना कबूल करावी लागेल कीं मराठी कवि व साधुसंतांच्या शिकवणीनें समाजांत एकवेळ माजलेली विषमता घालवून टाकली असली पाहिजे. जन्मानें, जातीनें, धनानें, धंद्यानें, विद्येनें इ. अनेक कारणांनीं उत्पन्न होणारें समाजांतील वैषम्य घालवून टाकण्याचा यशस्वी प्रयत्न आमच्या मराठी कवींनीं व साधुसंतांनीं केला. ब्राह्मण केवळ जन्मानें मोठा ही समजूत नाहींशी केली, संस्कृतांतलें ज्ञान मराठींत आणून त्या ज्ञानाला चिकटून असलेला अहंकार घालवून टाकला. अहंकारास करन्टें बनविलें ! भक्तीचा सर्व सुलभ मार्ग सर्वांस दाखवून व शिकवून **वैकुंठपेठ** सर्वांस, शूद्रातिशूद्रासहि मोकळी केली. भक्तीवांचून असणारें ज्ञान कसें वांझोटें असतें हें त्यांनीं सिद्ध केलें. **ज्ञानावांचून असलेली भक्ति तारील; परंतु भक्तीवांचून असलेलें ज्ञान तारूं शकत नाहीं**. हें त्यांनीं प्रचीतीस आणून दिलें. 'बुद्धी', 'भावने' शिवाय नेहमीं लंगडी होच त्यांची शिकवण असली तरी

अणु रेणूपासूनि, ब्रह्मांडीं भरला। तो म्यां देखीला वीटेवरि ॥
स्थावर जंगम भरूनि उरला। तो म्यां देखीला पंढरीये ॥
वेदशास्त्र पुराणें, गाति जयासाठीं। तो पुंडलिका पाठी उभा राहे ॥
वेडावल्या श्रुति न कळे म्हणती। तो उभा श्रीपती वाळुवरी ॥
गोविंदा तूं जळ मी तेथें कल्लोळ। असो सर्व काळ ऐक्य सूखें ॥
तूं बिंब मी तेज तूं हेतू मी काज। व्यापक तूं पूज्य पूजन मी ॥
अणुचा वियोग, नसे तुम्हां आम्हां। अजि मेघश्यामा सोडूं नको ॥

इ. इ. हजारों अभंगांतून सर्व ज्ञानांतील श्रेष्ठ जें वेदांत ज्ञान, त्यांतील प्रमेयें साधुसंतांनीं सुलभ भाषेंत सर्वतोमुखीं केलीं! ज्ञानभक्तीचें ऐक्य केलें ह्याशिवाय

जे कां रंजले गांजले। त्यासि म्हणे जो आपुलें।
तोचि साधु ओळखावा। देव तेथेंचि जाणावा ॥

अशा आपल्या प्रासादिक वाणीनें अत्युच्च नीतितत्त्वांचा प्रसार त्यांनीं श्रेष्ठ-कनिष्ठ सर्व जातींतून केला व भक्तीच्या बळावर सर्वांचें ऐक्य केलें. ही केवढी कामगिरी केली! नसता नामदेव शिंपी, तुकयावाणी, रोहिदास चांभार, सांवता माळी, सेना न्हावी, चोखामेळा महार, गोरा कुंभार इ. जन्मानें व धंद्यानें कनिष्ठ मानलेल्या जातींत सर्वांस वंदनीय असे संत कधींतरी झाले असते काय! आहार, मैथुन इ. **स्वाभाविक धर्म** व कामक्रोधादि **स्वाभाविक विकार** ह्यांत **गुरफटून, स्वार्थी झालेल्या मनुष्यसमाजास पाशवी वृत्तींतून सोडवून मनुष्यजातीच्या उद्धारासाठींच त्यांच्यांत उच्चवृत्ती उत्पन्न करण्यास राजाचा कायदा सर्वदा** व **सर्वस्वी केव्हांच समर्थ नसतो**, तर **मानवी मनांत ईश्वराचें अस्तित्व** व **त्यांवरील श्रद्धा जेणेंकरून बळावेल असें शिक्षणच मानवी समाजास नीतिप्रवर्तक, सदाचारी, स्वार्थत्यागी** व **सद्गुणी बनवूं शकतें** व **त्या योगानेंच समाजांत सुख, शांति,** व **समाधान नांदते क्रोडोपती एखादा मारवाडी एखाद्या भणंगभिक्षुक ब्राह्मणास पहातांच त्याच्या पायां पडतो** व **त्याचा आशीर्वाद घेतो हा देखावा हिंदुस्थानाशिवाय अन्य कोणच्या देशांत दिसेल?** अशा हिंदुस्थानांत Capitalists व Labourer

'धनाढ्य' व 'भिकारडे' हे भेद आतांपावेतों उत्पन्न होऊं शकले नाहींत व तज्जनित अत्याचार व अशांतताहि उत्पन्न झाली नाहीं. हा केवळ आमच्या धर्माच्या व साधुसंतांच्या शिकवणीचा परिणाम नाहीं असें कोण म्हणेल? तात्पर्य भागवतधर्मानें व आमच्या मराठी साधुसंतांच्या शिकवणीनें महाराष्ट्रीय समाज–खालच्या थरापासून वरच्या थरापर्यंतचा सर्व समाज–सद्गुणी, सुशील, बाळबोध सन्मार्गवर्ती, व भक्तिवान बनला व कांहीं शतकें त्यांनीं शांतीचें व समाधानाचें परमोच्च सुख अनुभवलें व पारलौकिक, परमश्रेष्ठ स्थान पटकावलें ह्यांत तिळमात्र संशय नाहीं.

निजाम-विजय, हैद्राबाद.

दक्षिण हैद्राबाद–महाराष्ट्र वाङ्मय मंडळातर्फे
प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें.

माझीं फुलें

गुच्छ १ ला.

लेखक. श्री. वा. गाडगीळ

ह्यांत उत्कृष्ट भावगीतें आहेत. ह्या पुस्तकास पुणें येथील दक्षिणा प्राईझ कमिटीनें व इंदूर येथील ग्रंथोत्तेजक मंडळानें बक्षिस दिलें असून तें मुंबई इलाखा व वऱ्हाड मध्यप्रांत सरकारनें दुय्यम शाळांतील वाचनालयासाठींही मंजूर केलें आहे.

किंमत दहा आणे.

जानकी काव्य

ले. श्री. सी. ग. मानाठकर M. A.

हें एक सुंदर सामाजिक खंडकाव्य असून निरनिराळ्या नियतकालिकांनीं त्यावर उत्तम अभिप्राय दिले आहेत.

संकल्पित पुस्तक

माझीं फुलें

गुच्छ दुसरा.

लौकरच प्रसिद्ध होईल.